**(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड. उषा दराडे)**

**पृ.शी.**: रोजगार हमी योजनेची ठोस अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने करावयाची उपाय योजना

**मु.शी.**: रोजगार हमी योजनेची ठोस अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने करावयाची उपाय योजना यासंबंधी सर्वश्री एस. क्यू. जमा, हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, विनायक मेटे, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री अरुण गुजराथी, भाई जगताप, ॲड. उषाताई दराडे, सर्वश्री उल्हास पवार, रमेश शेंडगे, मोहन जोशी, प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, राजन तेली यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु)

**तालिका सभापती** : मंत्री महोदयांनी आता नियम 260 अन्वये प्रस्तावावरील उत्तराचे भाषण सुरु करावे.

डॉ. नितीन राऊत (रोजगार हमी योजना मंत्री) : सभापती महोदय, मागील आठवडयात माननीय सदस्य श्री. एस. क्यू. जमा यांनी नियम 260 अन्वये एका अतिशय चांगल्या विषयावरील चर्चेला सुरुवात केली होती. त्या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन आपले विचार व्यक्त केले होते. विशेष करुन माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी, माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, माननीय सदस्य श्री. हेमंत टकले, माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे, माननीय सदस्य श्री.विनोद तावडे, माननीय सदस्य प्रा. दिलीप सोनवणे, माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले आणि माननीय सदस्य श्री. मनीष जैन यांनी राज्याच्या ग्रामीण अर्थ व्यवस्थेमध्ये महत्वपूर्ण ठरणाऱ्या रोजगार हमी योजनेबाबत आपले कळकळीचे मत प्रदर्शित केले. त्याबद्दल मी सर्व प्रथम सर्व सन्माननीय सदस्यांना मन:पूर्वक धन्यवाद देतो व त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, मला आठवते की, विदर्भाचे सुपुत्र आणि या राज्याचे दिवंगत मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक साहेब असतांना 1972 साली या राज्यामध्ये भीषण दुष्काळ पडला होता, अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील आमच्या भावंडांना आणि भगिनींना एक वेळचे जेवण तरी मिळावे, त्यांच्या हाताला काम मिळावे व त्यामधून त्यांना रोजगार मिळावा म्हणून या सभागृहाचे माजी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ D/

डॉ. नितीन राऊत...

सभापती व मार्गदर्शक नेते माननीय कै. वि. स. पागे यांनी दिनांक 1 मे 1972 रोजी या सभागृहामध्ये रोजगार हमी योजनेचा प्रस्ताव मांडला व तो मंजूर करण्यात आला. त्या निमित्ताने या राज्यामध्ये केवळ रोजगार उपलब्ध होणार नाही तर त्या माध्यमातून रोजगाराचे फार मोठे ॲसेट्स निर्माण होऊन लोकांना मोठया प्रमाणात कामे उपलब्ध होऊ शकतात अशाप्रकारची ही योजना राज्यापुढे मांडण्यात आली. त्यानंतर 1977 साली या राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य रोजगार हमी योजना कायदा अस्तित्वात आला.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत . . . .

त्यानुसार प्रत्येकाला 100 दिवसाचे काम देऊ आणि त्याअंतर्गत वैयक्तिक लाभाची कामे सुध्दा पूर्ण करु अशा पध्दतीने ही योजना सुरु केली. आज या योजनेला 39 वर्षे पूर्ण झालेली आहे आणि जर आपण 39 वर्षातील कामाचा आलेख विचारात धेतला तर या माध्यमातून आपण अनेक भागामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम केले असून, अनेक गरजू लोकांना रोजगार उपलब्ध करुन दिलेले आहेत. तसेच बरीच कामे देखील केलेली आहेत आणि त्या माध्यमातून फार मोठा ॲसेट निर्माण केलेला आहे. तसेच काही वैयक्तिक लाभाच्या उदाहरणार्थ शेततळ्यांच्या योजना, सिंचन विहिरीच्या योजना, पडीक जमिनीचा विकास, फलोत्पादन, सामाजिक वनीकरण इ.योजना हाती घेण्यात आल्या आहेत. त्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये आपण मोलाचे योगदान दिलेले आहे.

सभापती महोदय, मी याठिकाणी नमूद करु इच्छितो की, काँग्रेस पक्षाच्या अधिवेशनाच्या वेळी विचारमंथनाच्या अनुषंगाने बैठक होत असताना आमच्या यु.पी.ए.च्या नेत्या आणि काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा माननीय श्रीमती सोनिया गांधी यांच्यासमोर महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी राज्याचा एक इनोव्हेटीव्ह प्रोग्रॅम मांडला आणि त्याबाबत चर्चा होऊन, माननीय पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग यांनी तो स्वीकारला.त्यानंतर 2005 मध्ये देशात "नरेगा" म्हणजे महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु करण्यात आली. त्या माध्यमातून संपूर्ण देशात गरीबी आणि दारिद्र्य निर्मूलनाची कामे मोठया प्रमाणात लागू करण्यात आली. त्या माध्यमातून देशातील बेरोजगार, शेतकरी, शेतमजूर यांना रोजगार उपलब्ध करुन देत असतानाच दुसरीकडे त्यांची आर्थिक स्थिती बळकट करण्याच्या दृष्टीकोनातून देखील फार मोठे काम करण्यात आले आहे. ही गोष्ट खरी आहे की, आपल्या राज्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत येणारा खर्च हा इतर राज्यांमध्ये होणाऱ्या खर्चाच्या तुलनेमध्ये कमी आहे अशी सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.ज़मा आणि इतर सन्माननीय सदस्यांनी खंत व्यक्त केली. आंध्र प्रदेश, कर्नाटक, मध्य प्रदेश, राजस्थान, पश्चिम बंगाल, बिहार इ.राज्यांनी फार मोठ्या प्रमाणात खर्च करुन ती राज्ये आघाडीवर आहेत. परंतु आपल्या राज्याची ही योजना फाऊंडेशन आहे आणि असे असताना आपण याबाबत मागे का राहिलो आहोत ? परंतु प्रत्यक्षात चित्र पाहिले तर मला असे सांगावेसे वाटते की, आपण अजिबात मागे नाही तर पुढे आहोत. पण आपण योजनेसाठी जो खर्च करतो, तो कशा पध्दतीने होतो, याकडे आपण अनेकदा दुर्लक्ष करतो. आपल्या राज्यात दोन्ही योजना एकाचवेळी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत . . . .

सुरु होत्या. त्या योजनेअंतर्गत एनआर-ईजीएसमध्ये 2008-2009 च्या दरम्यान 361.54 कोटी रुपयांची कामे केली. 2009-2010 मध्ये 321.09 कोटी रुपयांची कामे केली आणि 2010-2011 मध्ये 300 कोटी रुपयांचे काम केलेले आहे. त्याच दरम्यान स्टेट ईजीएस मध्ये पाहिले तर 2008-2009 मध्ये 613.07 कोटी, 2009-2010 मध्ये 792.79 कोटी आणि 2010-2011 मध्ये 550 कोटी असे एकूण 850 कोटी रुपयांची कामे आपल्याला राज्यात केलेली आहेत. हे सांगत असताना मला येथे नमूद करावेसे वाटते की, याठिकाणी अनेक गोष्टी झालेल्या असताना सुध्दा आपण आपल्या कामाचा आलेख कमी होऊ दिलेला नाही, तो पुढे-पुढे जात आहे. काही गोष्टींबद्दल बऱ्याच आमच्या सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, अमुक-अमुक गोष्टी येथे होत नाहीत.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नितीन राऊत....

सभापती महोदय, मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, आज महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येचे प्रमाण अंदाजे 45 टक्के असून हे प्रमाण उपरोल्लेखित राज्याच्या नगरी लोकसंख्येपेक्षा आपल्याकडे बरेच अधिक आहे. महाराष्ट्रात औद्योगिक विकास या राज्यांच्या तुलनेत अधिक आहे. तसेच महाराष्ट्र शेती क्षेत्रात सुध्दा या राज्याच्या तुलनेत अधिक प्रगत असे राज्य आहे. या सर्व कारणामुळे महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील बेरोजगार व्यक्तिंना रोजगाराच्या चांगल्या संधी मोठया प्रमाणात उपलब्ध होतात, त्यामुळेच राज्यातील ग्रामीण भागातील बेरोजगार व्यक्ती या योजनेकडे कमी प्रमाणात वळताना दिसत आहेत. शहरीकरण झाल्यामुळे ग्रामीण भागातील मुले शिक्षणासाठी शहरात येऊन रहातात, त्यामुळे ग्रामीण भागातील लोंढे शहराकडे वळताना दिसतात. सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य शासनाची परंपरागत रोजगार हमी योजना बंद न करता ती सुरु ठेऊन त्या माध्यमातून नवीन पध्दतीची कामे देता येतील काय, याबाबत राज्य शासन विचार करीत आहे. हा विचार करीत असताना बऱ्याच नवीन गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. तो विचार या ठिकाणी मांडताना मला नेहमी असे वाटते की, कोरडवाहू शेती, पावसावर अवलंबून असलेली शेती, पारंपारिक पिके, भरड धान्य पिकविणाऱ्या शेतकऱ्याला, गावातील गरीब मजुराला, भूमिहीन शेत मजुराला, अल्पभूधारक शेतकऱ्याला, शेतमजुराला रोजगार हमी योजना हा आज शेवटचा जगण्याचा पर्याय आहे. त्या मजुराला हा पर्याय अधिकार म्हणून मिळालेला आहे. हा अधिकार मजुराला मिळण्यासाठी जी व्यवस्था उभी करण्याची आवश्यकता आहे, ती व्यवस्था कदापिही या राज्यात फक्त कागदावर राहणार नाही, तर ती व्यवस्था प्रत्यक्षात खालच्या स्तरापर्यंत नेण्यात येईल.

सभापती महोदय, मला महात्मा गांधींचे एक वचन आठवते. ते नेहमी असे म्हणायचे की, "या देशाचा विकास साधावयाचा असेल तर तो विकास या देशाच्या शेवटच्या नागरिकाच्या घरापर्यंत पोहचला पाहिजे". त्या दृष्टिकोनातून बेरोजगारांना आणि शेतमजुरांना मागणीप्रमाणे काम मिळाले पाहिजे. कामाचे दाम वेळेवर कसे मिळतील, ते मिळत असताना त्याला ते रोखीने कसे मिळतील, याचा विचार करण्यात आलेला आहे. आज नरेगाच्या अधिनियमातंर्गत पोस्टाच्या माध्यमातून बँकांच्या माध्यमातून मजुरी देण्यात येते. बऱ्याच वेळा मजुरी मिळत नाही असे मजुराला वाटते आणि बऱ्याचवेळा मजुरी मिळण्यास उशीर होतो. यासंदर्भात रिझर्व बँकेचे जे नियम आहेत,





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नितीन राऊत....

त्यानुसार बिझनेस करस्पॉन्डन्स मॉडेल सुरु केलेले आहे. तसेच खाजगी बिझनेस करस्पॉन्डन्स एजन्सी सुध्दा आहे. त्या माध्यमातून शासन निर्णय घेत आहे आणि तो निर्णय लवकरच अमलात येईल. व्यवस्थापन पध्दतीत, पारदर्शकता आणि तक्रार निवारणाचे अधिक महत्व आहे. त्यामुळे जवळपास 17 ठिकाणी तक्रार निवारण अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. मंत्रालयात सुध्दा एक कक्ष तयार करण्यात येत आहे. एक टोल-फ्री नंबर तसेच वेब-साईट दिल्यानंतर लोकांनी त्यांच्या तक्रारी एस.एम.एस.च्या माध्यमातून टोल-फ्री नंबरवर किंवा वेब-साईटवर पाठविल्या तर त्याची सोडवणूक करण्यात येईल. लोकल लेव्हलवर ज्या तक्रारी येतील, त्या तक्रार निवारणाच्या माध्यमातून सोडविण्याचे काम शासन करील. हे काम करीत असताना अलीकडच्या काळात अत्यंत पारदर्शकता ठेवण्याची गरज आहे. ती पारदर्शकता ठेवण्याच्या कामी शासन कुठेही कमी पडणार नाही, हे सुध्दा मला या ठिकाणी नमूद करावयाचे आहे.

राज्य शासन काही गोष्टींचा निर्णय घेणार आहे. रोहयोतील कामाच्या अंमलबजावणी संबंधीच्या प्रक्रियेचे योग्य पध्दतीने संगणकीकरण करणे, बिझनेस करस्पॉन्डन्समार्फत मजुरीचे वाटप करणे, अंमलबजावणीची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थाकडे कशी देता येईल या संबंधीचा निर्णय करणे, अंमलबजावणीतील सर्व घटकांचे नियमितपणे प्रशिक्षण कसे करता येईल, या संबंधी सुध्दा योग्य पध्दतीने विचार करण्यात येईल. कुशल आणि अकुशल कामांच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी विचार मांडताना सांगितले की, 80 आणि 20 टक्के कामाच्या रेश्योमध्ये बदल केला पाहिजे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नितीन राऊत ......

परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, हे सर्व अधिकार आम्ही ग्रामपंचायतींना दिलेले आहेत. ग्रामपंचायतींनी आपली प्रायोरिटी ठरवावयाची आहे. ती प्रायोरिटी ठरवित असताना त्यांनी जर रस्त्याच्या बाबतीत प्रायोरिटी ठरविली, त्यांनी जर जलसंधारणाच्या बाबतीत प्रायोरिटी ठरविली तर ती सुध्दा आम्हाला मान्य आहे. त्यामुळे 80:20 असा रेश्यो नाही. या संबंधीचा जी.आर. 4 मार्च, 2010 ला काढलेला आहे. परंतु त्या ठिकाणी ही कामे करीत असताना राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रत्येक कामामध्ये 60:40 असे प्रमाण ठेवावयाचे आहे, असे जे समजले जाते तो एक गैरसमज आहे. तो गैरसमज दूर केला पाहिजे. यामध्ये तसे नसून ग्रामपंचायत, तालुका, जिल्हा पातळीवर कसेही करुन 60:40 प्रमाण आले पाहिजे. त्या ठिकाणी गावामध्येच 60:40 प्रमाणे काम केले पाहिजे असे कंपल्शन नाही. परंतु ही कामे करीत असताना रेश्यो मेन्टेन होईल या पध्दतीने काम केले तर चांगल्या पध्दतीचे काम आपल्याला करता येतील. हे सगळे करीत असताना मजुरांना काम उपलब्ध करुन देणे, मजूर उपस्थिती, मजुरीचे वाटप इत्यादी महत्वाच्या बाबींमध्ये आम्ही ग्रामसभेला मोलाचे महत्व दिलेले आहे.

सभापती महोदय, स्वर्गीय राजीव गांधी हे आपल्या देशाचे नेते होते तसेच पंतप्रधान होते. त्यांचे असे म्हणणे होते की, गावातील माणूस सुखी झाला पाहिजे, तो आनंदी राहिला पाहिजे. त्यामुळे गावाला महत्व देत असताना राज्यामध्ये आणि देशामध्ये पंचायती राज व्यवस्था आली आणि 50 टक्के कामे ग्रामसभेला अधिकृत करुन देण्यात आली. ग्रामसभा, ग्रामपंचायती यांनी त्याचा फायदा उचलण्यासाठी कामे घेतली तर त्यासाठी 20 लाख रुपयांपर्यंतची तरतूद दिलेली आहे. म्हणजे प्रत्येक ग्रामपंचायतीने किमान 20 लाख रुपयांपर्यंतचे काम आणावे. प्रसंगी आम्ही त्यांना रक्कम वाढवून सुध्दा देऊ शकू. शासन 20 लाख रुपयांच्या वर रक्कम देणार नाही असे नाही. परंतु किमान 20 लाख रुपयांपर्यंतचे काम त्यांनी करावे अशा प्रकारचे सुतोवाच आम्ही या ठिकाणी केलेले आहे. इतर राज्यातील जी अभिनव कार्यप्रणाली आहे, मग त्यामध्ये वर्क टाईम आणि मोशनची बाब असेल, त्याचा सुध्दा या ठिकाणी विचार होणार आहे. हे सर्व करण्यासाठी आज आपल्या राज्यामध्ये रोजगार हमीचे आयुक्तालय नाही. ते आयुक्तालय आणत असताना त्याची

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

डॉ. नितीन राऊत ....

हायरारकी ठरविणे, राज्यामध्ये कसे नियंत्रण करता येईल, विभागीय स्तरावर याचे नियंत्रण कसे करता येईल, जिल्हा स्तरावर कसे नियंत्रण करता येईल, तालुका स्तरावर त्याचे नियंत्रण कसे राहील आणि गाव पातळीपर्यंत ते कसे पोहचू शकेल या बाबतची पूर्ण प्रणाली या आयुक्तालयाच्या माध्यमातून आम्ही तयार करणार आहोत. यामध्ये उद्देश एवढाच आहे की, रोजगार हमी योजनेमध्ये जी काही कामे चालतात त्या कामांचे दैनंदिन संनियंत्रण करणे, त्याची अंमलबजावणी करणे, एखाद्याला जर वाटले की आपल्याला काम मिळत नाही किंवा आपल्यावर अन्याय होत आहे तर त्याची पूर्तता तात्काळ करणे, या सगळ्या सोयी या आयुक्तालयाच्या माध्यमातून आम्ही करीत आहोत. त्या मुळे प्रभावी संनियंत्रण आणि अंमलबजावणीचे काम मोठ्या प्रमाणावर होणार आहे.

सभापती महोदय, मी अनेकदा आमच्या लोकप्रतिनिधींशी चर्चा केली. मी त्यांना भेटण्याचा प्रयत्न करतो. या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपले चांगले विचार मांडले. परंतु खऱ्या अर्थाने आपण पाहिले तर आपली मानसिकता अजूनही आपल्या राज्याची जी रोजगार हमी योजना आहे त्यामध्येच कोठे तरी घुटमळत आहे असे दिसते. मी हे मान्य करतो की, राज्याची रोजगार हमी योजना आणि केंद्राचा रोजगार हमी अधिनियम यामध्ये थोडाफार फरक आहे. कोठे तरी पारदर्शकता आली पाहिजे यासाठी तो फरक आहे. या ठिकाणी काही गोष्टी जरी नसल्या तरी इतर राज्याच्या तुलेनेत विचार केला तर आपण यामध्ये कोठेही मागे नाही. त्यामुळे अंमलबजावणीच्या संदर्भातील मानसिकता तसेच प्रशासकीय रचनेबाबतचा जो विषय आहे त्या बाबतीत आपण जुन्या योजनेतून बाहेर पडून नव्या योजनेमध्ये जर कामे सुरु केली तर निश्चितपणे त्याचा फायदा मिळेल. या ठिकाणी अशा प्रकारची टीका होते की, आंध्र प्रदेश, कर्नाटक,, बिहार, राजस्थान या सारखी राज्ये 4 कोटी रुपयांपर्यंत कामावर खर्च करु शकतात. मी आपल्याला सांगू इच्छितो की, तशी परिस्थिती नाही. आपल्या राज्यामध्ये सुध्दा नांदेड जिल्हा 60 कोटी रुपयांपर्यंत गेला. नांदेड जिल्हाच 60 कोटीपर्यंत गेला असे नव्हे तर त्याच्या बाजूला आंध्र प्रदेशमध्ये डोकावून पाहिले तर तेथील जिल्हा 250 कोटीवर गेलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत....

ते खर्च करु शकत असल्यामुळे नांदेड जिल्हा 60 कोटीपर्यंत गेला आहे. इतर जिल्हे 60 कोटीवर गेले आणि एकूण जिल्ह्यांची संख्या विचारात घेतली तर 250 कोटींच्या तुलनेत आपले राज्य 4 हजार कोटीपर्यंत पोहोचू शकेल. या कामात माझे सहकारी मित्र निश्चित मदत करतील असा मला विश्वास वाटतो.

सभापती महोदय, बिहार राज्यामध्ये राज्य सरकारची एक टीम जाऊन आली आहे. इन्फर्मेशन कम्युनिकेशन टेक्नोलॉजीच्या माध्यमातून बिहार राज्यात कशा प्रकारे काम चालू आहे याचा त्यांनी अभ्यास केला आहे. तामिळनाडू राज्याने रोजगार हमी योजनेच्या संदर्भात एक वेगळा पॅटर्न राबविला आहे. या विभागाच्या प्रधान सचिवांनी त्या पटर्नचा अभ्यास केला आहे. केरळ राज्याशी सुध्दा राज्य सरकार संपर्क ठेवून आहे. तामीनळनाडूमध्ये 60 टक्के भाग एनआरइजीएस अंतर्गत अकुशल कामासाठी खर्च केला जातो व 40 टक्के भाग राज्य सरकारच्या योजनेतून कुशल कामासाठी खर्च केला जातो. त्यामुळे मी या संदर्भात निर्णय घेत आहे. त्यानंतर मी मंत्रिमंडळासमोर जाणार आहे. राज्य सरकारचा रोहयोचा फंड 2008 मध्ये एकत्रित केला होता. हा फंड वेगळा ठेवून त्याच्या माध्यमातून ही कामे केली जातात. हे काम करीत असताना आपण केवळ ग्रामीण भागाचा विचार करु नये. आज ग्रामीण भागातून शहरात लोंढेच्या लोंढे येत आहेत. ते कामाच्या शोधात आहेत. परंतु शहरी भागात गरीब माणूस राहतो, बीपीएल खालील माणूस राहतो, तसेच रिक्षावाला आहे, मजूर आहे, फूटपाथवरील विक्रेता आहे या लोकांना या योजनेमध्ये कसे आणता येईल याचाही शासन विचार करीत आहे. या सर्वांना एकत्र आणले तर शहरी भागामध्ये अलीकडच्या काळामध्ये कायदा व सुव्यवस्थेला धोका निर्माण होत आहे, जी गुन्हेगारी वाढत आहे ती कमी करण्यासाठी त्याचा उपयोग होईल, असा मला विश्वास वाटतो. त्याच्या पुढे जाऊन मी असे म्हणेन की, सध्या जी बाल मजुरी वाढत आहे ती कमी करण्यासाठी या योजनेचा उपयोग होऊ शकेल. या बाबतीत सुध्दा राज्य सरकार विचार करीत आहे. त्यासाठी एक अभ्यास गट नेमून त्यांच्या माध्यमातून शासन निर्णय घेणार आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत.....

सभापती महोदय, या योजनेसाठी दोन प्रकारे निधी तयार करावा लागतो. एनआरइजीएसचा स्टेट फंड तयार केला तर केंद्र सरकारकडून राज्य सरकारला निधी येईल. राज्याकडून जिल्ह्याला जाईल आणि जिल्ह्याकडून ग्रामपंचायतीला जाईल. सध्या ग्रामपंचायतीकडून निधीची मागणी सरळ केंद्र सरकारकडे जाते. केंद्र सरकारकडून त्यांच्याकडे पैसा येतो. केंद्र सरकारकडून निधी येण्यास विलंब झाला तर अशा वेळी राज्य सरकारचा निधीची पूर्तता करण्यासाठी कोणताही रोल नसतो. त्यामुळे अशा वेळी ब्रिजचे काम करण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने एनआरइजीएसचा फंड तयार केला जाणार आहे. तसेच रोहयोच्या स्टेट फंडासाठी 2 हजार कोटींची मागणी सुध्दा करण्यात आली आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारने एनआरइजीएस अंतर्गत मजुरीचा दर 127 रुपयांपर्यंत वाढविला आहे. राज्यातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता, राज्यातील वेगवेगळे हवामान विचारात घेता मजुरीच्या दरात तफावत असावयास पाहिजे हे मी कबूल करतो. एखाद्या मजुराला 127 रुपये दर मिळत असेल पण याचा अर्थ असा नाही की, तो दिवसाला 300 रुपये कमवू शकत नाही. त्याच्या कामाच्या पध्दतीवर तो दर अवलंबून आहे व त्याप्रमाणे त्याला दर मिळणार आहे. केंद्र सरकारने मजुरीचा दर वाढविल्यामुळे मी केंद्र सरकारला धन्यवाद देऊ इच्छितो. त्यानुसार राज्यात 1 फेब्रुवारी पासून नवीन दर लागू केलेला आहे. 1983 मध्ये काम, वेळ व गती, या आधारावर मजुरीचे दर ठरविले जात होते. बदलत्या परिस्थितीमध्ये मजुरीचे दर कशा प्रकारे निश्चित केले पाहिजेत यासंबंधीही आमचा विभाग विचार करीत आहे. त्या बाबत लवकरच निर्णय होईल.

सभापती महोदय, लेबर बजेट तयार करणे हा देखील महत्वाचा इश्यू आहे. मागेल त्याला काम व आवश्यक तितके पैसे या तत्वानुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये लेबर बजेट तयार केले जाते. या विभागाचे सचिव नुकतेच दिल्ली येथे जाऊन आले आहेत. त्यांनी केंद्र सरकारला लेबर बजेटचे प्रेझेंटेशन सादर केलेले आहे. त्या माध्यमातून विभागाची मोहिम सुरु झालेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

अधोषित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत...

आयसीटीच्या माध्यमातून जी टेक्नॉलॉजी राजस्थान, आंध्रप्रदेश, केरळ, तामिळनाडू आणि बिहार या राज्यामध्ये आलेली आहे त्या हॅण्ड हेल्ड डिव्हाईसच्या माध्यमातून मजुरांचे थम इम्प्रेशन घेऊन, त्याचे नाव घेऊन, त्याला स्मार्टकार्ड देऊन, त्याला किती दिवसाचे काम मिळणार आहे, मजुरी किती मिळणार आहे या सर्व गोष्टींची माहिती घेण्याची प्रक्रिया सुरु करण्याचा निर्णय आम्ही करीत आहोत. पहिल्यांदा गडचिरोली सारख्या नक्षलग्रस्त भागामध्ये या आसीटीच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन घेण्याचे काम आम्ही करीत आहोत. हे सर्व करीत असताना अनेक कुशल लोक लागणार आहेत. कामाचे बजेट करीत असताना ग्रामपंचायतीला अनेक अडचणी येतात. त्यांच्याकडे इजिनिअर्स नसतात, कृषी सहाय्यक नसतात. ग्रामपंचायती क्षेत्रात शाळा असेल तर शाळेत शिक्षक नसतात, तेथे प्राथमिक अरोग्य केन्द्र असेल तर नर्स नसतात. यासंदर्भात व्यावसायिक पदवी आणि पदविकाधारक बरोजगारांना रोजगार हमी योजनेच्या कायद्यामध्ये कसे सामावून घेता येईल यादृष्टीने आमच्या खात्याने स्टडी ग्रुपच्या माध्यमातून विचार सुरु केला आहे. ग्रामीण भागातील सुशिक्षित बरोजगाराला रोजगार उपलब्ध करुन देण्याचा विषय आम्ही हाती घेतलेला आहे.

सभापती महोदया, ग्रामीण भागातील अनेक मजूर दुर्गम भागामध्ये जाऊन काम करतात. अशा मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाची आणि आरोग्याची सोय केली जाते. कित्येक वेळा मजूर आजारी पडतो त्यावेळी त्याची शुश्रुषा होत नाही. या बाबतीत शासनाने निर्णय घेतलेला आहे. रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुराचे आरोग्य चांगले रहावे यासाठी केरळ राज्याने ज्याप्रमाणे हेल्थ कार्ड योजना सुरु केलेली आहे त्या धर्तीवर मजुराला हेल्थ कार्ड देऊन त्याला आरोग्य सुविधा पुरविण्याचे काम आम्ही हाती घेत आहोत. या संदर्भात मागच्या वेळी जेव्हा चर्चा झाली त्यावेळी तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी मंत्रिमंडळाची उप समिती नेमण्यासंबंधीचा निर्णय घेतला. मंत्रिमंडळाच्या उप समितीने अभ्यास करुन याबाबतीत काही महत्वाच्या सूचना राज्य शासनाला केल्या, मागदर्शन केले. या उप समितीने केलेल्या सूचनांच्या आधारे मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक टास्क फोर्स तयार करण्यात आला असून त्या माध्यमातून रोजगार हमी योजनेचा कायदा प्रत्येक गावामध्ये चांगल्या प्रकारे अंमलात आणण्याच्या दृष्टीने कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. हे सर्व करीत असताना आता राज्याचे नवे मुख्यमंत्री महोदय श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी

..2..

श्री. नितीन राऊत....

राज्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी ताबडतोबीने यासंबंधीची बैठक घेऊन अनेक सूचना केल्या. कोणत्याही परिस्थितीमध्ये या वर्षी 4 हजार कोटीच्या पुढे यंत्रणा गेली पाहिजे असे त्यांनी सांगितले. रोहयोची किती कामे होतात, कशी होतात, कामावर मजूर उपलब्ध होतात की नाही, या गोष्टींचा फीड बॅक घेणे सुरु केले असून जास्तीत जास्त चांगली कामे कशी होतील याबाबतीत यंत्रणांना सूचना दिलेल्या आहेत.

सभापती महोदया, असे नाही की आपण चांगले काम करीत नाही. आपण चांगले काम करतो म्हणून आपल्या राज्याला अनेकदा पुरस्कार मिळालेले आहेत. आपल्या राज्यातील नांदेडच्या सरपंचांना दिल्लीला बोलावून त्यांचा तेथे सत्कार करण्यात आलेला आहे. त्यामुळे या क्षेत्रामध्ये आपण मागे नसून आघाडीवर आहोत हे मला येथे आवर्जून सांगायचे आहे. या संदर्भात मी नांदेडचे जिल्हाधिकारी आणि सर्व संबंधित अधिका-यांना मनापासून धन्यवाद देतो कारण त्यांनी या योजनेचे फार चांगल्या पध्दतीने नियोजन केलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ D/ प्रथम श्री. शिगम 11:00

श्री.नितीन राऊत....

आणि ते नियोजन करीत असताना त्यांनी बऱ्याच काही बाबतीमध्ये मदत करुन राज्य कसे आघाडीवर राहील यासंबंधीच्या सूचना केलेल्या आहेत.

सभापती महोदया, या ठिकाणी तालुका स्तरीय रोजगार हमी योजना समिती अस्तित्वात आहे. काही ठिकाणी या समितीचे अध्यक्ष आमदार आहेत आणि काही ठिकाणी इतर व्यक्ती अध्यक्ष आहेत. या बाबतीत कायदेशीर तरतूद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. आमदारांच्या तालुकानिहाय समित्या आहेत, तशा समित्या कार्यान्वीत करुन रोजगार हमी योजना चांगल्या प्रकारे कशी अंमलात येईल, या योजनेवर नियंत्रण कसे राहू शकेल, या योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त कामे कशी केली जातील या अनुषंगाने शासन काम करीत आहे आणि तशा सूचना विभागास देतो आहोत.

सभापती महोदया, रोजगार हमी योजनेच्या बाबतीत सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी काही मागण्या केल्या व काही सूचना केल्या आहेत. सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी या योजनेच्या बाबतीत काही सूचना केल्या आहेत. त्या बाबतीत सांगू इच्छितो की, या योजनेच्या कामाच्या संदर्भात कोणी अधिकारी दोषी असतील, त्यांचे विरुध्द निश्चितच कारवाई केली जाईल.

सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले की, या योजनेची कामे आमच्याकडे होत नाहीत, पर्यायाने या योजनेच्या कामांवर तरतूद खर्च होत नाही. संपूर्ण विदर्भात या योजनेच्या बाबतीत अशीच परिस्थिती आहे. या ठिकाणी सांगू इच्छितो की, मी देखील विदर्भातील आहे. नागपूर, अमरावती भागामध्ये 88.78 कोटी रुपये इतका खर्च या योजनेच्या कामांवर झालेला आहे. मराठवाड्यात 124.92 कोटी रुपये इतका खर्च झालेला आहे. या योजनेची कामे सर्व विभागात व्यवस्थितपणे करीत आहोत.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी या योजनेच्या अनुषंगाने काही मागण्या केल्या. त्या मागण्याच्या बाबतीत मी त्यांना विश्वास देऊ इच्छितो की, केंद्राने प्रत्येक कुटुंबाला 100 दिवसांची कुशल रोजगाराची हमी दिली आहे. उर्वरित दिवसाची रोजगाराची हमी राज्य शासनाने दिली आहे. प्रत्येक कुटुंबास एकूण 365 दिवसांची रोजगाराची हमी राज्य शासनाने दिली आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन राऊत...

महोदया, सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव सोनवणे यांनी 80 x 20 च्या संदर्भात या सभागृहात उल्लेख केला. या विषयाच्या बाबतीत मी मघाशी बोललो आहे.

महोदया, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी मागील पाच वर्षात राज्याच्या रोजगार हमी योजनेच्या निधीतून 4545.45 कोटी रुपये इतका खर्च झालेला आहे. व्यवसाय कराच्या रकमे विषयी देखील त्यांनी उल्लेख केला. राज्याच्या रोजगार हमी योजनेसाठी वेगळा फंड करण्यात यावा अशी मागणी विभागाने केलेली आहे आणि ती मागणी लवकरच सभागृहासमोर येणार आहे. सन्माननीय सदस्यांनी "एक व्यक्ती एक झाड" अशी सूचना केलेली आहे. सूचना अतिशय चांगली आहे. या बाबतीत ग्रीन व्हीलेज कन्सेप्ट शासनाने मान्य केलेला आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीने पाहिजे तेवढया वृक्षांची लागवड करावी. शासनाच्या माध्यमातून रोपवाटिका देणार आहोत, त्या रोपवाटिका महिला बचत गटामार्फत कशी चालविता येईल, या बाबतीत सुध्दा शासनाने आपली भूमिका मांडलेली आहे.

सभापती महोदया, मी यवतमाळ जिल्हयाचा पालकमंत्री आहे. मागील पावसाळयाच्या कालावधीत यवतमाळ जिल्हयात सात वेळा वीज पडली. वीज पडल्यामुळे ज्या व्यक्ती मृत्युमुखी पडल्या होत्या, त्यांच्या कुटुंबीयांचे सात्वन करण्यासाठी मी प्रत्येक वेळी गेलो. दुर्देवाने प्रत्येक ठिकाणी महिला मृत्युमुखी पडल्याचे माझ्या निदर्शनास आले.शेतामध्ये मोठया प्रमाणात भगिनी काम करताना दिसून येतात. आमच्या भगिनी चांगल्या पध्दतीने काम करतात म्हणून रोपवाटिकेचे काम महिला बचत गटाकडे द्यावे असा शासनाने निर्णय घेतलेला आहे. ग्रीन व्हीलेज कन्सेप्टच्या माध्यमातून ग्रीन महाराष्ट्र करण्याचे काम शासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

महोदया, या ठिकाणी वैयक्तिक लाभ योजने अंतर्गत विहिरीच्या कामासाठी कमी किंमत दिली जाते असा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला गेला. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, विहिरीसाठी 1 लाख 25 हजार रुपये एवढे आर्थिक मापदंड घालून देण्यात आले होते. परंतु आता प्रत्येक विहिरीच्या बांधकामाची कमाल मर्यादा 2 लाख रुपयांपर्यंत केली आहे. या योजनेचा लाभ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, दारिद्रय रेषेखालील व्यक्ती, आवास योजनेचे लाभार्थी, अल्प भूधारक शेतकरी यांना मोठया प्रमाणात होणार आहे.

3...



ABG/ MMP/ D/ प्रथम श्री. शिगम 11:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन राऊत...

सभापती महोदया, या ठिकाणी अनेक मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. त्याबाबतीत सांगू इच्छितो की, रोजगार हमी योजनेच्या कामांवर मजुरांची उपस्थिती वाढते आहे. 15 मार्च, 2011 पर्यंत 132 लाख मनुष्यदिन रोजगार निर्मिती झालेली असून आठवडयातील साप्ताहिक सरासरी मजूर उपस्थिती 1 लाख 2 हजार एवढी आहे. डिसेंबर, 2010 अखेर साप्ताहिक मजूर उपस्थिती 30 हजार 200 एवढी झालेली आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ D/ 11:05

डॉ.नितीन राऊत.......

त्यामुळे निश्चितपणे आपण चांगली प्रगतीची कामे करीत आहोत, हे मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो. मी सभागृहाला विश्वास देऊ इच्छितो की, पुढील काळात रोजगार हमी योजना राज्यात चांगल्या प्रकारे राबवून जे स्वप्न वि.स.पागे यांनी उराशी बाळगले होते ते स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न करणार आहोत. स्व.वि.स.पागे म्हणायचे की, "आपल्या आजवरच्या नियोजनात बेकारीचे निर्मूलन हे कधीच उद्दीष्ट नव्हते. बेकारी निर्मूलनाला कायम दुय्यम दर्जाचे स्थान दिले. यापुढे सर्वांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचे उद्दीष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत. सर्वांना काम ही आपले प्राधान्य असले पाहिजे. केवळ मूठभर लोकांसाठी बहुजन समाजाचा बळी जात असल्याचे सहन करणे अमानुष आहे. म्हणून हे ध्येय अंत:करणापासून स्वीकारले पाहिजे असा माझा आग्रह आहे. रोजगार हमी योजनेमागे हीच विचारप्रणाली आहे." याच विचारप्रणालीच्या माध्यमातून या क्षेत्रात राज्याने चांगली प्रगतीशील पावले उचलली असून मी सभागृहाला खात्री देतो की, निश्चितपणे येणाऱ्या दिवसात आपण सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी जे 4 हजार कोटी रुपयांचे उद्दीष्ट मांडले आहे ते उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून चांगल्या पध्दतीचे काम केल्याशिवाय राहणार नाही. या माध्यमातून मोठया प्रमाणात आपली ॲसेट तयार करुन गावामध्ये किंवा खेड्यामध्ये रस्त्यांची, पाणंद रस्त्यांची, शेततळ्यांची कामे करुन विकासाची गती वाढवू हेच याठिकाणी नमूद करतो.

सभापती महोदया, माननीय सदस्यांनी जे विचार मांडले, ज्या सूचना केल्या आहेत त्या सर्व सूचनांचे मी स्वागत करतो. या सूचनांचा चांगल्या पध्दतीने उपयोग करुन घेण्यासंबंधी विचार केला जाईल आणि तशा प्रकारची यंत्रणा सुरु केली जाईल हे पुन्हा एकदा नमूद करु इच्छितो. हे सर्व करण्यासाठी स्वतंत्र आयुक्तालयाची आवश्यकता आहे. जोपर्यंत प्रशासन चांगल्या पध्दतीने गतीमान होणार नाही त्याशिवाय ही यंत्रणा खालपर्यंत लागू होऊ शकत नाही. लवकरच या राज्यात रोजगार हमी योजनेसाठी स्वतंत्र आयुक्तालय निर्माण केले जाईल आणि त्या माध्यमातून हा कार्यक्रम राबविला जाईल. ज्या सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतला त्यांचे पुन्हा एकदा मी स्वागत करतो, त्यांना धन्यवाद देतो. या राज्यामध्ये रोजगार हमी योजना चांगल्या पध्दतीने राबविण्याविषयी त्यांनी काही उपयुक्त सूचना केल्या आहेत. ज्यामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे. त्याचे स्वागत करुन पुन्हा एकदा मनापासून धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

-----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिले आहे. कोकणामध्ये ही योजना मोठया प्रमाणात राबविली जात नाही याला अनेक कारणे आहेत. तेथील भौगोलिक परिस्थितीचा प्रश्न आहे. दानपत्राची अट ही एक मुख्य अडचण आहे. एक गुंठा जागेत 25-30 खातेदार असतात. त्यामुळे दानपत्र मिळण्यामध्ये अनेक अडचणी येतात. दानपत्राची ही अट रद्द करुन पूर्वी सरकारी विकास कामासाठी जमीन मिळविण्याकरिता संमतीपत्र उपयोगात आणले जात होते, त्याच धर्तीवर रोजगार हमी योजनेच्या विकास कामासाठी दानपत्राऐवजी संमतीपत्राची तरतूद करण्यात येईल काय? अकुशल आणि कुशल कामासाठी 60:40 रेशो लागू केला आहे. कोकणातील जास्तीत जास्त लोक हे मुंबईमध्ये वास्तव्य करीत आहेत. परिणामी अकुशल कामासाठी मजूर उपलब्ध होत नाहीत. महाराष्ट्राच्या अन्य भागांच्या तुलनेत कोकणातील भौगोलिक परिस्थिती विचित्र असल्यामुळे रोजगार हमी योजना सक्षमपणे राबविणे शक्य होत नाही. अन्य भागात अकुशल व कुशल कामासाठी 60:40 रेशो लागू करुन कोकणासाठी अकुशल कामाचा रेशो शिथिल केला जाईल काय? रोहयो अंतर्गत फलोद्यान योजना राबविली जाते. फळ बागांची लागवड करण्यासाठी बाहेरुन मजूर आणून अकुशल स्वरुपाचे काम केले जाते. ती भूमिका कोकणातील रोहयो अंतर्गत फळ बाग योजनेसाठी स्वीकारण्यात येईल काय?

नंतर आय.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ MMP/ पूर्वी श्री. भोगले......... 11:10

डॉ. नितीन राऊत : महोदया, मी नुकताच कोकण प्रदेशात जाऊन आलो आहे. या भागातील भौगोलिक परिस्थितीचा विचार केला असता तेथे रोजगार हमी योजनेच्या कामात अनेक अडथळे निर्माण होतात. या अनुषंगाने मी स्थानिक अधिकाऱ्यांबरोबर चर्चा सुध्दा केली. या परिसरात रोजगार हमी योजना कशी राबविता येईल त्यासाठी जी पर्यायी व्यवस्था करणे शक्य असेल ती करण्याचा जरुर प्रयत्न करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी या अडचणींमध्ये असलेली एक अडचण दान पत्राबाबत सांगितली. त्यासंदर्भात निश्चितपणे कोणती पर्यायी व्यवस्था करणे शक्य होईल ती करता येईल. तसेच फळ बागांसंबंधीचे निकष कसे वापरता येतील असेही त्यांनी नमूद केलेले आहे. तसेच या अनुषंगाने मी असेही सांगू इच्छितो की ही केंद्र शासनाची योजना असल्याने आपल्याला भूसंपादन करता येत नाही तर केवळ दान पत्राचीच अट आहे. तरीही ती अट तपासून कोणती पर्यायी व्यवस्था करता येईल, याचा विचार करुन तशी शिफारस केंद्राकडे करण्यात येईल.

श्री. हेमंत टकले : मंत्री महोदयांनी या प्रस्तावावरील उत्तराच्या भाषणात सविस्तर मांडणी केलेली आहे. त्यांच्या बोलण्यातून काही विरोधाभास जाणवला त्याचा थोडक्यात उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. ज्यावेळी आपल्यासमोर ही सर्व आकडेवारी येते त्या चर्चेच्या माध्यमातून असे लक्षात आले की, एनआरईजीएस अंतर्गत इतर राज्यांना जो निधी उपलब्ध करुन दिला त्या तुलनेत आपल्या राज्यात मात्र तेवढा निधी उपलब्ध करुन घेण्यात शासन यशस्वी झालेले दिसत नाही. मंत्री महोदयांनी या निमित्ताने सांगितले की, आपल्याकडे आपली स्वत:ची रोजगार हमी योजना चालू असल्यामुळे या योजनेला आपल्याकडून पाहिजे तेवढा प्रतिसाद मिळू शकला नसावा. असे चित्र असताना ज्या प्रमाणात राज्यातील दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या मात्र गेल्या काही वर्षात वाढत चालली. त्याचप्रमाणे इतर राज्यांपेक्षा महत्वाचा प्रश्न म्हणजे आपल्या राज्यात झपाट्याने शहरीकरण होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागात रोजगाराची संधी आवश्यक असलेल्या गरजू लोकांची संख्या कमी होत जाणे हे व्यस्त प्रमाण आहे. अशा प्रकारे स्थलांतरितांचे चक्र सुरु असताना ते लोक ज्या ठिकाणी स्थलांतरित होतात तेथील रोजगारावर ताण पडतो व पर्यायाने स्थानिक बेरोजगारीत वाढ होते, हे विसरता येणार नाही.

मंत्री महोदयांनी जसा उल्लेख केला त्याप्रमाणे मला अशीही भीती वाटते की, बेरोजगारीचा परिणाम म्हणून समाज विघातक प्रवृत्तींना

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ........

अधिक महत्वाचे स्थान मिळून समाज बिघडण्याची प्रक्रिया वेगात सुरु होते. मला वाटते संपूर्णत: केंद्र सरकारच्या सहकार्याने प्रत्येक राज्यात राबविण्यात येणारी एक आगळीवेगळी योजना आहे. या योजनेत निधीची कमतरता नाही. खरे तर शासनाच्या अनेक चांगल्या योजना निधी अभावी रखडतात पण ही योजना मात्र थेट राज्यात उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाशी निगडीत आहे. या सिध्दांतानुसार जे राज्य कमी काळात आपल्या मनुष्यबळाचा अधिक कुशलतेने व तत्परतेने उपयोग करुन घेऊ शकते त्या राज्याची आर्थिक प्रगती निश्चित मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता निर्माण होते. मंत्री महोदयांनी ही योजना प्रभावीपणे राबविता यावी म्हणून स्वतंत्र आयुक्तालयासारखी वेगळी यंत्रणा निर्माण करण्याचे सुतोवाच सुध्दा केले. त्याचप्रमाणे पंचायत समिती स्तरावर स्वतंत्र अधिकार देण्याबाबतचाही त्यांनी उल्लेख केला. त्यातून मला अशीही भीती वाटते की, ज्यावेळी आपल्या हातात भरपूर व पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध असतो त्याच वेळी अशा योजनांमधून त्याला चुकीचे पाय फुटण्याची प्रवृत्ती सुध्दा यातूनच निर्माण होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे हा निधी खरोखरच गरजू लोकांपर्यंत पोहचतो की नाही यासाठी सुध्दा स्वतंत्र यंत्रणा निर्माण करुन या निधीचा वापर योग्य प्रकारे होतो की नाही याचीही दक्षता घेण्याची गरज असून त्यासाठी सुध्दा तत्पर अशी प्रशासकीय व्यवस्था आपल्याला निर्माण करावी लागेल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

मग त्याला तुम्ही वर्क ऑर्डर म्हटले तरी चालेल.

या ठिकाणी मंत्री महोदयांनी टाईम मोशन स्टडीचा उल्लेख केलेला आहे. परंतु या सर्व गोष्टीतून पळवाटा काढण्याचे अनेक प्रयोग ग्रामीण भागात वारंवार चालू असल्याचे आपल्याला दिसून येत असते व यासंदर्भातील बातम्या वर्तमानपत्रात छापून आल्यानंतर त्याची चौकशी होते व चौकशी झाल्या नंतर अशी कामे बंद केली जातात. चांगल्या प्रकारच्या योजनेची अंमलबजावणी करतांना जर यंत्रणेतच दोष राहिले तर या योजनेचा राज्यातील गोरगरिबांना फायदा होणार नाही. राज्यातील तळागाळातील लोकांच्या आर्थिकस्तरामध्ये बदल घडवण्यासाठीच या योजनेमध्ये मोठया प्रमाणात शासन निधी उपलब्ध करुन देत असते. या महत्वाकांक्षी योजनेचा हेतू सफल होण्यामध्ये भरपूर अडचणी निर्माण झालेल्या आहेत. या ठिकाणी मंत्री महोदय अतिशय वेगळया विचाराने प्रेरित होऊन विभागाचे तसेच रोजगार हमी योजनेचे काम करीत आहेत असा आम्हा सर्व सदस्यांना विश्वास आहे. त्यामुळे या योजनेला एक वेगळा व्हीजन देऊन नव्या विचाराने या योजनेला अजून पुढे नेण्याची आवश्यकता आहे व त्या दृष्टीने मंत्री महोदय काम करतील असा आम्हाला विश्वास आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यु. जमा : सभापति महोदया, माननीय मंत्री जी हमारे नागपुर शहर के हैं और बहुत ही युवा और डायनामिक मंत्री हैं, वह हर विषय का अभ्यास बहुत ही गंभीरता से करते हैं. उन्होंने बहुत ही अच्छा और विस्तृत उत्तर यहां पर दिया है. मैं सभागृह में माननीय सदस्यों को बताना चाहूंगा कि हमारे मंत्री महोदय ने पी.एच.डी. की है, इसलिए उनके पास डाक्टर की उपाधि भी है और हमारे मंत्री महोदय पायलट भी हैं. अनेक दूसरे राज्यों की तुलना करते हुए उन्होंने इस चर्चा पर विस्तृत उत्तर दिया है. उनके उत्तर से साफ मालूम पड़ता है कि उन्होंने इस बारे में डिटेल स्टडी की है. इस के लिए मैं मंत्री महोदय का और उनके विभाग का अभिनन्दन करता हूं और उनको धन्यवाद भी देता हूं.

हमने यहां पर नेशनल रुरल एम्पलायमेंट गारंटी स्कीम लागू की है तथा सेक्शन 28 के मुताबिक हमने अपने स्टेट की एम्पलायमेंट गारंटी स्कीम को भी अपने राज्य में चालू रखा है. मंत्री महोदय ने इस बात को माना कि केंद्र की रोजगार गारंटी योजना के माध्यम से 100 दिन ग्रामीण बेरोजगारों को काम दिया जाएगा और बाकी 265 दिन राज्य की रोजगार गारंटी योजना के माध्यम से काम देकर हम अपने ग्रामीण क्षेत्र के मजदूरों को वर्ष भर रोजगार देंगे. यह निर्णय बहुत ही अच्छा है और अब इस पर सिर्फ अमल ही करना बाकी है. राज्य सरकार ने यह भी निश्चय किया है कि आने वाले समय में हम केंद्र शासन के फंड से कम से कम 4 हजार करोड़ रुपए खर्च करेंगे. ऐसा होना ही चाहिए. इस संबंध में माननीय मुख्यमंत्री महोदय से भी आपकी चर्चा हुई है. यह निर्णय भी बहुत स्वागत योग्य है.

सभापति महोदया, केंद्र सरकार की रोजगार हमी योजना के माध्यम से महाराष्ट्र में कम पैसे आने का एक कारण यह भी है कि हमारे यहां पर स्टेट की रोजगार हमी योजना के माध्यम से सड़क तथा अन्य इन्फ्रास्ट्रक्चर विकास का काम बड़े पैमाने पर पहले ही हो चुका है. इतना अधिक विकास दूसरे राज्यों में न होने की वजह से केंद्र सरकार की रोजगार हमी योजना का ज्यादा फायदा ले पाना उनके लिए संभव हो सका है. लेकिन एक बात मैं यहां पर यह जरुर कहना चाहूंगा कि केंद्र और राज्य सरकार की रोजगार हमी योजना के माध्यम से जो कुल पैसा हमारे यहां पर खर्च हुआ है वह बहुत ही कम है. मेरे विचार से यह बात अच्छी नहीं है. यदि

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यु. जमा....

हम केंद्र और राज्य की टोटल फीगर देखें तो पायेंगे कि सन् 2008-09 में हम लोगों ने 975.24 करोड़ रुपए ही खर्च किए हैं. 2009-10 में 1113 करोड़ रुपए खर्च किए हैं और सन् 2011-12 में यह रकम सिर्फ 850 करोड़ रुपए तक ही खर्च हो पाएगी.

हमारा मानना है कि केंद्र और हमारी राज्य की रोजगार हमी योजना में जो तफावत है, उसको आपने साइंटिफिकली समझ लिया है. इसलिए आपको इस तरह से काम करना चाहिए कि केंद्र सरकार की रोजगार हमी योजना के माध्यम से ज्यादा पैसा महाराष्ट्र में खर्च हो सके और इसके लिए हमें केंद्र की शर्तों के हिसाब से ही अपने यहां पर काम करना होगा. केंद्र की रोजगार हमी योजना के अंदर ग्राम पंचायत को केंद्र माना गया है, जबकि हम अपनी रोजगार हमी योजना के माध्यम से व्यक्तिगत विकास के काम भी करते हैं. यह तफावत हमें दूर करनी होगी. जब जॉब कार्ड उनके द्वारा दिया जाना है, वर्क असेसमेंट उनको करना है, पेमेंट भी वही करेंगे. तो हमें अपना काम उनकी शर्तों के हिसाब से ही करना चाहिए. ग्रामीण क्षेत्र में इन्फ्रास्ट्रक्चर डॅवलपमेंट के लिए आपने फंड बढ़ाने का जो निश्चय किया है, यह बहुत ही अच्छा निर्णय आपने लिया है.

मैं यहां पर दो-तीन बातें कहकर ही अपनी बात समाप्त करना चाहूंगा. आपने इस बात को भी स्वीकार किया कि ईजीएस के लिए अलग आयुक्तालय बनाया जाना चाहिए. आपका कांसेप्ट ग्रीन विलेज का है. आपका विभाग व्यक्तिगत लाभ के लिए भी काम करता है. उदाहरण के तौर पर आपका विभाग जवाहर विहीर योजना तथा हॉर्टिकल्चर विकास का काम भी करता है. आपने जवाहर विहीर योजना का लागत खर्च 1.25 लाख रुप से बढ़ाकर 2 लाख रुपए किया, यह निर्णय भी स्वागत योग्य है. लेकिन हमें इस बात की गारंटी भी लेनी पड़ेगी कि जितना पैसा हम एक विहीर के लिए देते हैं उतना पैसा वहां खर्च होना चाहिए. आपने इस बात को भी माना कि हमारी डिलीवरी सिस्टम में भी बहुत अड़चने हैं. उस बारे में एक दिक्कत लाल फीताशाही की है, उसको दूर करना चाहिए तथा केंद्र एवं राज्य सरकार के फंड का सही उपयोग होना चाहिए. उसके लिए आपको आधुनिक यंत्रों का इस्तेमाल करना चाहिए. इस बात का जिक्र भी आपने यहां पर किया कि स्मार्ट कार्ड और बायोमेट्रिक पद्धति का इस्तेमाल यहां .....

...4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MMP/ D/ प्रथम श्री. खर्चे..... 11:15

श्री एस. क्यु. जमा...

पर किया जाएगा. माननीय सदस्य श्री टकले जी ने यहां पर टाइम बाउंड स्टडी करने के लिए कहा, हमारा कहना है कि यदि आवश्यकता हो तो आप एक्सपर्ट कमेटी बनाकर उस विषय की स्टडी करें और जन प्रतिनिधियों की राय भी आप उस बारे में लें.

इन सारी बातों पर अमल करने के संबंध में माननीय मंत्री महोदय मेरा आपसे यह अनुरोध है कि योजनाओं के क्रियान्वयन में जो रुकावट आती है उसकी अकाउंटेबिलिटी फिक्स होनी चाहिए. आपने तालुका, जिला और राज्य स्तर पर कमेटी बनायी है. लेकिन यह बहुत ही रिच्युअलिस्टिक है. वहां पर कमेटी जाती हैं. दौरा करती हैं, पैसा भी खर्च होता है. लेकिन इन सब बातों का आउटकम बहुत ही कम निकलता है, यह काम करने से जितना फायदा लोगों को होना चाहिए, उतना फायदा नहीं हो पाता है. इसलिए जो डिले या देरी होती है, वह देर किसकी वजह से हुई इसकी जांच होनी चाहिए और दोषी व्यक्ति को सजा मिलनी चाहिए.

किसी भी स्तर पर किसी तरह का भ्रष्टाचार न होने पाये इसके लिए केंद्र सरकार ने एक मल्टी लेवल सिस्टम बनाया है. उनकी पूरी कोशिश है कि इस योजना का लाभ ग्रामीण क्षेत्र के लोगों तक पहुंचे. इस योजना का क्रियान्वयन बहुत ही अच्छे तरीके से तथा साइंटिफिक तरीके से हो, ताकि ग्रामीण क्षेत्र के बेरोजगारों को रोजगार मिल सके और उनको इस योजना से फायदा पहुंच सके, ताकि हमारी ग्रामीण अर्थ व्यवस्था भी मजबूत हो सके.

सभापति महोदया, केंद्र सरकार की रोजगार हमी योजना में शहरी गरीबों के लिए कोई प्रावधान नहीं है इसलिए मेरा कहना है कि केंद्र सरकार के फंड को हम ग्रामीण क्षेत्रों में ज्यादा से ज्यादा खर्च करें तथा अपने राज्य की रोजगार हमी योजना के माध्यम से यदि कोई योजना हम शहरी बेरोजगारों के लिए बना सकें तो बहुत अच्छा होगा. क्योंकि महाराष्ट्र में ग्रामीण क्षेत्रों से शहरों की तरफ 45-50 परसेंट पलायन हो रहा है. इसी वजह से शहरी क्षेत्रों में भी आज गरीबों की बहुत बड़ी संख्या रहती है. हमरा राज्य प्रगतिशील राज्य है. इसलिए शहरी गरीबों के लिए भी कोई योजना यदि महाराष्ट्र सरकार बना सके तो बहुत अच्छा होगा.

मंत्री महोदय के उत्तर से तथा उनकी तैयारी से हम पूरी तरह से संतुष्ट हैं. इसलिए हम उनको तथा महाराष्ट्र शासन को सिर्फ धन्यवाद ही देना चाहते हैं. इतना ही मुझे कहना है.

सभापति महोदया, आपने मुझे बोलने का समय दिया इसलिए आपको भी धन्यवाद

-0-

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( ॲड.उषा दराडे )** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे.सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक 11 वाजून 24 मिनिटांनी, दुपारी 12.15 वाजेपर्यत स्थगित झाली )

-----

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचा मुद्दा

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्दयाच्या अनुषंगाने एका अत्यंत गंभीर अशा विषयासंदर्भात मला या सदनाचे लक्ष वेधावयाचे आहे. एका अमेरिकन लेखकाने ज्याचे नाव जोसेफ लेलीव्हेल्ड असे आहे, त्याने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्यासबंधी लिहिलेल्या व प्रसिध्द न झालेल्या पुस्तकामधील लिखाण वर्तमानपत्रामधून प्रसिध्द झाल्यामुळे त्यांचे चारित्र्यहनन झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आलेला आहे. कोणत्याही गोष्टींचा आधार न घेता अशाप्रकारे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न एका वर्तमानपत्राच्या माध्यमातून करण्यात आला आहे, ही अत्यंत गंभीर अशी बाब आहे.

सभापती महोदय, राष्ट्रपिता महात्मा गांधी हे या संपूर्ण देशामध्ये आपणा सर्वांचे दैवत होते. त्यांचा स्वातंत्र्य लढयाचा इतिहास संपूर्ण जगाला माहीत आहे. त्यांनी जगाला अहिंसेचा संदेश दिला आहे. संपूर्ण जगामध्ये एक दिवस जागतिक अहिंसा दिवस म्हणून पाळला जातो. अशा थोर महात्म्याच्या विरोधात अमेरिकेच्या वर्तमानपत्रामधून लिखाण प्रसिध्द करण्यात आले आहे. मी याठिकाणी उल्लेख केलेल्या लेखकाचा या सभागृहाने तीव्र शब्दामध्ये निषेध करावा अशा प्रकारचा निषेधाचा ठराव मांडून मी त्याचा निषेध करीत आहे. त्याचबरोबर अशाप्रकारचे कोणतेही पुस्तक, कोणतेही लिखाण देशातील किंवा परदेशातील कोणत्याही वर्तमानपत्रामधून किंवा पुस्तक रुपाने प्रसिध्द होऊ नये या करिता देश स्तरावर केंद्र शासनाने या बाबतीत पावले टाकण्यासंबंधी या सभागृहाने आपल्या तीव्र भावना केंद्र सरकारला कळविल्या पाहिजेत. अशाप्रकारचे कोणतेही लिखाण बाहेर येऊ नये याकरिता तीव्र आक्षेप केंद्र शासनाकडे नोंदविण्याबाबत माझी या सभागृहाला विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी एका अमेरिकन लेखकाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे चारित्र्यहनन करणारे लिखाण वर्तमानपत्रामधून प्रसिध्द करण्याचा जो अत्यंत निंद्य प्रकार केला आहे, त्याचा जेवढा निषेध करता येईल तेवढा थोडाच आहे. या निमित्त सन्माननीय उद्योग मंत्री श्री. नारायण राणे यांनी शासनाच्या माध्यमातून योग्य तो पाठपुरावा करुन या संबंधी सखोल चौकशी करावी असे मी सुचवितो.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी एका गंभीर व महत्वाच्या विषयाकडे आपणा सर्वांचे लक्ष वेधले आहे. हे लक्ष वेधत असतांना त्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे चारित्र्यहनन करणारे लिखाण एका अमेरिकन लेखकाने वर्तमानपत्रामधून प्रसिध्द केल्याचा उल्लेख केला आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले, त्यांच्यामुळे या देशाला स्वातंत्र्य मिळाले अशाप्रकारची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. या निमित्त त्यांनी ज्या लेखकाचा आणि त्याच्या लिखाणाचा उल्लेख केला आहे ते लेख व लिखाण या महाराष्ट्रामध्ये प्रकाशित होऊ नये, कुणीही ते लिखाण प्रसिध्द करु नये, किंवा पुस्तक रुपाने विकू नये याची राज्य सरकार काळजी घेईल. जर कुठे ते लिखाण प्रसिध्द केले जात असेल तर त्याची जरुर चौकशी करुन कारवाई केली जाईल. तसेच, माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्यासंबंधी केंद्र सरकारला लिहिले जाईल असे मी शासनाच्या वतीने आपणास सांगतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी यांनी एका अमेरिकन लेखकाने राष्ट्रपिता महात्मा गांधींचे चारित्र्यहनन करण्यासंबंधीचे लिखाण प्रसिध्द झाल्याबद्दल औचित्याचा मुद्दा व निषेधाचा ठराव या सभागृहामध्ये मांडला आहे. तसेच, सन्माननीय उद्योग मंत्री श्री. नारायण राणे यांनी त्याला पाठिंबा देतांना शासनामार्फत त्याची सखोल चौकशी करुन आणि त्या लिखाणावर बंदी आणण्याची कारवाई केली जाईल असे आश्वासन दिले आहे. एका अत्यंत महत्वाच्या विषयावरील हा सभागृहाचा ठराव म्हणून मी मंजूर करीत आहे.

-----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी सभागृहाच्या

कामकाजावर घातलेला बहिष्कार

**सभापती** : आज दुपारी 12.00 वाजता सन्माननीय उप मुख्यमंत्री व वित्तमंत्री श्री.अजितदादा पवार आणि सन्माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील हे माझ्या दालनामध्ये आले होते. त्यानंतर सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सुध्दा माझ्या दालनामध्ये बोलविले होते. सन्माननीय उप मुख्यमंत्री व वित्तमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी मला असे सांगितले की, विधानसभेतील आमदारांच्या निलंबनाच्या अनुषंगाने गेले दोन-तीन दिवस प्रश्न निर्माण झाला होता आणि तो म्हणजे विधानसभेतील सन्माननीय सदस्यांचे निलंबन करण्यात आल्यामुळे विरोधकांनी कामकाजावर बहिष्कार घातला होता. परंतु आता तो प्रश्न सुटलेला असून त्यादृष्टीने विधानसभेमध्ये त्या अनुषंगाने तसा ठरावही मांडण्यात येणार होता. मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेब आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांना सांगितले की, विधानसभेतील सन्माननीय सदस्यांच्या निलंबनाचा जो प्रश्न आहे, तो तडजोडीने सुटलेला आहे असे मला सन्माननीय उप मुख्यमंत्री, वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी सांगितलेले आहे. त्यामुळे आपण सर्व सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये उपस्थित रहावे. त्यावर त्यांनी असे सांगितले की, आम्ही जरुर येतो. परंतु आम्ही विधानसभेमध्ये जाऊन खात्री करुन येतो. मी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना सभागृहामध्ये येण्याबाबत सांगितलेले आहे. मला असे वाटते की, आता विधानसभेमध्ये सुध्दा विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव पाठीमागे घेण्यात आला असावा.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, आम्ही आपले आभारी आहोत. सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत आणि आता ते सदनामध्ये येणार आहेत.हा वृत्तांत म्हणा किंवा बातमी म्हणा आपण आम्हाला सांगितली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. परंतु सभापती महोदय, आम्हाला याचीही जाणीव व्हावयास पाहिजे की, या सदनामध्ये कोणत्याही प्रकारची घटना घडलेली नाही. सभागृह बंद करण्याचे किंवा सभागृहात न येण्याचे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी असे कारण सांगितले की, विधानसभेमध्ये घटना घडली आणि त्यामुळे काही सन्माननीय सदस्यांना निलंबित करण्यात आले. विधानसभेमध्ये घडलेल्या घटनेबाबत त्यांच्यावर कारवाई झाली आहे, अशा वेळी विधान परिषदेचा त्याच्याशी काय संबंध आहे? आतापर्यंतच्या इतिहासामध्ये कधीही यापूर्वी विधानसभेतील घटनेच्या अनुषंगाने विधान परिषदेमध्ये प्रतिबिंब उमटले नाही, वैचारिकदृष्ट्या

श्री.नारायण राणे . . . .

उमटले असेल पण विधानसभेमध्ये केलेली कारवाई रद्द करण्यात यावी किंवा त्या दृष्टीने विचार करावा यासाठी या सदनाचा कधीही उपयोग करण्यात आला नाही. भविष्यकाळासाठी मला आपणास

एवढेच सांगावयाचे आहे की, ठीक आहे. यावेळेस झाले, पडदा पडला.पण भविष्यामध्ये विधानसभे-मध्ये घडलेल्या घटनेचे पडसाद विधान परिषदेमध्ये उमटता कामा नयेत आणि विधान परिषदेतील घटनेचे पडसाद विधानसभेमध्ये उमटता कामा नयेत. सभापती महोदय, आपल्याकडून त्यांना यासंबंधी काही समज किंवा मार्गदर्शन व्हावे एवढीच इच्छा आहे.

**सभापती** : एक अत्यंत महत्वाची बाब अशी आहे की, दोन्ही सभागृहे ही स्वयंभू, स्वतंत्र आहेत. आपण त्या अनुषंगाने सातत्याने या बाबीवर चर्चा करतो. जर दोन्ही सभागृहे स्वतंत्र असतील तर मग या दोन्ही सभागृहांचे अस्तित्व हे पूर्णत: स्वतंत्र असणे गरजेचे आहे. मी गेली 32 वर्षे विधानसभा आणि विधान परिषदेचा सभासद आहे. मी आणि माझे अनेक सहकारी मित्र या विधानसभेमध्ये किंवा विधान परिषदेमध्ये सन्माननीय सदस्य म्हणून वावरलो आहोत. मला वाटते की, त्यामध्ये सर्वश्री अरुण गुजराथी असतील, नारायण राणे साहेब आणि अन्य इतरही सन्माननीय सदस्य असतील. पण मी स्वत: असा प्रसंग, अशी परिस्थिती उद्‌भवल्याचे कधीही पाहिले नाही. मागील दोन दिवसामध्ये ती परिस्थिती आपण पाहिलेली आहे. त्या अनुषंगाने मी माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे यांना सांगू इच्छितो की, विरोधी पक्षनेते, गटनेते यांच्या बरोबरही आपण नंतर कधीतरी या बाबीच्या अनुषंगाने चर्चा करु या.

श्री.नारायण राणे (खाली बसून) : आपल्या दालनामध्ये चर्चा करु.

**सभापती** : होय. ती चर्चा येथे होणार नाही, माझ्या दालनामध्येच ही चर्चा होईल. मला असे वाटते की, आता प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करावी.

-----

. . . .एम-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**अशासकीय शाळांमधील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाबाबत**

**(1) * 12693 श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.वसंतराव खोटरे, श्री.मनीष जैन, श्री.विक्रम काळे** : **तारांकित प्रश्न क्रमांक 9113 ला दिनांक 4 डिसेंबर, 2010 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा दिनांक 25 नोव्हेंबर, 2005 चा सुधारित आकृतीबंध रद्द करण्यासंदर्भात माध्यमिक शाळा संहितेप्रमाणे कार्यवाही करण्याचा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या बैठकीसमोर सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अर्थसंकल्पीय अधिवेशनात मा.शिक्षण मंत्र्यांनी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध शासन मागे घेत असून माध्यमिक शाळा संहितेप्रमाणे मान्यता देण्यात येईल अशी घोषणा करुनही अद्याप त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केलेला नाही, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(4) सदर शासन निर्णय तातडीने निर्गमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र दर्डा** :(1) नाही.

(2), (3), (4) व (5) उच्च स्तरीय समितीपुढे प्रस्ताव सादर केला असता, अधिकची माहिती समितीला सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

श्री.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, राज्यातील माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा दिनांक 25 नोव्हेंबर 2005 चा सुधारित आकृतीबंध रद्द करण्याच्या संदर्भात आपल्या सभागृहाच्या माध्यमातून अनेक वेळा सातत्याने या प्रश्नाबाबत चर्चा झाली.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12693....

श्री. दिलीपराव सोनवणे .....

सभापती महोदय,मध्यंतरीच्या काळात डॉ. देवीसिंह शेखावत, अध्यक्ष, व्यवस्थापन मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली माननीय मुख्यमंत्र्यांकडे चर्चा झाली आणि दिनांक 8/8/2007 रोजी आदेश देखील पारित झाला आहे. अशासकीय शाळांमधील आकृतीबंध रद्द करण्याच्या आणि एस.एस.कोड प्रमाणे पदे भरण्याच्या बाबतीतील निर्णयही झालेला आहे. याबाबतची कार्यवाही सुरु आहे, एका महिन्यात निर्णय घेण्यात येईल, अशा प्रकाकरचे उत्तर जवळ जवळ तीन ते चार शिक्षण मंत्र्यांनी दिलेले आहे. गेल्या पाच-सहा वर्षापासून जागा रिक्त आहेत. या जागा भरण्यास संस्थेने मान्यता दिलेली नाही. त्यामुळे अनेक कामे ठप्प झालेली आहेत. आज या प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरामध्ये "उच्च स्तरीय समितीपुढे प्रस्ताव विचाराधीन आहे." असे नेहमीप्रमाणेच उत्तर देण्यात आलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, मागच्यावेळी माननीय शिक्षण मंत्री श्री. दर्डा यांनी उत्तर दिले होते की, " या संदर्भात तज्ज्ञ मंडळी आणि पालकांची बैठक घेतली जाईल." तेव्हा ती बैठक झाली आहे काय, त्या बैठकीमध्ये निर्णय झाला आहे काय, अधिवेशन संपण्यापूर्वी एस.एस.कोडप्रमाणे पदे भरण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल काय आणि माननीय मुख्यमंत्री यांनी दिलेल्या आदेशाचा आदर केला जाईल काय?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सोनवणे यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे. हा प्रश्न या पूर्वी या सभागृहात 27 वेळा विचारण्यात आलेला आहे. सभापती महोदय, माध्यमिक शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठी दिनांक 28 जून, 1994 रोजी चिपळूणकर समितीने शिफारस केल्या प्रमाणे नवा आकृतीबंध अस्तित्वात आला. त्याच्या अगोदर माध्यमिक शाळा संहितेप्रमाणे आकृतीबंध कार्यान्वित होता. सन 2001 मध्ये वित्त विभागाने सर्व पदांचा आढावा घेण्याचे आणि त्याचे पुनरावलोकन करण्याचे आणि काटकसरीचे धोरण राबविण्याचे आदेशित केले होते. त्यामागे अशी भावना होती की, वर्षानुवर्षे एक पद चाललेले आहे. मध्यंतरीच्या काळात संगणकीकरण झालेले आहे. अनेक नवीन-नवीन गोष्टी आलेल्या आहेत. तेव्हा याचे एकूणच पुनरावलोकन करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने दिनांक 25 नोव्हेंबर, 2005 ला शासनाने नवा आकृतीबंध लागू केला. सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, नवा आकृतीबंध आल्यानंतर शिक्षण संस्था चालक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा याला एकूणच फार

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12693....

श्री. राजेंद्र दर्डा......

मोठा विरोध होता. त्या अनुषंगाने तत्कालीन माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे जी बैठक झाली होती त्यावेळी त्यांनी असे निदेश दिले होते की, माध्यमिक शाळा संहितेप्रमाणे आकृतीबंध लागू करण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करण्यात यावेत. त्या दृष्टिकोनातून ऑगस्ट, 2008 पासून आम्ही वेगवेगळे प्रयत्न केल्या नंतर सद्य:स्थितीमध्ये उच्चस्तर समितीसमोर हा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. मला खात्री आहे की, आता पुन्हा हा प्रश्न विचारण्याची 28 वी वेळ न येता लवकरात लवकर हा प्रश्न मार्गी लावण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांचे आभार मानतो की, त्यांनी प्रामाणिकपणा दाखवून हा प्रश्न 27 वेळा या सभागृहात चर्चेला आलेला आहे हे स्वत: कबूल केलेले आहे. ती गोष्ट आमच्या तोंडून ऐकण्याची पाळी येऊ दिली नाही. हा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रश्न आहे. सभापती महोदय, आपण सुध्दा या प्रश्नामध्ये लक्ष घातले होते आणि आपल्या दालनात या संदर्भात बैठक घेतली होती त्यामध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंधाबाबत चर्चा झाली होती. आम्ही शिक्षक आमदार सातत्याने याबबतीत प्रश्न मांडीत आहोत. शासनाकडे पैसे नसतील तर पैशाची मागणी मान्य करण्यात येऊ नये. पण यासाठी कुठलाही वित्तीय भार लागणार नाही. सभापती महोदय, मंत्री महोदयांनी नव्याने या खात्याचा कार्यभार हाती घेतलेला आहे. संपूर्ण महाराष्ट्राच्या त्यांच्याकडून अपेक्षा आहेत. ते एक वजनदान मंत्री आहेत. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली आहे. तेव्हा हे अधिवेशन संपण्यापूर्वी उच्च स्तर समितीसमोर जाऊन निर्णय घेण्यात येईल काय आणि एस.एस.कोड प्रमाणे ही पदे भरण्याच्या संदर्भात हे अधिवेशन संपण्यापूर्वी जी.आर. निर्गमित करण्यात येईल काय?

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12693 ....

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निदेशानुसार 2008 मध्ये आपण वित्त विभागाला संपूर्ण प्रस्ताव सादर केला होता आणि त्या वेळेला वित्त विभागाने हा प्रस्तास संयुक्त सचिव समितीसमोर ठेवण्यास सांगितले. त्यानंतर अनेक त्रुटी दाखविण्यात आल्या. शेवटी संयुक्त सचिव समितीने आपला हा प्रस्ताव मान्य करुन किंवा त्यांच्या शिफारशी करुन आता 2009 मध्ये उच्चस्तर समितीसमोर ठेवण्यास सांगण्यात आले. त्या बद्दल सुध्दा वित्त विभागाने आपले म्हणणे त्या ठिकाणी मांडलेले आहे आणि काही अधिक माहिती मागितलेली आहे. मी आपल्याला एकच सांगतो की, एक आठवड्याच्या आत त्यांना हवी असलेली माहिती आम्ही उच्च स्तरीय समितीसमोर घेऊन जाऊ आणि शिक्षण विभागाच्या माध्यमातून हा विषय तातडीने सुटावा या दृष्टीकोनातून उच्च स्तरीय समितीमध्ये आम्ही जोर लावू.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्र्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल आम्हाला शंका नाही. कारण आम्हाला जे बोलावयाचे आहे ते आधीच बोलून टाकतात. यामध्ये प्रश्न वेगळा आहे. उच्च स्तरीय समितीचा निर्णय येईल तेव्हा येईल पण तो निर्णय येईपर्यंत आपण सभागृहात दिलेल्या आश्वासनानुसार आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निर्णयानुसार एस.एस.कोड अनुसार सध्याच्या रिक्त जागा भरल्या जातील का ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्य जाणतात की, आज एक आकृतीबंध या ठिकाणी लागू आहे. मी सांगू इच्छितो की, तो मागे घेतलेला नाही. मी सभागृहात जेव्हा बोलतो तेव्हा पूर्ण जबाबदारीने बोलतो.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या ठिकाणी चुकीचे रेकॉर्डवर येत आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकतीचे मुद्दे मांडता येत नाहीत. मी आपल्याला प्रश्न विचारण्याची संधी देतो.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, त्यांनी आता उच्च स्तरीय समितीसमोर आठ दिवसात माहिती घेऊन जाऊ असे जे उत्तर दिले ते

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12693 .... श्री. वसंतराव खोटरे...

उत्तर ऐकून आम्ही आता थकलो आहोत. 2003 पासून हा प्रश्न प्रलंबित आहे. 21 नोव्हेंबर, 2003 चा जो शासन निर्णय आहे तो शासन निर्णय आम्ही लक्षवेधी सूचना लावून 11.12.2003 ला रद्द केला. त्यावेळी माननीय श्री. शिंदे साहेब मंत्री होते. 12.12.2005 नंतर ज्या वेळी निर्णय रद्द केला त्या वेळी प्रा. वसंत पुरके साहेब शिक्षण मंत्री होते. 18 सप्टेंबर रोजी औरंगाबादला 35 हजार कर्मचाऱ्यांनी मोर्चा नेला तेव्हा पोलिसांनी आम्हाला अटक केली आणि हजारो कर्मचाऱ्यांवर लाठीहल्ला केला, ही सद्य:स्थिती माननीय मंत्री महोदयांना माहीत नाही म्हणून मी सांगत आहे. वर्षानुवर्षे म्हणजे 2003 पासून आतापर्यंत पर्यंत अनेक उन्हाळे-पावसाळे गेले. या गरीब कर्मचाऱ्यांचा आपण छळ मांडलेला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपला प्रश्न विचारावा.

श्री. वसंतराव खोटरे : माझे असे म्हणणे आहे की, ते कोणाचे ऐकत नाहीत, शिक्षण मंत्र्यांचे ऐकत नाहीत, मुख्यमंत्र्यांचे ऐकत नाहीत, माननीय मुख्यमंत्र्यांनी जो आदेश दिला....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा. नाही तर मला पुढचा प्रश्न पुकारावा लागेल.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मला माफ करा.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी दोन वेळा आपल्याला प्रश्न विचारण्याबाबत सांगितले. आपण या ठिकाणी बाहेरच्या एखाद्या सभेसारखे भाषण करणार असाल तर ती पध्दत या सभागृहाच्या कामकाजाच्या दृष्टीने बरोबर नाही.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मी क्षमा मागतो. माननीय मुख्यमंत्र्यांच्या म्हणण्यानुसार ज्या वेळी बैठक झाली त्यानुसार एस.एस.कोड प्रमाणे नाही पण आपण 8 दिवसाच्या आत जे म्हणत आहात त्या प्रमाणे यावर कारवाई करणार का ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव खोटरे हे भावनाविवश झाले. त्यांच्या भावना आपण समजून घेतल्या पाहिजेत. कोणाचा अवमान करण्याचा त्यांचा उद्देश नव्हता. ते फार तळमळीने बोलत होते. मी ही गोष्ट समजू शकतो. सन्माननीय सदस्य

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12693 .... श्री. राजेंद्र दर्डा....

2003 बद्दल सांगत आहेत. 2005 च्या नोव्हेंबरमध्ये जो आकृतीबंध आला तो आपल्याला मान्य नाही असे सन्माननीय सदस्य म्हणतात. परंतु त्या वेळी हा आकृतीबंध लागू करण्यात आला होता. म्हणूनच आपण ऑगस्ट, 2007 मध्ये सन्माननीय श्री. देविसिंग शेखावत यांच्या नेतृत्वाखाली जी एक बैठक तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांसमोर झाली

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12693.... श्री.राजेंद्र दर्डा....

त्या बैठकीमध्ये तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले होते. ही बाब सन्माननीय सदस्यांनी कृपया समजून घ्यावी. त्यानंतर संयुक्त समिती नेमण्यात आली, उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली, असा या विषयाचा प्रवास झालेला आहे....

श्री.कपिल पाटील : उच्चस्तरीय समितीचा निर्णय होईपर्यंत एस.एस.कोडनुसार रिक्त पदे भरली जातील काय एवढेच मंत्री महोदयांनी सांगावे. त्या निर्णयाची अंमलबजावणी करणे सरकारला भाग आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होण्यापूर्वीच सन्माननीय सदस्य मध्येच उभे राहून बोलत आहेत, ही पध्दत बरोबर नाही. मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण झ ााल्यावर सन्माननीय सदस्यांना जेवढा वेळ बोलावयाचे असेल तेवढा वेळ बोलता येईल.

**सभापती** : मंत्री महोदयांचे म्हणणे बरोबर आहे. सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांचे उत्तर चालू असताना मध्येच उभे राहून बोलू नये.

श्री.नारायण राणे : सन्माननीय सदस्यांनीच प्रश्नाचे उत्तर द्यावे, त्यानंतर मंत्री महोदय त्यांचे उत्तर बरोबर आहे की नाही हे सांगतील.

श्री.राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे या प्रश्नातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. मी पुन्हा एकदा सांगतो की, या आकृतीबंधामुळे जर जुनी पदे अतिरिक्त ठरली तरी कोणत्याही व्यक्तीला नोकरीतून काढण्याचा प्रश्न येत नाही. परंतु एस.एस.कोड लागू करण्याची मागणी केल्यामुळे यासंबंधीची माहिती एक आठवड्यात उच्चस्तरीय समितीकडे पाठवितो. तसेच 15 दिवसामध्ये यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांकडे एक बैठक आयोजित करुन माननीय उप मुख्यमंत्र्यांना सुध्दा आमंत्रित केले जाईल. यावेळी हा प्रश्न शासनाला मार्गी लावावयाचा आहे. सन्माननीय सदस्य आणि शासनाची भावना वेगळी नाही. एस.एस.कोडसाठी पुढील 15 दिवसात एक बैठक घेऊन मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

------

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अकोला जिल्ह्यातील लघुपाटबंधारे विभागाचे कार्यकारी**
**अभियंता यांच्यावर करावयाची कारवाई**

**(2) * 13363 डॉ.रणजित पाटील, श्री.भगवान साळुंखे, श्री.केशवराव मानकर, श्री.पांडुरंग फुंडकर** : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अकोला जिल्ह्यातील लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभागाचे कार्यकारी अभियंता 20 हेक्टर पेक्षा जास्त सिंचन क्षमता असलेल्या निकृष्ट दर्जाच्या 61 कोल्हापूरी बंधाऱ्यांचा पाहणी दौरा करण्यास व माहिती देण्यास हेतुपरस्पर टाळाटाळ करीत असलेला मुद्दा उपस्थित झाल्याने कार्यकारी अभियंता श्री.सोनडवले यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करण्याचा ठराव जिल्हा परिषदेच्या स्थायी समिती सभेत दिनांक 12 जानेवारी, 2011 रोजी सर्वानुमते मंजुर करण्यात आला आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(3) असल्यास, कार्यवाहीचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(4) अद्यापपर्यंत कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव देवकर, डॉ.नितीन राऊत यांच्याकरिता** : (1) दिनांक 12/1/2011 रोजी स्थायी समिती जिल्हा परिषद अकोला यांच्या बैठकीत संबंधित कार्यकारी अभियंता ल.पा.(स्था.स्तर) विभाग, अकोला यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचा ठराव मंजूर झाला असला तरी सदर बैठकीच्या इतिवृत्तावर सभापती, स्थायी समिती, जिल्हा परिषद, अकोला यांनी स्वाक्षरी केलेली नाही.
(2) प्रश्न उद्भवत नाही.
(3) प्रश्न उद्भवत नाही.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, "कार्यकारी अभियंता यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचा ठराव मंजूर झाला असला तरी सदर बैठकीच्या इतिवृत्तावर सभापती, स्थायी समिती, जिल्हा परिषद, अकोला यांनी स्वाक्षरी केलेली नाही." पण कार्यकारी अभियंत्यांविरुध्द कठोर कारवाई करण्याचा ठराव स्थायी समितीच्या सभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आला आहे हे खरे आहे काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, श्री.सोनडवले, कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, जि.प.अकोला येथे कार्यरत आहेत. दिनांक 15.12.2010 रोजीच्या स्थायी समितीच्या बैठकीत श्री.नितीन देशमुख, सभापती, कृषी यांनी श्री.सोनडवले यांना असे सांगितले होते की, अकोला जिल्ह्यातील 61 पाझर तलावांमध्ये पाणी साचत नाही. त्यामुळे तुम्ही तलावांची पाहणी करण्यासाठी

3....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दौरा करावा. यावर श्री.सोनडवले यांनी माझ्याकडे वाहन नसल्यामुळे मी दौरा करु शकत नाही असे उत्तर दिले होते. परंतु त्यांनी पुढील वेळी दौरा करण्याचे आश्वासन दिले होते. दिनांक 12.1.2011 च्या सभेत श्री.सोनडवले यांनी आश्वासन दिल्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशा प्रकारचा ठराव सभापतींनी मांडला. त्या ठरावाची नोंद करण्यात आली. परंतु सभापतींनी सभेच्या कार्यवृत्ताला मंजुरी देताना त्या ठरावावर सही केली नाही. पण पुढील सभेत तो ठराव सहीशिवाय त्याच पध्दतीने मंजूर झाला. म्हणजे त्या ठरावाला मंजुरी मिळाली नाही. त्यामुळे कार्यकारी अभियंत्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही.

**सभापती** : मी मंत्री महोदयांना सांगतो की, आपण छापील उत्तर पहावे. त्यात "कार्यकारी अभियंता यांच्याविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्याचा ठराव मंजूर झाला, असे स्थायी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त लिहिण्यात आले, परंतु सभापतींनी त्यावर सही केली नाही," असे नमूद केलेले आहे. खरे तर ज्यावेळी सन्माननीय सदस्य विधिमंडळाच्या माध्यमातून एखादा प्रश्न विचारतात त्यावेळी शासनाचे उत्तर स्वयंस्पष्ट असावयास पाहिजे. या कारणामुळे मी हा प्रश्न राखून ठेवीत आहे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर देण्यास तयार आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिगम पूर्वी श्री. खंदारे 12.40 वा.

ता.प्र.क्र. 13363...

**सभापती** : प्रश्न भाग (2), (3) आणि (4) ला "प्रश्न उद्‌भवत नाही" अशा प्रकारे छापील उत्तर दिलेले आहे. या व्यतिरिक्त मंत्री महोदयांनी असेही उत्तर दिलेले आहे की, अकोला जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीमध्ये जी काही चर्चा झाली त्या चर्चेचे इतिवृत्त मंजूर करताना ज्या सभापतींनी हा ठराव मांडला त्यांनी सही केली नाही. खरे म्हणजे अशा पध्दतीचे ड्राफ्टिंग आपल्या विभागा मार्फत येथे येणे संयुक्तिक वाटत नाही. म्हणून मी हा प्रश्न राखून ठेवत आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील मराठी माध्यमांच्या शाळांना मान्यता मिळण्याबाबत**

**(३) * १३७८३ डॉ.दिपक सावंत , श्री.विक्रम काळे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.दिलीपराव सोनवणे , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.राजन तेली , श्री.हुसेन दलवाई , प्रा.सुरेश नवले , श्री.कपिल पाटील , श्री.जयंत पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.चरणसिंग सप्रा , श्री.एम.एम.शेख , श्री.सुरेशदादा देशमुख , श्री.प्रितमकुमार शेगांवकर : तारांकित प्रश्न क्रमांक ९२७९ ला दिनांक ४ डिसेंबर, २०१० रोजीच्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुदानित मराठी शाळांना परवानगी तसेच अनुदान न देण्याचे शासनाचे धोरण असल्याचे माहे जानेवारी, २०११ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नविन मराठी शाळेकरीता एकूण किती अर्ज प्राप्त झाले आहेत तसेच चालू स्थितितील मराठी शाळांनी आयसीएसई, सीबीएसई, ब्रिटीश इंटरनॅशनल यासाठी अर्ज केले आहेत त्यापैकी किती शाळांना मान्यता देण्यात आली आहे,

(३) असल्यास, मराठी शाळांचे अस्तित्व टिकून राहण्यासाठी व स्थानिक मुलांना मराठीतून शिक्षण मिळण्यासाठी मराठी शाळा सुरु असणे गरजेचे असल्याने याबाबत राज्य शासनाने बृहत आराखडा तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र दर्डा :** (१) नाही.

(२) सन २००८-२००९ मध्ये सुमारे ११,००० मराठी प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरु करण्याकरिता प्रस्ताव दाखल करण्यात आले होते. तथापि, बृहत आराखडा निश्चित करुनच नवीन शाळांना परवानगी देण्याचा निर्णय शासन स्तरावरुन घेण्यात आल्याने सदरहू प्रस्ताव रद्द करण्यात आले आहेत. चालू स्थितीतील कोणत्याही मराठी शाळेने सीबीएसई, आयसीएसई, ब्रिटीश इंटरनॅशनल यामध्ये परिवर्तीत होण्याकरिता अर्ज केलेला नाही.

(३) व (४) बृहत आराखडा तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

श्री. विक्रम काळे : हा आकृतिबंध लागू करण्याबाबतची तारीख अथवा कालावधी निश्चित केलेला आहे काय ? या बृहत आराखड्याला मान्यता देण्याचा कालबद्द कार्यक्रम ठरविलेला आहे काय ? येणारे शैक्षणिक वर्ष ४ महिन्यावर आहे. तेव्हा येणा-या जून २०११ पूर्वी हा बृहत आराखडा जाहीर करण्यात येईल काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : राज्यात ७५ हजार अनुदानित प्राथमिक शाळा आणि जवळपास २० हजार माध्यमिक शाळा आहेत. या शाळांना वेतन आणि आनुषंगिक लाभ दिले जातात. शाळांना परवानगी दिली जात नाही असा प्रश्न विचारण्यात आलेला आहे. सन २००१-२००७ या कालावधीत १६४८ प्राथमिक आणि २१९६ माध्यमिक शाळांना परवानगी दिली होती. इतक्याच शाळांना परवानगी दिली असे नाही तर मध्यंतरी सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून ६०१३ नवीन शाळा सुरु करण्यात

..३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिगम पूर्वी श्री. खंदारे १२.४० वा.

ता.प्र.क्र.१३७८३... श्री. राजेंद्र दर्डा....

आल्या. शाळा सुरु करण्याच्या संदर्भात २००८ मध्ये एक जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात आले होते. त्यावेळी ११६५४ अर्ज प्राप्त झाले. त्यामध्ये प्राथमिक शाळेसाठी ५६२५ आणि माध्यमिक शाळेसाठी ६०२९ अर्ज प्राप्त झाले होते. त्यावेळी शासनाने निर्णय घेतला होता की, ज्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना "कायम" शब्द लावलेला आहे त्याबाबतीत १६ जून २००९च्या कॅबिनेटमध्ये "कायम" शब्द काढून त्या शाळांना सन २००१२-२०१३ पासून अनुदान लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. जाहिरातीमध्ये "कायम" हा शब्द वापरला असल्यामुळे ती प्रक्रिया रद्द करावी लागली आणि बृहत आराखड्याचे काम सुरु झाले. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी बृहत आराखड्याची परिस्थिती काय आहे, असा प्रश्न विचारलेला आहे. बृहत आराखडा तयार झालेला असून त्याची अंतिम छाननी करण्याचे काम चालू आहे. पुढील आठवड्याभरात बृहत आराखडा पूर्णपणे तयार होईल. बृहत आराखड्याच्या संदर्भात तीन-चार गोष्टी महत्वाच्या आहेत. अंतर आर.टी. प्रमाणे सांगितलेले आहे. त्यानंतर लोकसंख्येचा निकषही लक्षात घेतलेला आहे. हे सर्व निकष लक्षात घेऊन बृहत आराखडा जाहीर करण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : मंत्री महोदयांनी मांडलेल्या भूमिकेशी आम्ही सारे सहमत आहोत. गरज नसताना इतक्या शाळांना परवानगी देणे चुकीचे आहे. दुस-या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असा उल्लेख करण्यात आलेला आहे की, हा प्रश्न केवळ मराठी शाळांपुरता मर्यादित नाही तर सीबीएसई, आयसीएसई किंवा अन्य बोर्डाच्या शाळा उघडण्यात आल्यामुळे एसएससी बोर्डाच्या अनेक मराठी आणि इंग्रजी शाळांची संख्या कमी होत आहे. यासाठी दोन गोष्टी करण्याची आवश्यकता आहे. एक म्हणजे आपल्या एससीसी बोर्डाच्या मराठी किंवा इंग्रजी शाळांचा दर्जा एनसीआरटी प्रमाणे उंचावून आपले एसएससी बोर्ड आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बरोबरीने आणण्याची नितांत आवश्यकता आहे.

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....नंतर श्री. गिते....

ता.प्र.क्र.13783.... श्री.कपिल पाटील...

शासन तसे करील काय ? असे केले तर आपोआप या शाळा वाचतील. या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

श्री. राजेंद्र दर्डा : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी अत्यंत महत्वाचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. मराठी शाळा सुरु करण्याचाच प्रश्न नाही, मराठी शाळा टिकल्या पाहिजेत. मराठी शाळा टिकवावयाच्या असतील तर, त्या दृष्टीकोनातून त्याच्या अभ्यासक्रमाचा दर्जा वाढविला पाहिजे आणि ज्या शाळा आहेत, त्यांचा दर्जाही वाढविणे आवश्यक आहे. मला या सभागृहास सांगण्यास आनंद होत आहे की, एनसीएफ हे केंद्राने तयार केल्यानंतर त्यांनी राज्यांना सांगितले होते की, आपणही तयार करा आणि त्यादृष्टीने एससीएफ तयार करण्यात आले. त्यामध्ये गेल्या वर्षभरात खूप चांगले काम झालेले आहे. नवीन अभ्यासक्रम कसा असला पाहिजे त्या बाबतचा आराखडा जवळपास तयार झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जे मत या ठिकाणी व्यक्त केले, त्यांच्या मताशी मी सहमत आहे. शाळा सुरु करताना त्यांच्या दर्जाकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे आणि त्या दृष्टीकोनातून अधिक लक्ष दिले जाईल.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मराठी शाळांचा मुद्दा राज्यात चर्चिला जात आहे. त्यामुळे राज्य शासनाने यासंदर्भातील स्पष्ट अशा प्रकारचे धोरण जाहीर करणे आवश्यक आहे. यात दोन बाबी महत्वाच्या आहेत. जो बृहत आराखडा आहे, त्यास किती टाईम लिमिट घालून देण्यात आला आहे ? तो बृहत आराखडा शासन कधीपर्यंत जाहीर करणार आहे ? दुसरे असे की, "कायम विना अनुदानित " असा शब्दप्रयोग होता, तो शब्दप्रयोग मागच्या काळात बाजुला केला आहे. शाळांना अनुदान देण्याविषयीचे धोरण बृहत आराखडयासोबत शासनाने जाहीर केले तर सगळया गोष्टी अत्यंत स्पष्ट होतील. यासंदर्भातील भूमिका माननीय मंत्री महोदय सभागृहात जाहीर करतील काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला आहे. फक्त बृहत आराखडा जाहीर करुन चालणार नाही. बृहत आराखडा केंव्हा जाहीर केला जाईल असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे ? या प्रश्नाचे मी अगोदरच उत्तर दिलेले आहे. बृहत आराखडयाची अंतिम

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

छाननी चालू आहे. मंत्रिमंडळातील माझे ज्येष्ठ सहकारी आहेत, त्यांचेशी चर्चा करुन, तातडीने म्हणजेच एप्रिल महिन्यांच्या शेवटच्या आठवडयात अंतिम रुप देऊन त्यासंदर्भात जाहिरात देता येईल अशी माझी स्वत:ची अपेक्षा आहे. बृहत आराखडया बाबत चिंता करु नका अशी माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या दुसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, अनेक प्राथमिक आणि माध्यमिक शाळा यांना "कायम" असा शब्द होता. 2009 च्या निर्णयाप्रमाणे "कायम" हा शब्द निघालेला आहे. या शाळांना अनुदान देण्यापूर्वी शासनाला त्याचे मूल्यांकन करणे तसेच त्यासंबंधीचे निकष ठरविणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्यांनी याबाबतची मागणी मागच्या अधिवेशनात केलेली आहे. मूल्यांकनाचे निकष ठरविले गेले पाहिजेत. शालेय शिक्षण विभागामार्फत मूल्यांकनाचे निकष ठरवून वित्त विभागास पाठविले होते. वित्त विभागाने त्या निकषामध्ये त्रुटी काढली होती. ती त्रुटी दूर करुन मूल्यांकनाचे निकष पुन्हा वित्त विभागाकडे पाठविले आहेत. मला खात्री आहे की, एप्रिल महिन्याच्या शेवटपर्यंत मूल्यांकनाचे निकष हे निश्चितपणे तयार होतील.

--------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महानगरपालिका व नगरपालिका संचालित शाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती मिळणेबाबत**

**(४) * १२७२८ श्री.वसंतराव खोटरे, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.विक्रम काळे, श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत : दिनांक २७ जुलै, २०१० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या ९ व्या यादीमधील प्रश्न क्रमांक २६२२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानगरपालिका व नगरपालिका संचालित शाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती होणेबाबतचा प्रस्ताव कित्येक वर्षांच्या कालावधीपासून शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाचा विचार पुर्ण होऊन घेण्यात आलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, उपरोक्त बाबतीत लागणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र दर्डा :** (१) होय.

(२) व (३) मा.मुख्यमंत्री महोदयांचे आदेशानुसार मुख्य सचिवांचे अध्यक्षतेखालील समितीपुढे प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रश्न असल्यामुळे उप प्रश्न विचारण्यासाठी मला अधिक वेळ द्यावा. राज्यामध्ये सर्व शासकीय व निम शासकीय, शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळते. परंतु या महाराष्ट्रात छोटासा वर्ग आहे, तो म्हणजे नगरपरिषदेमधील प्राथमिक व माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळत नाही.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे...... ता.प्र.क्र.12728.....

दिनांक 12 मार्च, 1989 पासून अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती दिली जात आहे. विदर्भात नगरपालिकेच्या फक्त 54 शाळा आहेत, नाशिक विभागात 14 शाळा आहेत आणि कोकणामध्ये फक्त 4 शाळा आहेत. यातील काही शाळा महानगरपालिकेच्या अखत्यारीत आहेत. नगरपालिकेच्या ज्या शाळा शिक्षण मंडळामार्फत चालविल्या जातात त्या शाळेतील शिक्षकांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती दिली जात आहे. त्यामुळे नगरपालिकेतर्फे चालविल्या जाणाऱ्या शाळांमधील शिक्षकांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळावी यासाठी पुढील 10 दिवसात शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल काय? शासनाकडून शिक्षणाधिकारी व शिक्षण उपसंचालकांना पत्र पाठवून कळविले जाते की, नगरपालिकेतर्फे चालविल्या जाणाऱ्या शाळांमधील शिक्षकांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती दिली जावी. परंतु त्यांचे म्हणणे आहे की, आम्हाला शासनाकडून स्पष्ट आदेश पाहिजेत. याबाबत योग्य तो निर्णय घेऊन नगरपालिकेच्या शाळांमधील शिक्षकांना न्याय मिळण्यासाठी शासन निर्णय निर्गमित केला जाईल काय?

श्री.राजेंद्र दर्डा : मी सुरुवातीलाच सांगू इच्छितो की, जो निर्णयच झालेला नाही तो निर्णय निर्गमित करा हे म्हणणे संयुक्तिक आहे असे मला वाटत नाही. हा प्रश्न वेगळा आहे. राज्यात सध्या एकूण 22 नगरपालिका आहेत. माननीय सदस्यांनी शाळांची आकडेवारी दिली आहे. परंतु राज्यात अ, ब व क नगरपालिकांची संख्या 222 इतकी असून 3 नगरपंचायती आहेत. अशाप्रकारे सर्व नागरी स्वराज्य संस्थांची संख्या 247 आहे. राज्यातील महानगरपालिका व नगरपालिका या स्वायत्त संस्था आहेत. त्या ठिकाणी जे कर्मचारी काम करतात ते महानगरपालिका किंवा नगरपालिकांचे कर्मचारी असतात. या नागरी स्वराज्य संस्थांच्या कर्मचाऱ्यांचे वेतन शालेय शिक्षण विभागाकडून दिल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या अनुदानातून दिले जाते. राज्यामध्ये 5296 शिक्षक आणि 2234 शिक्षकेतर कर्मचारी आहेत. हे 7530 शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नगरपालिका, महानगरपालिका संचालित माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत आहेत. त्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबद्दलचा हा प्रश्न आहे. काही महानगरपालिका व नगरपालिका वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करीत आहेत. ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही त्यांच्याकडून वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती केली जात नाही. वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी त्यांना शासनातर्फे कोणतेही अनुदान दिले जात

..2...

SGB/ 12:50

श्री.राजेंद्र दर्डा..... ता.प्र.क्र.12728.....

नाही. वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती व्हावी यासाठी 2005 व 2009 मध्ये वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर केला होता. परंतु वित्त विभागाने या प्रस्तावाबाबत असहमती दर्शविली. माननीय लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा केल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी आदेश दिले की, मुख्य सचिव व संबंधित विभागाच्या सचिवांनी एकत्रित येऊन या प्रश्नाबाबत निर्णय घ्यावा. दिनांक 28 फेब्रुवारी, 2011 रोजी माननीय मुख्य सचिवांकडे या प्रश्नासंबंधी एक बैठक झाली होती. त्या बैठकीत अशा प्रकारचे वित्तीय दायित्व काही कालावधीसाठी शक्य होणार नाही असे त्यांनी स्पष्ट म्हटले आहे.

नंतर टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12728....... श्री. राजेंद्र दर्डा ........

मी सन्माननीय सदस्यांच्या मताशी सहमत आहे. हा प्रश्न फार मोठा नसून फक्त 7520 कर्मचाऱ्यांपुरताच असल्यामुळे मी स्वतःच ठरविलेले आहे की, माननीय वित्त मंत्री आणि मुख्य सचिव यांच्याबरोबर चर्चा करुन हा प्रश्न 100 टक्के मार्गी लावला पाहिजे. यादृष्टीने येत्या महिनाभरात प्रयत्न करण्यात येईल.

---------

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा अपघात विमा योजनेचे नूतनीकरण न केल्याने सर्व विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय**

**(5) *13439 श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो गाणार, श्री.चंद्रकांत पाटील, डॉ.रणजित पाटील, श्री.मोहन जोशी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.चरणसिंग सप्रा, श्री.हुसेन दलवाई, श्री.विजय सावंत** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील पहिलीपासून ते उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लाभ मिळणाऱ्या राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा अपघात विमा योजनेची मुदत माहे ऑगस्ट, 2010 ला संपून सुद्धा शासनाने नव्याने विमा कंपनीची नियुक्तीच न केल्याने राज्यभरातील सर्व विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचे माहे डिसेंबर, 2010 च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाकडून नव्याने विमा कंपनीची नियुक्ती न करण्याची कारणे काय आहेत,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र दर्डा** :(1) विमा कंपनीची नियुक्ती केली परंतु त्यांनी करार न केल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय झाली.

(2) व (3) शासन निर्णय दि.25-8-2010 अन्वये राज्यातील पहिली ते उच्च शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी दि.27-8-2010 ते 26-8-2011 या कालावधीसाठी राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा विमा योजना राबविण्यासाठी नॅशनल कंपनीस मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, इन्शुरन्स कंपनीने करार केलेला नाही.

श्री. मोहन जोशी : महोदय, ज्यावेळेस शासन एखादी योजना सुरु करते तेव्हा त्या योजनेच्या संदर्भात आवश्यक त्या पूर्तता करण्याची जबाबदारी सुध्दा संबंधित विभागांची असते. त्यानुसार स्व. राजीव गांधी यांच्या नावाने विद्यार्थ्यांसाठी अपघात विमा योजना राज्यात सुरु केली पण या योजनेची मुदत ऑगस्ट, 2010 मध्येच संपली. त्यानंतर 8 महिन्यांचा काळ उलटून गेला तरी अद्यापही शासनाने नंतरचा करार केलेला नाही, याचे कारण काय ? ज्या विद्यार्थ्यांचे मधल्या काळात नुकसान झाले त्याची नुकसान भरपाई करण्यासाठी शासन काय कारवाई करणार आहे ? त्यानंतर माझा असा प्रश्न आहे की, या कामात ज्या अधिकाऱ्यांनी दिरंगाई केली त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. राजेंद्र दर्डा : महोदय, ही गोष्ट खरी आहे की, स्व. राजीव गांधी यांच्या नावाने सर्व विद्यार्थ्यांसाठी ही विद्यार्थी सुरक्षा अपघात विमा योजना राज्यात लागू करण्यात आली होती. ही गोष्ट सुध्दा खरी आहे की, या योजनेची मुदत ऑगस्ट, 2010 पर्यंतच होती आणि त्यापुढील करार करणे आवश्यक होते. पण मी या प्रश्नाच्या खोलात गेलो आणि प्रामाणिकपणे यासाठी केलेले

....3....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रयत्न सांगतो, जेणेकरुन सभागृहाच्या सुध्दा लक्षात येईल. यातून कोणता मार्ग काढता येईल याचाही उहापोह करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. यासंबंधीची जाहिरात निघाल्यानंतर ज्या निविदा प्राप्त झाल्या होत्या, त्यात एकूण 6 कंपन्यांनी निविदा भरल्या होत्या. प्रत्येक कंपनीने प्रति विद्यार्थी वार्षिक प्रिमीयमचा दर हा वेगवेगळा दिलेला होता. त्यात नॅशनल इन्शुरन्स कंपनीने प्रति विद्यार्थ्यामागे 64 रुपये असा वार्षिक दर दिलेला होता आणि हा दर सर्वात कमी होता. अशा प्रकारे निविदा उघडल्यानंतर निविदा समितीने सांगितले की, नॅशनल इन्शुरन्स कंपनीने जरी कमी दर दिला असला तरी त्या कंपनीने मागील वर्षात दिलेल्या सेवेबाबतचे एकूण रेकॉर्ड पाहिले. मागील वर्षभरात कंपनीने केलेले काम पाहता दुसऱ्या क्रमांकाच्या इन्शुरन्स कंपनीला हे कॉन्ट्रॅक्ट दिले जावे असे ठरले.

महोदय, हा निर्णय प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली घेतला होता. सेकंड लोअेस्ट दर असलेल्या दुसऱ्या क्रमांकाच्या कंपनीचे मागील सहा महिन्यांचे रेकॉर्ड तपासले, त्यासंबंधी चार बैठका झाल्या व कंपनीला अनेक पत्रे सुध्दा दिली व शेवटी 4 फेब्रुवारी, 2010 रोजी पुन्हा प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांच्याकडे बैठक झाली तेव्हा कंपनीने करार करतो म्हणून सांगितले. हा करार स्टॅम्प पेपरवर करावा अशी त्यामध्ये अट होती. तसेच यामध्ये अशीही एक अट होती की, मागील वर्षी या कंपनीने शासनाकडून प्रिमीयमच्या स्वरुपात प्रति विद्यार्थ्यांमागे जो दर आकारला होता त्याच्या अगेन्स्ट किती मुलांना सेवा दिलेली आहे. एकदा स्कीम पास केल्यानंतर कंपनीने रेकॉर्ड बंधनकारक असूनही दिलेल नाही, याबद्दल मुख्य सचिवांशी मी बोललो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 13439 .....**

श्री. राजेंद्र दर्डा...

खरे म्हणजे सर्वात प्रथम नॅशनल इन्शुरन्स कंपनीलाच ब्लॅकलिस्ट करावे लागणार आहे. लोएस्ट टेंडर दिलेल्यानांच काम दिले पाहिजे असे मला तरी काही वाटत नाही. लोएस्ट टेंडरवाला प्रिमियम घेत असेल व त्याचा लाभ विद्यार्थ्यांना दिला जात नसेल तर ते योग्य नाही. यासंदर्भात मुख्य सचिवांनी सांगितले आहे की, पुढील आठवडयात या बाबत बैठक घेण्यात येईल व त्यामध्ये नवीन निविदा काढली जाईल.

सभापती महोदय, मी दुस-या प्रश्नाच्या संदर्भात माहिती देऊ इच्छितो की, ज्या विद्यार्थ्यांचा मृत्यू झालेला आहे किंवा जे विद्यार्थी कायमस्वरुपी अपंग झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांना क्लेम सेटल करण्याच्या संदर्भात शासनाकडून निश्चितपणे प्रयत्न केले जातील. याचे कारण असे आहे की, आपल्याला जो प्रिमियम विमा कंपनीला द्यावयाचा होता तो प्रिमियम अजूनही आपल्याकडेच असल्यामुळे अशा विद्यार्थ्यांना लाभ देणे शासनास शक्य होणार आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मंत्री महोदय मनापासून उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहेत. लोएस्ट किंवा हायेस्ट टेंडरच्या संदर्भात आम्ही काही बोलणार नाही परंतु ज्या विमा कंपन्यांनी विद्यार्थ्यांना नुकसानभरपाई दिली नाही अशा कंपनीला ब्लॅकलिस्ट केले जाईल यासंदर्भात जे विचार व्यक्त केलेले आहेत त्यासंदर्भात आम्ही त्यांचे अभिनंदन करतो. या कालावधीत काही विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले आहे किंबहुना काहींना कायमस्वरुपी अपंगत्व आलेले आहे तसेच काही विद्यार्थ्यांचा मृत्यू देखील झालेला आहे त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना शासन भरपाई देणार आहे काय ? तसेच अशा प्रकारे मुजोर झालेल्या कंपन्यांना आपण ब्लॅकलिस्टेड करणार आहात काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, अशा कंपन्यांना निश्चित प्रकारे ब्लॅकलिस्टेड केलेच पाहिजे. केवळ आपल्याच विभागाने अशा कंपन्यांना ब्लॅकलिस्टेड करुन काम भागणार नाही तर राज्यातील सर्व योजनेतूनच त्यांना ब्लॅकलिस्टेड केले पाहिजे तसेच केंद्र सरकारला सुध्दा यासंदर्भातील माहिती कळवण्याची व्यवस्था केली जाईल. त्याच बरोबर सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, ज्या विद्यार्थ्यांना कायमस्वरुपी अपंगत्व आलेले आहे किंवा ज्या विद्यार्थ्यांचा मृत्यू झालेला आहे अशा विद्यार्थ्यांना भरपाई देण्याच्या संदर्भात निश्चितपणे विचार केला जाईल. ...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.**: 13439 .....

श्री. प्रकाश बिनसाळे : संपूर्ण जगामध्ये विम्याच्या संदर्भात मेडिकल आणि इतर सर्व बाबतीत निर्णय घेतले जात असतात. या ठिकाणी मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, विम्याची मुदत संपल्यानंतर त्या विम्याची मुदत वाढली गेली नाही. त्यामुळे यासंदर्भात मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, करार कधी संपणार हे माहिती असताना एक वर्ष आधीच विमा कराराची प्रक्रिया सुरु का केली जात नाही ? विम्याच्या संदर्भात इन्शुरन्स रेग्युलेटर असतांना राष्ट्रीय स्वरुपाचे इन्शुरन्सच्या संदर्भातील निर्णय केंद्र सरकार घेत असते व राज्य स्तरावरील इन्शुरन्सच्या संदर्भातील निर्णय राज्य सरकार घेत असते. या इन्शुरन्सचा प्रिमियम ठरविण्यासाठी इन्शुरन्स रेग्युलेटरकडे जाऊन विनंती केली जाणार आहे काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी विम्याच्या संदर्भात अतिशय चांगल्या सूचना केलेल्या असल्यामुळे त्या सूचनांचा अभ्यास करुन त्यावर योग्य ती कार्यवाही केली जाईल.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, शाळेत जाणा-या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या संदर्भातील हा महत्वाचा विषय आहे. नॅशनल इन्शुरन्स कंपनी ही सरकारची इन्शुरन्स कंपनी आहे. जर फर्स्ट लोएस्ट कंपनी काम करीत नसेल तर सेंकड लोएस्ट कंपनीला काम करण्याच्या संदर्भात निगोसिएशन करण्याच्या बाबतीतील प्रयत्न शासनाने केलेला आहे काय, असे जर असेल तर वित्त विभागाने ही बाब का नाकारली याची माहिती मंत्री महोदय देतील काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, विमा कंपनीने लोएस्ट टेंडर भरले होते व त्यांनी हे काम केले नाही म्हणून हे काम दुस-या लोएस्ट कंपनीला देण्याबाबतची विनंती संचालकांनी शासनाला केली होती परंतु सदर विनंती मान्य करण्यात आली नाही. सन 2004 पासूनचा तक्ता मी पाहिल्यानंतर माझ्या असे लक्षात आले आहे की, आपण जो विमा दर देतो व जे विमा सेटल करतात त्यासंदर्भातील रक्कम पाहिली तर मला स्वत:ला असे वाटते की, विद्यार्थी सुरक्षा कवच अधिक मजबूत करण्यासाठी केवळ विम्याच्या माध्यमातून न जाता जीवनदायी योजनेसारख्या ज्या योजना आहेत त्यामध्ये मेडिकल एज्युकेशन, टेक्निकल एज्युकेशन, स्कूल एज्युकेशन या सर्व विभागाबरोबर एकत्र बैठक घेऊन पर्मनंट मार्ग काढण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

..3..



SGJ/ प्रथम श्री. खर्चे..... 13:00

**ता.प्र.क्र.: 13439 .....**

श्री. राजेंद्र दर्डा....

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी विमा कालावधी संपण्याच्या अगोदरच कार्यवाही करावयास पाहिजे होती असा प्रश्न उपस्थित केलेला असून विमा पॉलीसी संपण्याच्या अगोदर कार्यवाही केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

----

**सभापती :** ता.प्र.क्र. : 13,122

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्य शासनाच्या मुंबईतील चर्नी रोड येथील शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयातील यंत्र खरेदीत कोट्यवधी रुपयांचा झालेला अर्थिक घोटाळा**

**(७) * १३८६३ श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.उल्हास पवार , श्री.मोहन जोशी , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.सुभाष चव्हाण , श्री.जगदीश गुप्ता , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.संजय केळकर , श्री.चरणसिंग सप्रा , श्रीमती शोभाताई फडणवीस , श्री.धनंजय मुंडे , श्री.रामनाथ मोते , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्रीमती उषाताई दराडे , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या मुंबईतील चर्नी रोड येथील शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयातील यंत्र खरेदीत कोट्यवधी रुपयांचा अर्थिक घोटाळा झाल्याची धक्कादायक बाब दिनांक १८ जानेवारी, २०११ रोजी वा त्या सुमारास उघडकिस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घोटाळ्याची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने याप्रकरणी दोषी असणाऱ्यांविरुध्द शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सचिन अहिर,श्री.नारायण राणे यांच्याकरिता:** (१) नाही.

(२), (३) व (४) शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयात छपाई यंत्रे खरेदी संदर्भात शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या असून याबाबत चौकशी करण्यात येत आहे.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, चर्नीरोड येथील शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय हे १३६ वर्षा पूर्वी स्थापन झालेले आहे. या मुद्रणालयातील यंत्र खरेदी करण्याकरिता शासनाने पैसे मंजूर केलेले आहेत आणि त्याप्रमाणे यंत्राच्या खरेदी मध्ये घोटाळा झाला आहे काय असा मी पहिला प्रश्न विचारला असता त्याला "नाही" असे उत्तर देण्यात आले होते तसेच दुस-या,

तिस-या आणि चौथ्या प्रश्नाच्या उत्तरात असे म्हटलेले आहे की, " शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयात छपाई यंत्र खरेदी करण्याच्या संदर्भात शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या असून या बाबत चौकशी करण्यात येत आहे. " या मुद्रणालयामध्ये खरेदी करण्यात आलेल्या यंत्राचा दर्जा पाहता ज्यांच्याकडून ही यंत्रे खरेदी करण्यात आली होती ते ट्रेडर्स होते, मॅन्युफॅक्चरिंग करणा-याचे ते प्रतिनिधी नव्हते. हे यंत्र मॅन्युफॅक्चर करणां-याकडून खरेदी करण्याचा प्रयत्न का करण्यात आला नाही ? केवळ यंत्र खरेदी करण्याच्या बाबतीतच कामगार संघटनांनी तक्रारी केल्या आहेत असे नाही तर इतरही अनेक बाबतीत तक्रारी करण्यात आल्या आहेत. या मुद्रणालयातील रद्दी विक्रीसंबंधी देखील तक्रारी करण्यात आल्या आहेत तेव्हा या सर्व तक्रारीची सविस्तर चौकशी सचिव स्तरावरुन केली जाणार आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.१३८६३...

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की ज्यावेळी आपण यंत्र खरेदीची प्रक्रिया करीत असतो त्यावेळी टेन्डर काढण्यात येते . हे टेडर काढण्यापूर्वी त्यासंबंधीची जाहिरात दिली जाते. आपण एका कंपनीकडे वा एखाद्या मॅन्युफॅक्चररकडे जाऊन यंत्र खरेदी करीत नाही. याही प्रकरणात आपण तशाच प्रकारचे काम केलेले आहे.काही कंपनीने आपल्या ट्रेडर्सला ॲथॉरिटी देण्याचे काम केलेले आहे. त्यानंतर बिडींग प्रोसेसमध्ये हे सर्व यंत्र खरेदी करण्यात आले होते. त्यानंतर कामगार संघटनेने अशी तक्रार केली की या यंत्राच्या मॅन्युफॅक्चरचे दर आणि आपण खरेदी केलेल्या यंत्राचे दर यामध्ये तफावत आहे.आपण खरेदी केलेल्या यंत्राची किंमत जास्त आहे अशा प्रकारची तक्रार त्यांच्याकडून करण्यात आल्यानंतर शासनाने चौकशी करण्याचे आदेश दिले होते आणि चौकशीचा अहवाल मे महिन्यापर्यत येईल अशी अपेक्षा आहे. हे यंत्र मूळ किंमतीपेक्षा जास्त किंमतीला खरेदी करण्यात आले होते असे जर चौकशीमध्ये आढळून आले तर पुढची कारवाई करण्यात येईल.

श्री.प्रकाश बिनसाळे : या यंत्र खरेदीमध्ये भ्रष्टाचार झाला आहे काय असा पहिला प्रश्न विचारला असला त्याला " नाही " असे उत्तर देण्यात आले होते आणि दुस-या प्रश्नाच्या उत्तरामध्ये मात्र यंत्र खरेदीच्या संदर्भात शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या असून या बाबत चौकशी करण्यात येत आहे " असे उत्तर देण्यात आले आहे. पहिल्या प्रश्नाला " नाही " असे उत्तर देण्यात आल्यामुळे सभागृहाची दिशाभूल करण्यात आली आहे.अशा प्रकारच्या तक्रारी आल्या आहेत हे शासनाने दुस-या प्रश्नाच्या उत्तरामध्ये मान्य केलेले आहे. त्यामुळे पहिले उत्तर चुकीचे देण्यात आलेले आहे असे मला वाटते. तेव्हा या बाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.सचिन अहिर : सन्माननीय सदस्यांनी असे विचारले होते की यंत्राच्या खरेदीमध्ये भ्रष्टाचार झाला आहे काय ? त्या प्रश्नाला " नाही " असे उत्तर देण्यात आलेले आहे. आपल्या नियमाप्रमाणे वा निकषाप्रमाणे टेंडर काढण्यात आले होते.त्या टेन्डरमध्ये ज्या कंपनीने कमी दर दर्शविले होते त्यांच्याकडून यंत्रे खरेदी करण्यात आली होती. त्यामुळे या खरेदीमध्ये सकृतदर्शनी कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार , अयोग्यता वा अनियमितता झालेली नाही . यंत्राच्या खरेदी विक्रीसाठी शासनाने एक समिती गठीत केलेली आहे त्या समितीने हा निर्णय घेतला होता व तो शासनाने मान्य केलेला आहे. काही महिन्यानंतर कामगार संघटनेने तक्रार केल्यानंतर त्या

तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यास सांगितले असल्यामुळे दुस-या प्रश्नाच्या उत्तरामध्ये तशा प्रकारचा खुलासा करण्यात आला आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. तरी देखील मला त्यांना एक प्रश्न विचारावयाचा आहे. संघटनेने ज्या मशिनच्या संदर्भात तक्रार केली होती ती मशिन वेगळी होती आणि खरेदी करण्यात आलेली मशिन वेगळी होती काय? माझी अशी माहिती आहे की, जी खरेदी करण्यात आलेली मशिन होती ती डबल कलरची होती व ती योग्य होती. कामगार संघटनेने जी तक्रार केली ती मशिन वेगळी आहे काय आणि आपण खरेदी केलेली मशिन वेगळी आहे काय ?

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13863...

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, दोन्ही यंत्रांच्या स्पेसिफिकेशनमध्ये तफावत असल्याबाबत संघटनेने तक्रार केली आहे. त्यामुळे आपण तेवढयापुरता हा विषय मर्यादित ठेवला नाही. आपण हे यंत्र थेट मॅन्युफॅक्चररकडून खरेदी केले तर त्याची किंमत अमूक इतक्या दराने कमी होईल असे त्यांनी पत्र दिले. त्यामुळे संघटनेकडून प्राप्त झालेले पत्र ऑथेंटीक आहे की नाही या करिता संबंधित फॅक्टरीशी आपण पत्र व्यवहार केला आहे. मी या ठिकाणी सांगितल्यानुसार चौकशीचे आदेश दिले असून मे महिन्यापर्यंत संपूर्ण चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यासंबंधीचा निर्णय घेण्यात येईल.

श्री.विनायकराव मेटे : सभापती महोदय, आर्थिक घोटाळयासंबंधीची बाब उघडकीस आली काय ? या पहिल्या प्रश्नाला "नाही" असे उत्तर देण्यात आले आहे. तसेच, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या प्रश्नाला उत्तर देतांना "शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयात छपाई यंत्र खरेदी संदर्भात शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या असून या बाबत चौकशी करण्यात येत आहे" असे म्हटले आहे. यामध्ये जर आर्थिक घोटाळा नाही तर तक्रारी येण्याचे कारण काय? या तक्रारी जास्त दराच्या आल्या, यंत्राच्या आल्या की अन्य कोणत्या प्रकारच्या आल्या आहेत?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, यंत्रांच्या किंमतीमध्ये तफावत असल्याबाबत संघटनेकडून तक्रार करण्यात आल्यामुळे त्याच्या चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील अनुदानित संस्थांमधील शिक्षक-शिक्षकेतरांना**
**५ तारखेच्या आत वेतन मिळण्याबाबत**

**(८) * १३७१७ श्री.विक्रम काळे, श्री.वसंतराव खोटरे, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.रामनाथ मोते , श्री.भगवान साळुंखे , श्री.नागो गाणार , श्री.संजय केळकर , श्री.कपिल पाटील , श्री.जयंत पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ९०७४ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित संस्थांमधील शिक्षक-शिक्षकेतरांना दरमहा ५ तारखेपूर्वी वेतन मिळण्याबाबत शासनाने दिनांक १६ जुन, २००९ रोजीच्या शासन निर्णय तसेच परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना योग्य त्या सूचना देऊनही अनुदानित शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतरांना दिवाळीसाठी सुध्दा वेळेवर वेतन मिळाले नाही व अशा प्रकारच्या तक्रारी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केल्या आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्न भाग (१) नुसार शासन निर्णय परिपत्रकान्वये शासनाने सूचना देऊनही शिक्षक-शिक्षकेतरांना वेळेवर वेतन न मिळण्यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र दर्डा :** (१) होय.
(२) व (३) योजनेत्तर योजनेखाली वेतन वेळेवर अदा झालेले आहे. योजनांतर्गत योजनेखाली कमी तरतूद उपलब्ध झाल्याने उणे प्राधिकारपत्रावर वेतन अदा करण्यास मान्यता देण्यात आलेली हाती. पुनर्विनियोजनाद्वारे वाढीव निधी उपलब्ध करुन देऊन चालू वर्षाच्या वेतन थकबाकीसह वेतन अदा करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यामध्ये अनुदानित, कनिष्ठ महाविद्यालये आणि आदिवासींच्या शाळा आपल्या शिक्षण खात्याच्या अखत्यारीत आहेत. या शाळांमधील शिक्षकांचे वेतन दर महिन्याच्या पाच तारखेला होत नाही अशी त्यांची सातत्याने तक्रार असते. आजच्या स्थितीत गेल्या चार महिन्यापासून या राज्याच्या नक्षलग्रस्त भागातील शाळांमधील शिक्षकांचे सुध्दा वेतन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/

ता.प्र.क्र. १३७१३....

श्री.विक्रम काळे....

झाले नाही. त्यांना वेतन केव्हा दिले जाणार आहे? शिक्षकांना ५ तारखेच्या आत वेतन मिळावे याकरिता कोल्हापूरच्या उप संचालकांनी नवीन प्रणाली तयार केली आहे तिचा अवलंब संपूर्ण राज्यामध्ये कोणत्या कालावधीपासून करणार आहात? आम्हाला वारंवार अर्थसंकल्पामध्ये तरतूद नाही असे सांगितले जाते. तेव्हा वर्षभरासाठी लागणाऱ्या वेतनाची रक्कम किती आहे याची नियोजन विभागाला माहिती असते. त्याप्रमाणे पुढील वर्षीच्या वेतनासाठी लागणाऱ्या रकमेची तरतूद आपण अर्थसंकल्पामध्ये केली आहे काय?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी याठिकाणी तीन वेगवेगळे प्रश्न विचारले आहेत. त्यांचा पहिला प्रश्न आदिवासी विभागातील शिक्षकांसंबंधी आहे. आदिवासी उप योजनेंतर्गत मंजूर झालेल्या शाळांमधील शिक्षकांच्या वेतनासंबंधी त्यांनी प्रश्न विचारला आहे. गेल्या चार महिन्यापासून त्या शिक्षकांना वेतन मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. आदिवासी विभागाने साडे सात कोटी रुपये आमच्या विभागाकडे वर्ग करावयास पाहिजे होते ते अद्यापि केले नव्हते. त्याबाबत मी काल माननीय आदिवासी विकास मंत्र्यांबरोबर चर्चा केली असून त्यांना ३१ मार्चपूर्वी ही रक्कम वर्ग करण्याबाबत सांगितले आहे. जेणेकरुन शिक्षकांचे प्रलंबित असलेले पगार आपल्याला देता येतील. त्यांनी त्याबाबत कारवाई करतो असे मला सांगितले आहे. त्यामुळे माननीय सदस्यांनी विचालेला प्रश्न सुटेल. त्याचप्रमाणे कोल्हापूरमध्ये आपण प्रायोगिक तत्वावर एक प्रणाली अवलंबिली होती. त्याच धर्तीवर इतरत्र प्रणाली अवलंबिण्याबाबत अभ्यास सुरु आहे. त्याचप्रमाणे वर्षभरामध्ये शिक्षकांच्या वेतनासाठी किती रक्कम लागते हे नियोजन विभागाला माहीत असते असे त्यांनी विचारले आहे. मला आपल्याला सांगितले पाहिजे की, सुरुवातीला नियोजन विभागाने कमी तरतूद उपलब्ध करुन दिली होती तरी सुध्दा दिवाळीच्या वेळी पगार वेळेवर झाले नसल्याचे लक्षात आले. त्यामुळे शासनाने आदेश दिले की, उणे रक्कम जरी असली तरी त्याठिकाणी वेळेवर पगार देण्यात यावेत. तेव्हा सर्वसाधारणपणे ऑक्टोबर २०१० पासून योजनांतर्गत आणि योजनेतर तरतुदीमधून शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर होत आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अस्वाक्षरित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

APR/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:15

ता.प्र.प्र.13717 . . . .

श्री.राजेंद्र दर्डा . . ..

राज्यातील अनुदानित संस्थांमधील शिक्षक-शिक्षकेतरांना 5 तारखेच्या आत वेतन मिळालेच पाहिजे या दृष्टीकोनातून शासनाने आपली सिस्टीम इम्प्रुव्ह केलेली आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. दुपारी सभागृह सुरु झाल्यानंतर जी चर्चा झाली, त्यामध्ये सदनाची 20 मिनिटे खर्च झालेली आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, सदनामध्ये ज्यावेळी शिक्षण विभागाच्या संबंधातील प्रश्न उपस्थित होतात. त्यावेळी या सदनातील 11 ते 12 शिक्षक प्रतिनिधींनी चार-चार मिनिटांचा वेळ घेऊनच प्रश्न विचारले तर मला असे वाटते की, सदनामध्ये फक्त दोन-तीन प्रश्नच उत्तरीत होतील.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आम्ही थोडक्यात प्रश्न विचारतो, आम्हाला केवळ एक-एक मिनिटांचा वेळ द्यावा.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मला एका गोष्टीबाबत अभिनंदन करावयाचे आहे. राज्यातील अनुदानित संस्थांमधील शिक्षक-शिक्षकेतरांना 5 तारखेच्या आत वेतन मिळण्याबाबत प्रश्न विचारला आहे. पण शिक्षण विभागाला वारंवार सूचना देऊन सुध्दा . .. . .

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----

. . . .एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लधु उद्योग विकास महामंडळ मर्यादितचा सन 2005-2006 चा चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.रणजित कांबळे (पर्यटन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादितचा सन 2005-2006 चा एकतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माननीय राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने वर्ष 2011-2012 चे वार्षिक नियोजन व वर्ष 2010-2011 मधील वितरित तरतूद व जानेवारी, 2011 अखेर खर्चाचा जिल्हानिहाय तपशिलासह अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

. . . .एक्स-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, धनंजय मुंडे, संजय केळकर,वि.प.स.यांनी "उल्हासनगर शहरातील अनधिकृत इमारती/विकासकामे नियमाधीन करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे, सदर बांधकामे नियमाधीन करण्याबाबतचे छाननीपत्रक व माहितीपत्रक जिल्हाधिकाऱ्यांनी तयार करणे, सदर काम धिम्यागतीने सुरु असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत पाटील वि.प.स.यांनी "बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, 2009 (आरटीई) च्या अंमलबजावणीसाठी शासनाने काढलेल्या जी.आर.मध्ये अनेक विसंगती व त्रुटी असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.यांनी "मुंबईतील गिरणी कामगारांना परवडणारी घरे देण्याबाबतचा शासनाने निर्णय घेणे, गिरणी कामगारांना घरे देताना घालण्यात आलेल्या अटींमुळे गिरणी कामगार घरांपासून वंचित राहणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

-----

. . . .एक्स-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : खामगांव येथील राजीव गांधी शाळा क्रमांक-3 च्या

नूतनीकरण व सुशोभीकरण करण्याच्या कामांसंदर्भात बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आलेली तक्रार

**मु. शी.** : खामगांव येथील राजीव गांधी शाळा क्रमांक-3 च्या नूतनीकरण व सुशोभीकरण करण्याच्या कामांसंदर्भात बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आलेली तक्रार यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.रणजित पाटील, श्री.केशवराव मानकर वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

----

**पृ.शी** : नाशिक जिल्हा रुग्णालयात कक्षसेवक आणि शिपाई पदांच्या भरतीत बनावट गुणपत्रिकेच्या आधारे व शासनाची फसवणूक करुन देण्यात आलेल्या नियुक्त्या

**मु.शी.**: नाशिक जिल्हा रुग्णालयात कक्षसेवक आणि शिपाई पदांच्या भरतीत बनावट गुणपत्रिकेच्या आधारे व शासनाची फसवणूक करुन देण्यात आलेल्या नियुक्त्या यासंबंधी सर्वश्री जयप्रकाश छाजेड, राजन तेली,अशोक उर्फ भाई जगताप,सुभाष चव्हाण, उल्हास पवार,मोहन जोशी, एस.क्यू.ज़मा, हेमंत टकले वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

-----

. . . .एक्स-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 2 बाबत</u>

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय,आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक 2 बाबत मला असे सांगावयाचे आहे की, सदरहू लक्षवेधी सूचनेवरील चर्चा 29 तारखेला घेण्याऐवजी 30 तारखेला किंवा 31 तारखेला घेण्यात यावी.

**सभापती** : ठीक आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : दूध पावडर व दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन करण्यावर राज्य शासनाने घातलेली बंदी

**मु. शी.** : दूध पावडर व दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन करण्यावर राज्य शासनाने घातलेली बंदी यासंबंधी सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, परशुराम उपरकर वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( माननीय सदस्य अनुपस्थित )

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या सभागृहात लक्षवेधी सूचना पुकारण्यात आल्या नंतर सन्माननीय सदस्य अनुपस्थित असतील तर सदर लक्षवेधी सूचना लॅप्स होणार काय?

**सभापती** : लक्षवेधी सूचना शक्य तो मी लॅप्स करीत नाही.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**लक्षवेधी सूचना क्रमांक 4 बाबत**</u>

**सभापती** : या लक्षवेधी सूचनेला उत्तर देणारे संबंधित मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे ही लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल.

( विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य सभागृहात येतात )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ. शी.** : मुंबईतील कमलानेहरु उद्यानातील लोकप्रिय म्हातारीच्या बुटाची डागडुजी करण्याबात.

**मु. शी.** : मुंबईतील कमलानेहरु उद्यानातील लोकप्रिय म्हातारीच्या बुटाची डागडुजी करण्याबाबत श्री.सुभाष चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा□□य सदस्य श्री. सुभाष चव्हाण यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय,मुंबईतील, कमला नेहरु उद्यानातील लोकप्रिय म्हातारीचा बूट हा शालेय विद्यार्थ्यांचे खास आकर्षण आहे. हा म्हातारीचा बूट 1880 मध्ये बांधण्यात आला असून, या बुटाला आज सुमारे 131 वर्षे पूर्ण होत आहेत. या बुटाला गेल्या कित्येक वर्षात डागडुजीची गरज निर्माण झालेली आहे. हॅंगिग गार्डन मधील म्हातारीच्या बुटाची लेस तुटल्याचे उघड झाले आहे. मुंबई महानगरपालिकेच्या कंत्राटदाराने सुमारे रु. 85 लक्ष खर्च करुन निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे या बुटाची अवस्था दयनीय झालेली आहे.

तरी या जुन्या वास्तूंचे जतन करण्यासाठी राज्याच्या पुराभिलेख विभागाने विशेष लक्ष घालून आवश्यक निधीची तरतूद करावी, अशी सूचना मी विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

-----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील मसाज सेंटर या माध्यमातून अनेक अनैतिक व्यवहार राजरोसपणे सुरु असल्याबाबत

**मु. शी.** : राज्यातील मसाज सेंटर या माध्यमातून अनेक अनैतिक व्यवहार राजरोसपणे सुरु असल्याबाबत श्री. हेमंत टकले वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा□□य सदस्य श्री. हेमंत टकले यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

राज्याच्या गृह खात्याने बारबालांवर सन 2005 पासून बंदी घातली आहे परंतु आता हया मद्यविक्री करणाऱ्या बारमध्ये पळवाटा काढून ग्राहकाला मद्यागृहाच्याबाहेर जावून सौदे करण्याचा एक नवा पायंडा पडला आहे. एकटया मुंबई शहरात 200 हून अधिक परवानाधारक बार आहेत. त्याचप्रमाणे गेल्या 3 वर्षात मसाज सेंटर ही मोठया प्रमाणात वाढले आहेत. या माध्यमातून अनेक अनैतिक व्यवहार राजरोसपणे सुरु आहेत. गृहखात्याने या संबंधी त्वरित कायदेशीर कारवाई करण्याची गरज आहे. याबाबत शासनाने धडक कृती कार्यक्रम हाती घ्यावा, अशी विनंती मी या विशेष उल्लेखद्वारे करीत आहे.

---

..5..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पू. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्राथमिक शाळांचा राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेत समावेश होऊनही प्रशासकीय अडचणीमुळे योजनेस होत असलेला विलंब.

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयातील प्राथमिक शाळांचा राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेत समावेश होऊनही प्रशासकीय अडचणीमुळे योजनेस होत असलेला विलंब याबाबत श्री. राजन तेली वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा□□य सदस्य श्री. राजन तेली यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. राजन तेली ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतर्फे केंद्र शासनाची राजीव गांधी ग्रामीण विद्युत्तीकरण योजनेंतर्गत सिंधुदुर्ग जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील सर्व कुटुंबांना नाममात्र रुपये 15 अनामत रक्कम भरुन व पॉईंटचे वीजसंच मांडणीसहित वीज कनेक्शन देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सिंधुदुर्ग जिल्हयातील ज्या प्राथमिक शाळांना अजूनपर्यंत विद्युत पुरवठा केला गेलेला नाही अशा 46 प्राथमिक शाळांच्या विद्युतीकरणाचा समावेश या योजनेत केलेला आहे. परंतु प्रशासकीय अडीअडचणीमुळे ही समाजोपयोगी योजना राबविण्यात विलंब होत असल्याने याबाबत संबंधित ठेकेदारावर त्वरित कार्यवाही व्हावी, यासाठी करावयाची तातडीची कार्यवाही, याकरिता मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून हा विषय सभागृहात मांडू इच्छितो, कृपया स्वीकृत करावा, ही वंनती.

---

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नांदेड-मुंबई गोदावरी एक्स्प्रेस सुरु करणे व लातूर-मुंबई एक्स्प्रेसला मांजरा एक्स्प्रेस नाव देण्याबाबत

**मु. शी.** : नांदेड-मुंबई गोदावरी एक्स्प्रेस सुरु करणे व लातूर-मुंबई एक्स्प्रेसला मांजरा एक्स्प्रेस नाव देण्याबाबत याबाबत श्री. विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा□□य सदस्य श्री. विक्रम काळे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"भारत सरकारने नुकताच सामान्य जनतेचे हित समोर ठेवून अर्थसंकल्प मांडला. रेल्वे मत्र्यांनीही सामान्य प्रवाशांचे हित लक्षात ठेवून रेल्वे अर्थसंकल्प मांडला. त्यात मराठवाड्यासाठी काही रेल्वेगाड्या अधिकच्या सुरु करण्याची घोषणा झाली. परंतु मराठवाड्यातील महत्वाच्या असलेल्या नांदेड-मुंबई रेल्वे मार्गावर, जो रेल्वे मार्ग मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांपैकी पाच जिल्हे जोडतो, त्या मार्गावर प्रवाशाची वाढती संख्या लक्षात घेता नांदेड ते मुंबई अशी एक स्वतंत्र एक्स्प्रेस सुरु होणे गरजेचे होते व तिला गोदावरी एक्स्प्रेस नाव देणे गरजेचे आहे. तरी किमान भविष्यात लवकरात लवकर नांदेड-मुंबई अशी स्वतंत्र गोदावरी एक्स्प्रेस रेल्वे सुरु व्हावी व लातूर-मुंबई सुरु असलेल्या एक्स्प्रेस रेल्वेला मांजरा एक्स्प्रेस असे नाव देण्यात यावे. तरी आपल्या शिफारशीसह ही मागणी रेल्वे मंत्र्यांकडे तातडीने पाठवावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे मांडत आहे."

---

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बीड जिल्ह्यातील परळी येथील हनुमान व्यायाम शाळेला तातडीने अनुदान मिळण्याची आवश्यकता

**मु. शी.** : बीड जिल्ह्यातील परळी येथील हनुमान व्यायाम शाळेला तातडीने अनुदान मिळण्याची आवश्यकता याबाबत ॲड. उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड. उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील महत्वाच्या व निकडीच्या बाबीवर विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"बीड जिल्ह्यातील परळी येथे 1921 साली हनुमान व्यायाम शाळा सुरु करण्यात येऊन सदर व्यायाम शाळेला रुपये 50 हजाराचे अनुदान देण्यात येणे, सदर अनुदानातून व्यायाम शाळेचे साहित्य खरेदी करण्यात येणे, तथापि तद्नंतर दोन वेळा रुपये 15 हजार प्रमाणे अनुदान दिल्यानंतर 25 वर्षापासून अनुदानाची रक्कम देण्यात न येणे, परिणामी सदर व्यायाम शाळेत व्यायामाच्या साधनाचा अभाव निर्माण झालेला असून सदर व्यायाम शाळेला तातडीने अनुदान मिळण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ MMP

**पृ. शी.** : नियम स्थगित ठेवणे

**मु. शी.** : नियम स्थगित करण्याबाबत वित्त राज्यमंत्र्यांचा प्रस्ताव

श्री. राजेंद्र मुळक ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 289 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"महाराष्ट्र विधान परिषद नियमातील नियम 228 (1) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची तरतूद सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या संदर्भात स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.00 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 1.28 ते 2.00 वाजेपर्यंत मध्यंतर )

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करण्यात यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

**उप सभापती** : सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक मी 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.01 ते 2.10 पर्यंत स्थगित झाली. )

----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 14:10

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

## महाराष्ट्राची आर्थिक पाहणी पुस्तिका मिळण्यासंबंधी

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, दिनांक 23 मार्च 2011 रोजी महाराष्ट्राची आर्थिक पाहणी ही पुस्तिका सन्माननीय सदस्यांच्या पिजन होल मध्ये ठेवण्यात येण्यासंबंधी सूचना देण्यात आलेल्या होत्या. परंतु अद्याप ती पुस्तिका सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना पिजन होलमध्ये उपलब्ध झालेली नाही.

**उप सभापती** : माझ्या माहिती प्रमाणे ती पुस्तिका सर्व सन्माननीय सदस्यांना वितरित करण्यात आलेली आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेबाबत**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचा आजचा पहिला दिवस आहे. परंतु या चर्चेचा उद्याचा शेवटचा दिवस आहे असे समजते. तसेच असेही समजते की उद्या सभागृहाची बैठक सकाळी 10 ते दुपारी 2.00 वाजेपर्यन्तच आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी तीन दिवस देण्याचे ठरले होते.

**उप सभापती** : आपण सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे तीन दिवसातील एक दिवस चर्चा होऊ शकली नाही. सभागृहामध्ये विरोधी पक्ष उपस्थित नसल्यामुळे ही चर्चा राखून ठेवलेली होती. तरी या संदर्भात माननीय सभापतीना विचारुन निर्णय घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ज्या दिवसापासून माननीय विरोधी पक्षनेते चर्चेला सुरुवात करतात त्या दिवसापासून चर्चेचे तीन दिवस मोजण्यात येतात. अर्थसंकल्पावरील चर्चेला माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या भाषणा पासून सुरुवात होते. काल माननीय सभापतींनी ही चर्चा पुढे ढकलली त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. या चर्चेसाठी आजपासून तीन दिवस देण्यात यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

**उप सभापती** : माननीय सभापतींना विचारुन या बाबतचा निर्णय घेण्यात येईल.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## आमदारांना जिमखान्याचे सदस्यत्व व क्रिकेट सामन्याचे पास मिळण्याबाबत

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, आपण सर्वजण लोकप्रतिनिधी आहोत. या लोकप्रतिनिधींना मुंबईतील जिमखान्याचे सदस्यत्व मिळण्याबाबत बैठक होऊन हे सदस्यत्व देण्याचा निर्णय देखील झालेला आहे. जे जिमखाने शासनाच्या अधिपत्याखाली आहेत त्या जिमखान्यांचे सदस्यत्व विधानसभा आणि विधानपरिषदेतील सर्व सन्माननीय सदस्यांना मिळावयास पाहिजे.

तसेच 2 एप्रिल 2011 रोजी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर ऐतिहासिक क्रिकेट सामाना होणार आहे. या सामन्याचे पासेस दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांना मिळण्याची व्यवस्था व्हावी. आयएअेस अधिका-यांना मात्र जिमखाना, वेलिंग्टन क्लबचे सदस्यत्व ताबडतोब मिळते. लोकप्रतिनिधींना देखील तसे सदस्यत्व मिळायला पाहिजे. तसेच क्रिकेटच्या अंतिम सामन्याचे पासेस दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांना मिळण्याची व्यवस्था व्हावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**उप सभापती** : क्रीडा खात्याचे मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित आहेत. त्यांनी यामध्ये लक्ष घालावे.

श्री. दिवाकर रावते : 300 पासेस आलेले आहेत, असे कालच्या एका वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेले आहे. तेव्हा हे वाटप कसे करणार हे समजले तर बरे होईल.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, मुंबईतील वानखेडे स्टेडियममध्ये पहिल्यांदा दोन क्रिकेट मॅच झाल्या होत्या, त्यावेळी प्रत्येकी 250 पासेस क्रीडा विभागाकडे आले होते. हे पासेस कोणाकोणाला वितरित केले त्याबाबतची माहिती वृत्तपत्रात देखील आली होती. सभापती महोदय, मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर दिनांक 2 एप्रिल, 2011 रोजी जी क्रिकेट मॅच होणार आहे. ती विश्वकपासाठीची फायनल मॅच आहे. त्या क्रिकेट मॅचचे पास मिळण्याबाबत क्रीडा विभागामार्फत संबंधित संयोजकांना पत्र लिहिले आहे. क्रिकेट मॅच संयोजकांची आज बैठक होणार आहे. कॉम्प्लीमेंटरी पासेस संयोजकांकडून क्रीडा विभागास अद्यापपर्यंत प्राप्त झालेले नाहीत. सदर संयोजकांस महसूल मंत्री यांनी देखील पत्र पाठविले आहे. सभापती महोदय, आपण या संदर्भात निर्देश दिले तर निश्चितपणे त्यासंबंधी दखल घेऊ.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी जे निवेदन केले आणि त्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांनी निर्देश देण्यासंदर्भात माझ्याकडे विनंती केली. मी माननीय क्रीडा राज्यमंत्र्यांना असे निर्देश देतो की, आपण ताबडतोब क्रिकेट मॅच आयोजकांशी संपर्क साधून सभागृहाच्या भावना कळवाव्यात आणि सभागृहातील प्रत्येक सदस्यांस सन्माननीय एक तरी पास देण्याची व्यवस्था करावी.

----

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.** : सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**उप सभापती** : आजपासून अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस प्रारंभ होईल. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी एकूण जो वेळ उपलब्ध होईल, त्यापैकी वित्तमंत्र्यांच्या उत्तरासाठी असलेला एक तास जमेस धरुन निम्मा वेळ सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांकरिता आणि निम्मा वेळ विरोधी पक्षाचे सदस्य व अपक्ष सदस्य यांना देण्यात येईल. या चर्चेत ज्या सन्माननीय सदस्यांना भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपले नावे आपल्या पक्ष प्रतोदामार्फत माझ्याकडे त्वरित पाठवावीत.

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : माननीय उप सभापती महोदय, दिनांक 23 मार्च, 2011 रोजी या राज्याचे अर्थ राज्यमंत्री यांनी या सभागृहामध्ये महाराष्ट्र शासनाचा 2011-2012 या वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला.

महोदय, विधानसभा सभागृहात काही जरी झाले असेल तरी विधानपरिषद सभागृहामध्ये आम्ही अतिशय शांततेने माननीय अर्थ राज्यमंत्र्यांचे एकेक वाक्य ऐकले. अर्थ मंत्र्यांचे अर्थसंकल्पीय भाषण एकदा नव्हे तर तीन वेळा मी वाचून काढले. या भाषणाच्या दुसऱ्या परिच्छेदात राज्यात कृषी व उद्योग क्षेत्राची उन्नती व्हावी व त्या माध्यमातून तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा तसेच राज्याच्या सर्व भागांचा व समाजातील सर्व घटकांचा विकासात वाटा असावा हा दृष्टीकोन अर्थसंकल्प तयार करताना समोर ठेवला आहे असे म्हटले आहे. सभापती महोदय, माननीय अर्थ राज्यमंत्र्यांचे भाषण आम्ही पूर्णपणे ऐकलेले आहे. माननीय अर्थ राज्यमंत्र्यांचे भाषण सुरुवातीला बरे होते. परंतु ते भाषण पुढे पुढे वाचत गेले, तसतशी निराशा आमच्या पदरात पडावयास लागली. सुरुवातीला दुर्लक्षित क्षेत्राविषयी तसेच कृषी व समतोल विकासाच्या घोषणा केल्या. मी माननीय अर्थ राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपल्या पक्षाचे बोधवाक्य "आम आदमी " असे आहे. या अर्थसंकल्पामध्ये "आम आदमी" ला कोठे तरी बस्त्यात बांधून टाकले. माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी अतिशय सक्षमपणे अर्थव्यवस्था आमच्या समोर मांडली....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.......

सभापती महोदय, सन 2010-2011 मध्ये महसुली जमा 1,07,159 कोटी रुपये असताना महसुली खर्च मात्र 1,12,846 कोटी रुपये झालेला आहे. याचा अर्थ सन 2010-2011 या आर्थिक वर्षात 5687 कोटी रुपयांची महसुली तूट आलेली आहे. सन 2011-2012 या आर्थिक वर्षात महसुली जमा 1,21,503 कोटी रुपये अपेक्षित असून महसुली खर्च 1,21,445 कोटी रुपये एवढा अपेक्षित केलेला आहे. म्हणजे जवळपास 528 कोटी रुपयांचे शिलकी अंदाजपत्रक माननीय वित्त मंत्र्यांनी सभागृहाला सादर केले आहे. कर व्यतिरिक्त उत्पन्न 9730 कोटी रुपये व केंद्र सरकारकडून मिळणारी अनुदाने 14,368 कोटी रुपये अशी एकूण 1,12,503 कोटी रुपये महसुली जमा अंदाजपत्रकात दर्शविण्यात आली आहे. सन 2010-2011 च्या तुलनेत सन 2011-2012 मध्ये महाराष्ट्राचे एकूण उत्पन्न 1,43,344 कोटी रुपयांची वाढणार आहे असे वित्त मंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात सांगितले आहे. या वाढीव उत्पन्नामध्ये केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या 3416 कोटी रुपयांचा समावेश असल्याचे म्हटले आहे. 1000 कोटी रुपये वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक विक्रीमुळे मिळणार आहेत असा उल्लेख केलेला आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे मुंबई शहरामध्ये राहतात. त्यांना कल्पना आहे की, या वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाच्या विक्रीमुळे मुंबई शहराची अवस्था भयानक होणार आहे. मुंबई शहरातील जनतेला ज्या मूलभूत पायाभूत सुविधा पुरविल्या पाहिजेत त्या अत्यंत अपुऱ्या असताना वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाची विक्री करणे व त्यापासून उत्पन्न मिळविणे हे निश्चितच पुरोगामी महाराष्ट्राच्या लौकिकाला साजेसे नाही एवढेच मला म्हणावयाचे आहे. उत्पन्न वाढविण्याचे अनेक स्त्रोत आहेत. या मुंबई शहरातील जमिनी विकावयाच्या आणि त्यातून उत्पन्न मिळवायचे प्रयत्न केल्यामुळे या शहरामध्ये भविष्यात अनेक टोलेगंज इमारती उभ्या राहणार आहेत. या टोलेगंज इमारतींच्या दृष्टीने पायाभूत सुविधा कशा पुरविणार आहात? आज मुंबई शहरामध्ये पाणी, गटारे, रस्ते, दिवाबत्ती या नागरी सुविधा पुरेशा प्रमाणात देणे शक्य नसताना 1000 कोटी रुपयांचा वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक विकून त्या माध्यमातून मोठमोठ्या इमारती उभ्या केल्या जाणार आहेत. या इमारतींच्या उभारणीनंतर पुन्हा पायाभूत सुविधांवर ताण पडणार आहे. जमिनी विकून हजार कोटी रुपयांचे उत्पन्न मिळविणे हे पुरोगामी महाराष्ट्राला शोभनीय नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर........

सभापती महोदय, शासनाला मुद्रांक आणि नोंदणी शुल्काद्वारे 1537 कोटी रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न मिळणार असल्याचा उल्लेख केलेला आहे. आम्ही मुंबई शहरात वास्तव्य करीत नाही. आम्ही ग्रामीण भागातून या शहरात आलो आहोत. मुंबईतील सदनिकांच्या किंमती, जमिनीच्या किंमती प्रचंड प्रमाणात वाढल्या आहेत. सदनिकांची विक्री होत असताना आपोआप त्या रक्कमेच्या तुलनेत वाढीव मुद्रांक शुल्क भरावे लागते. या माध्यमातून उत्पन्न वाढण्यासाठी शासनाला फार काही प्रयत्न करावे लागतात असे नाही. सदनिका वा जमिनीच्या किंमती सहजपणे वाढल्यामुळे त्या प्रमाणात मुद्रांक शुल्काची रक्कम वाढत जाते आणि शासनाच्या उत्पन्नात भर पडते. वस्तूंच्या किंमती वाढल्यामुळे त्या वस्तूंवरील विक्रीकराचे उत्पन्न वाढते. माननीय वित्त मंत्र्यांनी 5185 कोटी रुपये विक्रीकरात वाढ झाल्याचे म्हटले आहे. या राज्यामध्ये प्रत्येक वस्तूवर विक्रीकर आकारला जात असल्यामुळे महागाई जसजशी वाढते तसतशी कराची रक्कम वाढत जाते. उदाहरण द्यायचे झाले तर सिगारेटच्या एका पाकिटाची किंमत 20 रुपये असताना त्याची किंमत वाढून 40 रुपये झाली असेल तर........

नंतर 2इ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .........

त्यावरील कर दुप्पट होणार आहे. म्हणजे हा कर 20 रुपयावरुन 40 रुपये एवढा होणार आहे. हे प्रत्येक वस्तुच्या बाबतीत म्हटले तरी चालेल. जसजशा किमती वाढत जातील त्यामुळे आपोआप या विक्रीकरात वाढ झाली आहे. यामध्ये केंद्राकडून मिळणाऱ्या निधीचाही समावेश आहे. अशा प्रकारे 58 कोटीचा शिलकी अर्थसंकल्प सादर करताना शासनाच्या डोक्यावर मात्र कर्जाचा डोंगर उभा आहे हे विसरुन चालणार नाही. आताच सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी सांगितल्याप्रमाणे "राज्याची आर्थिक पाहणी" या पुस्तिकेत रु. 2.31 लाख कोटीचे कर्ज या राज्यावर आहे, ही चिंतेची बाब आहे. एवढे कर्ज असताना आणखी बजेटच्या 1 टक्का एवढे कर्ज घेता येईल असेही सुतोवाच केले. याचा अर्थ रु. 2.31 लाख कोटीवरुन हा कर्जाचा बोजा वाढणार आहे. इतका मोठा कर्जाचा बोजा असताना शासनाला आणखी 1 टक्का कर्ज करुन एक कर्जबाजारी राज्य अशी प्रतिमा देश पातळीवर करावयाची आहे काय, असाही प्रश्न निर्माण होतो. ज्या पुरोगामी राज्याने संपूर्ण देशाला सतत एक नवी दिशा दिली असा हा महाराष्ट्र आज दिवाळखोरीत निघालेला आहे. एक कर्जबाजारी महाराष्ट्र, कर्ज काढल्याशिवाय या राज्याचा संसार चालणार नाही अशीच एक प्रकारे राज्याची प्रतिमा निर्माण झालेली आहे, हे मान्य करायला पाहिजे. युती शासनाची कारकीर्द संपली तेव्हा या राज्यावर रु. 39 हजार कोटीचे कर्ज होते पण आघाडी शासनाच्या 11 वर्षाच्या काळात मात्र रु. 2.31 लाख कोटीवर हा कर्जाचा बोजा गेलेला आहे.

महोदय, एका बाजूला राज्याच्या विकासाला या कर्जबाजारीपणामुळे खीळ बसलेला आहे, राज्यातील उद्योग दिवसेदिवस कमी होत आहेत, लोड शेडिंगचे प्रमाण वाढत चालले आहे, शाळांची दुरवस्था, आरोग्याची दुरवस्था झालेली आहे, शिक्षणाचा बट्ट्याबोळ झालेला आहे. असे असताना इतक्या मोठ्या प्रमाणावर कर्जाचा बोजा या शासनाने राज्यावर टाकलेला आहे, हे पुरोगामी म्हणविणाऱ्या आघाडी सरकारला, महाराष्ट्राला भूषणावह नाही.

महोदय, मागील काही वर्षांचा आढावा घेत असताना मी असे सांगणार आहे की, सन 2009-10 ची वार्षिक योजना रु. 26 हजार कोटीची होती. सन 2010-11 ची वार्षिक योजना रु. 33935 कोटीची होती. याचा अर्थ असा की या दोन वार्षिक योजनांमध्ये एकंदरित आकारमान रु. 59935 कोटीचे होते. मागील दोन वर्षांच्या दरम्यान रु. 48 हजार कोटीने कर्ज वाढलेले





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ........

आहे. याचाच अर्थ असा की राज्याच्या वार्षिक योजनेतील 80 टक्के उत्पन्न हे कर्जाद्वारे उभे केले. "राज्याची आर्थिक पाहणी" या पुस्तिकेमध्ये सन 2010-11चे निष्कर्ष काढण्यात आले आहेत. त्यानुसार महसुली जमा रु. 97044 कोटी आणि रु. 1.04 लाख खर्च, याचा अर्थ रु. 7656 कोटी इतकी तूट अपेक्षित होती. सन 2010-11 ची वार्षिक योजना रु. 33935 कोटीची असताना 2010-11 मध्ये रु. 25822 कोटीचे निव्वळ कर्ज अपेक्षित होते, पण हे प्रमाण किती तरी जास्त आहे. केवळ 19.02 टक्के इतकाच भांडवली खर्च अपेक्षित धरला होता. याचा अर्थ सन 2010-11 या आर्थिक वर्षात पायाभूत सुविधा निर्मितीवर आघाडी शासनाने खूप कमी रक्कम खर्च केली. पायाभूत सुविधा निर्मितीवर जवळपास 30 टक्के इतका कमी खर्च केला आणि अनुत्पादक बाबींवर मात्र 70 टक्के इतका खच्र करण्यात आला आहे. राज्याच्या वित्तीय तुटीचे स्थूल उत्पन्नाशी असलेले प्रमाण 2.04 टक्के आहे. हेच प्रमाण सन 2007-08 मध्ये फक्त 0.04 टक्के इतके होते.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सभापती महोदय, सन 2007-08 मध्ये वित्तीय तुटीचे 0.4 टक्के असलेले प्रमाण आज 2.4 टक्के झालेले आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक पहाणीमध्ये महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न 74,027 रुपये दाखवले आहे. हे जे दरडोई उत्पन्न आहे ते काही खेडयात राहणा-या माणसाचे नाही तर ते मुंबई, ठाणे, पुणे येथे राहणा-या माणसाचे दरडोई उत्पन्न आहे. या जिल्हयाचे राज्य उत्पन्नातील एकूण वाटा 56 टक्के आहे. मुंबई,ठाणे व पुणे या शहराचे उत्पन्न वगळून महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न 56,241 रुपये आहे. ग्रामीण भागातील माणसाचे तसेच ग्रामीण भागातील शेतक-याचे दरडोई उत्पन्न 56,241 रुपये आहे. बुलढाणा, वाशिम, नंदूरबार,यवतमाळ, मराठवाडयातील काही जिल्हयाचे दरडोई उत्पन्न केवळ 40,000 रुपये आहे असे या राज्याचे आर्थिक चित्र आहे. हे राज्य कर्जबाजारी झाले असून ते आता दिवाळखोरीत गेलेले आहे. असे असताना राज्य शासनाने 58 कोटी रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प सादर केलेला आहे. कृषी क्षेत्राबद्दल या ठिकाणी सांगितले गेले परंतु मी माननीय राज्य मंत्र्यांना सांगू इच्छितो की, आम्ही आपले भाषण एकाग्रचित्ताने ऐकले व वाचले आहे. आपण कृषी क्षेत्राच्या उन्नतीचे फार मोठे स्वप्न पाहिलेले आहे. खरे तर पुरोगामी महाराष्ट्राने देशात सर्वप्रथम कृषीवर स्पेशल अर्थसंकल्प मांडावयास पाहिजे होता. फुले, शाहू, आंबेडकरांचे नाव घेऊन आपण राज्य चालवित आहात. त्यामुळे आपण कृषीसाठी वेगळा अर्थसंकल्प मांडावयास पाहिजे होता. परंतु शेतीसाठी महाराष्ट्र शासनाने नाही तर कर्नाटक राज्याने शेतीसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प मांडलेला आहे. कर्नाटक राज्याने 17000 कोटी रुपयांचे बजेट दिलेले आहे. खरे म्हणजे त्यांचा नंबर आपल्यालाही घेता आला असता परंतु आपण तसे केले नाही.

मागच्या वर्षी कृषीसाठी 2158 कोटी रुपयांची तरतूद केली होती परंतु यावर्षी आपण कृषीसाठी केवळ 19,156 कोटी रुपये तरतूद केलेली आहे. मागच्या वर्षीपेक्षा या वर्षी आपण कृषीची तरतूद का कमी केली आहे ? अशामुळे आपल्याला कृषीची आणि उद्योगाची उन्नती साधावयाची आहे काय ? वित्त विषयक विवरणपत्र पृष्ठ क्रमांक 13 वर ही बाब नमूद करण्यात आलेली आहे. पुरोगामी महाराष्ट्राने शेतीसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प मांडावयास पाहिजे होता परंतु तसे झाले नाही तर मागच्या वर्षी पेक्षा या वर्षी शेतीसाठीची तरतूद कमी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

करण्यात आलेली आहे. कृषी हा राज्य सूचीचा विषय आहे. कृषी क्षेत्राच्या विकासाकरिता राज्यानेच पुढाकार घ्यावयास पाहिजे होता. सन 1970-71 मध्ये महाराष्ट्रामध्ये प्रत्यक्ष शेती करणा-या शेतक-यांची संख्या 49.50 लक्ष होती. सन 2005-06 मध्ये शेती करणा-या शेतक-यांची संख्या 1.37 कोटी होती अशी माहिती महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीमध्ये आहे. याचा अर्थ असा होतो की, सन 1970-71 च्या तुलनेत कृषीवरील भार तिपटीने वाढला गेला आहे. शेतक-यांची संख्या वाढली परंतु त्या तुलनेत शेतीचे क्षेत्र घटले गेले आहे. सन 1970-71 मध्ये 2.11 कोटी हेक्टर एवढे वहिती खालील क्षेत्र होते परंतु ते क्षेत्र देखील आता कमी झालेले आहे. मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, खरे म्हणजे या विषयाच्या संदर्भात या सभागृहात स्वतंत्रपणे चर्चा होण्याची आवश्यकता आहे. आज महाराष्ट्रातील वहिवाटीची शेती कमी का होत आहे याचा सर्वांनी विचार करण्याची आवश्यकता आहे. शहराच्या लगत असलेल्या 5-5,10-10 कि.मी. मध्ये जी उपजाऊ शेती होती ती ताब्यात घेऊन त्यावर ले आऊट टाकले जात असल्यामुळेच उपजाऊ शेतीचे क्षेत्र दिवसेंदिवस कमी होत चालले आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ........

हा महाराष्ट्राच्या चिंतेचा विषय आहे. एका बाजूला महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या 10 कोटी वरुन साडे अकारा कोटीपर्यत गेली आहे आणि दुस-या बाजूला वहिती खालील शेतीचे क्षेत्र मात्र घटत चालले आहे हा चिंतेचा विषय आहे.

सभापती महोदय, 1970-71 मध्ये महाराष्ट्राच्या प्रत्येक शेतक-याकडे सरासरी 4.28 हेक्टर क्षेत्र होते आणि 2005-2006 मध्ये हे क्षेत्र 1.46 हेक्टर पर्यत खाली आलेले आहे त्यामुळे शेतकरी दारिद्रय रेषेच्या खाली यावयास लागला. एकूण अन्नधान्याचे राष्ट्रीय सरासरी प्रती हेक्टरी उत्पादन 17.79 क्विंटल असतांना महाराष्ट्रामध्ये हे प्रमाण फक्त 10.13 क्विंटलवर आले आहे.
कापसाचे राष्ट्रीय सरासरी प्रती हेक्टरी उत्पादन 4.17 क्विंटल एवढे होते आणि महाराष्ट्राचे सरासरी उत्पादन 2.71 प्रती क्विंटल एवढे आहे. संपूर्ण देशात सिंचनाखालील क्षेत्र 45.3 टक्के एवढे आहे. महाराष्ट्रामध्ये केवळ 19.00 टक्के एवढे सिचनाचे क्षेत्र आहे.कृषी क्षेत्राला जर बळकटी दिली तर त्याचा सरळ परिणाम ग्रामीण भागावर होईल आणि ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था बळकट होण्यास ते सहाय्यभूत होऊ शकेल परंतु दुर्देवाने कृषी क्षेत्राकडे दुर्लक्ष केले जात आहे.

सभापती महोदय, मी ज्यावेळी या सबंधीचा मुद्दा मांडला होता त्यावेळी माननीय कृषी मंत्री सभागृहात उपस्थित नव्हते आता ते आलेले आहेत त्यामुळे मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की महाराष्ट्र राज्याने शेतीसाठी वेगळा अर्थसंकल्प मांडण्याच्या बाबतीत पुढाकार घ्यावयास पाहिजे होता परंतु तसे झालेले नाही. कर्नाटक राज्याने शेतीसाठी वेगळा अर्थसंकल्प मांडला असल्यामुळे तो अधिकार आता आपल्याकडे राहिलेला नाही.कर्नाटक राज्याने 17 हजार कोटी रुपयांचा स्वतंत्र अर्थसंकल्प कृषी क्षेत्रासाठी मांडला आहे.आपल्या राज्याने कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र अर्थसंकल्प मांडणे तर दूरच राहिले परंतु आपण शेतक-यासाठी एकही नवीन योजना या अर्थसंकल्पात आणली नाही. माननीय अर्थ राज्य मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, आपले अर्थसंकल्पाचे भाषण मी अत्यंत लक्षपूर्वक ऐकले आहे परंतु त्या भाषणात शेतक-यासाठी एकही नवीन योजना जाहीर करण्यात आली नाही.

सभापती महोदय, माझ्या हातात कर्नाटक राज्याचे कृषी अर्थसंकल्पाचे पुस्तक आहे त्यातील आकडेवारी व योजना सांगून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. परंतु त्यांनी कोण कोणत्या योजना आणल्या आहेत या संदर्भात मी आपल्या कृषी मंत्र्यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर माहिती देईन. कर्नाटक राज्याने सुवर्ण भूमी योजना, तुषार सिंचन योजना ,ठिबक सिंचन योजना, सेन्द्रीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ........

खताची योजना, शेत तळयाची योजना, वीज बिलात सवलत देण्याची योजना,एक टक्का व्याजाने कर्ज पुरवठा देण्याची योजना अशा प्रकारच्या असंख्य योजना त्यांच्या कृषी अर्थसंकल्पात सांगितल्या आहेत.

सभापती महोदय, आपल्या सरकारने पीक विमा योजनेसाठी 83 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्याचा लाभ 26 लाख शेतक-यांना होणार आहे. परतु या योजनेची आज काय अवस्था आहे.एक तर ही योजना सदोष असल्यामुळे त्या योजनेमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे.
ज्या पिकाला विमा योजनेचा लाभ मिळावयास पाहिजे त्या पिकांना हा लाभ मिळत नाही. एका शेतावर पाणी पाडावयाचे आणि दुस-या शेतावर पाणी पाडावयाचे नाही असे परमेश्वर कधीही करीत नाही.पीक विमा योजना सदोष असल्यामुळे प्रिमियम भरुन सुध्दा राज्यातील अनेक शेतकरी या योजनेपासून वंचित राहिलेले आहेत. राज्यातील अनेक शेतक-यांना दोन दोन वर्षे पीक विम्याचे पैसे मिळालेले नाहीत. राज्यातील पीक विमा योजनेचे खरोखर काय झाले आहे आणि किती शेतक-यांना फायदा झाला याची माहिती कृषी मंत्र्यांनी काढावी असे मी त्यांना सांगू इच्छितो.
वास्तविक आपल्या राज्यात सर्वंकष अशी पीक विमा योजना आणण्याची गरज आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव असता कामा नये. तेव्हा चांगली पीक विमा योजना आणण्यापूर्वी त्याचा सविस्तर अभ्यास करण्यात आला पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.या राज्यातील शेतक-यांसाठी राज्य शासनाला खरोखर काही मदत करावयाची असेल तर अवकाळी पाऊस आल्यावर, अतिवृष्टी झाल्यावर व गारपीट झाल्यावर ज्या शेतक-यांच्या पिकाचे नुकसान होते त्याची भरपाई त्याला पीक विमा योजनेच्या माध्यमातून मिळाली पाहिजे. निसर्गाचे कोणतेही संकट येऊन शेतक-याचे नुकसान झालेले असले तरी सर्वंकष पीक विमा योजनेमुळे सबंधित शेतक-याला फायदा झाला पाहिजे. थोडीशी गारपीट झाली आणि त्या शेतक-याच्या पिकाचे नुकसान झाले तरी त्याला किमान 70 टक्के नुकसान भरपाई मिळालीच पाहिजे.

नंतर श्री.सारफरे

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

परंतु ते शक्य झाले नाही आणि आपण ते केले नाही.

आपण खत टंचाईवर मात करण्यासाठी केवळ 51 कोटी 50 लाखाची तरतूद अर्थसंकल्पामध्ये केली. खताच्या टंचाईमुळे खतांचे भाव वाढले. तुम्ही सांगत आहात की, गेल्या तीन वर्षापासून आम्ही खताचे धोरण राबवीत आहोत, परंतु तुमचे धोरण फसले आहे. आज या राज्यामध्ये शेतकऱ्याला देण्यासाठी तुमच्याजवळ खत नाही. ते देण्यासाठी तुमच्याजवळ कोणती पूर्व नियोजित व्यवस्था आहे ते सांगा, पेरणीपूर्वी शेतकऱ्याला खत उपलब्ध करुन देऊ असे आपण सांगणार आहात काय? खतासंबंधीची आकडेवारी माझ्याजवळ उपलब्ध आहे परंतु ती वाचून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. मागील हंगामामध्ये खतासाठी करण्यात आंदोलनावर किती ठिकाणी लाठीमार करण्यात आला, किती ठिकाणी शेतकऱ्यांना मोर्चे काढावे लागले, किती ठिकाणी शेतकरी खतापासून वंचित राहिला, किती ठिकाणी शेतकऱ्यांना दुप्पट भावाने खताच्या थैल्या विकत घ्याव्या लागल्या, किती ठिकाणी शेतकऱ्याला हवे असलेले खत मिळालेच नाही याची आकडेवारी आपण सांगा. पीएफपीसारखे खत शेतकऱ्याला मिळालेच नाही. या राज्यामध्ये येणाऱ्या खताचे स्मगलिंग करुन ते जहाजामार्गे परदेशामध्ये पाठविण्यात आले याचा आपण शोध घेणार आहात काय? खताचा ट्रक सोसायटीच्या दारामध्ये उभा केला जातो, सोसायटीकडून त्या ट्रकमधील खताच्या थैल्या उतरवून घेत असतांना फक्त सोसायटीच्या दरवाजाचे दर्शन घेतले जाते, त्या थैल्यांना फक्त हाताचा स्पर्श केल्यानंतर तो ट्रक माघारी फिरुन परदेशामध्ये पाठविण्यासाठी थेट बंदरामध्ये जातो. अशा परिस्थितीत या शेतकऱ्यांचे कसे होणार आहे? माननीय कृषी मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील साहेब आपण याचा बंदोबस्त कराल अशी आम्ही आपणाकडून अपेक्षा व्यक्त करतो. आपण जर शेतकऱ्यांसाठी प्रामाणिकपणे काम करीत असाल तर खताची एकही थैली या राज्याच्या बाहेर विकली जाणार नाही, आणि सोसायटीच्या माध्यमातून जो कुणी हे खत बाहेर विकेल त्याला आपण जेलमध्ये टाका. परंतु आपण त्यांना जेलमध्ये टाकू शकत नाही हे आम्हाला माहीत आहे. या खताच्या नावाने सगळीकडे बोंबा बोंब सुरु आहे, त्यासाठी शेतकऱ्यांना लाठया खाव्या लागत आहेत. माजी मुख्यमंत्र्यांच्या नांदेड जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांना कधीही खत मिळाले नाही. त्याकरिता त्यांना लाठीमार खावा लागला ही अवस्था आहे. आपण शेतकऱ्याच्या शेतीसाठी खत देऊ शकत नाही तर त्या शेतकऱ्याला जीवंत कसे ठेवणार आहात, आपण त्यांच्या आत्महत्या कशा रोखणार आहात? या राज्यातील शेतकऱ्याला

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/

श्री. पांडुरंग फुंडकर ...

वेळेवर खत मिळत नाही, वेळेवर बियाणे मिळत नाही अशाप्रकारे त्याला आपण लाचार करुन टाकले आहे.

सभापती महोदय, या राज्यातील शेतकऱ्यांना 50 हजार रुपयापर्यंत बिनव्याजी कर्ज देण्यात येईल आणि त्यानंतर रु. 3 लाखापर्यंतचे 2 टक्के दराने कर्ज देण्यात येईल अशी सभागृहामध्ये घोषणा करण्यात आली. राज्यातील बहुतेक शेतकरी हे वेळेवर कर्जाची परतफेड करीत असतात, त्यामुळे यावेळी आपल्याला कर्ज माफीची घोषणा करावी लागली नाही. हे करीत असतांना त्यामधील मेख असे आहे की, जे शेतकरी नियमितपणे कर्जाची परतफेड करतील त्यांनाच या सवलतीचा लाभ दिला जाईल. या वर्षी राज्यातील 18 लाख हेक्टर जमीन अवकाळी पावसाने उद्ध्वस्त झाली, त्यामुळे शेतकरी उद्ध्वस्त झाले. रब्बीची पेरणी करायला त्याच्याजवळ कोणतीच सोय नव्हती. एका बाजूला रब्बीची पेरणी केल्यानंतर आपल्या सरकाने त्याचे वीजेचे कनेक्शन तोडून टाकले. माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या शब्दावर आता कुणाचाच विश्वास राहिलेला नाही. दादांची दादागिरी आता त्यांच्या डिपार्टमेंटमध्ये चालत नाही. त्यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये अवकाळी पावसामुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्यांच्या शेतातील वीजेच्या पंपाचे कनेक्शन कापले जाणार नाही अशी घोषणा केली होती. माननीय श्री. विखे पाटील साहेब मी राजकारणामध्ये जात नाही.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:45

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

पण आपण माझ्याबरोबर विदर्भ, बुलढाणा, अकोला, अमरावतीमध्ये यावे. तेथील कितीतरी शेतकऱ्यांची विजेची कनेक्शन तोडण्यात आली आहेत. याचे कारण म्हणजे त्याने विजेचे बिल भरले नाही. एका बाजूला त्याच्या शेतामध्ये गहू, हरभरा, सूर्यफूल ही पिके उभी आहेत. त्याच्या विहिरीमध्ये, तेथील तलावामध्ये, नदीमध्ये पाणी आहे. पण विजेच्या अभावी शेतकरी आपल्या शेतीसाठी पाणी देऊ शकला नाही. त्यामुळे त्याच्या हातातून गव्हाचे पीक गेले. अशा प्रकारे त्याचे पहिले पीक गेले, दुसरे पीक गेले अशा वेळी तो शेतकरी कर्ज कसे भरणार आहे ? त्याला याचा लाभ मिळणार नाही आणि तुम्ही त्याच्यासाठी फक्त 84 कोटी रुपयांची तरतूद केली. कारण आपल्याला माहिती होते की, हा शेतकरी नियमितपणे 100 टक्के कर्ज भरत नाही. जर शेतकऱ्यांनी 100 टक्के कर्ज भरले तर 84 कोटी रुपये कुठे निघून जातील त्याचा पत्ताही लागणार नाही. त्यामुळे माननीय वित्तमंत्र्यांनी बरोबर हुशारीने 84 कोटी रुपयांची तरतूद केली म्हणजे यामध्येही तुम्ही शेतकऱ्याला फसविले आहे. आमचे असे म्हणणे आहे की, कर्नाटक सरकारने ज्याप्रमाणे स्वतंत्रपणे कृषी बजेट मांडले, त्यामध्ये असा उल्लेख करण्यात आला आहे की, कोणत्याही शेतकऱ्याने वीज बिल भरलेले असो किंवा नसो सरसकट विजेचे बिल माफ करण्यात आले.

सभापती महोदय, विदर्भ, मराठवाडा, खानदेश हे कापूस पिकविणारे प्रदेश आहेत. याठिकाणी बजेटमध्ये असे म्हटलेले आहे की, देशाच्या एकंदर उत्पादनापैकी 20 टक्के कापूस फक्त महाराष्ट्रामध्ये होतो. पण प्रत्यक्षात 20 टक्के नाही तर 30 टक्के कापूस महाराष्ट्रात होतो. या कापसावर राज्यातच प्रक्रिया व्हावयास पाहिजे. आपण एकाधिकार योजनेचे तीनतेरा वाजविले आहेत, त्याबद्दल बोलून मी आपला वेळ घेत नाही. 1972 मध्ये पुरोगामी महाराष्ट्राने ही योजना सुरु केली होती. कै.माननीय वसंतरावजी नाईक मुख्यमंत्री होते आणि कै.श्री.यशवंतराव मोहिते यांचा मी जाणीवपूर्वक उल्लेख करु इच्छितो. कारण त्यांनी सहकार मंत्री म्हणून ही योजना सुरु करताना सांगितले होते की, शेतकरी हा खऱ्या अर्थाने या प्रक्रियेचा मालक झाला पाहिजे. कापसापासून कपडे तयार करण्याची जी प्रक्रिया आहे, त्याचा शेतकरी मालक झाला पाहिजे असे त्यांचे वाक्य आहे. पण ही योजना कापसापासून सूतापर्यंतही गेली नाही. ती जिनिंग-प्रेसिंगपर्यंतच गेली आणि आता तर ती ऑक्सिजनवरच आहे, अजून मेलेली नाही तर थोडाशी धाकधूक आहे आणि तीही सरकारच्या ऑक्सिजनवरच टिकलेली आहे. आता तर पगारही सरकारच देते. सरकारचे व्हेन्टीलेटर लागलेले आहे. त्यामुळे जेवढे दिवस व्हेन्टीलेटर आहे तेवढे दिवस ती जिवंत

29-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) II-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

रहाणार आहे आणि एखाद्या वेळेस व्हेन्टीलेटर काढले की योजना संपली.या योजनेचे काय झाले? कापसापासून कपड्यापर्यंतची प्रक्रिया झालीच नाही तर ते केवळ जिनिंग-प्रेसिंगपर्यंत आले. आता असे सांगितले की, शासनाने 2011-2012 च्या आर्थिक वर्षामध्ये यासाठी 100 कोटी रुपयांचा निधी या प्रक्रियेसाठी राखून ठेवलेला आहे. शासन 100 कोटी रुपयांमधून यावर काय प्रक्रिया करणार आहे ? असा प्रश्न आहे. माझे असे म्हणणे आहे की, याबाबतीत स्पष्ट धोरण जाहीर करावे. तसेच ही प्रक्रिया कुठे करणार आहात ? कापूस विदर्भ, मराठवाडा व खानदेशमध्ये पिकतो आणि ज्याठिकाणी कापसाचे एक बोंडही होत नाही म्हणजे सोलापूर, इचलकरंजीमध्ये एक बोंडही कापूस होत नाही, तेथे 100-100 सूत गिरण्या उभ्या रहातात. त्यामुळे अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेले 100 कोटी रुपये तिकडेच जाणार आहेत. त्यामुळे विदर्भ, मराठवाड्यातील जनतेला काही अपेक्षा राहिलेली नाही, हे शासनाचे फसवे धोरण आहे.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : हे धोरण फसवे नाही तर आपमतलबी आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कृषी संजीवनी योजनेबाबत सांगावयाचे तर आता आपण त्याचे नाव "संजीवनी योजना" असे नाव दिले. पण फक्त नावामध्येच संजीवनी आहे. पण सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांना मी सांगू इच्छितो की, यामध्येही एक डाव आहे. राज्यातील शेतकऱ्यांना गाजर दाखविले गेले आहे. जर तुम्ही विजेचे बिल वेळेवर 100 टक्के भरले तर व्याज माफ केले जाईल. ही कृषी संजीवनी योजना आहे म्हणजे तुम्ही विजेची बिले वसूल करण्यासाठी ही योजना आणली.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : हा विभाग कोणत्या मंत्री महोदयांकडे आहे ?

श्री.पांडुरंग फुंडकर : हा विभाग माननीय उप मुख्यमंत्र्यांकडे आहे. 9 हजार कोटी रुपयांची बिले घ्यावयाची आहेत असे सांगण्यात येत आहे. मग त्याची वसुली कशा प्रकारे करावयाची ? तर त्यासाठी ही योजना काढली.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . ..

श्री. पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, कृषीसाठी 1996 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद राज्याच्या तिजोरीतून न करता केंद्र शासनाच्या मिळणाऱ्या मदतीतून दाखविण्यात आलेली आहे. म्हणजे शासनाने कृषी खात्यासाठी प्रत्यक्ष 694 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. त्यापैकी 415 कोटी रुपये राष्ट्रीय कृषी कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून येणार आहेत. शेतकऱ्यांसाठी अमुक करु, तमुक करु, अशा प्रकारचा ढोल या ठिकाणी वाजविण्यात येतो. पण प्रत्यक्षात कृषी खात्यासाठी करण्यात आलेल्या तरतुदी पैकी केंद्र शासनाचे 600 कोटी रुपये आहेत. उर्वरित 279 कोटी रुपयापैकी 150 कोटी रुपये केंद्र शासनाच्या विविध योजनांतील राज्य शासनाच्या हिश्याचे आहेत. याचा अर्थ कृषीसाठी करण्यात आलेली 1996 कोटी रुपयाची तरतूद ही माननीय अर्थ मंत्र्यांनी चलाखी करुन वाढविलेली आहे.

सभापती महोदय, विजेच्या भारनियमना बाबत याठिकाणी बोलू इच्छितो. डिसेंबर, 2012 पर्यंत संपूर्ण महाराष्ट्राला खात्रीशीर वीज पुरवठा करुन राज्य भारनियमन मुक्त करण्याची घोषणा अर्थ मंत्री महोदयांनी केली होती. सन्माननीय श्री. दिलीप वळसे-पाटील ऊर्जा मंत्री होते तेव्हा पासून प्रत्येक अधिवेशनामध्ये सभागृहात विजे बाबतचा ठराव आणण्यात येतो. मी या सभागृहात जवळपास आठ वर्षापासून ऐकत आहे की, आम्ही विजेच्या बाबतीत 2009 मध्ये सक्षम होणार, 2010 मध्ये सक्षम होणार.पण 2009 आणि 2010 हे वर्षे आता संपलेले आहेत. त्यामुळे आता 2012 पर्यंत विजेच्या बाबतीत संक्षम होणार असे सांगण्यात येत आहे. पुढच्या वर्षी 2013 मध्ये विजेच्या बाबतीत सक्षम होऊ असे सांगण्यात येईल. महाराष्ट्रातील जनतेला किती दिवस हे गाजर दाखविणार? सभापती महोदय, 2010-2011 या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये फिडर सेपरेशन आणि सिंगल फेजिंग ही योजना माननीय अर्थ मंत्र्यांनी प्रस्तावित केली होती. या योजनेच्या माध्यमातून 16309 गावांना लाभ अपेक्षित होता. सिंगल फेजिंगमुळे बऱ्याचशा खेडयातील भार नियमन कमी

झाले आहे. सन 2011-2012 या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये फिडर सेपरेशन आणि सिंगल फेजिंग या योजनेसाठी तरतूद केल्याचे दिसले नाही. परंतु त्याच वेळेस 2300 कोटी रुपये नवीन औष्णिक विद्युत प्रकल्प उभारणीसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. हे प्रकल्प विदर्भात किती होणार आहेत आणि कोकणात किती होणार आहेत याची यादी मी या ठिकाणी वाचून दाखवू शकतो. हे प्रकल्प कोकणात व विदर्भात उभे राहणार आहेत. यापैकी एकही प्रकल्प पश्चिम महाराष्ट्रात उभा राहणार नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : दोन्ही भागांचा विकास झाला पाहिजे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या विभागातील पर्यावरणाचा ऱ्हास करुन सिंचनाचे पाणीही उद्योगपतीना देण्यात येणार आहे..सभापती महोदय, खापरखेडा येथून 500 मेगावॅट, भुसावळ येथून 1000 मेगावॅट, दोंडाईचा येथून 3300 मेगावॅट आणि धोपावे, जिल्हा रत्नागिरी येथून 1980 मेगावॅट असे एकूण 6700 मेगावॅट विजेचे उत्पादन दाखविलेले आहे. परंतु प्रत्यक्षात डिसेंबर 2012 पर्यंत या पैकी किती प्रकल्प कार्यान्वीत होतील याबद्दल आमच्या मनामध्ये शंका आहे. कारण आम्ही अनुभलेले आहे. या पूर्वी पारस-परळी विद्युत प्रकल्पा बद्दल सांगण्यात येत होते. प्रत्येक भाषणात पारस-परळीचा उल्लेख करण्यात येत होता. या पारस-परळीची वीज पाच वर्षे बाहेरच पडली नाही. सभापती महोदय, विजेचा खेळ-खंडोबा झालेला आहे. संपूर्ण महाराष्ट्र आज अंधारात आहे. दोन लाख विद्युत पंपांना कनेक्शन्स देण्याचे आश्वासन देण्यात आलेले आहे. दोन लाख विद्युत पंपाना कनेक्शन कुठून देणार?

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ......

आपल्याकडे वीजच नसेल तर 2 लाख पंप कसे देणार ? 2 लाख पंप देऊन शेतकऱ्यांच्या लोड शेडिंगमध्ये वाढ होईल. आता 10 तासाचे लोड शेडिंग आहे ते 12 ते 14 तासापर्यंत जाईल.

सभापती महोदय, या विजेचा संबंध उद्योगाशी आहे. राज्यामध्ये नवीन उद्योग उभारण्यासाठी ऑगस्ट, 1991 ते ऑगस्ट 2010 या कालावधीत एकूण रुपये 9 लक्ष 20 हजार 121 कोटी गुंतवणुकीच्या 20 हजार 484 औद्योगिक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली होती. परंतु ऑगस्ट 2010 अखेर 1 लाख 95 हजार 407 कोटी रुपये गुंतवणुकीचे फक्त 8322 प्रकल्प कार्यान्वित झाले. ही मागच्या काळातील परिस्थिती आहे. आता सप्टेंबर, 2009 ते ऑगस्ट, 2010 या कालावधीमध्ये 1 लाख 51 हजार 209 कोटी रुपये गुंतवणुकीच्या 766 औद्योगिक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असली तरी प्रत्यक्षात 1 लाख 51 हजार 209 कोटी रुपये गुंतवणुकीच्या 766 प्रकल्पांपैकी फक्त 8676 कोटी रुपये गुंतवणुकीचे 36 प्रकल्प कार्यान्वित झाले. याचा अर्थ असा की, हे सर्व कागदावरचे वाघ नाचवत आहेत. 169 औद्योगिक विशाल प्रकल्पांपैकी राज्यातील मागास 111 प्रकल्पांना मान्यता दिल्याचे शासनाने या ठिकाणी सांगितले आहे. त्या पैकी 70 प्रकल्प मराठवाडा आणि विदर्भात असल्याचा आवर्जून उल्लेख करण्यात आलेला आहे. या बाबतची सद्य:स्थिती पाहिली तर ही सर्व कागदावरचीच आकडेवारी असल्याचे आम्हाला दिसते. संपूर्ण विदर्भामध्ये सन 2005 पासून 56 औद्योगिक विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. त्यापैकी फक्त 25 औद्योगिक विशाल प्रकल्पांमध्ये आज उत्पादन सुरु झाले आहे. अमरावती विभागामध्ये तर फक्त 5 औद्योगिक प्रकल्पांमध्ये उत्पादन सुरु झाले आहे. गुंतवणुकीचा जर विचार केला तर 1 लाख 44 हजार 556 कोटी रुपयांची गुंतवणूक झाल्याचे नमूद केले गेले परंतु अमरावती विभागात केवळ 721 कोटी रुपयांची तर संपूर्ण विदर्भामध्ये 9 हजार 320 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली. मराठवाड्यामध्ये सुध्दा तेच झाले. मराठवाड्याची स्थिती काही वेगळी नाही. त्या ठिकाणी सन 2005 पासून मंजूर करण्यात आलेल्या 14 औद्योगिक विशाल प्रकल्पांपैकी केवळ 10 प्रकल्पांमध्ये उत्पादन सुरु झाले आणि या 10 प्रकल्पांमध्ये 2 हजार 95 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली. 10 लाख रोजगाराची संधी उपलब्ध होईल अशी घोषणा करण्यात आली परंतु

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/

श्री. पांडुरंग फुंडकर ....

आता जर आपण सेवायोजन कार्यालयात गेलात आणि तेथील बेरोजगारांची आकडेवारी काढली तर या राज्यातील स्थिती आपल्या लक्षात येईल.

सभापती महोदय, समतोल विकासाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो. 23 तारखेपासून आतापर्यंत त्यासाठीच भांडत होतो. समन्यायी तत्वावर विकास झाला पाहिजे, समन्यायी तत्वावर निधीचे वाटप झाले पाहिजे या बाबत चार दिवस घोळ सुरु होता. या बाबतीत शासनाने काय केले ? माननीय वित्त राज्यमंत्री विदर्भातील आहेत. आपण या ठिकाणी आपले अर्थसंकल्पीय भाषण वाचले. किमान विदर्भ आणि मराठवाड्याचा जो अनुशेष आहे त्या बाबतचा उल्लेख तरी आपण या पुस्तकामध्ये करावयास पाहिजे होता. आपण त्याचा साधा उल्लेखही या भाषणामध्ये केलेला नाही. अमरावती, नागपूर आणि औरंगाबाद या विभागांकडे तर साफ दुर्लक्षच झाले आहे. एकूण 143 विशेष आर्थिक क्षेत्रांपैकी अमरावती विभागामध्ये 3, नागपूर विभागामध्ये 7 आणि औरंगाबाद विभागामध्ये 12 अशी एकूण 22 विशेष आर्थिक क्षेत्रे मंजूर केली. वास्तविक पाहता महाराष्ट्रातील 35 जिल्ह्यांपैकी 19 जिल्हे मराठवाडा , अमरावती आणि नागपूर या तीन विभागात आहेत. त्या ठिकाणी 143 पैकी 70 विशेष आर्थिक क्षेत्रे मंजूर करावयास पाहिजे होती परंतु ते झालेले नाही. 4 हजार कोटी रुपयांचा महसूल देणारा हा औद्योगिक विभाग आहे पण तरतूद फक्त 100 कोटी रुपयांची केलेली आहे. महाराष्ट्रात 2010 पर्यंत 33 हजार 355 एवढ्या औद्योगिक वसाहती औद्योगिक विकास महामंडळाने विकसित केल्या परंतु अमरावती, नागपूर आणि औरंगाबाद या विभागात फक्त 8569 औद्योगिक वसाहती विकसित केल्या. याचा अर्थ असा की , 19 जिल्ह्यांमध्ये एकूण औद्योगिक वसाहतींच्या केवळ 25 टक्के औद्योगिक वसाहती विकसित केल्या गेल्या आहेत.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

प्रत्यक्षात त्या जास्त असावयास पाहिजे होत्या. मागील वर्षामध्ये या अंदाजपत्रकामध्ये राज्य शासनाने 'मानव विकास योजना" नावाची योजना गाजावाजा करुन आणली होती. परंतु यावेळी शासन त्या योजनेला विसरले आहे. मागील वर्षी त्या योजनेसाठी रु.500 कोटींची तरतूद केली होती. त्यामध्ये 25 जिल्ह्यातील 172 तालुक्यांचा समावेश केला होता. या योजनेचे काय झाले ? या वर्षाच्या अंदाजपत्रकात 'मानव विकास योजना' दिसते का ते मी पहात होतो. परंतु शासनाने ती योजनाच गायब करुन टाकली आहे.

**उप सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगू इच्छितो की, आता 3.00 वाजले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला आणखी 10 मिनिटांचा वेळ द्यावा.

**उप सभापती** : ठीक आहे, पण विरोधी पक्षाच्या वाट्याला आलेल्या वेळेतून तेवढा वेळ कमी करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी मघाशी म्हटल्याप्रमाणे 'मानव विकास योजने' साठी 500 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. अतिमागास जिल्ह्यातील व अति प्रगतीशील जिल्ह्यांचाही या योजनेत समावेश करण्याची मागणी करण्यात आली होती. खरे अतिमागास जिल्हे व तालुक्यांसाठी ही योजना होती. ज्यावेळी या योजनेचा पैसा अतिप्रगतीशील जिल्ह्यात चालला आहे ही बाब माझ्या लक्षात आली त्यावेळी मी माननीय मुख्यमंत्र्यांना एक पत्र लिहिले होते. त्या पत्रात या योजनेच्या निकषानुसार तालुक्यांची निवड करावी, ही योजना कशीही राबवू नये, असे नमूद केले होते. पण त्या पत्राचाच आधार या वर्षी घेतला की काय ते मला समजत नाही. या वर्षी ती योजनाच गायब करुन टाकली आहे. ही योजना का गायब करण्यात आली ? मागील वर्षी या योजनेद्वारे काही तालुक्यांना 3-3, 4-4 कोटी रुपये विकासाच्या कामांसाठी दिले होते. पण ती योजनाच बंद केली. तरी देखील याठिकाणी समतोल विकासाच्या गप्पा मारल्या जातात. मागास जिल्हे व तालुक्यांसाठी ही योजना होती. आम्ही कोणतेही तालुके सुचविले नव्हते. विदर्भातील, कोकणातील, मराठवाड्यातील तालुके घेण्यास सांगितले नव्हते. या राज्यातील जे अतिमागास तालुके आहेत त्यांच्यासाठी ही योजना आणली होती ती या वर्षी बंद करण्यात आली आहे.

2....

NTK/ MMP/

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, सिंचनाचा अनुशेष सुध्दा तसाच राहिला आहे. 2011-12 या वर्षाकरिता अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी रु.6300 कोटींची तरतूद केल्याचा भाषणामध्ये उल्लेख आहे. दिनांक 20 मार्च, 2011 रोजी 'लोकसत्ता' नावाच्या वर्तमानपत्राने विदर्भातील सिंचनाच्या अनुशेषाच्या विषयाची चिरफाड केली आहे. त्यात असे नमूद केले आहे की, "विदर्भातील सिंचनाचा अनुशेष दूर करण्याठी रु.500 कोटीची तरतूद करण्याचे आदेश राज्यपालांनी दिल्याचा उल्लेख आहे. सन 2011-12 च्या आर्थिक वर्षासाठी घटनेच्या 371 (2) कलमानुसार माननीय राज्यपालांनी सरकारला निधी वाटपाच्या संदर्भात सरकारला उपरोक्त आदेश दिलेले आहेत. प्रत्यक्षात राज्यपालांनी निर्देश दिल्यानंतर सन 2011-12 या आर्थिक वर्षासाठी पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यांसाठी रु.1176 कोटींची तरतूद करणे अपेक्षित आहे." हे आमचे म्हणणे नाही तर राज्यपालांचे आहे. त्यात पुढे असेही म्हटले आहे की, "या 1176 कोटी रुपयांच्या निधीतून 58 हजार 683 हेक्टर जमिनीचा अनुशेष दूर होऊ शकतो. हा अनुशेष दूर झाल्यावर 1 लाख 52 हजार 253 हेक्टर जमिनीचा अनुशेष शिल्लक राहतो. ही वस्तुस्थिती असताना नियोजन विभागाने सन 2011-12 या आर्थिक वर्षात अकोला व वाशिम या दोनच जिल्ह्यांचा अनुशेष संपुष्टात येईल असा प्रचार सुरु केलेला आहे."

सभापती महोदय, सरकारने सिंचनासाठी फार काही केलेले नाही. माझी माहिती चुकीची नसेल तर मागील वर्षातील सिंचनाची 2 हजार कोटी रुपयांची बिले देणे शिल्लक राहिलेली आहेत. म्हणजे 6 हजार कोटींमधून 2 हजार कोटी रुपये काढले तर 4 हजार कोटी रुपये शिल्लक राहतात. अशा प्रकारे शासनाने कृषी पंपाच्या बाबतीत तेच केले आहे. शासनाने कृषी पंपाला रु.2500 कोटी रुपयांची सबसिडी देण्याचे कबूल केले होते. मी परवा माननीय उप मुख्यमंत्र्यांना प्रेससमोर असे म्हटले होते की, आपण रु.2500 कोटी रुपयांची सबसिडी कृषी पंपासाठी देण्याचे कबूल केले होते. रु.1150 कोटी रुपयांचे मागील काळातील देणे शिल्लक आहे. त्यावर ते मला असे म्हणाले की, हे पैसे 31 मार्चपूर्वी देण्यात येतील. त्यावर मी असे म्हटले की, हे बजेट मंजूर झाल्यानंतर दिले जाणार आहेत का, रु.2500 कोटींमधून मागील वर्षातील रु.1150 कोटी रुपये वजा केले तर कृषी पंपासाठी किती निधी शिल्लक राहतो, अशा परिस्थितीत शासन या वर्षी 2 लाख कृषी पंप देणार कसे ?

यानंतर

श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 15:05

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, आरोग्याकडेही या शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. आरोग्य ही राज्यातील लोकांची मूलभूत गरज आहे. आज राज्यातील 80 टक्के लोक असे आहेत की त्यांच्या कुटुंबाला कधी ना कधी हॉस्पिटलची आवश्यकता भासत असते. राज्यामध्ये गेल्या 6 वर्षामध्ये 1 ते 6 वयोगटातील 40645 बालकांना आरोग्याच्या सुविधे अभावी आपला जीव गमवावा लागलेला आहे. या अर्थसंकल्पामध्ये सार्वजनिक आरोग्य सेवेकडे शासनाचे अत्यंत दुर्लक्ष झालेले आहे. आरोग्य संस्थांच्या बांधकामासाठी रु. 241.95 कोटीची तरतूद करण्यात आलेली असली तरी ग्रामीण भागातील आरोग्याच्या प्रश्नाकडे शासनाने अजिबात लक्ष दिलेले नाही. केन्द्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान योजनेसाठी रु. 166 कोटी पेक्षा जास्त निधी शासनाने दिलेला आहे. ही केन्द्राची योजना असल्यामुळे आणि बहुतांश निधी केन्द्र शासनाकडून उपलब्ध होत असल्यामुळे या योजनेमध्ये सर्व राज्ये सहभागी झालेली आहेत. या योजनेअंतर्गत ब-याचशा गोष्टी केन्द्र शासनाकडून मिळत असल्यामुळे राज्य शासनाची जबाबदारी फारशी राहिलेली नाही. ग्रामीण भागातील रुग्णांना एक्स-रे, इसीजी इत्यादी सुविधा प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या स्तरावर व रक्तपेढीची सुविधा ग्रामीण रुग्णालयांच्या स्तरावर उपलब्ध करुन देण्यासाठी 24 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, आज आपल्या राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या प्राथमिक आरोग्य केन्द्रांची काय अवस्था आहे ? त्या प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये डॉक्टर नसतात, डॉक्टर असले तर नर्स नसतात, नर्स असल्या तर औषधे नसतात. अशी या प्राथमिक आरोग्य केन्द्रांची अवस्था आहे.

सभापती महोदय, परवा मी एका प्राथमिक आरोग्य केन्द्रोला भेट दिली. मी हे जबाबदारीने सांगत आहे. माझ्या भेटीच्या वेळी त्या प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये डॉक्टर नव्हते आणि नर्स देखील नव्हत्या. माझी लाल दिव्याची गाडी पाहिल्यानंतर चौकीदाराने दरवाजा उघडला. त्याला नर्सेची किती पदे आहेत अशी मी विचारणा केल्यानंतर त्याने, तीन नर्सेस आहेत पण त्या हजर नाहीत, असे सांगितले. रुग्ण आला तर त्याला कोण औषध देतो असे मी चौकीदाराला विचारले त्यावेळी त्याने "मीच औषध देतो" असे सांगितले. ही घडलेली घटना मी येथे सांगत आहे. चौकीदार मला आत घेऊन गेला आणि त्याने लाल, हिरव्या गोळ्या दाखविल्या. रुग्णाला ताप आला





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

असेल तर लाल गोळ्या, हगवण लागली असेल तर हिरव्या गोळ्या द्यायच्या असे डॉक्टरांनी सांगितल्याचे चौकीदाराने मला सांगितले. सभापती महोदय, ही आरोग्य विषयक व्यवस्था आपल्या राज्यामध्ये आहे. एखादे विकासाचे काम झाले नाही तरी चालेल परंतु ग्रामीण भागातील आरोग्यासाठी पुढाकार घ्यायला पाहिजे. शहरात मिळणारी आरोग्य सुविधा आणि ग्रामीण भागात मिळणारी आरोग्य सुविधा यामध्ये खूप फरक आहे. ग्रामीण भागातील रुग्णालयात गोरगरीब माणसे येत असतात. या गोरगरीब माणसांच्या आरोग्याशी हे शासन खेळ खेळत आहे. एक्स-रे, इसीजी मशिन, रक्तपेढीची सुविधा ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांमध्ये उपलब्ध करुन देण्यासाठी फक्त 24 कोटीची तरतूद केलेली आहे. मशिन घेण्याबरोबरच त्या चालविण्यासाठी माणूसही देण्याची आवश्यकता आहे. काही रुग्णालयामध्ये अशा प्रकारच्या मशिन्स चालविण्यासाठी माणूसच नसल्यामुळे त्या बंद आहेत. मग आता नवीन मशिन्स घेऊन काय उपयोग ? राज्यातील 1816 प्राथमिक आरोग्य केन्द्रे, 10589 उपकेंद्रे आणि 365 ग्रामीण रुग्णालये या सर्वांसाठी केवळ 24 कोटी रुपये तरतूद केलेली आहे. याचा अर्थ प्रत्येक आरोग्य केन्द्रासाठी फक्त 11 हजार रुपये तरतूद केलेली आहे. राज्यामध्ये प्रतिलाख रुग्णामागे 144 खाटा उपलब्ध होत्या. ते प्रमाण प्रतिलाख 102 खाटांवर आलेले आहे. त्यामुळे रुग्णालयाच्या व्हरांड्यात रुग्ण झोपलेले दिसतात. आपण जे.जे. रुग्णालयामध्ये जाऊन पाहिले तर तेथे आताही रुग्ण व्हरांड्यात झोपलेले दिसतील. अशा प्रकारची आरोग्याची दूरवस्था आपल्या राज्यात झालेली आहे.

सभापती महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांसाठी 50 टक्के आरक्षण करण्यात येणार आहे असे शासनाने सांगितले. परंतु आज महिलांच्या बाबतीत समाजाची काय मानसिकता आहे ? गर्भलिंग तपासणी करुन मुलींची भ्रूणहत्या करण्याचे प्रमाण महाराष्ट्रामध्ये वाढलेले आहे. या संदर्भात सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. चर्चेच्या वेळी गर्भलिंग तपासणी केंद्रावर धाडी टाकण्यात आल्या असे सांगितले. परंतु कोणावर कारवाई केल्याचे सांगितलेले नाही. या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने पाहिले नाही तर महाराष्ट्राला त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. हजार मुलांमागे मुलींचे प्रमाण सरासरी 797 आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये हजार मुलांमागे मुलींचे प्रमाण 858 आहे. वाळवा तालुक्यातील इस्लामपूर भागामध्ये हे प्रमाण 799 इतके खाली आलेले आहे.

...नंतर श्री. गिते....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

हे अंतर वाढत गेले तर मोठी अडचण निर्माण होईल. या अनुषंगाने गृह विभागाचे कामकाज वाढते आहे. यामुळे कायदा व सुव्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांना सांगू इच्छितो की, आमच्या विभागात मलकापूर नावाचे गाव आहे. तेथील मुले भंडारा जिल्हयातील मुलींशी विवाह करुन घरी आणत आहेत. सामाजिक बंधन अथवा कोठलेही बंधने पाळले जात नाही. त्याचे कारण सध्या मुलींची संख्या खूप मोठया प्रमाणात कमी होत चालली आहे. मुलांचे वय 35 वर्षे झाल्यानंतर सुध्दा त्यांना विवाहासाठी मुली मिळत नाहीत अशी अवस्था ग्रामीण भागात निर्माण झालेली आहे. या गोष्टीचा शासन काही बंदोबस्त करणार आहे किंवा नाही ? आरोग्य विभागाची अतिशय दयनीय परिस्थिती असताना 58 कोटी रुपयांचे शिल्लकी अंदाजपत्रक शासनाच्या माध्यमातून सभागृहात सादर केले गेले.

सभापती महोदय, शिक्षण विभागाच्या संदर्भात काही मुद्दे उपस्थित करुन मी माझे भाषण संपविणार आहे. आरोग्य विभागासारखीच शिक्षण विभागाची अवस्था झाली आहे. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी केंद्र शासनाने बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 लागू केला. बालकांना सक्तीचे शिक्षण झाले. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत राज्य शासनाने 780 कोटी रुपये इतकी तरतूद प्रस्तावित केलेली आहे. सदर तरतूद ठेवलेली आहे असे नमूद केलेले नाही, सदर तरतूद प्रस्तावित केलेली आहे असे भाषणात नमूद केले आहे.. सर्व शिक्षा अभियान ही योजना केंद्र शासनाची आहे. महाराष्ट्राचे प्राथमिक स्तरावरील शिक्षणाचा विकास निर्देशांक 2008-09 मध्ये 0.66 होता, तो आता 2009-10 मध्ये 0.576 एवढा घसरला आहे. शिक्षणाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य चौथ्या क्रमांकावर आलेले आहे. प्रत्येक बाबतीत महाराष्ट्राचा नंबर खाली चालला आहे. शिक्षणाच्या माध्यमातून एक भावी पिढी निर्माण होत असते. ही भावी पिढी उद्ध्वस्त करण्याचे पाप हे शासन करीत आहे. शासनाकडून महंमद तुघलकी निर्णय घेतले जात आहेत. आता इयत्ता आठवी पर्यंत विद्यार्थ्यांची परीक्षाच घेतली जात नाही. आता विद्यार्थ्यांना विचारले तर, विद्यार्थी सांगतात की, अभ्यास करण्याचे कामच राहिलेले नाही. इयत्ता पहिली प्रवेश घेतला तर इयत्ता आठवी पर्यंत परीक्षा देण्याचे कामच नाही. ग्रामीण भागात शिक्षणाची अतिशय वाईट अवस्था झालेली आहे. अशा शिक्षण पध्दतीमुळे एक पिढी उद्ध्वस्त होणार आहे. मी या ठिकाणी अत्यंत जबाबदारीने बोलतो आहे. एक पिढी उद्ध्वस्त करण्याचे पाप शासनाच्या माथ्यावर येणार आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर

सभापती महोदय, प्रथम या शिक्षण संस्थेने देशातील संपूर्ण ग्रामीण भागाचा सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणानुसार बिहार मधील आठवीचे विद्यार्थी दैनंदिनी व्यवहारिक गणितात आता महाराष्ट्राच्या पुढे गेले आहेत. 2009-10 मध्ये राज्यातील 5939 शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती. त्यावेळी एका प्रश्नाच्या संदर्भात माननीय श्री.अजितदादा पवार यांनी घोषणा केली होती की, एक वर्षाच्या आत सर्व शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली जाईल. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, वस्तुस्थिती काय आहे याची माहिती घेण्यासाठी ग्रामीण भागात चला.

सभापती महोदय, 28659शाळांमध्ये विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र शौचालये नाहीत. या कामासाठी शासनाकडे निधीच उपलब्ध नाही. तसेच 32618 शाळांमधील अपंग विद्यार्थ्यांसाठी उतरण नाही. एवढी दयनीय परिस्थिती शासनाच्या शिक्षण विभागाची झालेली आहे. परंतु या गोष्टींची पूर्तता करण्यासाठी 2011-12 या वर्षाच्या अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही. प्राथमिक शिक्षणासाठी शासनाने तरतूद केलेली नाही. 2001 पासून आघाडी सरकारने वेतनेतर अनुदानासाठी एक पैसा देखील तरतूद केलेली नाही. सन 2001 पासून जवळपास 4 हजार रुपये वेतनेतर अनुदान थकीत आहे, अशी शिक्षण विभागाची अवस्था आहे. वेतनेतर अनुदान दिले जात नाही म्हणून शिक्षण संस्था चालकांची खडू आणण्याची देखील क्षमता राहिलेली नाही. शिक्षणाची अशी अवस्था असताना हे शासन आपली पाठ थोपटून घेत आहे. मला शिक्षण व इतर विभागाच्या बाबतीत अनेक गोष्टी सदनात मांडता येतील. परंतु वेळ कमी असल्यामुळे मी त्या गोष्टी सदनासमोर मांडू शकत नाही. कोठल्याही पध्दतीचे आशादायी चित्र या अंदाजपत्रकात आम्हाला दिसलेले नाही. मला माहिती आहे की, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप हे उलट भाषण करणार आहे. तुमच्या मनाच्या समाधानासाठी उलट भाषण करा. अर्थसंकल्प वाचल्यानंतर असे दिसून येते की, या अर्थसंकल्पात शासनाने सर्वसामान्य माणसांसाठी काहीही दिलेले नाही. आपण या सभागृहात जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी बसलेलो आहोत. परंतु या शासनाकडून जनतेला कोणत्याही प्रकारचा न्याय दिला जात नाही ही वस्तुस्थिती आहे. लोकप्रतिनिधी म्हणून राज्यातील जनतेला न्याय देणार आहोत की नाही हा खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, सावकारी कायदा हा माझा नेहमीचा आवडीचा विषय आहे...

यानंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर......

या कायद्याचे काय झाले? या सभागृहात सावकारी प्रतिबंध कायद्यासंबंधीचे बिल एक वर्षापूर्वी मंजूर झाले होते. आम्हाला सांगितले जाते की, तो कायदा केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी पाठविला आहे.

सभापती महोदय, माझ्या भागातील 200 सावकारग्रस्त शेतकरी माननीय राष्ट्रपतींच्या भेटीसाठी दिल्लीला गेले होते. त्यांनी माननीय राष्ट्रपतींची भेट घेतली व त्यांना सांगितले की, महाराष्ट्राच्या विधिमंडळाने सावकारांविरुध्द मंजूर केलेला कायदा आपल्या सहीसाठी प्रलंबित राहिलेला आहे. या गरीब शेतकऱ्यांना कोणीतरी सांगितले की, माननीय राष्ट्रपतींची सही झाल्याशिवाय राज्यात कायदा लागू होणार नाही. माननीय राष्ट्रपतींनी माहिती घेतल्यानंतर या शेतकऱ्यांना असे सांगितले की, तो कायदा मंजुरीसाठी अद्याप माझ्याकडे आलेलाच नाही. तो केंद्र सरकारच्या गृह खात्याकडे प्रलंबित आहे. सभापती महोदय, पाठपुरावा करण्याचे काम कोणाचे आहे? सभागृहात घोषणा करण्यात आली. कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढू, अमुक करु, तमुक करु. या सभागृहाने मंजूर केलेला कायदा एक वर्षापासून केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे. राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. त्यामुळे केंद्र सरकारकडे पाठपुरावा करुन सावकारी प्रतिबंध कायद्यास त्वरेने मंजुरी मिळावी यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत.

सभापती महोदय, अर्थसंकल्पीय भाषणात जीवनदायी योजनेचा उल्लेख झालेला नाही. ही योजना अस्तित्वात आहे की बंद केली हे सभागृहाला कळले पाहिजे. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यासंबंधी योजना जाहीर केली होती. या योजनेचे काय झाले? विदर्भातील आत्महत्याग्रस्त जिल्हयांसाठी माननीय पंतप्रधानांनी 3750 कोटी रुपयांचे पॅकेज मंजूर करताना असे सुचविले होते की, या पॅकेजच्या माध्यमातून गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुलांची लग्ने सामूहिक विवाह सोहळ्यात लावली जातील अशा नवविवाहित दाम्पत्यांना अनुदान दिले जावे. त्यादृष्टीने सामूहिक विवाह सोहळ्यात लग्न करणाऱ्या जोडप्यांना आतापर्यंत 10 हजार रुपये अनुदान दिले जात होते. आम्ही शासनाला विनंती केली होती की, ही योजना संपूर्ण राज्यासाठी लागू करण्यात यावी. त्या मागणीनुसार शासनाने ही योजना संपूर्ण राज्यासाठी लागू केली. परंतु मागील दोन वर्षापासून सामूहिक विवाह सोहळ्यात लग्न केलेल्या हजारो जोडप्यांना अद्याप 10 हजार रुपयांचे अनुदान दिले गेलेले नाही. या योजनेमध्ये काही लोकांनी गैरव्यवहार केला, हे आम्ही नाकारीत नाहीत. परंतु 90 टक्के लोकांनी प्रामाणिकपणे सामूहिक विवाह सोहळ्यात लग्न केले त्या जोडप्यांना अनुदान देण्याची आवश्यकता आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर......

सभापती महोदय, राज्य शासनाने अनेक महामंडळांची निर्मिती केली. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, अण्णासाहेब पाटील ओबीसी विकास महामंडळ, मौलाना आझाद अल्पसंख्याक विकास महामंडळांची स्थापना केली गेली. परंतु अर्थसंकल्पामध्ये या महामंडळांसाठी एका नव्या पैशाची तरतूद केलेली नाही. केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून लोकांना गाजर दाखविण्यासाठी या महामंडळांची स्थापना केली गेली.

सभापती महोदय, राज्यातील जनतेला या अंदाजपत्रकातून कोणताही दिलासा मिळालेला नाही. राज्यातील जनतेची फसवणूक करणारा हा अर्थसंकल्प आहे. ग्रामीण भागाची उपेक्षा करणारा, ग्रामीण भागातील जनतेच्या सुख-दु:खावर, त्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा हा अर्थसंकल्प आहे असे मी या अर्थसंकल्पाचे वर्णन केले तर ते चुकीचे ठरणार नाही एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दुपारी 2.17 वाजता भाषणाला सुरुवात केली होती. त्यांनी 1 तास 01 मिनिट भाषण केले आहे. माननीय सदस्यांनी भाषण करण्याबाबत मी वेळेचे बंधन घालणार नाही. मात्र सभागृहाची वेळ सायंकाळी 5.15 पर्यंत आहे. सभागृहाची वेळ एक किंवा दोन तास वाढविता येऊ शकते. तेवढ्या वेळेत आज निश्चित केलेल्या माननीय सदस्यांची भाषणे पूर्ण झाली पाहिजेत एवढीच मला विनंती करावयाची आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आज, उद्या आणि परवा असे एकूण तीन दिवस अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा घेण्यात यावी.

**उप सभापती** : अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा आज आणि उद्याही होणार आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये आम्ही सर्वसाधारण चर्चेसाठी चार दिवस निश्चित करण्याचा आग्रह धरला होता. नियमानुसार 7 दिवस सर्वसाधारण चर्चेचा कालावधी असला आणि तो आमचा अधिकार असला तरी नियम स्थगित करुन सर्वसाधारण चर्चा दोन किंवा तीन दिवस घेतली जाते. सभागृहामध्ये चर्चेसाठी वेळ कमी पडतो म्हणून आम्ही आग्रह धरला होता की, सर्वसाधारण चर्चेसाठी दिवस वाढवून मिळावेत. तीन दिवस सर्वसाधारण चर्चा घेण्याचे मान्य केले होते.

नंतर 2पी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घ्यावयाचा असतो. म्हणून मी अशी विनंती करतो की, उद्या दि. 30 मार्च, 2011 रोजीच्या कामकाज पत्रिकेमध्ये फक्त प्रश्नोत्तराचा तास ठेवावा आणि उर्वरित कामकाजाऐवजी संपूर्ण दिवस अर्थसंकल्पावर चर्चा ठेवावी. परवा दि. 31 मार्च, 2011 रोजी अर्थसंकल्पावरील चर्चेला मंत्री महोदयांचे उत्तर, अशी तीन दिवसांची ही चर्चा ठेवावी. तसेच या कामकाजाच्या दरम्यान शासकीय कामकाज सुध्दा करुन देण्याचीही आमची तयारी आहे.

**उप सभापती** : ठीक आहे, माझी हरकत नाही. आता सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप हे भाषण सुरु करतील.

------------

....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, सन 2011-12 या वर्षीच्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री तसेच वित्त मंत्री यांनी राज्याचा अर्थसंकल्प या सभागृहात सादर केला. या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून येणाऱ्या वर्षभराच्या विकासाची एक वेगळी दिशा राज्यासमोर ठेवलेली आहे, असे म्हटले तरी अतिशयोक्तीचे होणार नाही. अर्थसंकल्पावर बोलत असताना मी मुद्दाम असे सांगू इच्छितो की, हा अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने कष्टकरी, शेतकरी, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक एवढेच नव्हे तर सर्वसामान्य जनतेचा हा अर्थसंकल्प आहे, असे मी ठामपणे सांगतो. या अर्थसंकल्पाचा चेहरामोहरा पाहिला तर "आम आदमीचाच" आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. मी सरकारी पक्षाचा आमदार आहे म्हणून हे बोलत नाही तर एक आम आदमी म्हणून या अर्थसंकल्पाकडे पाहतो. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी चार दिवस सभागृहाच्या बाहेर राहून आज पहिल्यांदा अर्थसंकल्पावर भाषण केले. वास्तविक त्यांना तसे करणे क्रमप्राप्त होते. कारण त्यांच्याकडून दुसरे भाषण अपेक्षित नव्हते. या अर्थसंकल्पाकडे राज्यातील जनतेचे लक्ष लागून राहिले होते याचे कारण केंद्राचा अर्थसंकल्प जाहीर झाला तरी राज्यात महागाईचा आगडोंब समोर उभा आहे. त्यातून राज्यातील जनतेला कसा दिलासा देता येईल याचा विचार करुन आम जनतेचे काय प्रश्न असतील, अपेक्षा असतील त्यांचा विचार यामध्ये केलेला आहे. सामान्य जनतेच्या मनात दैनंदिन गरजेसाठी लागणाऱ्या वस्तू म्हणजे तांदुळ, गहू, डाळी, हळद, मिरची, गूळ, नारळ, धने यांच्या किंमतीत वाढ झाली की काय असा प्रश्न निर्माण झाला होता. पण या अर्थसंकल्पात त्याचे उत्तर "नाही" असेच आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KTG/ प्रथम श्री.खर्चे 15.25

श्री.भाई जगताप ...

सभापती महोदय, या अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने एक गोष्ट मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, शक्ती प्रदत्त समितीने या वस्तुंवर 5 टक्के कर आकारण्यात यावा अशा प्रकारची शिफारस केली होती. परंतु राज्य सरकारने हा कर आकारला नाही. त्यामुळे "आघाडी सरकार आम आदमीके साथ" असे नेहमीच म्हटले जाते. या समितीने 5 टक्के करवाढ सूचित केलेली असतांना राज्य सरकारने 11 कोटी महाराष्ट्रातील जनतेचे हित लक्षात घेता या अर्थसंकल्पामध्ये जीवनावश्यक वस्तुंवर एक पैशाचा कर सुध्दा लावला नाही. म्हणूनच हा अर्थसंकल्प सर्वसामान्य माणसांचा आहे , राज्यातील अकरा कोटी जनतेचा आहे असे मी मुद्दाम आपल्याला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पाच्या संदर्भात आणखी एक बाब मी आपल्याला सांगू इच्छितो. एलपीजी गॅसच्या किंमतीच्या बाबतीत अनेक लोकांच्या मनात शंका असतात.पेट्रोल वा डिझ ेलच्या किंमती वाढल्यामुळे एलपीजीच्या किंमती वाढणार आहेत असे लोकांना वाटत असते.अमुक एक वस्तूच्या किंमती वाढल्यामुळे दुस-या वस्तुच्या किंमती वाढणार आहेत अशा प्रकाराची गणिते वा समीकरणे तयार होत असतात परंतु राज्य शासनाने एलपीजी गॅसवर कोणत्याही प्रकारचा कर वाढविलेला नाही म्हणून माननीय मुख्यमंत्री, माननीय वित्त मंत्री, माननीय वित्त राज्य मंत्री यांचे जनतेच्या वतीने आभार मानतो.

सभापती महोदय, या ठिकाणी दोन हजार 36 कोटी रुपयांचे कर्ज राज्य शासनावर आहे असे जरी सांगण्यात आलेले असले तरी सर्व सामान्य माणसाला त्याच्याशी काहीही देणे घेणे नसते. कोणत्या वस्तुचे दर वाढतात या एकाच गोष्टीकडे त्याचे लक्ष असते.त्याला महिन्याला जो पगार मिळणार आहे त्या पगारात आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करता येणार आहे किंवा नाही हा त्याच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न आहे.महागाईमुळे सर्वसामान्य माणसाला नेहमीच विवचना भेडसावत असते त्याला दिलासा देण्याचे काम या अर्थसंकल्पाने केलेले असल्यामुळे माननीय वित्त मंत्र्यांचे आणि माननीय वित्त राज्य मंत्र्यांचे मी आभार मानतो.

सभापती महोदय,सर्व सामान्य जनतेला या अर्थसंकल्पामुळे खरोखर दिलासा मिळाला आहे. राज्यातील दोन्ही सभागृहामध्ये तसेच देशाच्या दोन्ही सभागृहामध्ये शेतक-याच्या आत्महत्येसंबंधी नेहमीच चिंता व्यक्त करण्यात आली होती आणि ख-या अर्थाने तो नेहमीच चिंतेचा आणि चिंतनाचा

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप ...

विषय आहे. शेतक-यांच्या आत्महत्या हा विषय कोणत्याही राज्याला अभिमानास्पद असण्याचे कारण नाही. शेतक-यांच्या आत्महत्यासबंधीचा प्रश्न केवळ या ठिकाणी भाषणे करुन सुटणार आहे काय शेतकरी आत्महत्या करण्यास का प्रवृत्त होत आहे ? याच्या मुळाशी जर आपण गेलो नाही तर आत्महत्या करणा-या शेतक-याच्या जिल्हयासाठी कितीही पॅकेज जाहीर केले तरी त्यामुळे हा प्रश्न कायमचा सुटणार नाही . किती काळ त्याला पॅकेज देणार आहे हा चिंतनाचा विषय आहे.सभापती महोदय, हा अर्थसंकल्प सर्व सामान्य माणसांचा आणि शेतक-यांचा आहे. आज या बळीराजाला मदत करणे हे सरकारचे कर्तव्यच आहे आणि सरकार आपले कर्तव्य व्यवस्थितपणे पार पाडत आहे. सरकारने शेतक-यांसाठी पॅकेज जाहीर केले म्हणजे त्याच्यावर मेहरबानी केली आहे असे मी कधीही म्हणणार नाही. ते सरकारचे कर्तव्यच आहे आणि हे कर्तव्य सरकार पार पाडणार आहे. परंतु फक्त पॅकेज देऊन या शेतक-यांना उभे करता येणार नाही . या विषयावर पुष्कळ चिंतन झालेले आहे आणि या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये त्याचे प्रतिबिंब उमटलेले तुम्हाला आम्हाला पहावयास मिळालेले आहे. या बळीराजाला मदत करीत असताना किंवा त्याच्या मूलभूत अडचणी दूर करीत असताना सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री भाऊसाहेब फुंडकर यांनी एका गोष्टीचा उल्लेख केला आहे.

सभापती महोदय, शेतक-यांना खत देण्याच्या संदर्भातील गेल्या दोन तीन वर्षाचा अनुभव दुर्देवाने अत्यंत वाईट आहे. परंतु या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये त्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलत असतांना मी असे सांगितले होते की त्यांनी काही दिशा निदर्शक अशा सूचना दिल्या होत्या. त्या सूचनांचे तंतोतंत पालन माननीय वित्त मंत्र्यांनी अर्थसंकल्पात केलेले असल्यामुळे ते निश्चितपणे अभिनंदनास पात्र आहेत असे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. शेतक-यांच्या खताची अडचण लक्षात घेता या वर्षी खतांचा बफर स्टॉक तयार केलेला आहे. पाऊस पडल्यानतर खते मिळविण्यासाठी शेतक-याला वणवण करीत हिंडावे लागते तशी वेळ त्याच्यावर पुन्हा येऊ नये म्हणून मे महिन्यातच शेतक-याला खताचे वाटप होईल अशा प्रकारचे आश्वासन अर्थसंकल्पात देण्यात आलेले आहे त्यामुळे बफर स्टॉक तयार होईल , शेतक-याला खताचा पुरेसा पुरवठा होईल आणि त्याला जे खत हवे आहे ते खत त्याला मिळेल.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड.उषा दराडे )**

नंतर श्री.सरफरे

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

आपण विभागवार खताची असलेली आवश्यकता लक्षात घेऊन त्याप्रमाणे खताचा पुरवठा केला पाहिजे अशाप्रकारची सूचना मला करावयाची आहे. कित्येक वेळा असे होते की, आपण घेतलेला यूरीया त्या विभागामधील शेतीसाठी लागेल अशी परिस्थिती नसते. काही विभागातील भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन त्या ठिकाणी आपल्याला खताचा पुरवठा करावा लागेल. त्या करिता आपल्याला बफर स्टॉक तयार करावा लागणार आहे. तो तयार करुन त्याप्रमाणे आपण खताचे वाटप करावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, केवळ खताचा वेळेवर पुरवठा करुन शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत तर या राज्यामध्ये दरवर्षी अवकाळी आणि अवेळी पाऊस येत असतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शे्तीचे नुकसान होत असते. त्याच्या शेतामधील विहिरीला पाणी आहे, परंतु पंप चालू करण्यासाठी विजेचे कनेक्शन जोडण्यात आलेले नाही किंवा पंप चालू असेल तर त्यामधून पाण्याचा उपसा करण्यासाठी त्यामध्ये ताकद नाही. अशाप्रकारे सर्व प्रकारच्या कर्जाच्या ओझ्याखाली शेतकरी दबलेला असतो म्हणून त्याला कृषी संजीवनी योजनेच्या माध्यमातून जवळ जवळ 5 हजार 900 कोटी रुपयांची मदत आपण जाहीर केली आहे. यामध्ये शेतकऱ्याने घेतलेल्या एकूण कर्जाच्या थकबाकीपैकी 2 हजार 910 कोटी रुपयांची मुद्दल आणि उर्वरित 2 हजार 930 कोटी रुपयांचे व्याज आणि 59 कोटींचा विलंब आकार आहे, ते माफ केले जाणार आहेत.

सभापती महोदया, या सभागृहामध्ये दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांनी अनेक वेळा चर्चेमध्ये भाग घेत असताना नियमित वीज बिलाचा भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांना वेगळे निकष लावण्याबाबत आपण विचार केला नाही तर त्यामधून वेगळी प्रथा निर्माण होईल असे सांगितले. म्हणून आपल्याला सर्वांना सरसकट सवलत देता येईल का? ती देण्यास हरकत नाही तशा प्रकारचे धोरण आणि योजना आखाव्या लागणार आहेत. कोणतेही धोरण स्वीकारतांना आपल्याला एक गोष्ट नक्की करावी लागेल की, स्वत:हून विजेच्या बिलाचा भरणा करण्यासाठी त्यांना आपण प्रोत्साहित केले पाहिजे, त्यामध्ये जर काही लोकांची अडचण असेल तर त्यांना आपण मदत केली पाहिजे याबद्दल दुमत नाही. अशाप्रकारे कृषी संजीवनी योजनेच्या माध्यमातून 2 हजार 930 कोटी आणि विलंब आकाराचे 59 कोटी असे जवळ जवळ 3 हजार कोटीपेक्षा जास्त कर्जावरील व्याज आणि विलंब आकार माफ करण्यात आला आहे. म्हणून खऱ्या अर्थाने ही कृषी संजीवनी योजना आहे. या योजनेला कृषी संजीवनी योजना असे नाव देण्यात आले नाही तर या राज्यातील जनतेला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ MMP/

श्री. भाई जगताप...

संजीवनी देण्याचे काम सरकारने केले आहे.

आपण मागील काळामध्ये पाहिले आहे की, पॅकेजच्या माध्यमातून, मदतीच्या माध्यमातून शेतकरी कर्जमुक्त होण्यासाठी आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबला असतांना त्याला मदत करण्याची भूमिका घेतली. परंतु त्या शेतकऱ्याला कायम स्वरुपी आश्वासन देणे आवश्यक होते, गरजेचे होते. त्याला समजले पाहिजे की, आपण एखादी गोष्ट केली तर त्यामधून आपल्याला फायदा होईल. आपण त्याचे 50 हजार रुपयांपर्यंतचे कर्ज माफ केले. माननीय श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी त्या दिवशी माननीय अर्थमंत्र्यांचे भाषण संपल्यानंतर उभे राहून अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या शेतकऱ्यांच्या दोन गोष्टी मान्य केल्या व त्याचे स्वागत केले होते. त्यामधील एक गोष्ट म्हणजे 50 हजार रुपयापर्यंतचे कर्ज माफ केले आणि 50 हजार रुपयापासून ते 3 लाखापर्यंत 2 टक्के व्याजाने कर्ज पुरवठा करण्याचा निर्णय घेतला. परंतु आज माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नेमके त्याच्या उलट सांगितले. कदाचित चार दिवस बाहेर राहिल्यानंतर या अर्थसंकल्पाचे स्वागत कसे करावयाचे असे त्यांना वाटले असावे? विधानसभेच्या माननीय सदस्यांकडून त्यांच्याकडे विचारणा झाल्यानंतर त्यांना कोणते उत्तर द्यावयाचे असा त्यांना प्रश्न पडला असेल. तरी सुध्दा माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांचे भाषण अभ्यासपूर्ण होते याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. ते या सभागृहातील एक ज्येष्ठ सदस्य आहेत. तरी सुध्दा काही गोष्टी त्यांना नाकारता येणार नाहीत. शासनाने केलेले 50 हजार रुपयापर्यंतचे बिनव्याजी कर्ज त्यांना कसे नाकारता येईल. जे शेतकरी योग्य वेळी 50 हजार रुपयापासून 3 लाखापर्यंतच्या कर्जाची परतफेड करतील त्यांना 2 टक्के व्याजाने कर्ज देणार.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप......

एकेकाळी हा बळीराजा कसा कर्जबाजारी झाला. सावकाराकडून 10 टक्के, 16 टक्के, 18 टक्के, 20 टक्के व्याजाने पैसे घ्यावयाचे आणि . . . .

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मघापासून सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी दोन वेळा उल्लेख केला की, गेले चार दिवस खाली बाहेर बसून आल्यावर ते असे भाषण करणार. परंतु मी त्यांना आठवण करुन देऊ इच्छिते की, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप आपण देखील काही काळ आमच्याबरोबर बसला होता. त्यामुळे आम्हाला कसे वाटले ते तुम्हाला कळले असेल. त्यामुळे आपण पायऱ्यांवर बसलो आहोत की सभागृहामध्ये बसलो आहोत यामुळे आपल्या भूमिकेमध्ये फार फरक पडतो असे नाही. जे काही दिसावयाचे ते दिसत असते आणि जे समजावयाचे ते समजत असते.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मला असे वाटते की, सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांना ही गोष्ट जरा जास्तच बोचलेली दिसते. खरे तर मी हा विषय टाळणार होतो. परंतु सन्माननीय सदस्यांनी माझे नाव घेऊन बोलल्यामुळे मी त्यांना सांगू इच्छितो की, ही लोकशाहीची पवित्र सभागृहे आहेत. याठिकाणी राज्याच्या अर्थसंकल्पाबाबत बोलत असताना मी जे काही आहे ते सांगण्याचा प्रयत्न करीत होतो. परंतु सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी ज्या गोष्टीचा उल्लेख केला, त्याबाबत सांगावयाचे तर "होय, मी त्यांच्याबरोबर पायरीवर बसलो. मला येथे मुद्दाम सांगावेसे वाटते की, मला माझ्या कृतीचा जराही खेद वाटत नाही. याचे कारण असे की, लोकशाहीला धरुन, त्याच्या चौकटीमध्ये राहून आपल्या मागणीसाठी ते पायरीवर बसले होते. मात्र मी त्यांच्या भूमिकेशी आजही सहमत नाही आणि भविष्यात केव्हाही रहाणार नाही हे मला मुद्दाम येथे सांगावेसे वाटते. त्यामुळे अशा प्रकारचे कितीही अडथळे आले तरी अर्थसंकल्पा- तील आकड्यांमध्ये बदल होणार नाही. याठिकाणी अर्थसंकल्पामध्ये सरकारने जे दिलेले आहे, जे प्रिंट झ ालेले आहे त्यात बदल होणार नाही. कदाचित माझा मूड बदलू शकतो किंवा कदाचित त्यांचा मूड चांगला होऊ शकेल किंवा सभागृहाचा मूड बदलू शकेल, परंतु यातील आकडे कसे बदलतील ? 50 हजारापासून 3 लाखापर्यंत 2 टक्के व्याज ही बाब ते कसे बदलू शकतील. यामध्ये बदल करु शकणार नाहीत म्हणून जेव्हा आम्ही हा अर्थसंकल्प सर्वसामान्य जनतेसाठी, शेतकऱ्यांसाठी आहे असे म्हणतो, त्यावेळी याठिकाणी आकडेवारीसहित जे काही दिलेले आहे, त्याचा आधार घेऊनच मी अर्थसंकल्पाबाबत बोलत आहे. या राज्यात जवळजवळ 31 लाख कृषी पंप

श्री.भाई जगताप......

असून 2011-2012 साठी 2500 कोटी रुपयांचे अनुदान जाहीर करण्यात आलेले आहे. आपण जे सांगितले ते खरे आहे. मागील 1 हजार कोटी रुपयांचे जे आहे . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. उद्या विधान सभेमधून विधान परिषदमध्ये रि-ॲप्रोप्रिएशन विधेयक येईल. याबाबतीत पध्दत अशी आहे की, रि-ॲप्रोप्रिएशन विधेयक मंजूर झाल्यानंतर अर्थसंकल्पावरील चर्चा होत नाही आणि सदरहू बिल हे मार्च महिना संपण्यापूर्वी मंजूर करावयाचे असते. आज मी आदरणीय सभापतींना अशी विनंती केलेली आहे की, मागील दोन-चार दिवसांचा जो वेळ गेला, त्यामुळे आता आज, उद्या आणि परवा असे चर्चेसाठी तीन दिवस रहातात. परंतु परवा 31 तारीख आहे. त्यामुळे सदरहू विधेयक कधी मंजूर व्हावयास पाहिजे यासंबंधात मार्गदर्शन झाले तर सर्वांना समजू शकेल आणि मग त्यानुसार अर्थसंकल्पावरील चर्चा कधी संपवावयाची ते ठरविता येईल.

**तालिका सभापती (ॲड.उषाताई दराडे)** : आपण याबाबतीत माननीय सभापती यांच्याशी चर्चा करु आणि माननीय सभापती यांचे काय म्हणणे आहे ते पाहू.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : मी याबाबतीत माननीय सभापती यांच्याकडे जाऊन आलो आहे. याबाबत विधान मंडळाच्या सचिवांचा सल्ला घ्यावा.

**तालिका सभापती** : ठीक आहे. मी त्यांच्याशी बोलते. आता सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी कृषी पंपाच्या बाबतीत बोलत होतो. विहिरीला पाणी आहे, परंतु जर पंपच बसविता आला नाही तर मग शेतकरी आपल्या शिवाराला कुठून पाणी देणार आहे? जरी या राज्यामध्ये विजेचा प्रश्न भेडसावत असला तरी शेतकऱ्यांच्या बाबतीत मागेल त्याला वीज जोडणी अशा प्रकारचे धोरण सरकारने घेतलेले आहे. तसेच या अर्थसंकल्पातील सर्वात मोठे कोणते पाऊल असेल तर या राज्यातील बळीराजाला त्याच्या पायावर उभे करावयाचे असून, मी शेतकरी आहे, कष्टकरी आहे आणि या राज्याचा मूलभूत नागरिक आहे अशा प्रकारची भावना त्याच्या मनामध्ये परत एकदा पल्लवित करण्याच्या दृष्टीने अर्थसंकल्पामध्ये सरकारने या सर्व गोष्टी केलेल्या आहेत आणि त्याबद्दल मी सरकारचे नक्कीच आभार मानतो.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी राज्यात कृषी विमा योजनेच्या बाबतीत जे सांगितले, ते खरे आहे.

यानंतर कु.थोरात .....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप........

माझेही हेच म्हणणे आहे. इतकी वर्षे या सगळया गोष्टी नव्हत्या. पण आता आपण नवीन नवीन गोष्टी करत आहोत. कदाचित असेही असेल की, आज या राज्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत असताना अनेक पाऊले उचललेली आहेत. त्यासाठी विलंब झालेला आहे वगैरे या गोष्टींमध्ये मी जाणार नाही. परंतु परिस्थितीनुसार काही नवीन पाऊले शासनाने उचललेली आहेत. पीक विमा योजनेच्या बाबतीत सभागृहातील दोन्ही बाजूच्या सदस्यांमध्ये एक तळमळ होती. त्याची सुरुवात करण्यात आलेली आहे, ही चांगली गोष्ट आहे. ही सुरुवात करत असताना मला याबाबतीत शासनाला विनंती करावयाची आहे की, पीक विमा योजनेची व्याप्ती वाढविण्याची गरज आहे. या राज्यातील जे चार-पाच विभाग महत्वाचे आहेत, त्या त्या विभागातील जी पिके आहेत, त्या पिकांना या पीक विमा योजनेचा फायदा मिळावा, अशा दृष्टीने शासनाने पाऊले उचलावीत.

सभापती महोदय, पाणलोट क्षेत्राच्या बाबतीत किंवा बाकीच्या गोष्टींच्या बाबतीत बोलून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही, परंतु जलसंपदा विभागासाठी जवळ जवळ 7393 कोटी रुपयांची तरतूद पाटबंधाऱ्याच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे. या सभागृहामध्ये अनेक वेळा तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून तसेच लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून पाटबंधाऱ्याच्या बाबतीत शासनाचे लक्ष वेधण्याचा आम्ही प्रयत्न करतो. आम्ही मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला बऱ्याचवेळा मंत्री महोदयां कडून योग्य उत्तरे दिली जातात तर काही वेळा थातूरमातूर उत्तरे दिली जातात.. कारण शेवटी पैशाचा प्रश्न असतो. पण आज जलसंपदा विभागासाठी एक भरीव तरतूद या अर्थसंकल्पामध्ये केल्यामुळे मला खात्री आहे की, जे प्रकल्प प्रलंबित होते, ज्या प्रकल्पांचे काम 80 ते 90 टक्के पूर्ण झालेले आहे, तसेच ज्याचा उल्लेख माननीय वित्त मंत्र्यांनी त्यांच्या भाषणात केलेला आहे, जे प्रकल्प पूर्णावस्थेकडे चाललेले आहेत, ते सर्व प्रकल्प पूर्ण केले जातील. जे प्रकल्प होऊ घातलेले आहेत त्या प्रकल्पासाठी सुध्दा जवळ जवळ 6300 कोटी रुपयाची भरीव तरतूद करण्यात आलेली आहे. यातून जवळ जवळ 300 पेक्षा जास्त प्रकल्प पूर्ण करुन या राज्याचे 1 लाख 75 हजार हेक्टर एवढे क्षेत्र सिंचनाखाली आणण्याची भूमिका आहे. देशाच्या तुलनेमध्ये महाराष्ट्रातील सिंचनाचे क्षेत्र कमीच आहे. याबद्दल दुमत असण्याचे काही कारण नाही. परंतु हे क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टिकोनातून विचार करणे गरजेचे होते आणि मला असे वाटते की, या विषयाला न्याय देण्याची भूमिका राज्य शासनाने उदधृत केलेली आहे.

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप........

सभापती महोदय, आरोग्याच्या बाबतीत सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी उल्लेख केला आणि ती आमच्या सगळयांचीच चिंता आहे. ग्रामीण भागातील रुग्णांसाठी केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची योजना आहे. या योजनेसाठी केंद्र शासनाकडून काही पैसा मिळणार आहे तर त्यामध्ये राज्य शासनाचा काही वाटा राहणार आहे. यापूर्वी आपला असा समज होता की, गावच्या ठिकाणची माणसे निरोगी असतात. परंतु दुर्देवाने मधुमेहाचे रुग्ण, हृदयविकाराचे रुग्ण किंवा इतर मोठया आजाराचे रुग्ण ग्रामीण भागात सुध्दा मोठया प्रमाणात पहावयास मिळतात. म्हणून ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात एक्स-रे, ईसीजी इत्यादी मशीनची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे, त्याबद्दल मी या ठिकाणी मनापासून मंत्री महोदयांचे आभार व्यक्त करतो. हे आभार व्यक्त करत असताना माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितलेली एक चिंता मला देखील मुद्दाम या ठिकाणी व्यक्त करावीशी वाटते. ग्रामीण रुग्णालयामध्ये यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देण्यात येते आहे, त्यासाठी निधीची तरतूद उपलब्ध करण्यात येत आहे. परंतु या मशीन्स चालणार कशा? सन्मानीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी जबाबदारीने सांगितलेले आहे. एखादा कम्पाऊंडर तशा पध्दतीने वागत असेल आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनाशी खेळत असेल तर या गोष्टीची प्रामुख्याने दखल घेणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ...

ग्रामीण रुग्णालये असतील, प्राथमिक आरोग्य केंद्रे असतील त्या ठिकाणी ज्या मशिन्स बसविणार आहोत त्यासाठी आवश्यक असणारा जो कर्मचारीवर्ग आहे त्याची सुध्दा भरती करणे हे सरकारचे प्रामुख्याने काम नव्हे तर कर्तव्य राहील, हे मला सूचित करावेसे वाटते.

सभापती महोदय, प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत केंद्र सरकारने ज्या काही गोष्टी केलेल्या आहेत त्या बाबतीत मी फारसा उल्लेख करणार नाही. परंतु शिक्षणाच्या बाबतीत उल्लेख करीत असताना मला मुद्दाम सांगावेसे वाटते की, अल्पसंख्याक समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांच्या विकासासाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली आहे. ते करणे आवश्यक होते. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात त्या बाबत उल्लेख केला तर योग्य होईल. या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांची तालीम किंवा शिक्षण हा जो महत्वाचा भाग आहे त्यापासून त्यांना वंचित ठेवले तर ते कसे होणार ? म्हणून या योजनेसाठी शासनाने 48 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मला मुद्दाम सांगावेसे वाटते की, यातील 30 टक्के शिष्यवृत्ती खास करुन मुलींसाठी राखीव ठेवण्यात आलेली आहे. या निर्णयाचे संपूर्ण महाराष्ट्रभर स्वागत होईलच परंतु या राज्याचा एक नागरिक म्हणून आणि लोकप्रतिनिधी म्हणून मी या शासनाचे मनापासून अभिनंदन करतो, आभार व्यक्त करतो. या बाबतीत शासनाने अतिशय चांगला निर्णय घेऊन खऱ्या अर्थाने पुरोगामी पाऊल उचलले आहे.

सभापती महोदय, मला मुद्दाम एक गोष्ट या ठिकाणी सांगावीशी वाटते. केंद्र शासनाकडून किती पैसे आले हे सांगण्याची गरज नाही. कारण या देशामध्ये सगळ्यात जास्त पैसे या राज्यामध्ये आलेले आहेत. जवळपास आठ ते सव्वाआठ हजार कोटी रुपये या राज्यामध्ये आले. एका गोष्टीकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य मागच्या काळामध्ये मंत्री होते. एनडीए सरकारच्या काळामध्ये आपण सगळ्या मंत्र्यांनी मिळून या राज्याला 1700 कोटी रुपये देण्याची विनंती माननीय पंतप्रधानांना केली होती. त्या वेळी एनडीएचे सरकार म्हणजे महाराष्ट्राचे सरकार आहे की काय असे चित्र संपूर्ण देशामध्ये होते. कारण रिमोट कंट्रोल

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ....

महाराष्ट्रामध्ये होता. रिमोट कंट्रोल मुंबईमध्ये होता. हे असून सुध्दा आणि केंद्रामध्ये राज्यातील 10 ते 11 मंत्री असून सुध्दा आपण जे 1700 कोटी रुपये मागितले होते त्या ऐवजी आपल्याला फक्त 47 कोटी रुपये मिळाले. मला मुद्दाम या ठिकाणी सांगावेसे वाटते की, या राज्यामध्ये येणारा जो पैसा आहे मग तो केंद्र शासनाच्या माध्यमातून येणारा पैसा असेल, ते आमचे पैसे आहेत कारण मुंबईतून टॅक्सच्या रुपाने पैसे जमा होतात त्यामुळे त्याच्या माध्यमातून येणारा पैसा असेल, त्यामध्ये या राज्याच्या विकासाकडे कधीही केंद्राने दुर्लक्ष केलेले नाही.

**तालिका सभापती (ॲड. उषा दराडे )** : सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप, आपल्याला भाषण सुरु करुन 25 मिनिटे झालेली आहेत.

श्री. भाई जगताप : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी 1 तास भाषण केले.

**तालिका सभापती** : विरोधी पक्षाला जो वेळ दिलेला आहे त्यातून 1 तासाचा वेळ वजा होणार आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदया, यानंतर मी पर्यावरणाच्या संदर्भात बोलणार आहे. पर्यावरणाच्या संदर्भात या शासनाने खऱ्या अर्थाने काही पुरोगामी पावले उचललेली आहेत. अल्पसंख्याक विद्यार्थीनीसाठी केलेली तरतूद असेल त्यामध्ये शासनाने पुरोगामी पाऊल उचलले आहे. आज संपूर्ण जगात ग्लोबल वार्मिन्गच्या बाबतीत बोलले जाते पण त्याची सुरुवात कोठून करणार ? या देशामध्ये महाराष्ट्र हे पहिले राज्य असेल की, ज्या राज्याने पर्यावरण संतुलित ग्राम अभियानाच्या संदर्भात एक धाडसी पाऊल उचललेले आहे. आपण विकासाच्या दृष्टीने गावाला केंद्रबिंदू मानून ग्रामपचायतींना सक्षम बनविलेले आहे. त्याच पध्दतीने पर्यावरणाच्या दृष्टीने प्रचार आणि प्रसार हा सुध्दा तेथूनच व्हावा या भूमिकेतून पर्यावरण संतुलित ग्राम विकास अभियानाला या ठिकाणी शासनाने प्राधान्य दिलेले आहे. त्यासाठी 200 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्या बद्दल मला शासनाचे आभार व्यक्त करावे लागेल.

...3...

श्री. भाई जगताप .....

सभापती महोदया, या ठिकाणी राज्याचे युवा धोरण येणार आहे. मला मुद्दाम या ठिकाणी सांगावे लागेल की, या देशामध्ये आणि राज्यामध्ये क्रिकेट सोडले तर बाकीच्या खेळांच्या बाबतीत काय परिस्थिती आहे ? उद्या सुध्दा क्रिकेटची मॅच आहे आणि उद्या सभागृहाचे कामकाज दुपारी 2.00 वाजण्याच्या आत संपेल की नाही आणि आपणा सगळ्यांना मॅच बघावयास मिळेल की नाही या बाबत आपण चर्चा करतो. कारण संपूर्ण देशाची त्या मागे भावना आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

त्या भावनेने खेळाडू खेळतात. पण या राज्याचे जे मैदानी खेळ आहेत त्या मैदानी खेळांकडे आतापर्यंत कोणाचेही लक्ष नव्हते. कबड्डी, कुस्ती यासारखे मैदानी खेळ आहेत. कबड्डीसारख्या उपेक्षित असलेल्या खेळासाठी या वर्षी तरतूद केलेली आहे. योगायोगाने मी मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचा अध्यक्ष आहे. माननीय वित्त मंत्री हे महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष आहेत. त्यांनी या खेळाला न्याय देण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यामुळे मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. माजी खासदार, हिंद केसरी, "जकार्ता वीर" मारुती माने यांनी महाराष्ट्राची व देशाची मान उंच केली, त्यांचे नाव घेतल्यावर गर्वाने आमची छाती फुगते, त्या मारुती माने यांचे कुस्तीमधील अमूल्य योगदान विचारात घेऊन त्यांच्या मूळ गावी त्यांचे स्मारक उभे केले जाणार आहे. माननीय अर्थमंत्र्यांच्या भाषणामध्ये 'आवश्यक ती तरतूद करण्यात येईल' असे म्हटलेले आहे. मंत्री महोदयांचा हेतू शुध्द आहे. त्यामुळे या स्मारकासाठी योग्य ती तरतूद केली पाहिजे. शासनाने अतिशय चांगले पाऊल उचलले आहे. शासनाने या वर्षी धोरणात्मक निर्णय घेतले आहेत त्याचे आम्ही स्वागत केलेले आहे, आभार देखील व्यक्त केलेले आहेत. म्हणून मारुती माने यांच्या मूळ गावी यथोचित स्मारक होण्यासाठी किमान 5 कोटींची तरतूद करावी. जेणे करुन ते स्मारक राज्याचे वैभव ठरेल, या राज्याला व देशाला सुध्दा अभिमानाने सांगता येईल.

सभापती महोदय, हे बजेट सर्वसामान्यांसाठी आहे, कष्टकऱ्यांसाठी आहे, मागासवर्गीयांसाठी आहे, उपेक्षित घटकांसाठी आहे. हे सांगण्याचे कारण असे आहे की, शासनाने अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गाकरिता कच्च्या घरांचे पक्क्या घरात रुपांतर करण्याच्या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात सर्व दारिद्रय रेषेखालील लाभार्थींना प्राधान्य देऊन योजनेची अंमलबजावणी सुरु केली आहे. त्यासाठी या वर्षी 800 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. आम्ही शहरातील असलो तरी शेतकऱ्यांची मुले आहोत. आम्ही सुध्दा ग्रामीण भागामध्ये काम करीत असतो. ग्रामीण भागातील कष्टकऱ्यांची कामे करण्यासाठी संपूर्ण देशभर, राज्यभर फिरत असताना काही गोष्टी आमच्या नजरेस येतात. अनुसूचित नवबौध्द हा समाज राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात आहे. ह्या समाजातील लोक पडीक व मातीच्या घरात राहतात हे राज्याचे वैभव असू शकत नाही. पण त्यांच्या घरांसाठी शासनाने तरतूद केली आहे त्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो. शासनाने उशिरा का होईना

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

श्री.भाई जगताप.....

राज्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत असताना या महत्वाच्या बाबीकडे लक्ष दिले आहे, त्या लोकांच्या कच्च्या घरांचे रुपांतर पक्क्या घरात करण्यासाठी 800 कोटींची तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, हे राज्य शासन कष्टकऱ्यांचे आहे, कामगारांचे आहे असे म्हणतो, त्यावेळी राज्यात बाल कामगार असणे ही कोणत्याही सरकारला, तुम्हाला, आम्हाला लाजिरवाणी गोष्ट आहे. बाल मजुरी नष्ट करण्यासाठी शासनाने प्रयत्न केले हे खरे आहे. परंतु शासनाला नेमके काय करावयाचे आहे ? बाल कामगार स्वखुषीने काम करीत नाहीत. त्यांची शिक्षण घेण्याची आर्थिक परिस्थिती नसते. आता केंद्र सरकारने निर्णय घेऊन सर्वांना शिक्षणाचा अधिकार प्रदान केलेला आहे. परंतु त्यांच्या पोटामध्ये काही नसेल, त्यांच्या घरी काही नसेल, त्यांच्या आई-वडिलांचा सामाजिक दोष आहे असेही म्हणता येत नाही. कारण आपल्या मुलांना शाळेत पाठविण्याची त्यांची ऐपतच नसते. एका बाजूला सर्व शिक्षा अभियान किंवा सर्वांना शिक्षणाचा अधिकार या योजनांच्या माध्यमातून सर्वांना शिक्षण दिले जाते. दुसऱ्या बाजूला पकडण्यात आलेल्या बाल कामगारांना रिमांड होममध्ये पाठविण्यात येते. त्या मुलांनी रिमांड होममधून गुन्हेगार बनून बाहेर यावे असा शासनाचा हेतू नक्कीच नसावा.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

माझी शासनाला विनंती आहे की, आपणाला या बाल मजुरांकडे केवळ बाल मजूर म्हणून पाहून चालणार नाही. त्या बाल मजुराच्या कुटुंबाला काही मदत करता येईल का या दृष्टीने विचार केला पाहिजे. आपण अशा मुलांना शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली आहे. राज्यामध्ये 1400 निवासी शाळा बांधलेल्या आहेत. अशा शाळांमधून अशा मुलांना शिक्षण मिळते. मिड डे मिल योजनेच्या माध्यमातून मुलांना जेवण मिळते. असे असले तरी त्यांच्या जीवनाच्या दुस-याही विवंचना असतात. या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, या बाल मजुरांना पकडल्यानंतर त्यांना रिमांड होममध्ये पाठविले जाते. परंतु त्यांना तेथे न पाठविता त्यांच्यासाठी बालगृह तयार करावे जेणेकरुन तेथे त्यांच्या शिक्षणाची आणि उदरनिर्वाहाची व्यवस्था होऊ शकेल. तसेच त्या बाल मजुराच्या कुटुंबाला काही मदत करता येईल का या दृष्टीनेही शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, परितक्त्यांना मदत करण्याचे धोरण शासनाने स्वीकारलेले आहे. संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून अशा परितक्त्या महिलांना मदत करण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. या प्रमाणे बाल मजुराच्या कुटुंबाला देखील मदत करण्याच्या दृष्टीने शासनाने पावले उचलावीत अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे हा अर्थसंकल्प ख-या अर्थाने सर्व सामान्यांचा अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प बळीराजाचा, शेतक-याचा अर्थसंकल्प आहे, हा अर्थसंकल्प कष्टक-याचा आहे, हा अर्थसंकल्प मागासवर्गीयांचा आहे आणि हा अर्थसंकल्प ख-या अर्थाने राज्यातील 11 कोटी जनतेला दिलासा देणार आहे असे माझे मत व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

----

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आजची सभागृहाची कामकाजाची वेळ किती असेल आणि अर्थसंकल्पावरील चर्चा केव्हा संपवायची या संबंधीचा हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्या संदर्भात सभागृहाला असे कळविण्यात येत आहे की, अर्थसंकल्पावर आज उशिरापर्यन्त चर्चा करुन राहिलेली चर्चा उद्या बुधवार दिनांक 30 मार्च 2011 रोजी प्रश्नोत्तराच्या तासानंतर सुरु होईल. त्यानंतर मंत्री महोदयांचे उत्तर आणि त्यानंतर लेखानुदान विनियोजन विधेयक घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सर्व सन्माननीय सदस्यांना या चर्चेमध्ये भाग घेण्याची संधी मिळावी म्हणून सभागृहाचे कामकाज उशिरापर्यन्त चालविण्याची मी विनंती केली.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदया, आज सभागृह कितनी देर तक चलेगा ?

**तालिका सभापती** : इस बारे में अभी हमने कुछ तय नहीं किया है. परन्तु उशिरापर्यंत बसू. सभागृहाची बैठक किती वेळ चालवायची हे नंतर बघू या.

श्री एस. क्यू जमा : सभापति महोदया, कल सभागृह 10.00 बजे शुरु होगा . उसके बाद प्रश्नोत्तर होंगे, उसके बाद बजट पर चर्चा होगी. मेरा आपसे अनुरोध है कि कल इस तरह की व्यवस्था की जाए कि सभागृह 2.00 तक स्थगित हो जाये.

**तालिका सभापती** : उद्या बुधवार, दिनांक 30 मार्च 2011 रोजी सभागृहाची बैठक सकाळी 9.00 वाजता भरणार आहे.

श्री. दिवाकर रावते : उद्या दुपारी 2.00 वाजेपर्यंत कामकाज आटोपेल असे धरुन चालू या.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपले भाषण सुरु करावे.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011-2012च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांचे भाषण मी ऐकले आणि सत्ताधारी पक्षातील एक सन्माननीय सदस्य विरोधी पक्षामध्ये सामील झाल्यासारखे वाटले. नंतर सन्माननीय सदस्य श्री. जगताप यांच्या ते सरकारच्या चुका दाखवत असल्याचे लक्षात आले. त्यांनी शेवटी या अर्थसंकल्पाचे कोडकौतुक केले. अर्थसंकल्पावर विरोधी पक्षाच्या वतीने शासनाच्या धोरणात्मक उणिवा दाखविल्या जातात आणि ते विरोधी पक्षाचे कामच आहे. सन्माननीय सदस्य आमच्या बरोबर पाय-यावर बसल्यानंतर त्यांच्यावर हा एवढा परिणाम झाला. या चर्चेमध्ये सत्ताधारी पक्षाकडून कमीत कमी सदस्यांनी भाग घ्यायचा असतो आणि तो घेतल्यानंतर सरकारच्या उणिवा न दाखवता कोणत्या गोष्टी करणे आवश्यक आहे हे सांगायचे असते. म्हणून मी सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी जे भाषण केले त्याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदया, ज्यांनी या सभागृहात अर्थसंकल्प सादर केले ते अर्थ राज्यमंत्री महोदय यावेळी सभागृहात उपस्थित नाहीत. माझ्याकडे अर्थसंकल्पाचे आर्थिक विवरणपत्र आहे. त्यावर श्री.अजितदादा पवार, उप मुख्यमंत्री, वित्त असे नाव आहे. परंतु या सभागृहात ज्यांनी अर्थसंकल्प मांडला, त्यांचे मात्र नाव नाही. त्यांच्याकडे अर्थ खाते आहे यासंबंधी सभागृहाला ओळख नाही. त्यांनी अर्थसंकल्प मांडला, त्यांनी काय म्हणून सभागृहात अर्थसंकल्प मांडला असा प्रश्न निर्माण होतो. म्हणून माननीय अर्थ राज्यमंत्र्यांचे नाव या पुस्तिकेवर असावे अशी मी सूचना करतो. कारण ते अधिकारवाणीने आमच्याशी बोलत असतात, त्यामुळे भविष्यात या पुस्तिकेवर त्यांचे असावे.

सभापती महोदया, हा अर्थसंकल्प कोणाचा आहे ? तो शंभर टक्के राष्ट्रवादी पक्षाकडे झुकलेला आहे. आपण म्हणतो की, आर्थिक धोरण कोठे झुकले आहे ? ते राष्ट्रवादी पक्षाकडे झुकले आहे, अशा प्रकारचा हा अर्थसंकल्प आहे. असे आम्ही म्हणत नाही. आम्ही असे म्हटले तर तो टिकेचा विषय होईल. सभापती महोदया, "मुंबई मिरर" या वृत्तपत्रात जो वृत्तांत आलेला आहे, त्याचे कात्रण माझ्याकडे उपलब्ध आहे. त्या वृत्तांतात असे म्हटले आहे की, या राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि सध्याचे माननीय मंत्री हे प्रचंड स्वाभिमानी आहेत. ते कोणापुढे कधीच वाकत नाहीत..

श्री.विक्रम काळे (बसून) : आपल्या हातात जे इंग्रजी कात्रण आहे ते वाचून दाखवा..

श्री. दिवाकर रावते : मला इंग्रजी भाषा येत नाही असा तुमचा समज झालेला आहे काय ? मी जरी मराठी भाषेचा आग्रह धरीत असलो तरी मला इंग्रजी भाषा वाचता येते. तुमच्या मंत्रिमंडळामध्ये इंग्रजी न बोलणारे मंत्री आहेत, यात माझा काही दोष नाही. या सरकारमध्ये इंग्रजी न येणारे मंत्री असतील तर त्यात माझा काही दोष नाही. "मुंबई मिरर" या वृत्तपत्रात असे म्हटले आहे की, " Revenue Minister Shri Narayan Rane said he had asked for Rs. 5 crores for Sindhudurg District but got nothing. My demand was not focused on my constituency Kudal. I wanted the money for the entire district and while I got nothing, NCP MLA from nearby district got 9 crores..." मी तुम्हाला मराठीत सांगू इच्छितो की, मला कवडी मिळाली नाही, परंतु माझ्या

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

शेजारी असलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या आमदाराला 9 कोटी रुपये मिळाले, असे माननीय श्री. नारायण राणे म्हणाले. त्यामुळे त्यांचा स्वाभिमान जागा झाला. "...Rane said he had met Pawar before the Budget to place his demand...." त्यांचा स्वाभिमान म्हणतो की,"...Normally, I do not visit other Minister's Chamber but this time I had no choice..." किती अगतिक झाले आहे. "....If things continue in this manner, it would be difficult for the Congress." आपल्या पक्षाला त्यांनी धोका दाखविलेला आहे. हा धोका माननीय श्री. नारायण राणे साहेबांनी दाखविलेला आहे. या बाबतीत माझे काही म्हणणे नाही. आमचे आदरणीय, आमचे ज्येष्ठ सहकारी डॉ.राधाकृष्ण विखे पाटील हे जरी त्या ठिकाणी असले तरी आमचे एकमेकावर प्रेम आहे. धोरणे चुकली तर मात्र आक्षेप घेतो. त्यांच्या बाबतीत असे म्हटले आहे की," Vikhe-Patil told the Chief Minister that his ministry was allotted Rs. 649 crores...." माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर यांनी याचा उल्लेख केला. "...of which Rs. 600 crores are either matching grants for Central Government Schemes or are part of Central fund. This leaves Vikhe-Patil with Rs. 49 crores only. Compared to the neighbouring Gujarat State which has allotted Rs. 1300 crores for agriculture, this is peanuts."

सभापती महोदय, दाणे टाकून आपल्या शेजारच्या सहकारी मंत्र्यांना विभाग चालविण्यास लावणारा हा अर्थसंकल्प आहे, असे "मुंबई मिरर" या वृत्तपत्रात छापून आलेले आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ 16:05

श्री.दिवाकर रावते............

सभापती महोदय, या अर्थसंकल्पातून गरिबांना काय दिले, पददलितांना काय दिले, शिक्षण क्षेत्राला काय दिले, महामंडळांना काय दिले, यापेक्षा हा अर्थसंकल्प राष्ट्रवादी पक्षाकडे झुकणारा आहे हे स्पष्ट झालेले आहे. अर्थसंकल्पीय भाषणातील कर विषयक पुस्तिकेमध्ये दुसऱ्या पृष्ठावर ऊस खरेदीवर वसूल करण्याच्या कर पध्दतीमध्ये बदल केल्याचे नमूद केले आहे. सर्वसाधारणपणे ऊसाचे गाळप ऑक्टोबर ते एप्रिल महिन्यापर्यंत होते. प्रती मेट्रीक टन 60 रुपये या दराने ऊसावर खरेदी कर वसूल केला जातो. प्रत्येक कारखान्याकडून 2 ते 2.25 कोटी रुपये कर वसूल होत असतो. या कर भरण्याच्या पध्दतीमध्ये सवलत देण्यात आली आहे. यापुढे हा कराचा पैसा कारखान्यांनी वर्षभर वापरायचा आणि ज्यावेळी साखर विक्री केली जाईल त्याप्रमाणात दरमहा ही कराची रक्कम भरायची असे धोरण सरकारने जाहीर केले आहे. स्वकीयांची काळजी घेणारा आणि साखर कारखानदारीतील आपल्या लोकांना वर्षभर कराची रक्कम वापरायला देणारा हा अर्थसंकल्प आहे.

सभापती महोदय, आजारी साखर कारखान्यांबाबत धोरण आणले आहे. राज्यामध्ये अनेक साखर कारखाने आजारी वा बंद पडले आहेत. ज्यांनी मागील तीन वर्षात गाळप केलेले नाही अशा आजारी साखर कारखान्यांसाठी पुनरुज्जीवन योजना आणली आहे. अशा कारखान्यांना विक्री कर माफ, ऊस खरेदी कर माफ केला जाणार आहे. या योजनेचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे का? साखर कारखान्यांचे जे संचालक आहेत ते कारखाने गिळंकृत करीत आहेत. त्यांना सहकार्य करण्याकरिता हे प्रयत्न सुरु आहेत. गरीब शेतकऱ्यांना यातून एक रुपयाचा देखील फायदा मिळणार नाही. आपल्या पक्षातील राजकीय लोकांची सोय कशी लावली जाते हे या पुस्तिकेतून वाचायला मिळते.

सभापती महोदय, अर्थ मंत्र्यांनी वडापाववरील कर कमी केला आहे. यात कोणती मोठी कामगिरी केली हे मला कळलेले नाही. या महाराष्ट्रातील 99 टक्के जनता रस्त्यावर विकला जाणारा वडापाव खाते. अशा वडापाववरील कर माफ केला. राजा उदार झाला आणि हाती वडापाव दिला. मला एका गोष्टीबद्दल शासनाचे अभिनंदन केले पाहिजे. दारुच्या निर्मितीवर मोठया प्रमाणात कर लावला गेला आहे. त्याबद्दल मी खूप आनंदी झालो आहे. दारुवर किती कर लावले तरी खरेदीदार थांबणार नाहीत. या माध्यमातून तिजोरीत खूप पैसा येईल. तिजोरीतील

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...........

घट भरुन काढता येईल. माननीय अर्थ मंत्र्यांनी 58 कोटी रुपये शिलकीचा अर्थसंकल्प सादर केला आहे. राज्याच्या निवृत्ती वेतनावरील खर्चात भरमसाठ वाढ झालेली आहे. योजनाबाह्य खर्चात वाढ होत आहे. अशा स्थितीत हे 58 कोटी रुपये कुठे जातील हे कळणार नाही. ओढून ताणून 58 कोटी रुपयांची शिल्लक दाखविण्यात आली आहे. दारु निर्मितीवर कर वाढविले त्याबद्दल मला काही म्हणायचे नाही. त्या माध्यमातून तिजोरीत महसुलाची भर पडणार आहे. आपल्या राज्याचे उत्पन्न वाढत असताना त्यामध्ये मुद्रांक शुल्काच्या माध्यमातून आणि विक्री कराच्या माध्यमातून मोठया प्रमाणात महसूल मिळत असतो. केंद्र सरकारच्या विविध योजनांमधून आणि राज्यात कर रुपाने गोळा होणाऱ्या महसुलातील वाटा राज्याला मिळत असतो.

सभापती महोदय, आज या राज्यावर कर्ज किती आहे? राज्यावर 2,44,975 लाख कोटी रुपयांचे कर्ज झालेले आहे. प्रत्येक वेळेला कर्जाचा विषय आला की, युती शासनाच्या कारभाराकडे बोट दाखविले जाते. युती शासनाकडून आघाडी सरकारकडे सत्ता गेली त्यावेळी राज्यावर 42,666 कोटी रुपयांचे कर्ज होते. हे कर्जाचे प्रमाण त्यावेळी राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या 17 टक्के इतके होते. आज 2.44 लाख कोटी रुपयांचे कर्ज झालेले असल्यामुळे शासनाने श्वेतपत्रिका जाहीर करावी आणि निधी कुठे खर्च केला याची सभागृहाला माहिती द्यावी.

नंतर 2झेड.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

इतके कर्ज का वाढले हा प्रश्न निर्माण होतो. त्याचा परिणाम म्हणून वर्षाकाठी एकूण बजेटच्या 17 टक्के एवढी रक्कम केवळ व्याजासाठी आपल्याला भरावे लागत आहेत. एवढा पैसा कोठे गेला हे समजण्यासाठी आम्हाला यासंबंधीची श्वेत पत्रिका काढून द्यावी. यातून काय निर्माण झाले हे देखील त्यातून समजणार आहे, म्हणून आमचा श्वेत पत्रिकेचा आग्रह आहे. मी आकडेवारी सांगणार नाही तर धोरणात्मक बाबींच्या अनुषंगानेही बोलणार आहे. वसुलीच्या बाबतीत बोलावयाचे तर 29258 कोटीची कर वसुली या शासनाने केलीच नाही. त्यात कर महसूल वसुली 18072.63 कोटी असून त्यात फक्त 9246.61 कोटी एवढी निर्विवाद रक्कम आहे. तर करेतर वस्तूंची वसुली जवळपास 20 हजार कोटीच्या आसपास शासनाने केलेलीच नाही. त्यासंदर्भात कोणतीही ठोस उपाययोजना या अर्थसंकल्पात दिलेली नाही. इतक्या बाजूंनी कराचे येणे बाकी असताना तसेच राज्यावर मोठ्या प्रमाणावर कर्जाचा बोजा असताना अर्थसंकल्पात मात्र कोणतीच दिशा सांगितलेली नाही. धोरणात्मक बाबींच्या अनुषंगाने बोलताना यामध्ये 60-62 वस्तू सांगितलेल्या आहेत त्यातील 22 वस्तू तर केंद्र शासनाच्या आहेत. 3 खाजगीकरणाच्या बाबी आहेत. अशा प्रकारे एकंदरित 25 बाबी म्हणजेच जवळपास 35 टक्के आपल्या तिजोरीशी संबंधित नसून केंद्र शासनाशी संबंधित आहेत. त्यात काही बाबतीत मॅचिंग ग्रँटच्या बाबी समाविष्ट असतील. सन 2009-10 मध्ये केंद्र शासनाकडून आपल्या राज्यात 20203.56 कोटीची उपलब्धता झाली होती. तर सन 2011-12 मध्ये 29959.16 कोटी इतकी रक्कम येणे अपेक्षित आहे. म्हणजे राज्याच्या 42 हजार कोटीच्या अर्थसंकल्पात 29 हजार कोटी केंद्र शासनाच्या माध्यमातून मिळणारी रक्कम आहे. म्हणजे वडीलांच्या खिशात हात घालायचा आणि नाक्यावर येऊन 555 सिगारेट ओढत रुबाब करावयाचा अशातला हा प्रकार आहे. या अर्थसंकल्पाच्या बाबतीत सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी टीका केली पाहिजे असे मी म्हणत नाही तर किमान शेतकऱ्यांच्या बाबतीत तरी बोलले पाहिजे. अर्थसंकल्पाला सुरुवात करताना पहिला विषय अन्न व कृषीवर भर दिल्याचे सांगितले आहे.

महोदय, अर्थसंकल्पावर बोलत असताना मी एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणून देणार आहे की, खाजगी सावकारीच्या संदर्भातील विधेयकाचा येथे उल्लेख झाला. त्यावरुन केंद्र

.....2......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

सरकार देत असलेल्या एका जाहिरातीची मला आठवण झाली. केंद्र सरकार दररोज एक जाहिरात प्रसिध्द करते. त्यात असे दाखविलेले आहे की, एका शेतकऱ्याच्या घरी दररोज एक सावकार येऊन उभा राहतो. शेतकऱ्याच्या बायकोला विचारतो की, या घराचा मालक कोठे गेला. त्यावर शेतकऱ्याची पत्नी सांगते की, ते शेतीचे उत्तम ज्ञान देणाऱ्या प्रशिक्षण वर्गासाठी गेले. या क्लासचा उपयोग त्या शेतकऱ्याला असा होणार आहे की, तो शेती भरभराटीची करेल आणि सावकाराची देणी फेडेल. अशा प्रकारे केंद्र शासनाच्या माध्यमातून सावकाराचे कर्ज लवकर कसे फेडता येईल याचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केलेली आहे.

महोदय, अर्थसंकल्पात सुरुवातीलाच शेतीच्या माध्यमातून सांगितलेले आहे. पण ज्या दिवशी म्हणजे दि. 23 मार्च, 2011 रोजी अर्थसंकल्पाचे वाचन होत होते त्या दिवशी दुपारी 12.00 ते सायंकाळी 7.00 या कालावधीत राज्यात आत्महत्या होत होत्या. त्या दिवशी श्री. सुरेश राठोड, खेड, जि. यवतमाळ, श्री. गणेश देशमुख, नरसाळा, जि. यवतमाळ, श्री. देविदास पांढरे, कोठूर्ली, जि. यवतमाळ, महादेव पार्वती, रा. मच्छिंद्र, जि. यवतमाळ, श्री. सुभाष मुंगुळ, आवरफळा, जि. चंद्रपूर.........

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

अर्थसंकल्प मांडण्याच्या अगोदरच्या दिवशी म्हणजे 23 मार्च, 2011 रोजी नामा चव्हाण राहणार-फुलवाडी, जि. चंद्रपूर, धोंडूजी येडसे,राहणार नागाई, जि.यवतमाळ, नामदेव राठोड राहणार मोडशी जि.वाशिम, दादाराव झामरे राहणार खडकी जि. अकोला व जितेंद्र सुरवडकर, राहणार पोफळी जि.बुलढाणा या पाच शेतक-यांनी 23 मार्च 2011 रोजी आत्महत्या केलेल्या आहेत. ज्या जिल्हयाकरिता माननीय पंतप्रधांनानी पॅकेज दिले होते त्या जिल्हयातील आत्महत्या थांबायच्या सोडून त्या वाढतच आहेत. आत्महत्या केलेल्या शेतक-यांचा शासना जवळील आकडा साडेपाच ते सहा हजाराचा आहे. परंतु यापेक्षाही आत्महत्या केलेल्या शेतक-यांची संख्या जास्त आहे.

सभापती महोदय, शेतक-यांना 50 हजार रुपयांपर्यंतचे कर्ज शून्य टक्के व्याजाने दिले जाणार असून 3 लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावर 2 टक्के व्याज आकारले जाणार आहे अशी घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. परंतु हे कर्ज कोणाला दिले जाणार आहे ? सभापती महोदय, ज्यांनी कर्ज फेडलेले आहे अशाच शेतक-यांना हे कर्ज मिळणार आहे.

सभापती महोदय, सन 2011 च्या जानेवारी महिन्यात 54, फेब्रुवारी महिन्यात 32 तर मार्च महिन्यात 28 अशा तीन महिन्यात 144 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यामुळे आपण कोणाला कर्ज देणार आहात ? या ठिकाणी मी केवळ अनुशेष ग्रस्त भागाच्या संदर्भातच बोलणार आहे. मराठवाडा आणि खान्देशची परिस्थिती अजून विदारक आहे. विदर्भातील 20 लाख शेतक-यांपैकी जेमतेम 2 लक्ष शेतकरी बँकेकडून कर्ज घेत असतात व उरुलेले 18 लक्ष शेतकरी सावकाराकडून कर्ज घेत असतात ही सत्य परिस्थिती आहे. केवळ विदर्भातील 90 टक्के शेतकरी सुध्दा आपल्या कर्ज योजनेचा फायदा घेऊ शकणार नाहीत अशी परिस्थिती आहे. त्यामुळे शेतक-यांना सावकारापासून मुक्त करुन त्यांना आपल्या बँकेच्या माध्यमातून कर्ज उपलब्ध करुन देण्याचे धोरण शासनाने आखावयास पाहिजे होते. परंतु अशा प्रकारचे कोणतेही धोरण अर्थसंकल्पात मला दिसले नाही ही खेदाची बाब आहे.

सन 2009 च्या दुष्काळानंतर व सन 2010 च्या अतिवृष्टीमध्ये सापडलेल्या सर्व शेतक-यांना व पीक कर्ज घेणा-या महिला बचत गटाचा कर्जावर व्याज तात्काळ माफ करण्यात यावे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

अशा प्रकारची मागणी आम्ही केली होती. कर्जाचे पुनर्वसन करुन तात्काळ नवीन पीक कर्ज यांना उपलब्ध करावे यासंदर्भात नाबार्ड व रिझर्व्ह बँकेने स्पष्ट आदेश दिलेले असतांना सुध्दा बँकानी या शेतक-यांना पीक कर्ज देणे बंद केलेले आहे. आम्ही यासंदर्भात सहकार मंत्र्यांना सांगितले त्यावेळेस त्यांनी सांगितले की, "आम्ही सर्व व्यवस्था करणार आहोत". यासंदर्भात माननीय सभापतींच्या दालनात बैठक झाली होती परंतु अजूनही शेतक-यांना पीक कर्ज दिले जात नाही ही वस्तुस्थिती आहे. पीक कर्ज न देण्याचे मुख्य कारण म्हणजे या शेतक-यांनी मागचे पीक कर्ज फेडलेले नसल्यामुळे त्यांना नवीन पीक कर्ज दिले जात नाही. हे जे शेतकरी आहेत ते अतिवृष्टीमुळे व दुष्काळामुळे उध्वस्त झालेले शेतकरी आहेत. त्यामुळे येत्या खरीप हंगामात शेतक-यांची प्रचंड प्रमाणात लूट होणार असून शेतक-यांना नाइलाजास्तव सावकाराकडेच जावे लागणार आहे. सरकारचे शेतक-यांच्या संदर्भातील धोरण शेतक-यांना आधारभूत न वाटता अजून उध्वस्तीकडे नेणारे आहे. कारण नियमामुळे बँका या शेतक-यांना कर्जच देणार नाहीत. सावकारापासून शेतकरी मुक्त कसा होईल याबाबत शासनाकडून कोणतीही घोषणा व शासनाची मानसिकता दिसली नाही हे मला मोठया खेदाने नमूद करावे लागत आहे.

सभापती महोदया, मागेल त्याला वीज जोडणीसाठी 80 कोटीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. आपण यासंदर्भात इच्छाशक्ती दाखवली आहे परंतु मला खात्री आहे हे काम शासनाला करताच येणार नाही. त्याचे कारण असे आहे की, शासनाचा वीज निर्मिती क्षेत्रात काहीही संबंध नाही. ऊर्जा मंत्री हे नामधारी मंत्री आहेत. कारण वीज निर्माण करणा-या सर्व कंपन्या खाजगी आहेत. खाजगी वीज कंपन्याच धोरण ठरवीत असतात. विजेच्या नियंत्रणाकरिता वीज नियामक आयोग आहे. आता वीज कंपनी सुरु करण्यासाठी कोणाचीही परवानगी लागत नाही.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

सभापती महोदया, शासनाने या तरतुदीमधून शेतक-यांना वीज द्यावी त्याबद्दल आम्हाला आनदच आहे. परंतु प्रत्यक्षात त्या प्रमाणे होऊ शकत नाही याची मला खात्री आहे. हे फसवे मृगजळ लोकांना दाखविण्यापेक्षा जी सत्य परिस्थिती आहे त्या परिस्थितीनुरुप जर काही प्रामाणिकपणे मुद्दे मांडले असते तर मला जास्त आनंद झाला असता.

सभापती महोदया, कृषी संजीवनी योजनेचा या अर्थसंकल्पात उल्लेख करण्यात आला असून दोन हजार कोटी रुपये माफ होणार आहेत. जे शेतकरी पूर्णपणे कर्ज फेडणार आहेत त्यांना पुन्हा कर्ज दिले जाणार आहे. त्याप्रमाणेच जो शेतकरी विजेचे बिल भरेल त्याला कृषी संजीवनी योजनेचा लाभ मिळणार आहे. माझ्याकडे असंख्य शेतक-यांकडून विजेची बिले पाठविण्यात आली आहेत.श्री रामदास ताडे नावाच्या शेतक-याचे 59 हजार 810 रुपयांचे विजेचे बिल आहे, श्री. चेडे नावाच्या शेतक-याचे 55 हजार रुपयांचे विजेचे बिल आहे, श्री रघुनाथ सावकार या शेतक-याचे 57 हजार 630 रुपयांचे विजेचे बिल आहे,त्यानंतर चौथे बिल 59 हजार 160 रुपयांचे आहे,पाचवे बिल 77 हजार 660 रुपयांचे आहे ,सहावे बिल 66 हजार 590 रुपयांचे आहे, सातवे बिल 71 हजार 800 रुपयांचे, आठवे बिल 76 हजार 90रुपयांचे आहे.अशा प्रकारे सर्व विजेची बिले 50 हजार रुपयापेक्षा जास्त रकमेची आहेत.ही बिले जेव्हा शेतकरी भरतील तेव्हा त्यांना कृषी संजीवनी योजनेचा फायदा होणार आहे. ही योजना किती फसवी आहे हे यावरुन दिसून येते. शासनाने फक्त योजना मांडावयाच्या आहेत परंतु प्रत्यक्षात शेतक-यांना त्यांचा काहीही फायदा होत नाही.

सभापती महोदया, आपण बीड जिल्हयातील आहात . तेव्हा बीड जिल्हयातील शेतकरी दहा हजार रुपयांचे बिल भरु शकतो काय याबाबतीत आपणच मला सांगावे. 2 हजार 30 कोटी रुपयांचे व्याज जर माफ करावयाचे असेल तर 2 हजार 910 कोटी रुपयांची मुद्दल भरली गेली पाहिजे.या शेतक-यांची संख्या 22 लाख एवढी आहे . मी भागाकार केला असून प्रत्येक शेतक-याला 13 हजार 280 रुपये भरावे लागतील. आज कोणताही शेतकरी दहा हजार रुपयापेक्षा जास्त रक्कम भरु शकत नाही. ही योजना सुध्दा फसवी आहे. एवढी रक्कम शेतकरी भरु शकणार नसल्यामुळे त्याही योजनेचा लाभ शेतक-यांना होणार नाही. त्यामुळे या शेतक-यांचे विजेचे कनेक्शन कापण्यात येईल. मागेल त्याला वीज देणार अशी घोषणा जरी करण्यात आली असली तरी या शेतक-यांचे विजेचे कनेक्शन कापून इतर शेतक-यांना वीज देण्यात येणार आहे असे मला सांगावयाचे आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

सभापती महोदया, 22 लाख शेतक-यापैकी विजेच्या बिलाचे पैसे भरले नाहीत म्हणून 10 लाख शेतक-यांचे विजेचे कनेक्शन शासन नक्कीच कापणार आहे आणि मागेल त्या शेतक-याला वीज दिली जाईल.सभापती महोदया, मागेल त्याला वीज देण्यासंबंधीची योजना अशाच प्रकारची आहे त्या बाबतीत कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण शासन देऊ शकणार नाही. 70 ते 80 हजार रुपये विजेचे बिल भरणारा शेतकरी आज महाराष्ट्रात नसल्यामुळे या योजनेचा लाभ त्याला घेता येणार नाही हे मी पुन्हा एकदा स्पष्ट करु इच्छितो.

सभापती महोदया, पीक विमा योजनेच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप कौतुक करीत होते परंतु या योजनेविषयी त्यांना खरोखर काही समजलेले नाही असे मला वाटते. ते कामगार पुढारी असून शहरी भागातील आहेत त्यामुळे त्यांना पीक विमा योजनेविषयी फारशी माहिती नसेल असे मला वाटते. ही केन्द्रीय पीक विमा योजना आहे.त्यासाठी राज्य सरकारकडून मॅचिग ग्रॅन्ट दिली जाते. एकूण शेतक-यांची संख्या 22 लाख असून 83 कोटी रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद अत्यंत अल्प आहे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, सिंचनाच्या बाबतीत स्वतंत्रपणे चर्चा घेण्यात येईल त्यावेळी मी त्यावर बोलणार आहे . सिंचनाचा विषय अत्यंत गंभीर असल्यामुळे अर्थ संकल्पाच्या भाषणात दोन मिनिटे त्यावर बोलून तो विषय संपण्यासारखा नाही. शेतक-याच्या जीवनाशी आणि विकासाशी निगडीत असा तो विषय आहे.

सभापती महोदया,विदर्भातील माजी मालगुजारी तलावाच्या दुरुस्तीचा विषय सुध्दा त्यामध्ये घालण्यात आला आहे. विदर्भातील अनुशेषांतर्गत 256 कोटी रुपये देऊन मालगुजारी तलावाची दुरुस्ती करण्यात आली होती. जर हे तलाव दुरुस्त करण्यात आले नसतील तर हे 256 कोटी रुपये नेमके कोठे गेले याची चौकशी करण्यात यावी .अनुशेषातून या दुरुस्तीच्या कामासाठी पैसे देण्यात आलेले असतांना अजूनही मालगुजारी तलावांची दुरुस्ती करण्याचे कसे काय राहिले ? या सभागृहात त्या संबंधी चर्चा झाली होती. त्यामुळे या अर्थसंकल्पात माल गुजारी तलावाचा जो विषय मांडण्यात आला आहे तो मला योग्य वाटत नाही.

सभापती महोदया, आंबा प्रकल्पा सारख्या लहान लहान प्रकल्पाचा उल्लेख अर्थसंकल्पात जास्त करण्यात आला आहे.नाबार्डच्या अर्थ सहाय्यातून घ्यावयाच्या मेगा पाणलोट





श्री.दिवाकर रावते ....

विकास कार्यक्रमाचा उल्लेख या अर्थसंकल्पात करण्यात आला आहे हा तर केन्द्र सरकारचा कार्यक्रम आहे. जी योजना अस्तित्वात आहे तीच योजना या अर्थसंकल्पाच्या निमित्ताने येथे मांडण्यात आली आहे.

नंतर श्री.सरफरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदया, सरोगेट मदर अशाप्रकारचा शब्द मी याठिकाणी वापरतो. मराठी भाषा विचित्र असल्यामुळे त्या भाषेमध्ये भाषांतर केले तर "भाडयाची आई" असा त्याचा अर्थ होईल. हा व्दयर्थी शब्द असून त्यामध्ये शिवीसारखा त्याचा अर्थ होतो. कारखान्याने शेतकऱ्याकडे एक दिवसाचे पिल्लू सोपवायचे, शेतकऱ्याने ते पिल्लू वाढवावयाचे आणि त्याबद्दल त्याचे पैसे घ्यावयाचे म्हणजे सरोगेट मदर अशी त्याची व्याख्या आहे. ही जुनी योजना असून आजही अनेक कारखान्यामधून शेतकऱ्यांना 16 ते 17 रुपयांनी पिल्ले विकत दिली जातात. मध्यंतरी राज्यामध्ये बर्ड फ्ल्यूची साथ पसरली व त्यामध्ये सर्व पक्षी मरण पावले. आपण यामध्ये प्रत्येक पक्षामागे 20 रुपये एवढे प्रचंड अनुदान दिले. यामध्ये शेतकऱ्याला 8 रुपये आणि मूळ मालकाला 12 रुपये अशाप्रकारचे अनुदान दिले. माझ्याकडे असलेल्या यादीनुसार सर्वात जास्त म्हणजे 90 टक्के अनुदान बारामतीला गेले. बाकीचे 25 कोटी रुपयांतील थोडे थोडे इतरांना देण्यात आले असून त्यामध्ये अजून 20 कोटी रुपये देणे बाकी आहेत. ती अनुदानाची 20 कोटींची तरतूद या ठिकाणी करण्यात आली आहे. मला प्रश्न पडला की, हे 20 कोटी रुपये दिल्यामुळे शेतकरी काय करणार आहे? कारखाने त्या शेतकऱ्यांना पिल्ले देतात त्याबरोबर त्याचे खाणे-पिणे व औषध -पाणी देतात. शेतकऱ्यांनी ते पिल्लू फक्त वाढवायचे असते. तेव्हा त्या करिता ही 20 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यावेळी सर्वात जास्त पैसे बारामतीला देण्यात आले.

सभापती महोदय, यामध्ये नौकेकरिता 42 कोटी रुपये ठेवण्यात आले आहेत. या राज्याला 750 कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी आपल्या भाषणामधून विचार मांडले होते, त्याप्रमाणे लाकडी बोटी बांधण्याऐवजी ॲल्यूमिनियमच्या बोटी बांधून देण्यात आलेले 42 लाखाचे अनुदान खाऊन टाकण्यात आले. सभापती महोदया, माननीय आरोग्य मंत्र्यांनी आरोग्य विभागासाठी 1 हजार कोटींची तरतूद मागितली होती. परंतु त्यांना जेमतेम 200 कोटी रुपयांची तरतूद देण्यात आली आहे. मी जे.जे हॉस्पिटलमध्ये उपचाराकरिता गेलो होतो.त्यावेळी रक्ताचे नमुने तपासणीसाठी पाठविले जात असताना मी त्याबाबत चौकशी केली. तेव्हा मला असे समजले की, त्या हॉस्पिटलमध्ये असलेल्या आठ महत्वाच्या मशीन्स बंद अवस्थेत आहेत. परदेशातून आणलेल्या चांगल्या स्थितीतील या मशीन्स टेक्निशिअन्सची नेमणूक केली नसल्यामुळे वापरल्या जात नाहीत. त्या मशीन्समधून गरीब पेशंट्सना तात्काळ रिपोर्ट मिळतो, परंतु त्या बंद अवस्थेत आहेत. अशा अनेक प्रकारच्या गोष्टी त्याठिकाणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

आहेत. आरोग्य विभागाबाबत बोलावे तेवढे थोडेच आहे, त्यातील अनेक मुद्दयांबाबतची माहिती माझ्याकडे आलेली आहे परंतु मी त्यांचा उल्लेख करीत नाही. रस्ते विकास महामंडळाला 2700 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे आदरणीय श्री.भुजबळ साहेबांनी हे आमचे "वर्क हॉलीडे" असल्याचे जाहीर केले, आमच्या विभागाला पैसे न मिळाल्यामुळे हे आमचे सुट्टीचे वर्ष असल्याचे त्यांनी जाहीर केले होते ती बातमी वर्तमानपत्रात छापून आली आहे. मुंबई महानगरपालिकेने फक्त मुंबई शहरातील रस्त्यांकरिता 1 हजार कोटींची तरतूद केली आहे. आपल्या अर्थसंकल्पामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील रस्त्यांकरिता 2700 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याची जर तुलना केली तर नामदार श्री. भुजबळ साहेब म्हणत आहेत त्यामध्ये किती सत्य आहे हे लक्षात येईल. तसेच, या ठिकाणी करण्यात आलेली तरतूद ही जुनी थकित असलेली देणी देण्याकरिता, मागील थकित बिले काढण्याकरिता करण्यात आली आहे.

सभापती महोदया, या ठिकाणी दोन गोष्टी कशा समजून घ्यावयाचा असा मला प्रश्न पडला आहे. या अर्थसंकल्पामध्ये नक्षलवादासंबंधी उल्लेख नाही. परंतु 55 कोटी 75 लक्ष रुपयांची तरतूद पोलिसांच्या प्रशिक्षणासाठी इमारत बांधणे, सामग्री खरेदी, मोटार वाहने खरेदी याकरिता करण्यात आली आहे. मला याठिकाणी एक गोष्ट अभिमानाने सांगावीशी वाटते की, नक्षलवाद या विषयामध्ये केंद्र सरकारने भाग घेतला आहे, त्याचप्रमाणे तो राज्याचा देखील विषय आहे. या राज्याच्या माननीय गृह मंत्र्यांच्या बाकीच्या विचारांशी मी सहमत असावे अशातला भाग नाही, परंतु गडचिरोली जिल्ह्याचे पालक मंत्री या नात्याने त्यांनी तेथील लोकांमध्ये जागृती निर्माण केली आहे, नक्षलवाद्यांबाबत असलेले भीतीचे वातावरण दूर केले हे आपल्याला नाकारता येणार नाही.. पूर्वीचे पालक मंत्री वर्षातून एकदा जात होते, परंतु हे तर महिन्यातून तीन ते चार वेळा त्या ठिकाणी जातात. मी देखील स्वत: त्या भागामध्ये जातो. त्या भागातील माहिती घेऊन, लोकांना धीर देऊन त्यांना भयमुक्त करण्याचे काम करणारे असे हे पहिले पालक मंत्री निर्माण झाले आहेत

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

नक्षलवाद्यांना लोकांकडून मिळणाऱ्या मदतीपासून वेगळे पाडण्याचा जो प्रयत्न केला, तो अत्यंत कौतुकास्पद आहे. नक्षलवाद्यांच्या संबंधात त्यांचे प्रयत्न सुरु आहेत. अशा वेळी खास नक्षलग्रस्त भागासाठी ज्या तरतुदी असावयास पाहिजेत, त्या केल्या असतील पण त्याचा अर्थसंकल्पामध्ये उल्लेख झालेला नाही. त्यामुळे राज्य शासनाने अर्थसंकल्पामध्ये "नक्षलग्रस्त भाग" म्हणून उल्लेख केला असता आणि त्याची नोंद झाली असती तर नक्षलग्रस्त भागासाठी श्री.सुरेश व्दादशीकर यांच्यासारखे पत्रकार जे त्याठिकाणी स्वत: रात्रंदिवस काम करीत असतात, माहिती घेतात आणि लिखाण करीत असतात. त्याचा उल्लेख झाला असता तर त्याचे एक वेगळया प्रकारे प्रक्षेपण झाले असते आणि लोकांमध्ये चांगला विषय गेला असता की, या राज्यातील मंत्री महोदय रात्रंदिवस नक्षलग्रस्त भागातील जनतेला धीर देण्यासाठी पध्दतशीरपणे, व्यवस्थित काम करीत असतील तर राज्य शासनही त्यांच्यामागे उभे आहे अशा प्रकारचा संदेश गेला असता. परंतु मला तशा प्रकारचा उल्लेख झाल्याचे कुठे दिसत नाही. मी या चर्चेच्या निमित्ताने माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांचे मनापासून स्वागत करतो, धन्यवाद देतो आणि त्यांना सहकार्य करतो आणि नक्षलवादाच्या विरोधात तुमच्यामागे सर्व पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे आहेत अशा प्रकारचा संदेश देण्यामध्ये माननीय गृहमंत्री यशस्वी झाले आहेत ही कौतुकाची बाब आहे.कारण हा प्रश्न महाराष्ट्राचा आहे. तो कोणत्याही सरकारचा नाही, पक्षाचा नाही. त्यामुळे त्या भागातील दोन-तीन जिल्ह्यातील जनतेला होणारा जो त्रास होत आहे आणि त्याबाबत त्यांनी जी भूमिका घेतलेली आहे त्याचे मी स्वागत करतो. याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणामध्ये याबाबत उल्लेख केला तर मला त्याचा आनंद होईल. तसे झाले तर ही बातमी वर्तमानपत्राच्या माध्यमातून तेथील जनतेपर्यंत पोहोचावे आणि त्या लोकांचे तेथील परिस्थितीला तोंड देण्याचे धैर्य वाढावे अशी मी येथे आवर्जून भूमिका मांडतो.

सभापती महोदय, खाजगीकरणाचा विषय काय आहे ? हे मला कळले नाही. मुंबई शहरामध्ये कायदा व सुव्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने संपूर्ण शहरात सीसी.-टी.व्ही बसविण्याचा शासनाचा मानस आहे. कारण या माध्यमातून काय करणार आहेत हे काल टी.व्ही.वर दाखविण्यात येत होते. त्यानुसार कुठे काय सुरु आहे हे आपल्याला दिसते. या अंतर्गत मुंबई शहरामध्ये टप्प्याटप्प्याने सुमारे 5 हजार सीसी-टी.व्ही कॅमेरे बसविण्याचे प्रस्तावित आहे असा अर्थसंकल्पामध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे. खरे म्हणजे हे गृह विभागाचे काम आहे आणि ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

त्या विभागातील साहेबांचे काम आहे की, कुठे काय चालले आहे ते पहावयास पाहिजे. परंतु ही बाब बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वावर आहे, परंतु हे मला काही कळले नाही म्हणजे तुम्ही सुरक्षा व्यवस्था खाजगी माणसांच्या ताब्यात देत आहात काय ? म्हणजे मी पैसे खर्च करावयाचे आणि सीसी-टी.व्ही. लावावयाचे आणि मी सर्व ऑब्झर्व्ह करावयाचे, मीच त्याच्या सी.डी.बनवावयाच्या आणि मग त्या गृह विभागाला द्यावयाच्या, त्याबद्दल गृह विभागाकडून पैसे घ्यावयाचे. तेव्हा बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा म्हणजे नक्की काय? संपूर्ण कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भातील बाब संपूर्णपणे खाजगीकरणाकडे देणार म्हणजे काय ? हे मी पहिल्यांदा वाचत आहे.याचा अर्थ खाजगी सुरक्षा रक्षक असावेत, अशा प्रकारे पोलीस आणावेत अशा प्रकारचा जो प्रकल्प आहे, तो काही माझ्या लक्षात येऊ शकत नाही.

सभापती महोदय, मी येथे मराठी भाषेबाबत विषय मांडला होता. मी असा विषय मांडला होता की, मराठी भाषा विभागासाठी निधी कमी आहे, तेथे पुरेसा स्टाफ नाही आणि मराठी भाषेच्या संबंधातील जी धोरणे आहेत, ती राबविण्यात यावीत. महाराष्ट्र राज्याची मराठी ही राजभाषा आहे आणि त्याची अंमलबजावणी व्हावी. तसेच यासंबंधात जे आदेश काढलेले आहेत, त्याचे पालन करण्यात यावे, नव्याने काही करावे असे म्हटलेले नाही. फक्त न्यायालयामध्ये मराठीचा वापर व्हावा अशा प्रकारचा आग्रह धरला होता. याबाबतीत मला माननीय उप मुख्यमंत्र्यांकडून असे उत्तर यावयास हवे होते की, आपण ज्या सूचना केलेल्या आहेत, त्याची अंमलबजावणी मी स्वत:जातीने करीन. कारण माननीय उप मुख्यमंत्री हे आक्रमकतेने काम करतात. दुर्दैवाने मी जे बोललो ती सरकारवर केलेली टीका आहे असे गृहीत धरले. ती सूचना आहे असे गृहीत धरले नाही आणि त्याचे मला वाईट वाटले. मग उडदामाजी काळे-गोरे निवडावेत तसे ते माझ्या भाषणातील इंग्रजी शब्द निवडत बसले. मी इंग्रजी बोलू शकत नाही काय ? होय, मी इंग्रजी शब्द वापरले. पण त्यांनी काढलेले शब्द हे जाणीवपूर्वक वापरलेले होते. मी असे म्हणालो की, "मंत्रिमंडळाने जो निर्णय घेतलेला आहे, त्या चारही वीज कंपन्यांची नावे मराठीमध्ये ठेवलेली असताना त्यांनी ती इंग्रजीमध्ये नोंदविली. त्याबद्दल तुम्हाला जाणीव देण्यासाठी असे म्हटले की, होय, त्यांनी त्यावेळेला ती नावे रजिस्टर केली. मी "रजिस्ट्रेशन"हा जो शब्द वापरला, तो तुमच्या अधिकाऱ्यांच्या प्रवृत्तीसंबंधात वापरला, तुमच्याबाबत नाही. कारण सरकारने संबंधितांना अंमलबजावणी करण्यास सांगितले.

यानंतर कु.थोरात . . ..

SMT/ प्रथम सौ. रणदिवे.... 16:35

श्री.दिवाकर रावते...

त्यावेळी मी दोन वर्तमानपत्रे दाखविली. वर्तमानपत्रामध्ये मराठीतून जाहिरात द्यावी अशा प्रकारचा कायदा असताना देखील सगळया नगरपालिका, महानगरपालिका आपल्या जाहिराती इंग्रजीतून छापतात. ही टेंडरची जाहिरात आहे असे मी सांगितले त्यावेळी मंत्री महोदयांना ते लगेच कळले. परिणाम असा होतो की, प्रशासनाला काहीही सांगण्यात येत नाही. त्यामुळे दोन दिवसापूर्वीच वर्तमानपत्रातून इंग्रजीमध्ये जाहिरात आलेली आहे. त्याच वेळी असे ठणकावले असते की, यापुढे मराठीतून जाहिरात आली पाहिजे, इंग्रजीतून जाहिरात आली तर कारवाई करण्यात येईल तर अधिकाऱ्यांवर धाक निर्माण झाला असता.

सभापती महोदय, दिनांक 26 मार्च, 2011 ला सामना या वर्तमानपत्रातून नाशिक महानगरपालिकेची इंग्रजीतून जाहिरात आलेली आहे.त्या बाबतीत कारवाई केली जात नाही पण विरोधकांना नामोहरम करण्याच्या बाबतीत प्रवृत्ती बळावते आहे. मंत्री महोदय असे म्हणाल की, कोणाला असे वाटते की, आपण मराठीचे ठेकेदार आहोत? तर होय, आम्ही मराठीचे ठेकेदार आहोत. शासनाने टेंडर काढले असेल तर आम्ही जरुर ठेकेदार आहोत. किती पैसे खर्च करणार हे शासनाने सांगितल्यानंतर तो ठेका घेऊन त्या ठेक्याचे काम झाले की नाही हे बघणारे आम्ही ठेकेदार आहोत. पण अशा प्रकारे हिणवण्याची प्रवृत्ती आहे. मी ज्या राजभाषे करिता भांडत आहे. ती तुमची, आमची आणि सर्वांची आहे. ती माझी व्यक्तिगत मालमत्ता नाही. पण एखादा सन्माननीय सदस्य मराठी राजभाषा वापरात यावी यासाठी सातत्याने अट्टहास धरीत असेल तर त्याच्या सूचनांचे स्वागत करुन आपल्या अधिकाऱ्यांना जाब विचारावयाचे सोडून हिणवण्यांची प्रवृत्ती ज्यावेळी बळावते त्यावेळी सरकारचे नेतृत्व दुबळे पडते, हा त्याचा अर्थ असतो, हे लक्षात ठेवा. अशा प्रकारे मला वाटले He is a person of stubborn personality. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित दादा पवार यांची स्टबॉर्न पर्सनॅलिटी आहे. ते असे सांगतील की, श्री. दिवाकर रावतेजी मराठी ही महाराष्ट्रची राजभाषा आहे. आपण या बाबतीत जे सांगितले आहे, त्या बबतीत मी अधिकाऱ्यांना जाब विचारीन. He lost his stubbornness for no reason. सभापती महोदय, शासन निर्णय राबवित असताना माननीय मुख्यमंत्री एका सन्माननीय मंत्र्यांचा इंग्रजीतून परिचय करुन देत होते त्यावेळी मी पटकन उठून असे सांगितले की, मंत्री महोदयांचा परिचय मराठी भाषेतून करुन देता येत नाही काय? तेव्हा ते असे म्हणाले की, मंत्रालयात आमचे मंत्री त्यांच्या नावाच्या पाटया

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

श्री.दिवाकर रावते...

रुबाबात इंग्रजीतून लावतात. आबांच्या नावातील आर.आर. जात नसेल तर शासनाच्या मराठी भाषेच्या वापराबद्दलचा जी.आर. आम्हाला सांगावाच लागेल. पण मी हा विषय मांडल्यानंतर आबांनी त्यांच्या नावाची पाटी मराठीतून लावली. मी मराठी भाषेबद्दल जाणीव पूर्वक सांगत असताना देखील मराठी भाषेची अवहेलना करण्यात येत आहे. अर्थसंकल्पामध्ये हा विषय घेण्यात आला आहे की, आम्ही मराठीकरण करणार आहोत. परंतु या संदर्भात सर्व विभाग अद्याप एकत्र आलेले नाहीत. श्री. कुलकर्णी यांचे काम अत्यंत अगतिकपणे चाललेले आहे. त्यांना कोणी जुमानत नाही. निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली आहे, ती सुध्दा परिपूर्णतेने काम करीत नाही, हे मी याठिकाणी निदर्शनास आणून दिले होते. पण त्याबाबतीत या ठिकाणी काहीही सांगण्यात आलेले नाही.

सभापती महोदय, "पुण्य नगरी" वर्तमानपत्रात श्री. विजय सावंत यांनी जे लिहिलेले आहे ते मी या ठिकाणी वाचून दाखवितो."ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज यांनी मराठी भाषेच्या होणाऱ्या उपेक्षेबद्दल बोलताना 1989 साली असे म्हटले होते की, "कागदोपत्री मराठी भाषा ही राजभाषा झाली आहे. पण व्यवहारात तिचा हा अधिकार फारसा मान्य झालेला दिसत नाही. डोक्यावर सोनेरी मुकुट आणि अंगावर फाटके कपडे अशा अवस्थेत ती मंत्रालयाच्या दाराशी उभी आहे." त्यापुढे असे म्हटले आहे की, "आपल्या देशातील लोकशाही व्यवस्थेचे वर्णन करावयाचे झाले तर कुसुमाग्रजांचे वरील भाष्य येथे तंतोतंत लागू पडते. भारतातील राजकीय व्यवस्था म्हणून लोकशाहीला मान्यता देण्यात आलेली आहे, हे सत्य असले तरी वास्तवात मात्र संसद असो की, राज्याच्या विधानसभा, लोकशाही तेथे डोक्यावर सोनेरी मुकुट घालून विवस्त्र अवस्थेत लाजेने व शरमेने मान खाली घालीत आहे." शासनाच्या कृती बद्दलचे वर्णन या माध्यमातून आलेले आहे. सभापती महोदय, मंत्री म्हणून आपण काय बोलतो, कसे बोलतो याचा विचार केला पाहिजे. "सत्तेच्या पदी थोरही बिघडतो" याचा अनुभव आम्ही ज्या वेळी घेतो, त्यावेळी खंत वाटते. माननीय मंत्री श्री. राजेंद्र दर्डा सभागृहात होते. मी त्या दिवशी सभागृहात नव्हतो. विधानसभेमध्ये गदारोळ झाला.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्या गदारोळात सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे नव्हते. त्या दिवशी मी सभागृहात नव्हतो. त्या दिवशी हसन अलीचे प्रकरण आले होते. राज्याचा अर्थसंकल्प 42 हजार कोटींचा आहे. परंतु हसन अली याने 70 हजार कोटींचा कर चुकविला आहे. राज्याच्या बजेटच्या दुप्पट ही रक्कम आहे. म्हणजे त्याचे उत्पन्न किती असेल याचा अंदाज येतो. पुणे जिल्ह्यातील एक घोड्याचा व्यापार करणारा माणूस राज्याच्या बजेटच्या दुप्पट रकमेचा कर चुकवितो.

त्यावेळी शिक्षण क्षेत्रातील श्री.राजेंद्र दर्डा यांनी त्यास जोरात हरकत घेतली, म्हणजे सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याला हरकत घेतली. ते असे म्हणाले की, प्रसार माध्यमातील माहितीला कितपत खरे धरावयाचे ? लोकमत या वर्तमानपत्राचा खप 1 कोटी इतका आहे, क्रमांक 1 वरील हे दैनिक आहे, त्याच्याशी संबंधित असलेले मंत्री महोदय श्री.दर्डा आहेत. त्यांच्या वर्तमानपत्रात खोटे छापून येते तर मंत्री म्हणून त्यांनी तसे जाहीर करावे. मग वर्तमानपत्रात येणारे खरे आहे की, शेठजी खरे आहेत, हे आम्हाला कळेनासे झाले आहे. मंत्री महोदयांनी येथे मत व्यक्त केले असल्यामुळे त्याची नोंद झालेली आहे. अशा प्रकारची वक्तव्ये होतात त्यावेळी वाईट वाटते. पीठासीन अधिकाऱ्यांकडून काही वेळेला सभागृहाच्या कामकाजातून आक्षेपार्ह नोंदी काढल्या जातात. त्यावर मी काही बोलणार नाही.

माननीय अर्थमंत्री श्री.अजित दादा पवार असे म्हणाले की, शहरी पक्ष हे गांडूळ आहेत. हे वर्तमानपत्रात छापून आलेले आहे. (अडथळा) ग्रामीण भागात गांडूळाला किती महत्व आहे ते सगळ्यांना माहीत आहे. गांडूळ हा एक असा प्राणी आहे की, त्याने निर्माण केलेल्या खतामधून शेतकरी सेंद्रिय शेती करु शकतो. सेंद्रिय शेतात पिकविलेल्या मालाला परदेशात अधिक किंमत मिळते. त्यावेळी दादा असे म्हणाले की, आमच्यामध्ये काही वाद नाहीत. कोठे वाद करावयाचा आणि कोठे नाही ते आम्हाला बरोबर कळते.

सभापती महोदया, आपण सदस्य म्हणून जे विषय मांडता ते विषय आम्हाला आपुलकीचे वाटतात. आम्हाला सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांच्याकडूनही अपेक्षा आहेत, कारण त्या चळवळीतून आलेल्या आहेत. त्यांच्या चळवळीबद्दल आम्हाला प्रेम आहे, त्यांनी चळवळीत खूप

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.दिवाकर रावते.....

काम केलेले आहे. दुसऱ्या तत्कालीन सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण यांना केवळ 9 महिन्याचा कालावधी मिळाला. त्यांनी या सभागृहाला अतिशय सुंदर मार्गदर्शन केलेले आहे. त्यांची मुदत संपताना आम्ही वक्तव्य केल्यावर माननीय मंत्री श्री.अजित दादा पवार यांनी आम्ही त्यांना खासदार करणार आहोत. आमचा पक्ष त्यांना वाऱ्यावर सोडणार नाही असे म्हटले होते. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण ज्या चळवळीतून आल्या आहेत त्या चळवळीबद्दल आम्हाला आदर आहे. त्या समाजासाठी त्या काम करीत असतात. आम्ही अनेक वर्षे ते अनुभवलेले आहे.

सभापती महोदय, शिक्षण खात्यासाठी या वर्षाच्या बजेटमध्ये तरतूदच केलेली नाही. त्यावेळी ग्रामविकास मंत्री श्री.जयंत पाटील असे म्हणाले की, शिक्षण सेवकाच्या अल्प वेतनाबाबत ग्रामविकास मंत्री यांनी परखड शब्दात वस्तुस्थिती मांडली. रस्त्यावरील भिकारी तुमच्यापेक्षा जास्त पैसे कमवितो. अशा प्रकारे शासनाबाबत त्यांनी जाहिररित्या मत व्यक्त केले. शिक्षकांचे पगार अर्थ खात्यात रखडतात, अशा प्रकारची दूषणे मंत्री महोदयांनी दिली आहेत. या अर्थसंकल्पात काय आहे ? शिक्षकांना पगार देण्यासाठी पैसा नाही. माननीय ग्रामविकास मंत्र्यांनी रस्त्यावरील भिकारी शिक्षण सेवकांपेक्षा जास्त पैसे कमवितो, शिक्षकांचे पगार अर्थ खात्यात रखडतात अशा प्रकारची दूषणे दिल्यानंतर एक शेवटची खंत त्यांनी मांडली आहे. ती खंत किती योग्य आहे ते आपण सगळे जण 4 दिवस अनुभवत आहे. मीच या राज्याचा प्रमुख आहे. राष्ट्रवादी पक्षाने काँग्रेसला मुख्यमंत्री पद दिले ही वडिलधाऱ्यांनी केलेली चूक आहे. हे पद आमच्या पक्षाकडेच असावयास पाहिजे होते, मीच मुख्यमंत्री झालो असतो. अशा प्रकारची त्यांनी जाहीरपणे खंत मांडली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

स्वत:ची राजकीय इच्छा, आकांक्षा प्रकाशित होत असताना सर्वसामान्य माणूस बाजूला गेलेला आहे. या सभागृहामध्ये राज्य मंत्री महोदयांनी अर्थसंकल्प मांडला. तो मांडत असताना त्यांनी शेर म्हणून दाखवला. विधानसभेत अर्थमंत्र्यांना शेर-शायरी आणि विठ्ठलाचे नामस्मरण करावयाचे होते....(अडथळा).. नवबौध्दासाठी घरे बांधण्याची 800 कोटी रुपयाची एक चांगली योजना शासनाने राबविण्याचे ठरविलेले आहे. या योजनेअंतर्गत 8 हजार घरे होतील. ती झाली तर... ती झाली तर आम्हाला आनंदच आहे. तेव्हा ही चांगली योजना सन्माननीय सदस्यांनी राबवून घ्यावी.

सभापती महोदय, या ठिकाणी अर्थसंकल्प सादर करीत असताना सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य टाळ्या वाजवत होते. त्या टाळ्यांचे मला कौतुक वाटते. अर्थ राज्यमंत्री महोदय अर्थ संकल्प सादर करताना एक शेर म्हणाले.

कभी हम भी गुजर रहे थे कब्रस्तान से,

"कब्रस्तान" म्हटल्यानंतर सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य टाळया वाजवायला लागले. मी त्यांना म्हटले, थांबा, टाळ्या वाजवू नका.

कि ठोकर लग गयी एक हड्डी से, हड्डी की क्या गुजारिश थी ... येथे मूळ शब्द "हड्डी" नाही.

हड्डी की क्या गुजारिश थी, कि चलने वाले जरा संभल के चलना, हम भी कभी इन्सान थे. वो हड्डी बोल रही थी कि आपकी वजह से हम कब्रस्तान में आ गिरे है, तो आप संभल के चलना, लोगों को जो कहते है वह आप बराबर बताना, शेवटी अशा प्रकारचा हा दिशाहीन अर्थसंकल्प मांडलेला आहे. अशा प्रकारचा अर्थसंकल्प सादर करुन सर्वसामान्य गरीब माणसाला कब्रस्तानमध्ये पाठविण्याचे काम करु नका अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011-2012च्या अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या राज्याच्या अर्थसंकल्पावर चर्चा करीत असताना काही तरतुदींना पाठिंबा देऊन काही महत्वाच्या बाबीकडे मी शासनाचे लक्ष वेधित आहे. महाराष्ट्र राज्याचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या 50 वर्षाच्या मागोवा घेत असताना आपण जेव्हा मागे वळून पाहतो त्यावेळी आपण काय मिळविले, किती मिळविले पुढील वर्षासाठी काय राहिलेले आहे याचे चित्र पुढे येते. सध्या महाराष्ट्राच्या संदर्भात चर्चा होत असते, मग ती विरोधी पक्षाच्या माध्यमातून असेल, वर्तमानपत्राच्या माध्यमातून असेल, पत्रकारांच्या माध्यमातून असेल किंवा आर्थिक विश्लेषण करणा-या तज्ज्ञांच्या माध्यमातून असेल, त्या चर्चेमध्ये भडक चित्र रंगविले जाते. राज्यावर 2 लाख 90 हजार कोटीच्या कर्जाचा डोंगर असल्यामुळे हे राज्य संपेल की काय असे बोलले जाते. राज्य आणखी कर्जात बुडणार, अर्थशून्य अर्थसंकल्प, ग्रामीण भागाला फसविणारा अर्थसंकल्प, कर्जाचा बोजा 2 लाख कोटीच्या वर, खिशात नाही आणा आणि बाजीराव म्हणा, असे काय काय या अर्थसंकल्पाच्या बाबतीत म्हटले जाते. हे कळीचे मुद्दे आहेत. आज राज्याची आर्थिक परिस्थिती काय आहे ? It is milestone to see the past and plan our future.माझ्याकडे फिस्कल पॉलिसी ट्रॅटेजी स्टेटमेंट आहे. त्यामधील  नमुना "क"मध्ये असे म्हटलेले आहे की "क्षमतेचे निर्धारण". आमची क्षमता काय आहे ? सन 2011-12मध्ये 22860 कोटीची ऋण उभारणी केली जाईल, ही ऋण उभारणी केंद्र शासनाने घालून दिलेल्या 35160 कोटी या मर्यादेपेक्षा ब-याच प्रमाणात कमी आहे. व्याजाचे महसुलाशी असलेले 14.85 टक्के गुणोत्तर हे केन्द्र शासनाने घालून दिलेल्या 20 टक्के मर्यादेपेक्षा खूप कमी आहे. राज्याची आर्थिक कुवत संपलेली आहे. तिजोरीत काही राहिलेले नाही अशा प्रकारचा प्रचार होतो. त्यामुळे राज्यात परप्रांतातून येणा-या तसेच अन्य राज्यातून येणा-या गुंतवणुकीवर परिणाम होतो. मी या ठिकाणी देशातील काही 5-6 राज्यांच्या कर्जाची आकडेवारी देतो.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी....

आंध्रप्रदेश 1 लाख 26 हजार कोटी, पश्चिम बंगाल 1 लाख 92 हजार कोटी, महाराष्ट्र 2 लाख 9 हजार कोटी, मुंबई एवढी ज्या राज्याची लोकसंख्या आहे त्या केरळ राज्यावर 65 हजार कोटी, उत्तर प्रदेश 2 लाख 21 हजार कोटी रुपये एवढे या राज्यांवर कर्ज आहे. कर्ज हे आपल्याला घ्यावे लागते. परंतु त्याचा वापर कसा करावा या संदर्भात निश्चितपणे शासनाला सूचना करु शकतो. अर्थसंकल्प म्हटल्यानंतर दरडोई उत्पन्न, दारिद्रयाची टक्केवारी, राज्यावर असलेला कर्जाचा बोजा, व्याज प्रदान, विकास खर्च, विकासेतर खर्च, योजने अंतर्गत खर्च, योजनेतर खर्च, भांडवली खर्च, महसुली खर्च, राज्याचे स्थूल उत्पन्न, उत्पादक खर्च, अनुत्पादक खर्च, तुटीचा अर्थसंकल्प आणि शिलकी अर्थसंकल्प. वास्तविक राज्य शासनाकडून सादर केला गेलेला अर्थसंकल्पाच्या माध्यमातून पुढील वर्षात राज्याचे आर्थिक उत्पन्न कसे वाढेल, रोजगार कसा वाढेल या दृष्टीकोनातून चर्चा झाली पाहिजे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मघाशी मुद्दा उपस्थित केला की, सामाजिक न्याय देखील अर्थसंकल्प मांडताना दिला पाहिजे. या सर्व बाबी लक्षात घेतल्या तर महाराष्ट्र हे पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. 41 हजार 500 कोटीची वार्षिक योजना करणारे देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य महाराष्ट्र आहे. योजना अजून मंजूर झालेली नाही, ती प्रलंबित आहे. योजना मंजूर होईल अशा प्रकारचा मला आशावाद आहे. योजना मंजूर होतील याच दृष्टीकोनातून अर्थसंकल्पात तरतुरी करण्यात आलेल्या आहेत. आपण 2011-12 या वर्षातील विकास कार्यक्रम बघितला तर महसुली खर्च 52 टक्के एवढा आहे आणि भांडवली खर्च हा 48 टक्के एवढा आहे. महसुली खर्च 21677.91 कोटी रुपये आणि भांडवली खर्च 19154.88 कोटी रुपये आहे. माननीय वित्त मंत्री महोदय, मला वाटते की, आपण 50 टक्क्यांवर आले पाहिजे. किमान आज भांडवली खर्च 48 टक्के आहे, तो पुढे नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. 25500 कोटी रुपयांची योजना आणि त्याचा अर्थसंकल्प शासनाने सादर केला. त्यात देखील माननीय राज्यपालांच्या आदेशानुसार 30686.72 कोटी रुपयांचा अर्थसंकल्प राज्यपालांच्या माध्यमातून तयार झालेला आहे. विदर्भ डेव्हलपमेंट बोर्डासाठी 9217 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ती तरतूद विदर्भात खर्च केली जाणार आहे. मराठवाडा डेव्हलपमेंट बोर्डासाठी 5134 कोटी रुपयांची तरतूद केली आहे आणि ती तरतूद मराठवाडा विभागासाठी खर्च होणार आहे. उर्वरित महाराष्ट्र विकास

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी....

मंडळासाठी 16335 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. उर्वरित महाराष्ट्रात आमचा खानदेश आहे, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र यांचा समावेश आहे. या संपूर्ण गोष्टींचा आपण विचार केला तर शासनाने आपले अधिकार माननीय राज्यपालांना सात ते आठ वर्षापूर्वी दिलेले आहेत. महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प करण्याचा अधिकार आता समित झालेला आहे. 41500 कोटी रुपयांचे नियोजन करीत असताना राज्य शासनास फक्त 10 हजार 800 कोटी रुपयांचे नियोजन करण्याची शक्ती प्रदान करण्यात आलेली आहे. शासनाने विदर्भासाठी आणि मराठवाडा विभागासाठी तरतूद उपलब्ध करुन दिली आहे, ते तर माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार दिलेले आहेत. शासनाला अजूनही काही जास्त तरतूद उपलब्ध करुन देता येणे शक्य असेल तर ती द्यावी. जे महसुली विभाग अत्यंत अशक्त आहेत, आर्थिक परिस्थिती कमजोर आहे, त्यांना शक्ती देण्याच्या संदर्भातील विचार अर्थसंकल्पाच्या माध्यमातून झाला पाहिजे. राज्याचे मागील वर्षी स्थूल उत्पन्न 9 लाख 3 हजार 330 कोटी रुपये होते. हे राज्यच एवढे स्थूल उत्पन्न देऊ शकते. दुसरे राज्य एवढे स्थूल उत्पन्न देऊ शकणार नाही. यात वाढ किती झाली त्याबाबतची माहिती मी या ठिकाणी देत आहे. मागील वर्षी स्थूल उत्पन्न 8.07 होते, यात 2010-11 या वर्षात 10.05 एवढी वाढ झाली आहे. याचा अर्थ स्थूल उत्पन्नात आपण पुढे गेलो आहोत. कृषी व संलग्न कार्य मागील वर्षी 3.01 एवढे होते. या वर्षी कृषी उत्पादनामुळे 12.05 इतकी वाढ झाली आहे. मागील वर्षी उद्योग क्षेत्र 9.01 एवढे होते, यावर्षी 10.09 इतकी वाढ झाली आहे. राज्य कुठे पाठीमागे गेले आहे.? कोणत्या क्षेत्रात राज्य मागे आहे ? माननीय श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या काही मुद्दयांशी मी सहमत आहे आणि त्या मुद्यांच्या अनुषंगाने देखील बोलणार आहे. शासनाची उजवी बाजू मांडावयाची म्हणून मी काही मुद्दे उपस्थित केले आहेत. आपण एकत्र येऊन काय करु शकतो....

यानंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.........

निव्वळ राज्य उत्पादनातील वाढ विचारात घेता मागील वर्षी 13.9 टक्के असताना या वर्षी ती 16.9 टक्के झाली आहे. कृषी व संलग्न सेवा यामध्ये 16 टक्के, उद्योग क्षेत्रात 15.8 टक्के आणि सेवा क्षेत्रात 17.6 टक्के इतकी वाढ झाली आहे. मागील वर्षी दरडोई उत्पन्न 64238 रुपये होते. या वर्षी 74027 रुपये झाले आहे. राज्याचे दरडोई उत्पन्न वाढत आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी महागाईचा मुद्दा मांडला आहे. महागाई म्हणजे अप्रत्यक्ष कर आहे. जो कर बजेटमध्ये आणण्याची गरज नाही. भाववाढ ही एक प्रकारची महागाई असते, तो एक प्रकारचा टॅक्स असतो. दरडोई उत्पन्न 10 हजार रुपयांनी वाढले ही वस्तुस्थिती कोणाला नाकारता येणार नाही. महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न 1 लाख रुपयांपर्यंत गेले पाहिजे. तसे उद्दिष्ट समोर ठेवण्यात यावे. या राज्याचे दरडोई उत्पन्न 1 लाख रुपये असावे. ते सुध्दा ठाणे, पुणे, मुंबई हा जो गोल्डन ट्रॅक आहे त्याच्या बाहेर असलेल्या जिल्हयांचे दरडोई उत्पन्न वाढले पाहिजे. या तीन जिल्हयांच्या बाहेर देखील राज्याचे दरडोई उत्पन्न फार कमी प्रमाणात आहे.

सभापती महोदय, मानव विकास निर्देशांकाच्या संदर्भात देखील माननीय विरोधी पक्षनेत्यांनी भाष्य केले आहे. महसुली जमा व तूट याचा विचार करीत असताना 7654 कोटी रुपयांची तूट 2010-2011 मध्ये होती व 2009-2010 मध्ये 12731 कोटी रुपये होती. या वर्षी 58 कोटी रुपयांचे आधिक्य दाखविले आहे. म्हणजे सरप्लस बजेट आहे. 5-5, 8-8 हजार कोटी रुपयांचे डेफिसिट बजेट मागील तीन वर्षात सादर झालेले असताना या वर्षी 58 कोटी रुपयांचे सरप्लस बजेट सादर केले आहे. कदाचित 58 कोटी रुपये सरप्लस असणार की नाही हे सांगता येणार नाही. परंतु शेतीचा परफॉर्मन्स, पाऊस किती पडेल आणि उत्पादन किती वाढेल या बाबी देखील लक्षात घ्याव्या लागतील.

सभापती महोदय, राज्य शासनाचा महसूल विचारात घेतला तर 2009-2010 मध्ये 63959 कोटी आणि या वर्षी 74722 कोटी रुपये आहे. म्हणजे यामध्ये 10763 कोटी रुपयांनी राज्याचा महसूल वाढला आहे. हे प्रगतीचे सुचिन्ह म्हणावे लागेल. आणखी एक समाधानाची बाब म्हणजे योजनांतर्गत खर्च व योजनेतर खर्चाचे प्रमाण विचारात घेतले तर 2006-07 मध्ये 78 टक्के योजनेतर खर्च होता. या वर्षी 71.7 टक्के आहे. म्हणजे जवळपास 60 टक्के खर्च हा नॉन प्लॅन



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.........

एक्स्पेंडिचर म्हणतो त्या योजनेतर खर्चामधून योजनांतर्गत खर्चामध्ये आणला आहे ही देखील चांगली परिस्थिती यामध्ये निर्माण झालेली दिसून येते.

सभापती महोदय, वेतन, मजुरी आणि व्याज या संदर्भात वृत्तपत्रात देखील बातमी छापून आली होती. वेतन, मजुरी आणि व्याज यावर 70 टक्के रक्कम खर्च होत आहे. 2006-07 मध्ये 38.7 टक्के रक्कम वेतन व मजुरीसाठी खर्च होत होता. 2010-2011 मध्ये 53.3 टक्के रक्कम खर्च झाली आहे. म्हणजे या वेतन खर्चामध्ये 15 टक्के वाढ झाली आहे. सहाव्या वेतन आयोगाचा हा परिणाम आहे. व्याजावरील खर्चामध्ये मात्र कपात झाली आहे. हा खर्च 19.3 टक्क्यावरुन 17 टक्क्यावर आला आहे. परंतु मंत्री महोदयांनी हा एकूण 70 टक्के खर्च कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. वेतन, निवृत्ती वेतन यावरील खर्च 50 टक्क्याच्या आत असणे राज्याच्या हिताचे आहे. मागील अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी देखील मी हा मुद्दा मांडला होता. पेन्शनसाठी वेगळा फंड तयार केला पाहिजे. अर्थसंकल्पाच्या 10 टक्के रक्कम पेन्शनसाठी दिली जाते. पेन्शन देऊ नये असे मी म्हणणार नाही. वेल्फेअर प्रॉजेक्ट आहेत ते करावेच लागतील. परंतु महाराष्ट्र हे प्रथम क्रमांकाचे राज्य म्हणत असताना 70 टक्के रक्कम वेतन, मजुरी व व्याजावर खर्च होत आहे..........

नंतर 3जे...1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

याचा निश्चितपणे शासनाने विचार करावा. मागील महसुली तुटीच्या संदर्भात मी सविस्तर बोलणार नाही पण ओझरता उल्लेख जरुर करणार आहे. आपली मागील महसुली तुट रु. 7654 कोटी एवढी होती. अर्थसंकल्पीय तूट 141 कोटी तर वित्तीय तूट 24294 कोटी इतकी होती. पण यावर्षी शासनाचे अभिनंदन जरुर करणार आहे ते म्हणजे शासनाने व्हॅटचे प्रमाण वाढविलेले नाही. व्हॅटचे प्रमाण यावर्षी सुध्दा 12.5 टक्के एवढे उच्चतम ठेवलेले आहे. देशातील कोणतेच राज्य असे नाही की त्यांनी त्यांचा व्हॅट वाढविलेला नाही. इतर राज्यांनी हे प्रमाण 13.5 पर्यंत तसेच 15 टक्क्यापर्यंत नेले आहे. व्हॅटमध्ये वाढ न करुन महागाई कमी प्रमाणात वाढेल याची काळजी या शासनाने घेतलेली आहे असेही मला सांगावयाचे आहे.

तसेच दुसरा मुद्दा म्हणजे न्यूनतम दर जो 4 टक्के होता तो 5 टक्के केलेला आहे. न्यूनतम दरात जी वाढ केली त्यासंदर्भात मी माननीय उप मुख्यमंत्र्यांशी बोललो असता ते म्हणाले की, केंद्र शासनाने देखील म्हटले आहे की, राज्यांना आपला निधी वाढावा असे वाटत असेल तर हा न्यूनतम दर एक टक्क्याने वाढविण्यास हरकत नाही. अशा प्रकारे देशातील अनेक राज्यांनी हा दर 5 टक्के केलेला आहे. त्यामुळे ग्रामीण भागात महागाई वाढेल ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. या अनुषंगाने माझी शासनाला अशी विनंती आहे की, ज्यावेळी व्हॅटमध्ये आपण वाढ केली त्यावेळी विक्रीकराची थकबाकी किंवा आता व्हॅट आल्यानंतरची थकबाकी किती आहे व तिच्या वसुलीसाठी शासन काय करीत आहे हे सुध्दा सांगणे गरजेचे आहे. यासंदर्भात शासन एखादी ॲम्नेस्टी स्कीम वगैरे आणणार आहे काय हे देखील सभागृहाला अवगत करावे. मध्यंतरी युती शासनाच्या काळात अशी योजना त्या शासनाने आणली होती. त्यानंतरच्या काळात सुध्दा अशी योजना आणण्याचा प्रयत्न झाला. जेणेकरुन व्हॅटवरील इंटरेस्ट माफ करुन मुद्दल तरी मिळेल, यादृष्टीने प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

या अर्थसंकल्पात शासनाने कृषी खात्याला 2826 कोटी एवढी तरतूद केलेली आहे. दोन वर्षापूर्वी आम्ही शासनाला विनंती केली होती की, ज्या क्षेत्रावर राज्यातील 65 टक्के जनता अवलंबून आहे त्या कृषी विभागासाठी स्वतंत्र अर्थसंकल्प तयार करावा. केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरदचंद्र पवार यांच्याकडे कृषी विभागाचा कार्यभार आल्यानंतर त्यांनी केंद्रातील कृषी विभागाचा 5

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .........

टक्के अर्थसंकल्प हा केवळ कृषी विभागासाठी केला, त्यापूर्वी हे प्रमाण अत्यंत कमी होते. आता देखील आम्हाला शासनाने सांगावे की, आम्ही राज्यातील कृषी विभागासाठी अर्थसंकल्पामध्ये पाच पटीने तरतूद करु. आमच्या जिल्ह्याचे पालक मंत्री श्री. गुलाबराव देवकर साहेब सभागृहात उपस्थित आहेत. त्यांना माझी विनंती आहे की, 11 जानेवारी, 2010 रोजी जळगांव जिल्ह्यात जी गारपीट आणि वादळ झाले त्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम एक वर्षानंतर मिळाली. वास्तविक ही मदत म्हणजे एकरी 2 हजार, 3 हजार जास्तीत जास्त 5 हजार एवढीच असते. महत्वाचा मुद्दा म्हणजे शेतकरी हा भिकारी नाही. पण अशा नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत देण्याऐवजी पीक विमा योजना सशक्त कशी होईल, याचा विचार करणे गरजेचे आहे. ऊसाला त्याची गरज पडत नाही, कारण कितीही पाऊस पडला आणि गारपीट झाली तरी ऊस हा ताठ मानेने स्वाभिमानाने उभा असतो. इतर पिकांच्या बाबतीत मात्र तशी परिस्थिती नसते म्हणून ही पीक विमा योजना चांगल्या प्रकारे राबविणे आवश्यक आहे. ती योजना सशक्त केली तर राज्यातील शेतकरी आपल्याला धन्यवाद देतील, दुवा देतील. त्याशिवाय हा शेतकरी उभा राहणार नाही. अन्यथा प्रत्येक वेळेस नैसर्गिक आपत्तीत नुकसान झाल्यानंतर शासनाकडे आर्थिक मदतीची वाट पाहण्याशिवाय त्याच्याकडे पर्याय नसतो. त्याला शासनाकडेच मदतीची अपेक्षा करावी लागते, याची नोंद घेणे आवश्यक आहे. पीक विमा योजना सक्षमपणे राबवून आपले राज्य हे देशातील पहिले राज्य म्हणून ओळखले गेले पाहिजे, असा प्रयत्न शासनाने करावा अशी मी विनंती करतो.

यानंतर विकास खर्चाचा विचार केला तर महाराष्ट्रातील प्रमाण 65.09 टक्के, कर्नाटक मध्ये हेच प्रमाण 2 टक्क्यांनी जास्त म्हणजे 67.02 टक्के एवढे आहे. गुजरात राज्यात 64.03 टक्के आणि राजस्थान मध्ये 64.04 टक्के तर हरियाना राज्यात हे प्रमाण 71 टक्के एवढे आहे. मघाशी सांगितल्यानुसार एकूण खर्चातील विकास कामाचा हिस्सा वाढविण्यासाठी देखील शासनाला प्रयत्न करावा लागणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ........

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

त्यामुळे एकूण बजेटपैकी विकास खर्चाचा हिस्सा वाढविण्याची आपल्याला नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदया, औद्योगिक गुंतवणुकीच्या संदर्भातील मुद्दा मांडावयाचा आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक पहाणीत असे म्हटले आहे की, गुजरात राज्याची गुंतवणूक 8,59,787 कोटी रुपयांची असून महाराष्ट्र राज्याची गुंतवणूक 6,95,516 कोटी आहे. आपल्या राज्यातील प्रकल्पांची संख्या 16,140 असून गुजरात राज्यातील प्रकल्पांची संख्या 10,666 आहे. आंध्र प्रदेश या राज्याच्या प्रकल्पांची संख्या 7,237 आहे. आंध्रपदेश केवळ 1 लाखाने महाराष्ट्राच्या मागे आहे. आधी कोणाला कारखाना टाकावयाचा झाला की, चला मुंबईला असे चित्र होते परंतु आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. महाराष्ट्राला औद्योगिक गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर ठेवावयाचे असेल तर आपल्याला फार परिश्रम करावे लागतील. वीज आणि पाणी हे शेती आणि उद्योगाचे पाया आहे. केवळ गुजरात राज्य आपल्या पुढे गेले आहे असे नाही तर आंध्र प्रदेश, पंजाब आपल्या स्पर्धेत आहे. उत्तरांचलला केंद्र शासनाने मोठया प्रमाणात सबसिडी दिलेली असल्यामुळे उत्तरांचलमध्ये आता मोठया प्रमाणात औद्योगिक क्षेत्र निर्माण झालेले आहे. नाशिकमधील एक कारखाना हरिद्वारला गेला आहे. कारखान्यांना चांगले पॅकेज देण्याचा विचार झाला तरच आपण उद्योग क्षेत्रात प्रथम राहू अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदया, भारतातून व महाराष्ट्रातून निर्यात होणारी जी टक्केवारी आहे ती दिलासा देण्यासारखी आहे. सन 2005-06 मध्ये महाराष्ट्रातून 1,13,700 कोटी रुपयांचा माल एक्सपोर्ट केला गेला, तर भारताने 4,54,800 कोटी रुपयांचा माल एक्सपोर्ट केलेला आहे. जवळपास 25 टक्के निर्यात महाराष्ट्रातून झालेली आहे. सन 2009-10 या वर्षात भारताने 8.45 कोटी रुपयांची तर महाराष्ट्र राज्याने 2.28 कोटी रुपयांच्या मालाची निर्यात केलेली आहे. जवळ पास एकूण निर्यातीच्या 24 टक्के निर्यात महाराष्ट्रातून झालेली आहे. आता निर्यातीला सुध्दा आपल्याला तोंड द्यावे लागणार आहे. गुजरात राज्यातील दोन तीन पोर्ट चांगल्या प्रकारे डेव्हलप झालेले आहेत. गुजरात राज्या प्रमाणे आपल्याला सुध्दा आपले काही पोर्ट डेव्हलप करावे लागणार आहेत. इतर राज्यांना बोटीने माल एक्सपोर्ट करावयाचा असेल तर त्यांनी गुजरातमधून माल एक्सपोर्ट न करता महाराष्ट्रातून माल एक्सपोर्ट करावा यासाठी आपल्याला आपले पोर्ट अधिक

...2...

श्री. अरुण गुजराथी...

डेव्हलप करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदया, महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीमध्ये एक चमत्कारिक विरोधाभास मला दिसतो. भारताची दारिद्रय रेषेची टक्केवारी 21.80 टक्के असून महाराष्ट्र राज्याची दारिद्रय रेषेची टक्केवारी 32.40 टक्के आहे. देशापेक्षा महाराष्ट्रात गरिबीचे प्रमाण जास्त आहे. एका वृत्तपत्रात माहिती देण्यात आली होती की, बिहारची दारिद्रय रेषेची टक्केवारी 32.50 आहे. आपल्या पेक्षा बिहारची गरिबी केवळ 10 टक्क्यानेच जास्त आहे. भारत 21.80, बिहार 32.50, महाराष्ट्र 32.40, कर्नाटक राज्य 34.80 टक्के असून दिल्लीची दारिद्रय रेषेची टक्केवारी केवळ 8 टक्के व गुजरात राज्याची दारिद्रय रेषेची टक्केवारी 12 टक्के आहे.

सभापती महोदया, मागच्या वर्षीच्या आकडया प्रमाणे देशाचे दरडोई उत्पन्न 37,490 रुपये असून महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न 54,887 रुपये आहे. दिल्ली आणि एक दोन राज्य सोडले तर महाराष्ट्र दरडोई उत्पन्नात दुसरा आणि दारिद्रय लोकसंख्येच्या टक्केवारीमध्येही दुसरा आहे. हा चमत्कारिक विरोधाभास आहे त्यामुळे यासंदर्भात एखादी समिती नेमण्यात यावी किंवा दारिद्रय रेषेची टक्केवारी कमी कशी करता येईल यासंदर्भातील प्रयत्न करणे गरजेचे आहे असे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी ...

सभापती महोदय, यानंतर मला सिंचन क्षेत्राच्या संदर्भात एक मुद्दा मांडावयाचा आहे. देशाच्या तुलनेत महाराष्ट्राचे सिंचन क्षेत्र फार कमी आहे. पंजाबमध्ये 97 टक्के, बिहारमध्ये 61, टक्के हरियाणामध्ये 85 टक्के, उत्तर प्रदेशामध्ये 80 टक्के, कर्नाटकमध्ये 32 टक्के, वाळवंट असलेल्या राजस्थानामध्ये 34 टक्के आणि महाराष्ट्रामध्ये 19 टक्के सिंचन क्षेत्र आहे. ओरिसामध्ये 35 टक्के, पश्चिम बंगालमध्ये 56 टक्के, गुजराथमध्ये 45 टक्के सिंचन क्षेत्र आहे. आपण कितीही प्रयत्न केला तरी 25 टक्क्यापेक्षा जास्त ओलिताखालील शेती होऊ शकणार नाही, असे कृषी तज्ज्ञांचे आणि सिंचन तज्ज्ञांचे म्हणणे आहे. तेव्हा कृषी क्षेत्राच्या बाबतीत जर मर्यादा येत असेल तर आपल्याला औद्योगिक क्षेत्राकडे वळणे आणि त्याकरिता पॅकेजेस देणे गरजेचे आणि महत्वाचे आहे. बिहार असो, हरियाणा असो उत्तर प्रदेश असो त्या ठिकाणी सिंचन क्षेत्र जास्त आहे. आज सुध्दा बिहारमध्ये 20 फुटावर पाणी लागते परंतु आपल्याकडे 200 फुटावर देखील पाणी लागत नाही,अशा प्रकारची स्थिती आहे. त्यामुळे पैशाच्या बाबतीत जसे नियोजन करतो तसेच पाण्याचे नियोजन करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न आपण केला पाहिजे, असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला विजेच्या बाबतीत एक मुद्दा मांडावयाचा आहे. देशातील औद्योगिक विजेचा वापर 169 किलोवॅट प्रती तास असून, महाराष्ट्रामध्ये 265 किलोवॅट प्रती तास, पंजाब्मध्ये 387 किलोवॅट प्रती तास, गुजराथमध्ये 365 किलोवॅट प्रती तास तर तामिळनाडू राज्यामध्ये 320 किलोवॅट प्रती तास केला जातो. सभापती महोदय 12 डिसेंबर 2012 रोजी राज्यात भार नियमन राहणार नाही, अशा प्रकारे शासनाने घोषणा केली आहे. जर तसे झाले तर औद्योगिक क्षेत्रात विजेचा आणि पाण्याचा वापर वाढू शकेल. गरिबी मोजतांना किंवा हयुमन डेव्हलपमेन्ट इंडेक्स मोजत असताना घरगुती विजेचा वापर देखील लक्षात घेतला जातो. देशामध्ये ही आकडेवारी 639 असून महाराष्ट्रामध्ये 668, पंजाबमध्ये 1085, तामिळनाडूमध्ये 806 आणि गुजराथ राज्यामध्ये 804 आहे. वीज आणि पाणी या दोन बाबीकडे आपल्याला जास्त लक्ष दिले पाहिजे. त्याचबरोबर राज्यातील गरिबी कशी कमी करता येईल, याकडे लक्ष दिले पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी ...

सभापती महोदय, पाच सहा मुद्यांकडे मी माननीय वित्त राज्य मंत्र्याचे लक्ष वेधू इच्छितो. पगार, पेन्शन आणि व्याज यावरील खर्च 50 टक्क्यापेक्षा जास्त जाणार नाही,याची काळजी घेतली पाहिजे, योजनेतर खर्च 60 टक्क्याच्या आत आणण्याचा प्रयत्न करावा, मानव विकास निर्देशांक कमी असलेल्या नंदूरबार, धुळे, बुलढाणा अमरावती,जालना, गडचिरोली या जिल्ह्यासाठी विशेष योजना राबविण्यात आल्या पाहिजेत. ज्या जिल्हयाचे दरडोई उत्पन्न देशाच्या सरासरी उत्पन्ना पेक्षा कमी आहे, त्या जिल्ह्यासाठी विशेष कार्यक्रम वा विशेष पॅकेज देण्याच्या संदर्भात विचार करण्यात यावा. जळगाव,धुळे,नंदूरबार आणि नाशिक या जिल्हयासाठी उत्तर महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याविषयी पाच सहा वर्षापूर्वी ठराव मंजूर केला होता. परंतु अजूनही हे वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्यात आलेले नाही. तेव्हा उत्तर महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ आणि कोकणासाठी देखील वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्यात आले पाहिजे. त्याचबरोबर जोपर्यंत हे वैधानिक विकास मंडळ होत नाही, तोपर्यंत कोकण आणि उत्तर महाराष्ट्रासाठी विशेष पॅकेज देण्यात आले पाहिजे. शासनाने 5500 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. तसेच प्रत्येक वर्षाला 1700 कोटी रुपये या प्रमाणे तीन वर्षासाठी पॅकेज जाहीर केले होते. कोकणासाठी किती रुपयांचे पॅकेज दिले, हे मला माहीत नाही. परंतु कोकणातील तीन जिल्हयाचे दरडोई उत्पन्न जर आपण पाहिले तर पहिल्या सहा सात जिल्हयामध्ये रायगड, ठाणे सिंधुदूर्ग हे जिल्हे येतात तर सर्वात कमी दरडोई उत्पन्नामध्ये नंदुरबार धुळे हे दोन जिल्हे येतात. या तुलनेत जळगाव जिल्हयाचे दरडोई उत्पन्न थोडेसे बरे आहे. दोन वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याविषयीची मागणी या भागातील सन्माननीय सदस्यांच्या माध्यमातून मी करीत आहे.

सभापती महोदय, दिल्ली येथे मिनी मंत्रालय करण्यात यावे, अशा प्रकारची मागणी मी यापूर्वी केली होती. राज्याचा अर्थसंकल्प जेवढा आहे तेवढा तेथे एका विभागाचा अर्थसंकल्प असतो. एका खात्याला जेवढे पैसे मिळतात तेवढया रकमेचा आपल्या राज्याचा अर्थसंकल्प आहे. त्यामुळे दहा बारा आय.ए.एस. अधिकारी आणि इतर 40-50 अधिकारी व कर्मचा-यांचे एक मिनी मंत्रालय दिल्ली येथे स्थापन करण्यात आले पाहिजे. इतर राज्ये दिल्लीतून जास्तीत जास्त पैसे मिळविण्याचा प्रयत्न करीत असतात. तसा प्रयत्न आपण सुध्दा केला पाहिजे, असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

नंतर श्री.सरफरे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ 17:15

श्री. अरुण गुजराथी....

पालघर, डहाणू येथे डायमंड पार्क उभारण्यात यावे या करिता माझी शासनाला विनंती आहे. सोने आणि डायमंडच्या उद्योगाशी माझा काहीही संबंध नाही. मला एवढेच सांगावयाचे आहे की, आपण ज्या गोष्टी एक्सपोर्ट करतो त्यामध्ये डायमंड फार मोठया प्रमाणात परदेशामध्ये जाते. याकरिता 100 ते 200 एकर जागेमध्ये आपण एक डायमंड पार्क उभारले तर गुजरातच्या सूरतमध्ये चालणाऱ्या या उद्योगाशी स्पर्धा करणारा हा उद्योग आणि व्यापार आपल्या राज्यामध्ये वाढू शकेल.

सभापती महोदय, औद्योगिक धोरणाच्या संदर्भात आपण इंटरेस्ट सबसिडी देऊ असे म्हटले असल्यामुळे ही इंटरेस्ट सबसिडी जास्त प्रमाणात द्यावी अशी मी मागणी करतो. त्याचबरोबर त्यांना व्हेंचर कॅपिटलसुध्दा आपण दिले पाहिजे. को-ऑपरेटिव्ह सोसायटींना ईक्विटी कॅपिटल देण्याच्या संदर्भात शासनाचा जो काही निर्णय असेल त्याला आपला विरोध असण्याचे कारण नाही. परंतु व्हेंचर कॅपिटल आणि इंटरेस्ट सबसिडीप्रमाणे व्हॅटच्या 50 टक्क्यामधील 25 टक्के हिस्सा उद्योजकांना घेऊ दिला जातो त्याऐवजी 50 टक्के घेऊ दिला तर अधिक उद्योग या राज्यामध्ये येऊ शकतील.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये 75 ते 80 लाख इतक्या मोठया प्रमाणावर कापसाच्या गाठींचे उत्पादन होते. त्यापैकी 25 लाख कापसाच्या गाठी गुजरात, मध्य प्रदेश आणि आंध्र प्रदेश या राज्यामध्ये जातात. हा माल त्या राज्यामध्ये जाता कामा नये. तो जात असल्यामुळे आपल्या राज्याचे 300 ते 400 कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. त्यावर कर लावणे घटनेतील तरतुदीशी सुसंगत आहे की, त्यामुळे घटनेचा भंग होणार आहे हे आपल्याला पहावे लागेल. कापसाचे जितके उत्पादन होते त्याच्या 50 टक्के गाठींपासून सूत काढण्यासाठी हा कापूस गुजरात आणि तामिळनाडूमध्ये व्यापारी घेऊन जातात. त्यामधून जाणारा एक हजार ते 800 कोटी रुपयांचा व्हॅट आपल्याला मिळाल्यामुळे आपले उत्पन्न वाढू शकते. अशाप्रकारे वर्षभरामध्ये 50 हजार कोटीपर्यंत आपले व्हॅटचे उत्पन्न वाढू शकते. आज व्हॅटच्या माध्यमातून 37 टक्के उत्पन्न येते, स्टॅप डयुटीच्या माध्यमातून 12 ते 13 टक्के उत्पन्न येते, स्टेट एक्साईजच्या माध्यमातून 5 ते 7 टक्के उत्पन्न येते ते वाढविण्यासाठी आपण प्रयत्न करावेत. सभापती महोदया, मुंबईमधून देशाच्या पातळीवर सेंट्रल एक्साईजच्या माध्यमातून 60 टक्के रक्कम जाते, परंतु त्याच्या तुलनेत आपल्याला केंद्र शासनाकडून पुरेशी रक्कम मिळत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिल्लीला माननीय पंतप्रधानांच्या कार्यालयामध्ये अनेक वर्षापासून काम केले आहे. माननीय पंतप्रधानांशी त्यांचे चांगले संबंध आहेत,

DGS/

श्री. अरुण गुजराथी....

हे लक्षात घेऊन केंद्र शासनाकडून मुंबईसाठी विशेष अनुदान मिळविण्याचा त्यांच्याकडून प्रयत्न झाला पाहिजे. या मुंबईमध्ये मेट्रो रेल आणि मोनो रेलची कामे सुरु असल्यामुळे त्यासाठी निधी मिळविण्याकरिता प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, महाराष्ट्राच्या आर्थिक पहाणीच्या पृष्ठ क्रमांक 168 मध्ये शहरी दारिद्रय आणि ग्रामीण दारिद्रयाचे गुणोत्तर दिले आहे. महाराष्ट्रात शहरी दारिद्रय 47.9 टक्के आहे आणि ग्रामीण दारिद्रय 25.6 टक्के आहे. त्याचप्रमाणे भारताचे शहरी दारिद्रय 41 टक्के आहे आणि ग्रामीण दारिद्रय 25 टक्के आहे. अशाप्रकारे देण्यात आलेले शिरगणतीचे गुणोत्तर एवढे कसे असू शकते याचा मला विचार पडला आहे. रोजगार हमी योजना ही ग्रामीण भागातील "ड" वर्ग नगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये राबविली जाते ती आपण शहरामध्ये राबवू शकत नाही. राज्य शासनाने ऐआयबीपीकरिता केंद्र शासनाकडून 8 हजार 39 कोटी रुपये आणले आहेत, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु नरेगा योजनेकरिता तुम्ही केंद्र शासनाकडून पैसे आणले नाहीत. राजस्थान, मध्य प्रदेशसारखी राज्ये नरेगा योजनेमधून 6 ते 7 हजार कोटी रुपये घेऊन गेले आहेत. आपले मंत्रालयातील दोन-चार अधिकारी या करिता वेगळे काढले तर 7 ते 8 हजार कोटी रुपये आणू शकतात. तसे जर आपण आणले तर ग्रामीण भागामध्ये पायाभूत सुविधा देण्याचे काम आपण चांगल्याप्रकारे करु शकू असे मला वाटते.

सभापती महोदया, तामिळनाडू, गुजरात, कर्नाटक ही सर्व राज्ये आता औद्योगिक स्पर्धेमध्ये आपल्यापुढे चालली आहेत. याकरिता आपले प्रशासन कार्यक्षम, लोकाभिमुख व्हावे अशी या प्रसंगी अपेक्षा व्यक्त करतो. या अर्थसंकल्पामधील विविध तरतुदींना पाठिंबा देत असतांना आपली अधिक प्रगती, अधिक विकास आणि अधिक गती कशापध्दतीने वाढेल यासाठी प्रयत्न करावेत अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदया, याठिकाणी अर्थसंकल्प वाचत असताना मला माझ्या लहानपणीची एक गोष्ट आठवली.आम्हाला लहानपणी जादूचे खेळ शिकविले जावयाचे आणि या बोटावरची थुंकी त्या बोटावर कशी गेली आणि त्या बोटावरची थुंकी या बोटावर कशी गेली याबद्दल प्रयोग करुन दाखविले जात होते, तेव्हा आम्हाला नवल वाटावयाचे. परंतु आम्ही लहानपणी जे शिकलो तेच आम्ही आयुष्यभर पहात आहोत.येथे सुध्दा अर्थसंकल्पामध्ये एवढे पैसे दिले, तेवढे पैसे दिले, हरितक्रांती केली आणि शेतकऱ्यांना अमुक इतके पैसे दिले असे ऐकल्यानंतर, वाचल्यानंतर असे वाटले की, खरेच आपल्याला बरेच काही मिळालेले आहे.परंतु प्रत्यक्षात पाहिल्यावर लक्षात आले की,आपण कुठे आहोत. याठिकाणी किंमती नुसार क्षेत्रनिहाय वृध्दीदर हा 2007-2008 मध्ये कृषीसाठी 9.9, 2008-2009 मध्ये तो 19.3 टक्के आहे आणि 2009-2010 मध्ये तो 1.8 टक्के आहे. अशा वेळी आपण कृषी क्षेत्रामध्ये खूप प्रगती केली असे जर वाटत असेल तर ते अतिशय चुकीचे आहे. कारण आम्हाला केंद्र शासनाकडून कृषीसाठी पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये 30 टक्के रक्कम मिळाली होती. पण ती हळूहळू कमी होऊन आता 10 व्या पंचवार्षिक योजनेमध्ये ही रक्कम 3.5 टक्क्यावर आली आहे म्हणजे आपण शेतीचा विकास करीत आहोत असे जे सांगितले जात आहे ते बरोबर आहे काय ? याचाही विचार केला पाहिजे. आपण स्थूल उत्पन्नामध्ये फार मोठ्या चर्चा केल्या. परंतु मुंबईचे स्थूल उत्पन्न 2007-2008 मध्ये 77,145 इतके आहे आणि 2008-2009 मधील हे उत्पन्न 89.343 इतके आहे. पण आपण मुंबई शहराचा विचार करीत असताना गडचिरोलीसारख्या टोकातील भागाचा कधी विचार केला आहे काय? त्याठिकाणी 2007-2008 मध्ये 24,115 रुपये आणि 2008-2009 मध्ये 24,370 रुपये इतके स्थूल उत्पन्न होते, म्हणजेच मुंबईच्या जवळ आले तर त्या भागातील स्थूल उत्पन्न वाढणार आणि मुंबईपासून खूप लांब गेलो तर मग आम्ही दारिद्र्याच्या खाईत जाणार आणि तरीसुध्दा आमचा महाराष्ट्र मोठा आहे असे म्हणणे चुकीचे आहे.

सभापती महोदय, माझ्यामागे एकजण दमदारपणे गुणगुणत होता.तो म्हणाला की,"शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती" आणि मलाही असे वाटले की, त्या मुलाने हा चांगला विषय उपस्थित केला.पण माझ्या मनामध्ये विचार आला की, सध्या स्थिती काय आहे? "आज आम्ही शोधत होतो, त्यातील उरले किती". त्यावेळी मात्र "शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती" असे दमदारपणे छातीवर ठोकून बोलत होतो. पण आज मात्र शेतकरी आत्महत्या करीत आहे,महिलांवर अत्याचार होत आहेत.हे सर्व होत असताना खरे मराठा कुठे उरले आहेत हे आम्ही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

शोधत आहोत, जे आमचे संरक्षण करण्यासाठी पुढे येतील. त्यामुळे या गोष्टीचा देखील विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, याठिकाणी हरितक्रांतीचा विषय उपस्थित झाला. शेतकऱ्यांना फार मोठ्या प्रमाणात रक्कम दिली आणि आम्ही हे केले, ते केले असे सांगण्यात आले. पण जेव्हा मी या पुस्तकाचा अभ्यास केला, याबाबत विचार केला तेव्हा माझ्या लक्षात आले की, खरच राज्याने कृषी विभागाला अर्थसंकल्पातील किती वाटा दिला ? तर केवळ 129 कोटी रुपये कृषी विभागाला दिले म्हणजे 3 टक्के देखील म्हणता येणार नाही एवढा कमी निधी दिलेला आहे. .001 टक्का म्हटले तरी हरकत नाही. तेव्हा आपण जर कृषी विभागाला एवढी कमी रक्कम देत असलो तर कुणाच्या भरवशावर नाचत आहोत हा प्रश्न आहे आणि यासाठी आपण केंद्र शासनाच्या भरवशावर आहोत म्हणजे हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवले आणि मीच दान केले असे म्हणून मोठया प्रमाणात त्याचा लाभ उठविण्याचा प्रयत्न करीत आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. तसेच याठिकाणी अल्प व्याज दराने अल्प मुदतीचे कर्ज देतो असे सांगण्यात आले. 50 हजार रुपयांचे कर्ज 30 जूनच्या आत भरले तर व्याजदर शून्य असेल अशी घोषणा केली. पण हीच घोषणा मागच्या वर्षी देखील केली आहे. मागच्या वर्षी ही रक्कम 25 हजारावरुन 50 हजार रुपये केली असे सांगण्यात आले. याबाबतीत मी जेव्हा सर्व बँकेमध्ये पत्रे दिली की, 50 हजार रुपयांचा व्याज दर शुन्यावर आणला तर तुम्ही आमच्याकडून पैसे कसे वसूल करीत आहात ? अशा वेळी संबंधितांनी सांगितले की, याबाबतीत आमच्याकडे कोणताही जी.आर.आलेला नाही, आता मराठी शासन निर्णय आलेला नाही. परंतु अगोदर घोषणा केली आणि वर्षभरानंतर आता या योजनेसाठी पैसे देत आहोत असे सांगत आहोत. याबाबतीत शासनाने खरे सांगावे की, आपण एवढया सगळया लोकांना 84.28 कोटी रुपये देऊ शकणार आहोत काय ? याचा फायदा किती लोकांना देणार आहात आणि किती लोकांच्या डोक्यावर टांगती तलवार ठेवणार आहात ? मघाशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनीही उल्लेख केला होता की, आज जर शेतकऱ्यांचा हिशोब केला

यानंतर कु.थोरात . . ..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे.... 17:25

श्रीमती शोभा फडणवीस....

तर हे मोहरीच्या भावातही देणार नाही, अशा प्रकारची स्थिती आहे. मग देतो असे सांगावयाचे. याचे धोतर सोडून त्याला द्यावयाचे आणि त्याचे शर्ट काढून याला द्यायचे, अशा प्रकारचे चित्र नाही ना? शेतकऱ्याला काही द्यावयाचे नसेल तर देऊ नका. पण द्यावयाचे असेल तर कमीत कमी व्यवस्थित देण्यात यावे, जेणे करुन त्या माणसाला पाच पैसे मिळतील, अशा प्रकारची व्यवस्था करण्यात यावी.

सभापती महोदय, खताच्या राखीव साठयासाठी तीन वर्षापासून अर्थसंकल्पामध्ये तदतूद करण्यात येत आहे. गेली तीन वर्षे खतांच्या दृष्टीने अतिशय त्रुटीचे दिवस आहेत. शेतकऱ्यांना खत मिळत नाही म्हणून आम्ही सतत मोर्चे काढतो. या वेळी खताच्या पुरवठयासाठी पोलिसांची मदत घ्यावी लागली. मी राजूरा, कोरपना आणि जिवतीच्या भागात गेले होते. तेथे शेतकऱ्यांनी खतासाठी रांग लावली होती, पण खत विक्रीची दुकाने बंद होती. मी या संदर्भात चंद्रपूरच्या अधिकाऱ्याला फोन केला. खताची कमतरता पडणार नाही अशा प्रकारच्या घोषणा आम्ही ऐकल्या होत्या तर मग ही खते गेली कुठे? याबाबतीत आमच्या असे लक्षात आले की, खताच्या व्यागन आमच्याकडे आल्याच नाहीत. यासंदर्भात मी जिल्हाधिकाऱ्यांना देखील फोन केला होता. सभापती महोदय, राजूऱ्याचा भाग हा अतिशय दुर्गम भाग आहे. त्या ठिकाणी कोणी सहजासहजी जात नाही. त्या ठिकाणी खताचा पुरवठा झाला नाही म्हणून मी जिल्हाधिकाऱ्यांना फोन केला तेव्हा त्यांनी असे सांगितले की, मी खताची ऑर्डर नोंदविलेली आहे पण अद्यापपर्यंत खत मिळालेला नाही. नांदाड व बसमतमध्ये खतांचा पुरवठयाच्या वेळी लाठीचार्ज झाला. खते घेण्यासाठी शेतकऱ्यांच्या मोठया प्रमाणात रांगा लागलेल्या होत्या त्यामुळे पोलीस बंदोबस्तात खताचे वाटप करावे लागले पण सगळया शेतऱ्यांना खताचा पुरवठा होऊ शकलेला नाही. सभापती महोदय, मी या संदर्भात काल एक लक्षवेधी सूचना दिली होती. पण तीवर या सभागृहात चर्चा झाली नाही. हा खत जातो कुठे? खताची पुरेपुर खरेदी करण्यात येते,त्यासाठी आगाऊ पैशाची नोंदणी केली जाते. व्यापाऱ्यांना तो देण्यात येतो, मग हा खत कुठे जातो? याबाबतीत आमच्या असे लक्षात आलेले आहे की, शेतकऱ्यांना मिळणारा युरिया हा अनुदानित असतो आणि या युरियाचा वापर प्लायवूड फॅक्टरीमध्ये रेक्झिन तयार करण्याकरिता केला जातो. प्लायवूड फॅक्टरीमध्ये जर युरिया वापरण्यात येत असेल तर व्यापारी अणि कारखानदार यांचे संगनमत आहे काय हे पाहिले पाहिजे, त्याची चौकशी झाली

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

पाहिजे. याबातीत माझी अशी सूचना आहे की, शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानित युरियाचा रंग बदलण्यात यावा. त्याच्या गोणीचाही रंग बदलण्यात यावा, जेणेकरुन शेतकऱ्यांना युरिया मिळाला काय हे या युरियाच्या पॅकेजवरुन आमच्या लक्षात येईल. शेतकऱ्यांसाठी देण्यात येणारा युरिया जर इतर ठिकाणी आढळून आला तर आम्हाला त्याबाबतीत तातडीने तक्रार करता येईल. केवळ पैसे खर्च करुन शेतकऱ्यांना लाभ देता येत नाही म्हणून शेतकऱ्यांना प्रत्यक्षात लाभ मिळण्याच्या दृष्टिकोनातून काय केले पाहिजे, हाही एक महत्वाचा प्रश्न आहे, त्याबाबतीत शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, राष्ट्रीय कृषी विमा योजना, सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजना आणि हवामान आधारित पीक विमा योजना या तिन्ही विमा योजनांचा अर्थसंकल्पाच्या भाषणात उल्लेख करण्यात आलेला आहे. सभापती महोदय, मी एकदा विम्याच्या चर्चासत्रामध्ये गेले होते. विमा कसा देण्यात येतो याची मी माहिती घेतली. तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, हा विमा शेतकऱ्यांच्या फायद्याचा नाही. आयुर्विमा कंपनीच्या लोकांनी आणि कृषी अधिकाऱ्यांनी एकत्र बसून या विमा योजनेचे प्रारुप तयार केलेले आहे. या विमा योजनेमध्ये काय आहे? अवर्षण प्रवण म्हणजे पाऊस कमी झाला असेल तर विम्याची रक्कम 13 हजार रुपये देण्यात येणार आहे. अतिवृष्टी झाली तर 17 हजार रुपये देण्यात येणार आहेत. पण शेतकऱ्याला 30 हजार रुपयाचा पीक विमा घ्यावा लागणार आहे. कोणाच्या डोक्यातून ही कल्पना आलेली आहे. अतिवृष्टीमुळे किंवा अवर्षणामुळे नुकसान झाले तर ते नुकसान सारखेच आहे.शेतकऱ्यांनी अतिवृष्टीसाठी विम्याचे पैसे भरावयाचे, अवर्षणासाठी पैसे भरावयाचे आणि अवर्षण झाले तर 13 हजार रुपये मिळणार, अतिवृष्टी झाली तर 17 हजार रुपये मिळणार,हा कुठला नियम आहे, ही कुठली विमा योजना आहे? ही विमा योजना शेतकऱ्यांच्या फायद्याची नाही.

सभापती महोदय, धान पिकाच्या विम्याच्या बाबतीत उंबरठा उत्पन्न दाखविण्यात आलेले नाही. ज्यावेळी उंबरठा उत्पन्न दाखविले जाईल तेव्हा 10 वर्षात जे उत्पन्न मिळेल त्यातून नुकसान भरुन येईल. पण उंबरठा उत्पन्नाचा कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही.

यानंतर श्री. खंदारे....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

त्यांनी म्हटले की, 10 वर्षातील उत्पन्नाची सरासरी पाहिजे. त्यापैकी 3 वर्षे चांगले उत्पन्न असेल त्या वर्षाचे उंबरठा उत्पन्न गृहीत धरावे. या प्रकारामुळे आमच्या भागातील दुष्काळ जाहीर होऊ शकत नाही. त्यामुळे आमच्या भागातील शेतकरी मरत आहेत. ही सरासरी कोणाच्या भरवशावर काढली जाते ? सरासरी काढताना संपूर्ण जिल्ह्याचे उत्पन्न गृहीत धरले जाते. कधी या जिल्ह्यात दुष्काळ असतो, कधी दुसऱ्या जिल्ह्यात दुष्काळ असतो, कधी या जिल्ह्यातील गावे दुष्काळग्रस्त असतात तर कधी दुसऱ्या जिल्ह्यातील गावे दुष्काळग्रस्त असतात. पण सब घोडे बारा टक्के याप्रमाणे विचार करुन शेतकऱ्यांना घाटावर पोहोचविण्याचा शासन विचार करीत आहे. त्यामुळे विमा योजना कोणत्याही प्रकारे शेतकऱ्यांच्या फायद्याची नाही. या योजनेमध्ये शासनाने योग्य तो सुधारणा करावी असे स्पष्टपणे सांगितले होते. यासाठी शासनाने जे माहितगार शेतकरी आहे, ज्यांना शेतीची उत्तम जाण आहे अशा शेतकऱ्यांकडून शासनाने माहिती घ्यावी. केवळ विमा एजण्ट व अधिकाऱ्यांनी एकत्र बसून निश्चित केलेली ही विमा योजना राबविली जात असेल तर एकाही शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही. यातून या विमा कंपन्या मोठ्या होणार आहेत, शेतकरी मात्र मातीत जाणार आहेत.

शासनाने शेतकरी अपघाती विमा योजना सुरु केली आहे. या योजनेतील मी 28 शेतकऱ्यांच्या केसेस 7/12 व इतर सर्व आवश्यक त्या कागदपत्रांसह विमा कंपनीकडे सादर केल्या होत्या. मी आणि सन्माननीय महसूल मंत्री श्री.थोरात यांनी सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर 28 केसेसपैकी केवळ 8 शेतकऱ्यांचे पैसे मिळाले, 20 शेतकऱ्यांचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत. म्हणजे विम्याचे हप्ते भरल्यानंतर पैसे मिळत नसतील तर कोणाचे घर भरण्यासाठी ही योजना आणली आहे असा सवाल मी यानिमित्ताने शासनाला विचारु इच्छिते. शेतकऱ्यांचे घर भरणार की विमा कंपन्यांचे, यावर विचार होणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय कृषी विकास योजना आहे, त्यासाठी शासनाने पैसे दिले आहेत. ते पैसे देत असताना त्यात केंद्र सरकारच्या हिश्याचे पैसे गृहित धरण्यात आले आहेत. राज्य सरकारच्या हिश्याचे पैसे दिलेले नाहीत. राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, या योजनेतही केंद्र सरकार देत

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

असलेल्या पैशाचा उल्लेख केलेला आहे, राज्याच्या हिश्याचा उल्लेख केलेला नाही. रोजगार हमी योजनेसाठी सन 2011-12 या वर्षासाठी 645 कोटी रुपये तरतूद केली असून सन 2010-11 या वर्षात या योजनेवर 362 कोटी रुपये खर्च झाले आहेत असे नमूद केलेले आहे. रोजगार हमी योजनेसाठी दरवर्षी 3500 हजार कोटी रुपये व्यवसाय कराच्या माध्यमातून गोळा होतात. महाराष्ट्र राज्याची ही योजना देशामध्ये आदर्श ठरली आहे. त्यामुळे केंद्र सरकारने महाराष्ट्र राज्याची ही योजना उचलून धरली आणि संपूर्ण देशामध्ये ती राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्या योजनेतील चुकांबद्दल मी बोलणार नाही. परंतु महाराष्ट्र सरकारने सभागृहात घोषित केले होते. सन 2007-08 मध्ये ज्या जिल्ह्यातील तालुक्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे अशा प्रत्येक तालुक्यांसाठी 2 पिण्याच्या पाण्याच्या विहिरींकरिता 2.50 कोटी रुपये देण्याची घोषणा करण्यात आली होती. आज आपण 2011-12 मध्ये आहोत, ही योजना कोठे गायब झाली ते समजलेले नाही. त्यासाठी एकही पैसा दिलेला नाही. त्यावेळी प्रत्येक तालुक्यासाठी 300 विहिरी देण्याचे ठरले होते. आमच्या जिल्ह्याचे पालक मंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी आणि आम्ही एकत्र बसून 300 विहिरींचा प्रस्ताव तयार करुन सादर केला होता. त्यानंतर शासनाने 4200 विहिरी मंजूर केल्या होत्या. त्याचे काम सुरु झाले, पण त्याचा एकही पैसा मिळालेला नाही. उलट त्याबाबतच्या माझ्या एका प्रश्नाला 'प्रश्नच उद्‌भवत नाही' असे उत्तर मिळाले आहे. ज्या शेतकऱ्यांनी पैसे खर्च केले असतील, ज्या शेतकऱ्यांनी विहिरी बांधल्या असतील त्यांना जर पैसे मिळाले नाही तर शेतकऱ्यांना त्याच विहिरीत आत्महत्या करण्याची वेळ येईल. कारण ते पैसा देऊ शकणार नाहीत. आता शासन 742 कोटी रुपये कशासाठी देत आहे. कोणाला दिले जात आहे, जुनी बिले अदा करण्यासाठी 1400 कोटी रुपये लागणार आहेत.

रोजगार हमी योजनेचा पैसा बजेटमध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यावेळी असे सांगण्यात आले होते की, रोजगार हमी योजनेसाठी पैसा कमी पडू दिला जाणार नाही. जुन्या कामांसाठी सुध्दा पैसा दिला जाईल. परंतु आजतागायत एकही पैसा मिळालेला नाही. कर्मचाऱ्यांकडून व्यवसाय कर नियमितपणे सरकारच्या तिजोरीत जातो, परंतु शेतकऱ्यांचे दारिद्रय संपविण्यासाठी या पैशाचा काहीही उपयोग होत नाही हे मला खेदाने सांगावेसे वाटते.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

सभापती महोदय, शेत तळी योजनेसाठी शासनाने 24 कोटी 32 लाखांची तरतूद केली आहे. विदर्भात प्रत्येक जिल्ह्यात शेत तळी जास्त आहेत. तरी सुध्दा धानाच्या पिकाला पाण्याची गरज असल्यामुळे शेत तळ्यांसाठी पावसाळ्यातील शेवटचे पाणी तरी मिळावे यासाठी शेत तळ्यांची मागणी केली जाते.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

या शेततळ्याचे बांधकाम 20x20 मीटर आणि खोली 3 मीटर या प्रमाणे केले जाते. या शेततळयासाठी फक्त 45 हजार रुपये दिले जातात. आता आपण रोजगार हमी योजनेवरील मजुरीचे दर 126 रुपये केले आहेत. याचा आपण विचार केला तर 45 हजार रुपयामध्ये शेततळी बांधणे कठीण जाणार आहे. हे शेततळे बांधल्या नंतर त्याला दगडांचे पिंचिंग करण्यात येते. पिचिंगसाठी लागणारे दगड आणण्याच्या खर्चाचा यामध्ये उल्लेख नाही. शासनाला जर शेततळी करण्यासाठी काही रक्कम द्यायचीच असेल तर ती कमीत कमी 1 लाख रुपये तरी द्यायला पाहिजे. कारण प्रत्येक विभागाची आराजी वेगळी असते, तळयाची मोजणी वेगळी असते. लहान आणि मोठी तळी आपण बांधत असतो. तेव्हा या 45 हजार रुपयामध्ये वाढ होण्याची आवश्यकता आहे. दुसरे असे की, पिचिंग करण्यासाठी जे दगड लागतात ते देखील तेथे मिळत नाहीत. ते लांबून आणावे लागत असल्यामुळे वाहतुकीचा खर्च वाढतो, मजुरीचा खर्च वाढतो. या सर्व गोष्टींचा विचार करुन शेततळयासाठी देऊ केलेल्या रकमेमध्ये वाढ करावी जेणेकरुन या शेततळ्यातील पाण्याचा उपयोग सिंचनासाठी करता येईल.

सभापती महोदय, मालगुजारी तलावाच्या नूतनीकरणाचा विषय या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट केलेला आहे. आमच्या भागात मालगुजारी तलावांची संख्या खूप मोठी आहे मालगुजारी तलावाच्या दुरुस्तीसाठी पैसे द्यावेत अशी आमची अनेक वर्षापासूनची मागणी होती. ही दुरुस्ती रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून करण्यात येत होती. आता त्यासाठी पैसे मिळत नाहीत. मालगुजारी तलावासाठी पैसे देताना प्रति हेक्टर 21 हजार रुपये असे नॉर्म्स लावले होते. आता त्यामध्ये वाढ करुन ती रक्कम 28 हजार रुपया पर्यन्त वाढविलेली आहे. सभापती महोदय, तलाव जेवढे मोठे असेल तेवढी अधिक रक्कम माती काढण्यासाठी लागते. केवळ माती काढून तलाव होत नसते. त्या तलावाला सांडवा लागतो, दरवाजे लागतात. दरवाजे करायचे म्हटले तर लोखंडाचे भाव गगनाला भिडलेले आहेत. सिमेंटचे भाव देखील गगनाला भिडलेले आहेत. ज्यावेळी सिमेंटच्या पोत्याची किंमत 93 रुपये होती त्यावेळी तलावासाठी 28 हजार रु. दिले जात होते. आता सिमेंटच्या पोत्याची किंमत 325 रु. झालेली आहे, लोखंडाचे भाव वाढलेले आहेत. मग एवढ्या कमी रकमेमध्ये वेस्टवेअर आणि गेटची दुरुस्ती कशी काय करणार ? या तलावाच्या मातीकामासाठीच दोन अडीच लाख रु. लागणार असतील आणि 5 लाखाचेच एस्टिमेट असेल तर

..2..

श्रीमती शोभा फडणवीस...

तलावाची कामे कशी होणार ? म्हणून वस्तुस्थितीची जाणीव ठेवून वस्तूच्या वाढत्या किंमती, वाढती मजुरी, वाढता खर्च या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. आमच्या जिल्ह्यामध्ये परिस्थिती अशी आहे की, तेथे दगड मिळणे कठीण जाते. आम्ही आमचा पाय ठेवला तर तो पडतो झुडपी जंगलात आणि हात ठेवला तर तो पडतो रिझर्व्हड् फॉरेस्टमध्ये, अशी आमची स्थिती आहे. त्यामुळे या ठिकाणी वाघ चांगले वाढू शकतात असे सरकारचे म्हणणे आहे. म्हणजे सरकार माणसाला विसरुन वाघांची चांगली जोपासना करीत आहे, ही चांगली गोष्ट आहे. कारण आमच्या भागात सर्व ठिकाणी हिरवी गार वनश्री आहे. सभापती महोदय, मला हे सांगायचे आहे की, या तलावांच्या दुरुस्तीसाठी आम्हाला निधी वाढवून द्यावा किंवा टीसीएमच्या नॉर्म्स प्रमाणे पैसे द्यावेत किंवा हेक्टरी एक लाख रुपये द्यावेत. मग त्यामध्ये गेटचा समावेश असेल, पिचिंगचा समावेश असेल, नाले दुरुस्ती आणि कॅनॉल दुरुस्तीचा समावेश असेल, माती कामाचा समावेश असेल, अशा सर्व कामासाठी शासनाने निधी दिला पाहिजे.

केन्द्र पुरस्कृत पाणलोट क्षेत्र विकासासाठी केन्द्र शासनाकडून निधी येतो.या पाणलोट क्षेत्र विकास कामासाठी राज्याची तरतूद शून्य आहे. पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी अर्थसंकल्पामध्ये 57.27 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. आज त्या दवाखान्यांची स्थिती काय आहे, त्या दवाखान्यामध्ये डॉक्टर आहे काय, कंपाऊंडर आहे काय ? त्या ठिकाणी चपराशी देखील नाही. त्या दवाखान्यामध्ये जनावर घेऊन कोणी गेले तर ते जनावर बांधण्यासाठी खुंट देखील नाही. अशा दवाखान्यातून जनावरांवर औषधोपचार कसा होणार हा प्रश्न आहे. आपण पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी तरतूद केलेली आहे. हे करीत असताना प्रत्यक्ष त्या दवाखान्यामध्ये काम करण्यासाठी माणसे देण्याची गरज आहे. ती माणसे तुम्ही का देत नाही ? पशुधन हे शेतक-याचे अतिशय जिव्हाळ्याचे धन आहे. पावसाळ्यात एक बैल मेला तर शेतक-याचे कंबरडेच मोडते. कारण तेवढ्या किंमतीचा बैल घेण्याची शेतक-याची त्यावेळी परिस्थिती नसते. म्हणून जे काही द्यायचे असेल ते खुल्या मनाने, खुल्या दिलाने द्यावे. हातात चवण्णी ठेवून आशीर्वाद देऊन सांगायचे की तुला वाटेल ते खा, अशातला हा प्रकार आहे. आता चार आण्याचा चहा देखील मिळत नाही. त्यासाठी 10 रुपये मोजावे लागतात. म्हणून जे काही द्यायचे असेल ते परिस्थितीनुरुप आणि वाढती महागाई लक्षात घेऊन द्या. या पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये पहिल्यांदा कर्मचारी वर्ग

..3..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:35

श्रीमती शोभा फडणवीस...

भरण्याची गरज आहे. तो कर्मचारी वर्ग तुम्ही भरा. दवाखान्याचा उद्धार करण्यासाठी आपण एक मशिन घेण्याचे ठरविले. मला येथे सांगायचे आहे की, आज एक टेक्निशियन 5 ठिकाणी काम करीत आहे.

...नंतर श्री.गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस..

तो टेक्निशियन वेळेवर कोठेही सापडत नाही. यासंदर्भात विचारणा केली तर त्या टेक्निशियनकडून सांगितले जाते की, मी इकडे होतो, तिकडे होतो. त्यामुळे रुग्णांच्या रक्त तपासणीची कामे होत नाहीत. आरोग्य केंद्रातील रक्त तपासणीच्या मशीन्स धूळ खात पडलेल्या आहेत. यावरुन मशीन्स खरेदीकडे अधिकाऱ्यांचे लक्ष आहे, ही बाब आता लोकांच्या लक्षात येऊ लागली आहे. रुग्णालय सुरु केल्यानंतर सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात, परंतु त्या ठिकाणी काम करणारे वस्तुनिष्ठ कर्मचारी उपलब्ध करुन दिले पाहिजेत, ही महत्वाची बाब शासनाने लक्षात घेतली पाहिजे.

सभापती महोदया, या अर्थसंकल्पात नमूद करण्यात आले आहे की, राष्ट्रीय सहकार विभागामार्फत नौका उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत. यावरुन असेही लक्षात येते की, राज्य शासनाचा बहुतांश अर्थसंकल्प केंद्र शासनाच्या भरवशावर आहे. पण केंद्र सरकारने उद्या पाठ फिरविली तर हे शासन पूर्णपणे कोलमडणार आहे. केंद्र शासनाने देतो म्हटले आहे म्हणून त्यावर विश्वास ठेवण्यास हरकत नाही, असे सगळयांचे म्हणणे आहे.

सभापती महोदया, केंद्र शासनाच्या वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत राज्याला आतापर्यंत 8 हजार 39 कोटी इतके केंद्रीय अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे. त्यापैकी सन 2010-11 या आर्थिक वर्षात आतापर्यंत 1 हजार 257 कोटी व सन 2011-12 मध्ये 2 हजार 772 कोटीचा नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. अशा प्रकारे केंद्राकडून येणाऱ्या निधीवर राज्यातील विकास कामे करुन एक प्रकारे आमच्या मुलीचे लग्न दुसऱ्याच्या भरवशावर करण्याचेच सरकारने ठरविलेले दिसते. म्हणजे केंद्राकडून रक्कम प्राप्त झाल्यानंतर आपल्या राज्यातील सिंचन कार्यक्रम हाती घेतला जाणार आहे. सदर कार्यक्रमाचा निधी केंद्राकडून लवकर मिळण्याच्या बाबतीत शासनाने प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदया, केंद्र सरकारने बाल कामगार कायदा केला आहे. महाराष्ट्र राज्याचा स्वतंत्र असा बाल कामगार कायदा अजूनही झालेला नाही. कोणत्याही ठिकाणी बाल कामगार दिसणार नाहीत याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविलेली आहे. मग या कायद्याची अंमलबजावणी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी हॉटेलमध्ये जाऊन धाड टाकतात.

2...

श्रीमती शोभा फडणवीस..

किराणा दुकानात जाऊन धाड टाकतात आणि तेथे काम करीत असलेल्या बाल कामगारांना पकडतात. बाल कामगार ठेवलेल्या व्यापाऱ्यांना मोठया प्रमाणात दंड आकारतात. धाड टाकून पकडण्यात आलेल्या बाल कामगारांना रिमांड होममध्ये ठेवले जाते. ही एक प्रकारे इज्जतीने जीवन जगणाऱ्या मुलांना रिमांड होममध्ये ठेवून गुन्हेगार बनविण्याची प्रवृत्ती राज्यात वाढीस लागत असेल तर हे शासन नवीन गुन्हेगारांची पिढी निर्माण करीत आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही. रिमांड होममध्ये बिघडलेल्या मुलांनाच ठेवले जाते. पोटासाठी काम करणारी चांगली मुले रिमांड होममध्ये ठेवून त्यांना बिघडविण्याचा मार्ग दाखविणार आहात काय ? बाल कामगार कामे का करतात ? कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली नसते म्हणून आई-वडील लहान मुलांना कामासाठी पाठवितात. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे पोट भरण्यासाठी लहान मुलांना कामावर जावे लागते. माझ्ा मुलाने शिक्षण घेऊ नये असे कोणत्याही आई-वडीलांना वाटत नाही. हॉटेलमध्ये कप बशा धुण्याचे काम कोणत्या मुलाला चांगले वाटते ? पण त्या मुलांची आर्थिक परिस्थिती अतिशय खराब असते म्हणून त्यांना तशी कामे करावी लागतात. तसेच अर्थसंकल्पात शासनाकडून सांगितले गेले की, आम्ही एवढया शाळांची व्यवस्था करणार आहोत. राज्यात फक्त शाळा उघडून उपयोग होणार नाही तर त्या शाळेत मुलांची राहण्याची सोय शासनाने केली पाहिजे. त्यांच्या जेवणाची, कपडयाची व्यवस्था शासनाने केली पाहिजे. तसेच अशा बाल कामगार मुलांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत केली पाहिजे. असे केले तरच बाल कामगारांचे प्रमाण कमी होईल. महाराष्ट्राचा बाल कामगार कायदा स्वतंत्रपणे शासनाने केला पाहिजे, अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदया, महिलांवर होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करुन त्यांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने महिला आयोगाच्या सहमतीने जिल्हा परिषदेमार्फत समुपदेशन केंद्रे सुरु करण्यात येणार आहेत. मी सहज संबंधित अधिकाऱ्यांना विचारले की, आपल्या जिल्ह्यात समुपदेशन मंडळे किती आहेत, या मंडळात कोणाला घेतले ? तेव्हा समजले या समुपदेशन मंडळात अगदी छोट्या छोटया मुली घेतल्या आहेत, त्या लोकांना कशी काय मदत करु शकतील, कसे समुपदेशन करु शकतील ? याचा विचार करणे आवश्यक आहे. गेल्या एका वर्षापासून जिल्हा परिषदेने ही केंद्रे स्थापन केली आहेत. त्यांना जागा दिली. त्यांना स्टेशनरी लागणार आहे, त्यांना विजेचे बील भरावे

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस..

लागणार आहे. काही प्रकरणात कॉम्प्रमाईज करण्यासाठी संबंधित व्यक्तींना बोलाविल्यानंतर त्यांना मार्गदर्शन करीत असताना अनेक गोष्टींची या केंद्राना मदत लागणार आहे. एवढेच काय पण या केंद्रात काम करणाऱ्यांना व्यक्तींना मानधन अद्यापपर्यंत दिले गेलेले नाही. समुपदेशन व मदत केंद्र सुरु करण्यासाठी पैसे देऊ असे म्हटले आहे पण त्यासाठी स्वतंत्र अशी कोणत्याही प्रकारची तरतूद शासनाकडून करण्यात आलेली नाही. या केंद्रामध्ये मागील वर्षापासून मुली काम करीत आहेत, त्यांना आर्थिक मदत मिळाली नाही तर त्या मुलांचा देखील शासनावरील विश्वास उडेल आणि त्या मुली केंद्रे सोडून निघून जातील. अशा प्रकारे कुठल्या महिलांच्या अत्याचाराबद्दल हे शासन सिरीयस आहे, हा खरा प्रश्न आहे. अशा प्रकारची समुपदेशन केंद्रे उघडून महिलांवरील अत्याचार कमी होणार नाहीत तर जोपर्यंत अशा अत्याचार करणाऱ्या गुंडाना कडक शिक्षा करणार नाही, जोपर्यंत अशा गुन्हेगांरावर कायद्याचा आसूड ओढला जाणार नाही, तोपर्यंत असे गुन्हे होतच राहतील, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. नागपूर येथील मुलीच्या बाबतीत जी घटना घडली, त्या घटनेच्या गुन्हेगाराचा शोध अद्यापही शासनाचे पोलीस घेऊ शकले नाहीत. या घटनेतील गुन्हेगाराला अटक करावी म्हणून महिलांना मोर्चे काढावे लागले...

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. परशुराम उपरकर )**

**यानंतर श्री. भोगले....**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 17:45

श्रीमती शोभा फडणवीस.......

त्या गुंडाचे नाव सांगण्यास लोक का घाबरतात? उद्या तो गुंड पकडला गेला आणि जामिनावर सुटून बाहेर आला तर आपल्या खांद्यावर तलवार चालविली जाईल हे लोकांना माहिती आहे. म्हणून लोक मदत करावयास तयार नाहीत. लोकांचा कायद्यावर विश्वास राहिलेला नाही. इतकेच नव्हे तर या राज्यात लोकप्रतिनिधींवर मोठया प्रमाणात हल्ले होत आहेत. याची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला जाण आहे. पाण्यात पडल्यानंतर सगळेच कोल्हे असण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे या संदर्भात कडक कायदा करण्याची गरज आहे. या सभागृहाने सावकारी प्रतिबंध कायदा मंजूर केला, तो अद्याप केंद्र सरकारच्या स्तरावर प्रलंबित आहे. याचा अर्थ केंद्र सरकार तुम्हाला किंमत देत नाही किंवा तुमच्या कायद्यावर कोणाचा विश्वास नाही असे म्हणावे लागेल. जो कायदा राज्याने केला तो यशस्वी झाला पाहिजे. एकीकडे सरकारचा ब्युरोक्रसीवर धाक राहिलेला नाही. गुंड, बदमाष, समाज विघातक यांच्यावर सरकारचा वचक राहिलेला नाही. किती दिवस आम्ही हे सहन करायचे याचा विचार करण्याची गरज आहे.

कब तक हम मरते रहेंगे गुंडो के हाथ ।
कब तक हम लूटते जायेंगे अपनों के हाथ ।।
दर्द भी बाटेंगे तो बाटेंगे किसके साथ ।
रोना भी चाहे तो रोएंगे किसके साथ ।।

अशी स्थिती या महाराष्ट्राची आहे. आम्ही कोणाकडे न्याय मागायचा? या गोष्टींचा शासनाने गंभीरतेने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरातील कापड गिरण्या बंद पडल्या. या गिरण्यांमधून काम करणारे लाखो कामगार उद्ध्वस्त झाले. त्या कामगारांना राहण्यासाठी जागा आणि आर्थिक मोबदला देण्याची वारंवार घोषणा होऊनही अद्याप त्या संदर्भात कोणता विचार होत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. प्रत्येक अधिवेशनात दोन्ही सभागृहामध्ये गिरणी कामगारांच्या प्रश्नाबाबत चर्चा होते, भाषणे केली जातात. अधिवेशन संपल्यानंतर सगळी चर्चा हवेत विरुन जाते. या गिरणी कामगारांना आपण अद्याप न्याय देऊ शकलो नाही हे आपल्याला मान्य करावे लागेल.

सभापती महोदय, वीज पुरवठा करण्यासाठी नवीन प्रकल्प उभारले जाणार आहेत. राज्य भारनियमनातून मुक्त करण्यासाठी 2012 हे वर्ष निश्चित केले आहे. ऊर्जा क्षेत्रातील पायाभूत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.......

सुविधांकरिता निधी दिला जाणार आहे. नवीन प्रकल्प उभे करीत असताना जे जूने प्रकल्प आहेत, जे कालबाह्य झाले आहेत ते बंद करावयास निघालो आहोत. चंद्रपूर जिल्हयामध्ये 1971-72 मध्ये उभारलेले चारही प्रकल्प बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकल्पांवर होणाऱ्या दुरुस्ती खर्चामुळे वीज निर्मितीचा खर्च वाढत आहे असे सांगितले जाते. एकीकडे जूने वीज प्रकल्प एका वर्षात बंद करणार असू आणि नवीन प्रकल्प तीन वर्षात उभारणार असू तर 2012 मध्ये हे राज्य भारनियमनातून मुक्त कसे होणार? एकीकडे कृषी पंपाला वीज देण्याची घोषणा केली जाते. कृषी पंपांना वीज जोडणी देऊ असे सांगितले जाते. दुसरीकडे वीज निर्मितीसाठी नवीन प्रकल्प उभे करण्यात येणार आहेत. अस्तित्वात असलेले जूने प्रकल्प बंद करुन त्यांचे खाजगीकरण करण्यात येणार आहे. जूने प्रकल्प खाजगीकरणाच्या माध्यमातून चालविले जाऊ शकतात तर शासन या जून्या प्रकल्पांची डागडुजी करुन ते का चालवू शकत नाही? कृषी पंपाबाबत मुद्दल भरा, आम्ही व्याज माफ करु असे सांगितले गेले. नोव्हेंबरपासून विदर्भातील सर्व कृषी पंपाची वीज कनेक्शन्स तोडण्यात आली आहेत. शेतकऱ्यांकडून जबरदस्ती वसुली केली जात आहे. आता ही व्याज माफीची सवलत कोणासाठी? विदर्भातील शेतकरी उघड्यावर पडला आहे. या सवलतीचा फायदा फक्त पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना होणार आहे. कारण तेथील कृषी पंपाची वीज कनेक्शन्स तोडण्यात आलेली नाहीत. सगळा निधी त्या भागाकडे वळविला जात आहे. आमच्या पाठीवर हात ठेवावयास कोणी वजनदार माणूस उरलेला नाही. अक्षरश: घराघरात घुसून वीज कनेक्शन्स तोडण्यात आली आहेत. आज जाहीर केलेल्या पॅकेजचा फायदा कोणाला होणार आहे? श्रीमंतांचे घर सगळेच भरतात. गरिबांना मदत करण्याची नियत असेल तर पहिल्यांदा गरिबांचा विचार करावा आणि मग श्रीमंतांचा विचार व्हावा.

सभापती महोदय, वन्य जीव क्षेत्रात वाघांचे दर्शन आनंदाने करण्याकरिता वन्य क्षेत्रातील संरक्षण आणि पर्यटकांच्या दृष्टीने सुविधा वाढविण्याची आवश्यकता असल्यामुळे व्याघ्र प्रकल्पांसाठी 25 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत आहे.

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नंतर 3टी.1..

PFK/ पूर्वी श्री. भोगले..... 17:50

श्रीमती शोभा फडणवीस .....

मला या निमित्ताने सांगावेसे वाटते की, शासनाने फॉरेस्टचे बफर झोन निर्माण केले. त्यातील एक झोन माननीय पालक मंत्र्यांच्या भागात आहे तर दुसरे झोन माझ्या क्षेत्रात आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, वाघाला माणुसकी आणि प्रेमाने वागवा. माणुसकीने वागवा म्हणजे वाघाला मांडीवर घेऊन बसायचे काय ? वाघासारख्या क्रूर प्राण्याला माणुसकीने वागविण्याचा सल्ला देणारे हे सरकार मात्र आमचा आदिवासी माणूस वाघाच्या तोंडात मरताना आम्ही बघतो त्यावेळी शासनाची माणुसकी काय मेलेली असते, हे मात्र मला समजत नाही. कारण माणुसकीने जगण्याचे स्वातंत्र्य सुध्दा या शासनाने आम्हाला दिलेले नाही. शासनाचाच नारा आहे की, " SAVE TIGER " पण आमची अशी विनंती आहे की "SAVE TRIBLE". जंगलात राहणाऱ्या आदिवासीचा कुठेतरी शासनाने विचार करावा. कारण हा आदिवासी ज्यावेळी एखाद्या जंगली प्राण्याकडून मारला जातो तेव्हा त्याच्या वारसाला तीन-तीन, पाच-पाच वर्षे पैसे सुध्दा दिले जात नाहीत. त्यासाठी आम्हाला उपोषणाला बसावे लागते, यापेक्षा दुर्दैव ते कोणते. जंगलात राहणाऱ्या आदिवासीचे हे सर्वात मोठे दुर्दैव म्हणता येईल.

एक जण मला म्हणाला की ताई आपण भाग्यवान आहात, कारण आपल्याला येता-जाता वाघ दिसत असेल. मी त्याला म्हणाले की, आपण जरा माझ्यासोबत चला, मग आपल्याला समजेल की जंगलात राहणे कसे असते ? वाघ दिसतो हे दुरुन सांगायला चांगले असते, वाघ दुरुन बघायलाही चांगला असतो पण आजही या जंगलात पुरेसे रेंजर्स नाहीत, पिण्याच्या पाण्याची सोय नाही. टँकरने पाणी पुरवठा करायचा म्हटले तरी कोणत्या ठिकाणी आपण पाणी पुरवठा केला हे कसे समजणार आहे ? याचाही विचार करण्याची गरज आहे. वर्तमान पत्रात आलेल्या बातमीवरुन सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी मला म्हणाले की, ताई आपल्या क्षेत्रात वाघांची संख्या वाढली. मी त्यांना सांगितले की, वाघांची संख्या वाढलेली नसून त्यांनी केवळ बछडे मोजले म्हणून त्यांना संख्या वाढल्याचे वाटले. पण सध्या जंगलात जी परिस्थिती आहे त्यामुळे या वाघांना खायला मिळणार नाही, पाणी मिळणार नाही तर राहायला सुध्दा सुरक्षित जागा नाही. मग या वाढलेल्या वाघांना वाचविण्यासाठी कोणती उपाययोजना केली याचा विचार करण्याची गरज आहे. अशा प्रकारे या अर्थसंकल्पाला "अर्थ नसलेला अर्थसंकल्प" म्हटले तर ते वावगे ठरणार नाही, कारण संपूर्णपणे केंद्राच्या मदतीवर उभा असलेला हा अर्थसंकल्प आहे. त्यात कोणत्याही प्रकारची विशेष सोय केलेली दिसत नाही.

29-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3T-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ........

महोदय, शासनाने चंद्रपूर जिल्ह्यातील फ्लोराईडयुक्त पाणी असलेल्या गावांसाठी पाण्याचे नमुने तपासता यावेत म्हणून प्रयोगशाळा देण्याचे मान्य केले पण त्याचा उल्लेख या अर्थसंकल्पात कोठेही केलेला दिसत नाही. आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये प्रत्येक जिल्ह्यासाठी एक हजार विहिरी देण्याचे मान्य केले होते त्याचाही उल्लेख यामध्ये दिसत नाही.

महोदय, झोपडपट्टयांच्या बाबतीत बोलायचे तर झोपडयांचा विकास फक्त मुंबई, पुणे, कोल्हापूर किंवा सोलापुरपुरताच होतो. केवळ याच भागात झोपडया आहेत असे शासनाला वाटते काय ? विदर्भ किंवा मराठवाडा हे सुध्दा या राज्याचीच लेकरे आहेत. या भागात सुध्दा झोपडया वाढत आहेत, त्याबाबत मात्र कोणताही निर्णय शासनाने घेतल्याचे दिसत नाही. अधिवेशनासाठी मुंबईला आलो म्हणजे प्रश्न मुंबईचे, लक्षवेधी सूचना सुध्दा मुंबईच्याच. अर्थसंकल्प पाहिला तर तो देखील मुंबईसाठीच. मग आम्ही या राज्यात कोठे आहोत हा या निमित्ताने मला प्रश्न पडतो. कारण आमचा कोणताही उल्लेख यामध्ये दिसत नाही. म्हणून शासनाने विदर्भाच्या विकासासाठी ठोस असे प्रयत्न करण्याची गरज आहे, अशी मी विनंती करते.

शेवटी मी असे म्हणेन की, केंद्राच्या भरवशावरील अर्थसंकल्प देऊन आम्हाला कब्रस्थानात पाठविण्याची व्यवस्था शासनाने कृपा करुन करु नये. या निमित्ताने एक हिंदी शेर सांगते आणि माझे भाषण संपविते.

कब्रस्तान से गुजरने की जरुरत क्या,
स्मशानो में निकली किसानों की बारात.
महिलाओं की अर्थी उन्हीं के साथ
किसको कहे हम अपने दिल की बात
सत्ता के सूत्र है नामर्दों के हाथ

-----

श्री. एस.क्यू.ज़मा : महोदय, सम्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस जी ने शेर में जो अंतिम वाक्य कहा है वह कार्यवाही से निकाल दिया जाए.

-------

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अर्थसंकल्प सादर केल्यानंतर आज दुस-या दिवशी अर्थसंकल्पावर चर्चा होत आहे. अर्थसंकल्पावर पहिल्या दिवशी चर्चा होऊ शकली नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आज अर्थसंकल्पावर अतिशय चांगल्या प्रकारे चर्चा होत आहे. अर्थसंकल्पावर माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे भाषण अतिशय चांगले झाले आहे. माननीय रावते साहेब तर नेहमीच चांगले भाषण करीत असतात. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी तर अर्थसंकल्पावरील भाषण अतिशय उत्तम केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी तर अर्थसंकल्पावर अभ्यासपूर्ण भाषण केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी अर्थसंकल्पाच्या संदर्भात सरकारची बाजू चांगल्या रितीने मांडलेली आहे. अशा रितीने अर्थसंकल्पावरील चर्चा होणे ही महाराष्ट्राच्या लोकशाही परंपरेला साजेशी अशी बाब आहे. अर्थसंकल्पाच्या दृष्टीने या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी महाराष्ट्राच्या आर्थिक घडीचा आढावा घेतलेला आहे. चांगल्या व वाईट गोष्टी बरोबर ज्या गोष्टींची कमतरता आहे त्याच्या संदर्भातील ऊहापोह या ठिकाणी करण्याचा प्रयत्न सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणातून केलेला आहे. अर्थमंत्र्यांना एका बाजूने महसूल वाढविणे आणि दुस-या बाजूला खर्च व गुंतवणुकीची व्यवस्था करणे ही एक अतिशय तारेवरची कसरत करावी लागत असते. अर्थमंत्र्यांच्या हातात काही जादूची कांडी नसते हे आपण विसरु नये. अमेरिके प्रमाणे राज्याला आयकर लावता येत नाही तर आयकर लावण्याचे काम आपल्या केंद्र सरकारचे असते. महसूल वाढविण्याच्या दृष्टीने मोठा भाग बाजूलाच राहत असतो. परंतु आपल्याला यामध्ये काहीच करता येत नाही असे काही नाही. माननीय अर्थमंत्र्यांनी या अर्थसंकल्पात एक चांगली गोष्ट केलेली आहे. शेयर बाजार आणि वायदे बाजारावर वाढीव शुल्क आकारण्याचे काम त्यांनी केलेले आहे. अर्थमंत्र्यांनी हे काम अतिशय चांगल्या प्रकारे केलेले आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्प सादर करीत असताना आपण लक्षात घेतले पाहिजे की, गेली अनेक वर्षे तुटीचा अर्थसंकल्प मांडला जात होता परंतु या वर्षी मात्र 58 कोटी रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प मांडण्यात आलेला आहे. हे शिलकी 58 कोटी रुपये खर्च होतील याची आम्हाला कल्पना आहे. परंतु त्यातल्या त्यात एक शिलकी अर्थसंकल्प मांडल्याबद्दल आम्हाला आनंद झालेला आहे. तरी सुध्दा मी असे म्हणेन की, महाराष्ट्रत गेल्या काही वर्षात रिसोर्स मोबिलायझेशन ज्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई.....

प्रमाणात व्हावयास पाहिजे होते त्या प्रमाणात झालेले नाही. या अर्थसंकल्पात माननीय अर्थमंत्र्यांनी यासंदर्भात जरुर प्रयत्न केलेले आहेत. माननीय मंत्री महोदयांनी महाराष्ट्रातील आम आदमीवर फारसा कर पडणार नाही, महागाई वाढणार नाही, आम आदमीचा खिसा खाली होणार नाही याची काळजी घेतलेली आहे. परंतु श्रीमंताच्या खिशाला थोडी अधिक कैची लागली असती तर बिघडले नसते एवढे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते. श्रीमंत माणसावर थोडा अधिक कर लावला असता तर राज्याचे उत्पन्न वाढले असते. उदाहरण द्यावयाचे झाले तर मुंबईमध्ये दर दिवशी 300 मोठया गाडया येत असतात. या मोठया गाडयांवर कर लावला असता तर अधिक पैसे राज्य शासनाला मिळाले असते. मुंबईमध्ये प्रचंड मोठे फ्लॅट लोक विकत घेत असतात त्यामुळे यावरील डयुटी वाढवली असती तर शासनाला अधिक महसूल मिळाला असता. परंतु यासंदर्भात मंत्री महोदयांनी काहीही कर वाढवले नाही. फ्लॅटवरील ड्यूटी व मोठया गाडयांवरील कर वाढवला असता तर महाराष्ट्र शासनाला समाज कल्याणाची कामे अधिक चांगल्या रितीने करता आली असती.

सभापती महोदय, मुकेश अंबानी यांनी मुंबईमध्ये 3500 कोटी रुपये खर्च करुन एक बंगला बांधला असून हा बंगला वक्फ् बोर्डाच्या जागेवर बांधण्यात आलेला आहे. या बंगल्याचे दर महिन्याच विजेचे बिल 6.5 लाख रुपये येते अशी आम्हाला माहिती मिळालेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई .....

ही अत्यंत धक्कादायक गोष्ट आहे. त्यांच्या घरातील विजेची बिले त्यांची कंपनी भरत असते. असे जरी असले तरी राज्यात मोठया प्रमाणावर लोड शेडींग असल्यामुळे गरीब विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी पुरेशी वीज देता येत नाही . बिर्ला यांच्या पुस्तकामध्ये असा उल्लेख करण्यात आला आहे की, ते सर्व खोल्यांमध्ये जाऊन सर्वानी दिवे बंद केले आहेत किंवा नाही हे पहावयाचे आणि ज्याच्या खोलीमध्ये दिवा चालू आहे असे आढळून आले तर तो दिवा ते स्वत: बंद करावयाचे आणि दुस-या दिवशी त्याला रागवत असत. परंतु आता परिस्थिती पुष्कळ बदलली आहे. गरीब व्यक्तीबद्दल कोणी फारशी तमा बाळगत नाहीत, अशा लोकाना वेसण घालण्याचे काम या निमित्ताने करता आले असते असे मला वाटते.

सभापती महोदय, राज्यामधील शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी संजीवनी योजना आणली आहे.50 हजार रुपयांचे कर्ज माफ करण्यात आले आहे. त्यावरील व्याज मात्र माफ करण्यात आलेले नाही. 3 लाख रुपयापर्यंतच्या कर्जावर दोन टक्के व्याज आकारण्यात येणार आहे.ही शेतक-यांच्या दृष्टीने चांगली योजना आहे. सभापती महोदय, या ठिकाणी माननीय कृषी मंत्री जर उपस्थित असते तर अधिक बरे झाले असते. या अर्थसंकल्पामध्ये वा या पूर्वीच्या अर्थसंकल्पामध्ये राज्यात अन्नधान्याचे उत्पादन वाढावे या दृष्टीने जो प्रयत्न व्हावयास पाहिजे होता तो प्रयत्न दुर्देवाने होत नाही.कै. वसंतराव नाईक ज्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते त्यावेळी हरित क्रांती फक्त पंजाब राज्यामध्ये होती परंतु ती आपल्या राज्यामध्ये आणण्याचे काम त्यांनी केले होते.त्यानंतर या राज्यामध्ये कृषी उद्योग अधिक चांगल्या प्रकारे व्हावा आणि राज्याचे कृषी उत्पादन वाढावे या दृष्टीने खास प्रयत्न झालेले दिसत नाहीत. तृण धान्य आपल्या राज्यामध्ये फक्त 60 टक्के उपलब्ध असल्यामुळे 40 टक्के इतर राज्यातून आणावे लागते तेव्हा तृण धान्य वाढविण्याच्या दृष्टीने काय प्रयत्न करता येतील याचा विचार होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, कडधान्य आणि तेलबिया यांचे उत्पादन वाढविण्याच्या दिशेने जो प्रयत्न व्हावयास पाहिजे होता तो प्रयत्न दुर्देवाने होतांना दिसत नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी मघाशी असे सांगितले की, महाराष्ट्रामध्ये जास्तीत जास्त 25 टक्के क्षेत्र सिंचनाखाली येऊ शकते. कितीही प्रयत्न केला तरी हे प्रमाण 40 टक्क्याच्या वर जाऊ शकणार नाही. अशा परिस्थितीमध्ये कोरडवाहू शेतीच्या बाबतीत जे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई .....

काही संशोधन व्हावयास पाहिजे होते ते दुर्देवाने होत नाही. तेव्हा हे संशोधन करण्यासाठी काही जण प्रयत्न करीत आहेत. हैद्राबाद येथे "इक्रीसाड" नावाची एक संस्था असून त्यांनी नवीन बी बियाण्याचा शोध लावलेला आहे.संशोधन करण्याकरिता या संस्थेला अमेरिकेने 1500 कोटी डॉलर्सची आर्थिक मदत दिलेली आहे. तेव्हा कडधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी कोणते संशोधन करता येईल याबाबतीत आपण त्या संस्थेकडे विचारणा केली पाहिजे असे मला वाटते.तेलबिया आणि कडधान्याचे उत्पादन जर वाढले तर त्यातून कोरडवाहू शेतक-यांच्या हातामध्ये अधिक पैसे येतील तेव्हा या दृष्टीकोनातून शासनाने प्रयत्न करावेत असे मला सांगावयाचे आहे.

**( सभापती स्थानी तालिका सभापती श्री रामनाथ मोते )**

सभापती महोदय, ग्रामपंचायतीना सौर ऊर्जेच्या सहाय्याने सामुदायिक अभ्यासिका स्थापन करण्यासाठी 75 कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पात केल्या बद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. ही रक्कम आज जरी कमी वाटत असली तरी या कार्यक्रमास सुरुवात झालेली आहे ही चांगली गोष्ट आहे. मी सुध्दा अशाच प्रकारे कोठे ना कोठे तरी बसून अभ्यास केला होता. माझ्या प्रमाणे इतरही अनेक जणांनी अशाच प्रकारे अभ्यास केला असेल. गावा गावामध्ये ज्या प्रमाणे सौर ऊर्जाच्या सहाय्याने अभ्यासिका स्थापन करण्यात येत आहे त्याचप्रमाणे पुस्तकाची जर सोय केली तर बरे होईल.

सभापती महोदय, वडा पाव वरील व्हॅट साडेबारा टक्क्यावरुन 5 टक्के करण्यात आला आहे परंतु वडा पाव हे सर्वसामान्य व्यक्तीचे खाद्यान्न असल्यामुळे पाच टक्के व्हॅट तरी कशाला ठेवता ? हा पाच टक्के व्हॅटसुध्दा रद्द करण्यात यावा.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ 18:05

श्री. हुसेन दलवाई.

खरे म्हणजे परदेशामध्ये, अरब देशामध्ये वडा पावला फार महत्व प्राप्त झाले आहे, त्याठिकाणी वडा पावला इंडियन बर्गर म्हटले जाते. त्यामुळे वडा पाव व्हॅट फ्री करावा, त्यावरील कर पूर्णपणे माफ करण्याबाबत मंत्री महोदयांनी गंभीरपणे विचार करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यंत्रमाग आणि वीज मागासाठी 500 कोटींचे अनुदान देण्यात आले आहे. भिवंडी, मालेगाव, इचलकरंजी येथील यंत्रमागधारकांची बऱ्याच वर्षापासून मागणी होती ती पूर्ण करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे युवा व क्रीडा धोरणासाठी तरतूद करण्यात आली आहे. आज काल क्रिकेट खेळाबद्दल प्रचंड आकर्षण निर्माण झाले आहे. त्या शिवाय आपल्याकडे दुसरा कोणताही खेळ नाही असा चुकीचा समज आहे. या दृष्टीने कबड्डी, खो-खो या खेळांना सुध्दा उत्तेजन दिले पाहिजे. या खेळांसाठी करण्यात आलेली तरतूद अतिशय कमी असून ती वाढवून 100 कोटी करण्यास हरकत नाही.

सभापती महोदय, आश्रमशाळांसाठी 196 कोटी रुपये देण्यात आले आहेत ही अतिशय चांगली गोष्ट आहे. या निमित्ताने माझी अशी सूचना आहे की, गरीब मुस्लिम मुलांना घरामध्ये धड खायला मिळत नाही, त्या मुलांचे गरीब आई-वडील आपल्या मुलांचे पोषण करु शकत नाही म्हणून त्यांना मदरशामध्ये पाठवितात. मदरशांची संख्या कां वाढत आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आपल्या मुलाला त्या ठिकाणी किमान काही तरी खायला मिळेल, तो अडाणी रहाण्यापेक्षा थोडे तरी तिथे शिकेल या हेतूने त्या मुलाला मदरशामध्ये पाठविले जाते. अशाप्रकारच्या आश्रमशाळा काढा असे मी म्हणणार नाही, परंतु अशा यतीम खान्यांना आपण निधी दिला पाहिजे आणि हे यतीम खाने कुठल्या तरी शाळेशी जोडले गेले पाहिजेत . केवळ मदरशामध्ये राहून त्या मुलांचा पुढे विकास होणार नाही, त्यांना आपले जीवन नीट जगता येणार नाही याकरिता त्यांना चांगले तांत्रिक शिक्षण मिळेल, नेहमीची दुनियाईज तालीम मिळेल यादृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. हे प्रयत्न झाले तर मदरशांची संख्या कमी होईल. याचा अर्थ मी धर्माच्या विरोधात बोलत आहे अशाप्रकारची टीका काही लोक माझ्यावर करतील. परंतु मी हे धर्माच्या विरोधात मुळीच बोलत नाही. मी देखील धार्मिक शिक्षण घेतले आहे. प्रत्येक दिवशी अर्धा ते एक तास धार्मिक शिक्षण घेतल्यानंतर पुढील आवश्यक असलेले शिक्षण घेतले पाहिजे. आमच्या धर्मामध्ये आम्हाला हेच सांगितले आहे, आमच्या पैगंबराने आम्हाला हेच सांगितले आहे की, तुम्ही शिक्षण घेण्यासाठी चीनला गेलात तरी चालेल, परंतु तुम्ही शिक्षण घेतले पाहिजे. त्यादृष्टीने शासनाने प्रयत्न केले पाहिजेत अशी मी माननीय

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. हुसेन दलवाई....

अर्थमंत्र्यांना विनंती करतो. सच्चर समितीच्या अहवालामध्ये आश्रमशाळासंबंधी उल्लेख आहे, परंतु या अर्थसंकल्पामध्ये सच्चर समितीच्या शिफारशींबाबत फारसा उल्लेख झालेला दिसत नाही.

सभापती महोदय, ज्याप्रमाणे इतर ठिकाणी असलेल्या तीर्थक्षेत्रांना आपण अनुदान दिले आहे त्याप्रमाणे आपण मिरज येथील निरसाप दर्ग्याला अनुदान दिले आहे ही अतिशय चांगली गोष्ट आहे. या दर्ग्यामध्ये हिंदू व मुसलमान सर्व धर्माचे लोक जातात. म्हणून मला एक विनंती करावयाची आहे की, याकूब सरोहर हे छत्रपती शिवाजी महाराजांचे एक गुरु होते, त्यांच्या दर्ग्याकडे जाण्यासाठी साधा रस्ता सुध्दा नाही ही बाब महाराष्ट्राला भूषणावह नाही. दापोली येथील केळशी गावामध्ये असलेल्या या दर्ग्याला सुविधा पुरविण्यासाठी केलेली तरतूद कमी असून आपण या करिता 10 कोटींची तरतूद करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे दापोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक आणखीन सुशोभित करण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. रत्नागिरी जिल्ह्यातील मालगुंड हे कवि केशवसूतांचे गाव आहे. त्यांनी आपल्या कवितेमधून

"आम्ही कोण म्हणूनी काय पुसता,
आम्ही असू लाडके देवाचे,
जगे आम्हास गिळावया,
हिंदूही नाही, मुस्लिमही नाही,
मी एक पंथाचा"

ही शिकविण सांगितली होती, त्यांचे त्या ठिकाणी स्मारक आहे. ते पहाण्यासाठी मोठया प्रमाणावर पर्यटकही जात असल्यामुळे ते अधिक सुशोभित कसे होईल यादृष्टीने आपण प्रयत्न केले पाहिजेत अशी विनंती करतो.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आंगणेवाडीच्या जत्रेला प्रचंड प्रमाणात भाविक येतात.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई . . . .

तेथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नव्हती. मी पालकमंत्री असताना पहिल्या भेटीमध्ये कोणते काम केले असेल तर तेथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली होती. तेथे प्रचंड प्रमाणात लोक येतात, त्यांची सर्व व्यवस्था होईल यादृष्टीने काही प्रयत्न केले पाहिजेत आणि त्यासाठी निधीची तरतूद देखील करावी असे माझे म्हणणे आहे.

सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी राज्यावर 2 लाख 30 हजार कोटी रुपयांचे कर्ज असतानाही अर्थसंकल्प मांडलेला आहे. या कर्जाचे व्याजही मोठया प्रमाणात द्यावे लागते. शिवाय आता सहावा वेतन आयोग लागू झालेला आहे. सहावा वेतन आयोग लागू करण्यात येऊ नये असे माझे मुळीच म्हणणे नाही, तो दिलाच पाहिजे. कर्मचाऱ्यांकडून चांगले काम करुन घ्यावयाचे असेल तर त्यांना चांगले वेतन दिले पाहिजे, त्यांच्या रहाण्याची नीट व्यवस्था केली पाहिजे आणि ते सुखामध्ये रहातील हे पाहिले पाहिजे, असे झाले तरच ते भ्रष्टाचार करणार नाहीत आणि नीट काम करतील. परंतु हायर आणि फायर मात्र असले पाहिजे. त्यांनी कामच करावयाचे नाही असे असता कामा नये. परंतु सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी साहेब असे म्हणाले की, वेतनावरील खर्च 50 टक्क्यापर्यंत ठेवावा, सध्या ही टक्केवारी 70 टक्क्यापर्यंत गेलेली आहे. माझे असे म्हणणे आहे की, रिर्सोस मोबीलायझेशन करावे, तुम्हाला वेतन कमी करता येणार नाही. अनेक ठिकाणी कर्मचारीच नाहीत. त्यामुळे तेथे कर्मचारी घ्यावे लागतील आणि हे सर्व करावयाचे असेल तर रिर्सोस मोबीलायझेशनवर अधिक लक्ष देणे अतिशय आवश्यक आहे असे माझे म्हणणे आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी साहेबांनी असा उल्लेख केला की,महाराष्ट्र हे कर्जाच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. पहिला क्रमांक उत्तर प्रदेशचा आहे, दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र राज्य आणि तिसऱ्या क्रमांकावर बंगाल आहे आणि त्यानंतर इतर राज्ये आहेत. तेव्हा महाराष्ट्र राज्यावरील कर्ज कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावयास पाहिजेत. परंतु कर्जाच्या बोजामुळे घाबरुन चालणार नाही.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात भाषण करावे.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, मला भाषणासाठी निदान अर्धा तास तरी देण्यात यावा. मी आता माझ्या भाषणाला सुरुवात केलेली आहे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांना सांगू इच्छितो की, त्यांचे भाषण सुरु होऊन 20 मिनिटे झालेली आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, मग मला आणखी 20 मिनिटांचा वेळ देण्यात यावा.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई साहेबांना सांगू इच्छितो की, त्यांचे भाषण सुरु होऊन 20 मिनिटे झाली आहेत आणि अजून बऱ्याच सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, मला जरा बोलू द्यावे. याठिकाणी भाषण करण्यासाठी मी चार दिवस अर्थसंकल्पाचा अभ्यास केलेला आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, याठिकाणी सिंचनाच्या बाबतीत काही प्रयत्न केलेला आहे. पण लघु सिंचन प्रकल्पाबाबत अधिक भर द्यावयास पाहिजे, तो दिला जात नाही. तसेच कोकणासारख्या ठिकाणी जेथे मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो, तेथे मोठे प्रकल्प आणण्यापेक्षा डोंगर माथ्यावर पाणी कसे साठविता येईल याचा विचार झाला पाहिजे, पण तो होत नाही. महाराष्ट्रामध्ये 19 टक्के सिंचन झालेले आहे आणि कोकणामध्ये केवळ 5 टक्के सिंचन आहे ते कशा प्रकारे वाढेल यादृष्टीने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये वीज पंपांना सवलती देण्यात आली आहे ही चांगली गोष्ट आहे. पण मघाशी सन्माननीय सदस्यांनी सांगितले त्याच्याशी मी सहमत आहे की, कोकणामध्ये वीज पंप नाहीत. पश्चिम महाराष्ट्रामध्ये सगळे वीज पंप आहेत आणि त्यांच्यासाठी आपण सवलत देत आहोत. अन्नधान्यावरील सबसिडी 11 टक्क्याने कमी करण्यात आलेली आहे म्हणजे गरीबांच्या तोंडातील घास काढून घेण्याचे काम झालेले आहे. रिझर्व बँक ऑफ इंडियाचे माजी गव्हर्नर श्री.वाय.व्ही.रेड्डी यांनी असे म्हटलेले आहे की, देशामध्ये अन्नधान्याच्या किंमती स्थिर ठेवणे अतिशय आवश्यक आहे आणि ते सरकारच्या धोरणाचे सूत्र असले पाहिजे. तेव्हा आपल्याला खऱ्या अर्थाने गरीबांसाठी काही करावयाचे असेल तर याबाबतीत नीट विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, मी अगदी थोडक्यात विचार मांडणार आहे.उद्योगाच्या बाबतीत जी तरतूद केलेली आहे,ती यावेळी 50 टक्क्यांनी घटलेली आहे.सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी साहेबांनी भाषणामध्ये सांगितले की, उद्योगधंदा वाढला पाहिजे. पण मी त्यांना सांगू इच्छितो की,उद्योगधंद्या साठी तरतूदच केलेली नाही तर तो कसा वाढणार आहे? मागच्या वेळेला उद्योगधंद्या साठी जी तरतूद केली होती, त्याच्या 50 टक्के तरतूद कमी झालेली आहे म्हणजेच ...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई . . . .

दरवेळेस अर्थसंकल्पामध्ये उद्योगधंद्यासाठी करण्यात येणारी तरतूद कमी होत गेली आहे आणि असे झाले तर महाराष्ट्रामध्ये उद्योगधंदा वाढणार नाही असे माझे मत आहे, राज्याचा क्रमांक खाली जाईल. परंतु तसे होऊ नये यादृष्टीने शासनाने प्रयत्न केला पाहिजे. जर उद्योगधंद्यामध्ये गुंतवणूक व्हावयास हवी असेल तर काही आर्थिक सवलती देखील द्यावयास पाहिजेत. त्याहीपेक्षा नियमितपणे वीज पुरवठा, पाणी उपलब्ध केले पाहिजे आणि सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी साहेबांनी एका गोष्टीचा उल्लेख केला नाही, परंतु मी त्याचा उल्लेख करणार आहे आणि ती गोष्ट म्हणजे जमीन. सध्या महाराष्ट्रामध्ये उद्योगधंद्यासाठी जमीन उपलब्ध होणे फार कठीण झालेले आहे. कारण लोक आपली जमीन देण्यास तयार नाहीत. कारण जे प्रकल्पग्रस्त असतात, त्यांचे पुनर्वसन वेळेवर होत नाही किंवा बहुधा ते होतच नाही. त्यामुळे लोक आपली जमीन देण्यास घाबरतात. म्हणून जर आपल्याला उद्योगधंद्यासाठी जमीन हवी असेल तर प्रकल्पग्रस्तांच्या मनामध्ये एक आश्वासित असे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे.... 18:15

श्री. हुसेन दलवाई....

त्याच बरोबर डेव्हलपमेंटल क्लस्टर निर्माण केले पाहिजे आणि कामगारांच्या राहण्याची व्यवस्था त्या त्या भागात केली पाहिजे. आपण नेहमी या ठिकाणी चीन बद्दल चर्चा करीत असतो. चीनमध्ये कामगारांची राहण्याची व्यवस्था तरी असते. पण आपल्याकडे एका खोलीत दहा ते पंधरा कामगार राहतात. झोपडपट्टयात राहतात आणि कसे तरी जीवन जगतात.तेव्हा याबाबतीत सुध्दा विचार करण्यात यावा, अशी मी सूचना करतो.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्याच्या संबंधात बोलावयाचे झाले तर कोकणात एकही मोठे रुग्णालय नाही. कोकणात मोठे प्रकल्प आहेत. उद्या त्या ठिकाणी काही दुर्घटना घडली तर त्या लोकांना मुंबईत यावे लागेल. माझ्या एका मित्राची मुलगी रायगड येथे पर्यटनासाठी गेली होती. तेथे उडी मारताना पडली त्यानंतर ती तेथून मुंबईत येईपर्यंत तिचे निधन झाले. आम्ही कोकणातील सगळे सदस्य सुशिक्षित आहोत. आम्ही या ठिकाणी उपस्थित करण्यात येणाऱ्या प्रत्येक प्रश्नावर आमचे विचार मांडतो. पण कोकणात चांगले रुग्णालय नाही, तेव्हा याही बाबतीत विचार करावा, अशी मी सूचना करतो.

डॉ. नीलम गोऱ्हे (बसून) : रत्नागिरीला फक्त एक मनोरुग्णालय आहे.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, आमच्यावर इतका अन्यय होतो की, आम्ही मनोरुग्णच होणार. डॉ. नीलम गोऱ्हे फार चांगल्या बोलल्या. आम्ही जास्त शिकलेले असल्यामुळे मनोरुग्ण होणार नाही. सभापती महोदय, कोकणात एक तरी वैद्यकीय महाविद्यालय असले पाहिजे, कोकणात एकही वैद्यकीय महाविद्यालय नाही, ही अतिशय चुकीची गोष्ट आहे. हाफकिन इन्स्टिटयुट बंद करण्याचे चालले आहे. वाडिया हॉस्पिटल बंद करण्याचे चालले आहे. ज्या सार्वजनिक रुग्णालयात गरीब माणसे जातात, त्या रुग्णालयांची आज काय अवस्था आहे? याचे वर्णन सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केलेले आहे. त्यामुळे मी त्याबाबत जास्त बोलणार नाही. पण ही सर्व रुग्णालय चालू राहतील या दृष्टिकोनातून शासनाने काही उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई....

सभापती महोदय, पर्यटन व वन पर्यटनावर मी बोलू इच्छितो. वेगवेगळया ठिकाणी लोक यात्रेसाठी जातात,त्याप्रमाणे देशातील आणि परदेशातील लोक पर्यटनासाठी कोकणात मोठया प्रमाणात येतात. पण कोकणात जाण्यासाठी चांगले रस्ते नाहीत. दापोली जिल्हयातील मुरुड येथे अतिशच चांगला व स्वच्छ समुद्र आहे, त्यामुळे लोकांना या ठिकाणी पर्यटनासाठी येण्यास आवडते. पण त्या ठिकाणी जाताना खूप त्रास होतो, म्हणून दुसरा पर्यायी रस्ता करण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी पर्यटनाचे वातावरण निर्माण करावयाचे असेल तर तेथे लागणारे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करण्याची आवश्यकता आहे. पण त्यासाठी करण्यात आलेली तरतूद अत्यल्प आहे. कोकणचा खऱ्या अर्थाने विकास करावयचा असेल तर तो पर्यटनाच्या माध्यमातून होईल. पण त्याबाबतीत दुर्दैवाने प्रयत्न केले जात नाहीत. वन पर्यटनचा उल्लेख अर्थसंकल्पावरील भाषणात करण्यात आलेला आहे. खरे म्हणजे कोकणात वन पर्यटनाला फार मोठा वाव आहे, पण दुर्दैवाने या संदर्भात फारसे काही केले जात नाही.

सभापती महोदय, दुग्ध व्यवसायाच्या दृष्टीने सकस चारा निर्माण करावा असे केंद्र शासनाचे प्रयत्न चाललेले आहेत. त्यासाठी तरतूदही केलेली आहे. महाराष्ट्राने त्याचा उपयोग करुन घ्यावा. तसेच पशुखाद्य दर्जेदार निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत, अशी सूचना मी करतो.

सभापती महोदय, शिक्षण हा माझा आवडीचा विषय असल्यामुळे मी या संदर्भात थोडे जास्त बोलणार आहे. शिक्षणाच्या संदर्भात जी तदतूद केलेली आहे, ती तरतूद आकडेवारीनुसार मोठी दिसत असली तरी पण सहावा वेतन आयोग लागू झालेला आहे. महागाई दहा टक्के वाढलेली आहे. त्यामुळे ही तरतूद वाढीव आहे, हे मी मानावयास तयार नाही. शिक्षणाच्या संदर्भात आपण प्रबोधन करीत असतो. सर्वांनी शिकले पाहिजे, अमुक केले पाहिजे, तमुक केले पाहिजे असे सांगतो. पण मला या ठिकाणी सांगण्यास वाईट वाटते की, शिक्षणाच्या संदर्भात बहुजन समाजाच्या मुलांचे सरस्वतीच्या मंदिराचे दरवाजे बंद करण्याचे धोरण चालले आहे, ते अत्यंत चुकीचे आहे. या संबंधात माझे असे म्हणणे आहे की, या विना अनुदानित शाळा सुरु ठेवण्यात याव्यात. मराठी माध्यमाच्या, उर्दू माध्यमाच्या शाळा लोक काढतात, ती चांगली गोष्ट आहे. या शाळांमधील

...3...

श्री. हुसेन दलवाई.....

शिक्षकांचे पगार शासनाने दिले पाहिजेत सन 2003 मध्ये शासनाने शिक्षण सेवकांच्या बाबतीत निर्णय घेतला आणि या शिक्षण सेवकांना तीन हजार रुपये पगार देण्याचे धोरण आखण्यात आले. रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या माणसाला दिवसाला 120 रुपये पगार दिला जातो आणि या शिक्षण सेवकांना दिवसाला फक्त 98 रुपये दिले जातात. शासन सर्व ठिकाणी मोठया प्रमाणावर खर्च करीत असताना शिक्षकांवर खर्च करु शकत नाही काय?

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई ...

शिक्षणाच्या संदर्भात जी भूमिका आहे त्यामध्ये जे लोक शिकले, जे मोठ्या प्रमाणावर महर्षी बनलेले आहेत त्यांना आता खालच्या लोकांना शिकविण्याची इच्छा नाही, हे यातून दिसते आणि ही गोष्ट चांगली नाही. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, त्यांना ताबडतोबीने किमान 5 हजार रुपये पगार मिळेल अशी व्यवस्था होणे आवश्यक आहे. दरवर्षी साधारण: 15 हजार शिक्षणसेवक नेमले जातात. त्यांची या दृष्टीने काही व्यवस्था केली आहे असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियान हे चांगले पाऊल आहे. प्राथमिक शिक्षण दर्जेदार व्हावे म्हणून नवीन इमारती, स्वच्छतागृहे करीत आहात या अतिशय चांगल्या गोष्टी आहेत. पण इयत्ता सातवीनंतर विद्यार्थ्यांनी काय करावयाचे ? इयत्ता आठवी ते दहावीच्या बाबतीत काहीही नीट व्यवस्था नाही. माध्यमिक शाळांसाठी अधिक तरतुदीची गरज आहे. केंद्र शासनाच्या माध्यमिक शिक्षण योजनेला मॅचिंग ग्रँट म्हणून शासनाने काही व्यवस्था केलेली आहे पण ती व्यवस्था पुरेशी नाही. शिक्षण विभागाकडे इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतचे वर्ग येतात. सगळे तज्ज्ञ सांगतात की, मुलांच्या मेंदूची वाढ 3 ते 6 वर्षे वयामध्ये होते. पण नर्सरी असेल, ज्युनियर के.जी. असेल, सिनियर के.जी.असेल हे वर्ग कोणत्या विभागाकडे येतात हे माहीत नाही. खरे म्हणजे हे वर्ग शिक्षण विभागाला जोडले पाहिजेत. आपण शिक्षणाचा अधिकार म्हणतो परंतु त्या दृष्टीने काही प्रयत्न केले जात नाहीत. आदिवासींच्या शिक्षणाच्या संदर्भात 10 टक्के कपात आहे. दलितांच्या शिक्षणाच्या संदर्भात 10 टक्के कपात आहे. सामाजिक न्यायाच्या संदर्भात 10 टक्के कपात आहे. त्या शिक्षकांना पगार मिळत नाही. त्या बाबत आज आरडाओरड होते.

सभापती महोदय, अल्पसंख्याक समाजाच्या शिक्षणाच्या संबंधामध्ये सुध्दा प्रचंड हेळसांड होते. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी एक गोष्ट या ठिकाणी मांडली आणि त्यांनी सांगितले की, ते मला कळले नाही. पण मला ते कळले आहे. सच्चर समितीच्या बाबतीत त्यांनी सांगितले. दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या शहरामध्ये जास्त आहे. त्या मानाने ग्रामीण भागात कमी संख्या आहे. शहरामध्ये जी जास्त संख्या आहे त्यामध्ये सगळ्यात जास्त मुस्लीम समाज आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. हुसेन दलवाई .....

मुंबईमध्ये, ठाण्यामध्ये, पुण्यामध्ये अशी अनेक ठिकाणे आहेत की, ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर मुस्लीम वस्ती आहे. परंतु दुर्दैवाने त्या ठिकाणी शाळाच नाही. वडाळा सारख्या ठिकाणी मुलींची शाळा नसल्यामुळे त्या रात्रीच्या शाळेत जातात. या बाबतीत काही तरी व्यवस्था केली गेली पाहिजे. मी जे सुचविले त्या प्रमाणे ते करता येईल. त्या संदर्भामध्ये अधिक विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, शाळेतील पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेबाबत सांगावयाचे तर 31 टक्के शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. 45 टक्के शाळांमध्ये स्वच्छतागृह नाही. 55 टक्के शाळांमध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे नाहीत. 3 हजार शाळांमध्ये फळाच नाही. ही जी अवस्था आहे ती बंद झाली पाहिजे. त्या दृष्टीने सगळ्यांनी प्रयत्न करावा. अल्पसंख्याक विभागाच्या संदर्भात काही गोष्ट या ठिकाण्ी होत आहेत पण ते अधिक चांगल्या रितीने होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब चिडणार नाही अशी अपेक्षा करुन मी अशी सूचना करतो की, मराठी शाळांमध्ये उर्दू विषय जर शिकवला गेला तर उर्दू शाळांचे जे वेड आहे ते कमी होईल. मी चांगल्या हेतूने ही सूचना करीत आहे. त्या ठिकाणी तो विषय ऑप्शनल असेल. इतरांना शेर-शायरी करण्यासाठी उर्दू शिकावयाचे असेल तर त्या बाबत आपला विरोध असण्याचे काही कारण नाही. उर्दू ही केवळ मुसलमानांचीच भाषा आहे असे समजण्याचे कारण नाही. म्हणून मी या वेळी सुध्दा ही सूचना करतो आणि मी माझे भाषण संपवितो.

---

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ पूर्वी श्री.बरवड 18:25

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी दिनांक 23 मार्च, 2011 रोजी राज्याचा अर्थसंकल्प मांडला आहे. त्यांनी त्या दिवशी केलेल्या भाषणाबद्दल माझी नाराजी व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मागील अर्थसंकल्पात केलेल्या घोषणा पुढील वर्षी दिसत नाहीत. या वर्षी ज्या अर्थ मंत्र्यांनी घोषणा केलेल्या असतात त्या घोषणा अर्थ मंत्री बदलल्यामुळे विरुन जातात. गेल्या वर्षी कोकणातील मंत्री महोदयांनी अर्थसंकल्प सादर केला होता. परंतु त्यांना एक वर्ष होत नाही तोपर्यंत त्यांचे अर्थमंत्री पद पश्चिम महाराष्ट्राला मिळाले. परत एकदा कोकणासाठी दिलेल्या घोषणा या वेळचे अर्थमंत्री विसरुन गेले. कोकणी माणसांची फसवणूक करणारा हा अर्थसंकल्प तयार केलेला आहे. मागील वर्षी या सभागृहात लोकाभिमुख योजना, सर्वसामान्य माणसासाठी आणि गोरगरिबांना उपयुक्त ठरलेली जीवनदायी योजना घोषित केली होती. त्यासंबंधी माननीय आरोग्य मंत्र्यांनी विभागवार बैठका घेतल्या. त्या योजनेतील त्रुटींबाबत चर्चा करण्यात आली. प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे या अधिवेशनात माननीय मुख्यमंत्र्यांनी 7 जिल्ह्यात ही योजना प्रभावीपणे राबविण्याची काल घोषणा केली. प्रत्यक्षात ही घोषणा होण्यासाठी विलंब झालेला आहे. मंत्री महोदय सभागृहात घोषणा करतात, त्यांचे पालन केले जात नाही. सभागृहाच्या बाहेर घोषणांची खैरात केली जाते. घोषणा करुन जो शब्द दिला जातो तो पाळला पाहिजे, जनतेचे प्रश्न सोडविले पाहिजेत अशी मंत्री महोदयांची भावना दिसून येत नाही. सभागृहात सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाच्या अनुषंगाने जी आश्वासने दिली जातात ती पाळली जात नाहीत.

गेल्या निवडणुकीपूर्वी 24 जून रोजी कोकणात मंत्रिमंडळाची बैठक झाली होती. त्या बैठकीत कोकणासाठी घबाड देण्याच्या घोषणा करण्यात आल्या. कोकण पॅकेज अंतर्गत 5 हजार 332 कोटी रुपये देण्याचे जाहीर करण्यात आले. नेहमी प्रमाणे त्यावेळी जाहीर केलेले पैसे आजही मिळालेले नाहीत. कोकणातील अनेक सन्माननीय सदस्यांच्या भाषणातून ते व्यक्तही होत असते. मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी मंत्री व अधिकारी येतात. त्यांच्या जाण्यायेण्यावरच कोट्यवधी रुपये खर्च होतो. कोकण पॅकेज अंतर्गत जाहीर झालेल्या 5 हजार 332 कोटी रुपयांच्या संदर्भात

2...



NTK/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर....

25 ऑगस्ट रोजी जी.आर.निघाला आहे. त्यात हे पैसे तीन टप्प्यात देण्याचे नमूद केलेले आहे. 2012 साली शेवटचा टप्पा पूर्ण होणार आहे. या बाबत मी मागील अधिवेशनात लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्यावेळी मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, सन 2009-10 या वर्षासाठी 2908 कोटी रुपये, सन 2010-11 या वर्षासाठी 1370 कोटी रुपये व सन 2011-12 या वर्षासाठी 1032 कोटी रुपये दिले जाणार आहेत. प्रत्यक्षात किती पैसे मिळाले याबाबत मी थोडक्यात सांगू इच्छितो. कोकणातील 48 बंदरांमधील गाळ काढण्याच्या कामाचा या पॅकेजमध्ये समावेश केला होता. ड्रेझर खरेदी करण्यासाठी 60 कोटीं रुपये दिले होते. मी याबाबत एक प्रश्न विचारला होता त्यासंबंधी जिल्ह्याचे माननीय पालक मंत्री व उद्योग मंत्री यांनी असे उत्तर दिले होते की, परदेशातून ड्रेझर खरेदी करण्यासाठी निविदा मागविली आहे. या ड्रेझरची आजपर्यंत खरेदी झालेली नाही. त्यामुळे गाळ काढण्याचा प्रश्न मिटलेला नाही. यावेळी बंदरातील गाळ काढण्यासाठी 20 कोटी रुपये देण्याची घोषणा केलेली आहे. पण ड्रेझरशिवाय गाळ काढला जाणार आहे. त्यावेळी ड्रेझर खरेदी करण्याची योजना तयार केली. प्रत्यक्षात ड्रेझर दिला गेला नाही.

कोकणामध्ये केवळ 5 टक्के सिंचन झाले आहे, त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनीही केला आहे. या सिंचनासाठी 3 वर्षामध्ये 550 कोटी रुपये देण्याचे जाहीर केले होते. प्रत्यक्षात 350 कोटी रुपये दिले गेले. कोकणातील प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या जमिनीचे मोबदले मिळत नाहीत. अनेक प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झालेले नाही. अनेक प्रकल्पग्रस्त आज रस्त्यावर उतरु लागले आहेत. टाळंबा धरणातील अनेक कुटुंबांनी आंदोलनात भाग घेतला, अशा 2500 धरणग्रस्तांनी स्वत:ला अटक करुन घेतली होती. प्रकल्पग्रस्तांची ही अवस्था असल्यामुळे कोकणात प्रकल्प होत नाहीत.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड.उषा दराडे )**

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:30

श्री. परशुराम उपरकर...

आज कोकणामध्ये शेती व्यवसायाला चालना मिळू शकेल, कोकण सुजलाम् सुफलाम् होऊ शकेल असे प्रकल्प कोकणामध्ये झालेले नाहीत. 1970 सालामध्ये सुरु केलेले प्रकल्प अद्याप पूर्ण झालेले नाहीत. त्या प्रकल्पाची किंमत आता चार पटीने वाढलेली आहे. त्याच प्रमाणे कोकणातील वनसंज्ञेचा प्रश्न देखील सुटलेला नाही. कोकणासाठी जे पॅकेज दिले होते त्या पॅकेजमध्ये सागरी महामार्गासाठी 67 कोटी, रस्ते विकासासाठी 224 कोटी, वाडीजोड रस्त्यासाठी 105 कोटी, पर्यटनाच्या ठिकाणी जाणा-या रस्त्यांच्या विकासासाठी 190 कोटी, तसेच प्रत्येक जिल्ह्यामध्ये समुद्र आणि धार्मिक स्थळांच्या ठिकाणी ॲप्रोच रोड करण्यासाठी 60 कोटी, पाणलोट विकास मिशनसाठी 150 कोटी, फळप्रक्रियेसाठी 39 कोटी, नळ पाणी पुरवठा योजनेसाठी 315 कोटी आणि आयटीआय पॉलिटेक्निक साठी 115 कोटी अशी तरतूद होती. आता कोकणातील आयटीआय बीओटी तत्वावर जिंदालला दिलेले आहे.

सभापती महोदय, कोकण पॅकेजसाठी केन्द्र शासनाकडून किंवा राज्य शासनाकडून पैसे आले तरी त्या पैशाचा विनियोग करण्याच्या संदर्भात जो शासन निर्णय काढला जातो त्यामध्ये "असे वाचावे की, हा आलेला निधी कोकण पॅकेज समजावा" अशा प्रकारचा वाक्य प्रयोग करुन कोकणातील लोकांची घोर फसवणूक करण्याचे काम मंत्रिमंडळाच्या माध्यमातून होत आहे. तत्कालीन मुख्यमंत्री जेव्हा कोकणात आले होते त्यावेळी त्यांनी 200 कोटीचे पॅकेज जाहीर केले होते. आताचे राज्याचे नवे मुख्यमंत्री जेव्हा कोकणच्या दौ-यावर गेले त्यावेळी त्यांनी काँग्रेसचा मेळावा घेतला आणि त्या मेळाव्यामध्ये कोकणाला दिलेले पॅकेज योग्य पध्दतीने खर्च होऊ शकले नाही हे कबूल केले. एका माजी मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या पॅकेजच्या बाबतीत नंतर आलेल्या मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले की ते पॅकेज वितरित झालेले नाही. त्या काँग्रेसच्या मेळाव्यात नव्या मुख्यमंत्र्यांनी पर्यटनासाठी तसेच किल्ल्यांचे संवर्धन करण्याची घोषणा केली असताना आता सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पामध्ये त्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही. म्हणजे काँग्रेसच्या मेळाव्यात मुख्यमंत्र्यांनी कोकणी जनतेला दिलेला शब्द पाळलेला नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. अर्थसंकल्पामध्ये कोकणातील गड, किल्ल्यांसाठी 20 कोटीची तरतूद केलेली आहे एवढेच मला सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे.

श्री. परशुराम उपरकर : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, 12व्या वित्त आयोगाकडून साडेसात कोटी रुपये सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग किल्ल्यासाठी आले होते. परंतु ते पैसे हे शासन खर्च करु शकले नाही हे स्वत: पर्यटन मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे. म्हणजे नुसत्या घोषणा करायच्या, अर्थसंकल्पामध्ये तरतूद दाखवायची आणि प्रत्यक्षात काहीही खर्च करायचा नाही असे या सरकारचे धोरण असेल तर त्यामधून कोकणातील प्रश्न सुटू शकणार नाहीत. कोकणासाठी दिलेल्या पॅकेजसंबंधी जी.आर. काढण्यात आले. परंतु त्या जी.आर.प्रमाणे खर्च झालेला नाही.

सभापती महोदय, कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये विमानतळ होण्यासाठी तीन वेळा भूमिपूजन झाले. तीन वेळा तीन दगड लागले. सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री हेच उद्योगमंत्री आहेत. त्यांच्या हस्ते विमानतळाच्या जागेचे तीन वेळा भूमिपूजन झाले. परंतु अद्याप त्या विमानतळाचा कुठे पत्ताच लागत नाही. हे विमानतळ केव्हा होणार हे एकदाचे जाहीर करुन टाकावे, किंबहुना ते होणार नसेल तर तसे नाही म्हणून सांगावे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री. शिगम 18:35

श्री. परशुराम उपरकर...

राज्य शासनाने अन्य जिल्हयांमधील विमानतळ करण्यासाठी 150 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सिंधुदूर्ग जिल्हयात विमानतळ करण्यास मात्र शासनाने एकाही पैशाची तरतूद केलेली नाही.

सभापती महोदया, आरोग्य विभागाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी व्यथा मांडली. कोकणात गेल्या बारा वर्षापासून लॅप्टोची साथ येते आहे. गेल्या वर्षी लॅप्टोच्या आजारामुळे 25 रुग्ण मृत झाले. गेल्या बारा वर्षात जवळपास 100 रुग्ण या आजारामुळे मृत झाले आहेत. दोन वर्षापूर्वी लॅप्टोच्या साथीवर नियंत्रण आणण्यासाठी प्लेटलेट सेप्रेशन युनिट करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला गेला. परंतु ते युनिट अद्यापर्यंत सुरु झालेले नाही. डिसेंबर,2010 मध्ये सदर युनिट चालू करण्याची घोषणा माननीय मंत्र्यांनी केली. त्या घोषणेची देखील अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. अजून किती रुग्णांचे प्राण जावेत असे या शासनाला वाटते. सिंधुदूर्ग जिल्हयातील बऱ्याच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी नाहीत. एक्स-रे मशीन आहे, परंतु ते ऑपरेट करण्यासाठी एक्स-रे तंत्रज्ञ नाही. सिटी स्कॅन मशीन ऑपरेट करण्यासाठी महिन्यातून एक वेळा कोल्हापूर येथून तंत्रज्ञ येईल अशी घोषणा झाली. परंतु कधीही तंत्रज्ञ आले नाहीत. शेवटी ती मशीन बंद झाली आहे. सिटी स्कॅन मशीनची सुविधा रुग्णांना मिळत नाही. एखाद्या रुग्णाला तातडीने उपचार करावयाचे असतील तर त्यास गोवा किंवा मुंबई किंवा कोल्हापूर येथे न्यावे लागते. तो रुग्ण गोवा,मुंबई अथवा कोल्हापूर येथील रुग्णालयात ॲडमीट होण्यापूर्वी मृत होतो. रुग्णांचे जीव घेण्याचे काम शासनाच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून केले जात आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आरोग्य केंद्रामध्ये सिटी स्कॅन मशीन व इतर सुविधा रुग्णांना उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने तरतूद केलेली नाही.

सभापती महोदया, सिव्हील सर्जन यांची बदली करण्याबाबत सभागृहात अनेक वेळा चर्चा झाली. त्या चर्चेच्या वेळी माननीय आरोग्य मंत्र्यांनी सांगितले की, सदर सिव्हील सर्जनची तातडीने बदली करण्यात येईल. परंतु अद्यापही त्यांची बदली करण्यात आलेली नाही. सभागृहातील दोन्ही बाजुच्या सदस्यांनी त्यांच्या बदलीची मागणी केलेली आहे. परंतु अद्यापही त्यांची बदली करण्यात आलेली नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यात आरोग्य विभागाची पूर्णपणे वाट लागलेली आहे. त्यामुळे सिव्हील सर्जन यांची तातडीने बदली करण्याबाबतचे शासनाने आदेश दिले पाहिजेत.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

सभापती महोदया, मुंबई-गोवा महामार्गावर दोन वर्षात 1500 अपघात झाले. या अपघातामध्ये 900 व्यक्ती मृत झाल्या आहेत. 4500 व्यक्ती या अपघातामुळे गंभीर जखमी झाल्या आहेत. मुंबई-गोवा महामार्गाचे नूतनीकरण करण्यासाठी शासनाने गेल्या पाच वर्षात एक रुपयाची देखील तरतूद खर्च केलेली नाही. या महामार्गाच्या दुरुस्ती व नूतनीकरणाच्या कामासाठी 150 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती, परंतु प्रत्यक्षात शासनाने 32 कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करुन दिली आहे.

सभापती महोदया, राज्यातील अनेक महामार्गांचे चौपदरीकरणाची कामे झाली आहेत. कोकणातील 17 नंबरच्या महामार्ग आहे, त्याचे चौपदरीकरण करणे गरजेचे आहे. परंतु त्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु हा महामार्ग चौपदरी करण्यासंदर्भात या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली नाही, ही अतिशय दुर्देवी बाब आहे असे मला आवर्जून नमूद करावेसे वाटते.

सभापती महोदया, या सभागृहात पर्यटनाच्या विकासाच्या बाबतीत शासनाकडून मोठे कौतुक केले जाते. सिंधुदूर्ग जिल्हयात पर्यटन विकास मोठया प्रमाणात झाला पाहिजे व त्यासाठी निधीची उपलब्धता करुन दिली पाहिजे. परंतु शासनाकडून पर्यटन विकासाच्या कामासाठी पुरेशा प्रमाणात तरतूद उपलब्ध करुन दिली जात नाही. पर्यायाने पर्यटनाचा पूर्णपणे विकास होत नाही असे मला खेदाने नमूद करावेसे वाटते. सागरी महामार्गाची देखील शासनाने दुर्दशा करुन ठेवलेली आहे. सागरी महामार्गांचा विकास मोठया प्रमाणात झाला पाहिजे.

सभापती महोदय, कोकणातील जे प्रमुख महामार्ग आहेत, त्या ठिकाणी ट्रामा केअर सेंटर्स असण्याची गरज आहे. कोकणातील सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी या जिल्हयातील महामार्गांवर कोठेही ट्रामा केअर सेंटर्स उभारण्यात आलेली नाहीत. मागील वित्तमंत्र्यांनी सांगितले की, रायगड जिल्हयात अशा प्रकारचे सेंटर्स उभारण्यात येतील. प्रत्यक्षात एकही सेंटर उभारण्यात आलेले नाही. मागच्या वर्षाच्या अर्थसंकल्पात रायगड येथे एक वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचे नमूद करण्यात आले होते. त्या ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालय सुरु झाले आहे किंवा नाही याचा या वर्षाच्या अर्थसंकल्पात कुठेही उल्लेख केलेला दिसून येत नाही.

3...



ABG/ प्रथम श्री. शिगम 18:35

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

सभापती महोदया, कोकण रेल्वे पश्चिम महाराष्ट्राला जोडण्यासाठी " रत्नागिरी-कराड " व "वैभववाडी-कोल्हापूर" या लोहमार्गाचे सर्वेक्षण करण्यासाठी घोषणा झाल्या. परंतु त्या घोषणेच्या बाबतीत देखील या अर्थसंकल्पात कुठेही उल्लेख दिसून येत नाही ही देखील दुर्देवी बाब आहे.

सभापती महोदया, रेड्डी बंदराचे काम तीन वर्षापूर्वी बी.ओ.टी.तत्वावर दिले आहे. सदर बंदराचे काम बी.ओ.टी.तत्वावर देताना संबंधित ठेकेदाराने 4 कोटी रुपये शासनाकडे भरले. त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची सुविधा नाही. पूर्वी मालाच्या निर्यातीचा दर 20 रुपये प्रति टन असा दर होता, तो  65 रुपये प्रति टन केला. गेल्या तीन वर्षात 30 लाख टन माल निर्यात केला. 65 रुपये प्रति टन या दराने संबंधित ठेकेदाराने कोणतीही सुविधा न देता 18 कोटी रुपये मिळविले....

यानंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर........

4 कोटी रुपये भरले परंतु कोणत्याही सुविधा दिल्या नाहीत. 18 कोटी रुपये उत्पन्न मिळविले आहे. समुद्रमार्गे वाहतूक करीत असताना मागील तीन वर्षात 600 कोटी रुपयांची उलाढाल झाली. परंतु अद्याप त्या बंदराचा कोणताही विकास होऊ शकलेला नाही.

(**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**)

सभापती महोदय, माननीय शिक्षणमंत्र्यांनी कोकण पॅकेजमधून कोकणात दहावी व बारावी परीक्षा मंडळ स्थापन करण्याची घोषणा केली. दिनांक 14 मार्च, 2011 रोजी शासनाने जीआर निर्गमित केला. परंतु या मंडळासाठी अद्याप जागा निश्चित केलेली नाही किंवा स्टाफ मंजूर केलेला नाही. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हयात बी.एड व डी.एड शिक्षक भरती करीत असताना स्थानिक उमेदवारांना प्राधान्य द्यावे यासाठी लोकप्रतिनिधी व पालकांमार्फत मागणी करुन त्याकडे शासनाने दुर्लक्ष केले. परिणामी कोकणातील शिक्षक उमेदवारांना न्यायालयाचे दरवाजे ठोठावे लागले. अशा प्रकारे शासनाकडून कोकणातील शिक्षक उमेदवारांवर अन्याय केला जात आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यासह कोकणाला 720 कि.मी.चा सागरी किनारा लाभला आहे. या सागरी किनाऱ्यावरील मच्छिमारांना फयान वादळ, बदलते हवामान याचा परिणाम सहन करावा लागत आहे. मासेमारी करीत असताना मत्स्य दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. मच्छिमारांनी जी कर्जे घेतली होती त्या कर्जाची ते परतफेड करु शकले नाहीत. त्यांच्यावर महसूल विभागाने रेव्हेन्यू रिकव्हरी नियमानुसार जप्तीची कार्यवाही सुरु केलेली आहे. मच्छिमारांची तुटपुंजी प्रॉपर्टी जप्त करण्याचे प्रयत्न सुरु झाले आहेत. ही कारवाई ताबडतोब थांबवून मच्छिमारांनी 1994 पूर्वी घेतलेली कर्जे माफ केली पाहिजेत. त्यांना शेतकऱ्यांप्रमाणे 50 हजार रुपये बिनव्याजी कर्ज मंजूर करावे, 3 लाखापर्यंतचे कर्ज 3 टक्के व्याज दराने उपलब्ध करुन देण्याची शासनाने घोषणा करावी.मच्छीमारांना सबसिडीवर रॉकेलचा पुरवठा करण्यात यावा.

सभापती महोदय, सुनामी व अवकाळी पावसामुळे आंबा, काजू बागायतदार हवालदिल झाले आहेत. यंदा 10 टक्के सुध्दा उत्पादन आलेले नाही. आंबा बागायतदारांना नुकसान भरपाई देत असताना तुटपुंजी रक्कम दिली जाते. प्रती आंबा झाडासाठी 1000 रुपये व प्रती काजू झाडासाठी 500 रुपये आर्थिक मदत जाहीर करण्यात यावी व यासाठी 2 हेक्टरची अट लागू न करता जेवढे बागायती क्षेत्र आहे त्या संपूर्ण क्षेत्राला भरपाई देण्याची योजना जाहीर करण्यात यावी. कोकणातील शेतकऱ्यांच्या आंबा व काजू या फळ पिकाला हमी भाव जाहीर करण्यात यावा.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर........

सभापती महोदय, संपूर्ण देशामध्ये जी वाईन निर्मिती होते, त्यापैकी 86 टक्के वाईन ही महाराष्ट्रात निर्माण केली जाते. ही संपूर्ण वाईन पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रात निर्माण होते. कोकणातील करवंद व काजू या फळ पिकापासून वाईन तयार करण्याबाबत सभागृहात अनेकदा चर्चा झाली. धोरण जाहीर करण्याचे शासनाने आश्वासन दिले. परंतु अर्थसंकल्पामध्ये या संदर्भात कोणताही उल्लेख झालेला नाही. सभागृहात फक्त चर्चा होते आणि शासन आश्वासनाची पूर्तता करण्यास तयार नाही.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा उद्योगधंद्याबाबत ड वर्गात मोडतो. अनेक उद्योजकांनी सुवर्ण जयंती प्रोत्साहन योजना, बीज भांडवल योजनेंतर्गत कर्जे घेतली. आर्थिक मंदीमुळे त्या कर्जाची परतफेड करण्यास उद्योजक असफल ठरले आहेत. शासनाने 18 मे, 2007 रोजी जीआर काढला आहे. उद्योजकांनी 31 मार्च, 2008 पर्यंत वन टाईम सेटलमेंट करण्याबाबत हा जीआर काढला होता. ज्या उद्योजकांनी पैसे भरले नाहीत त्यांच्या प्रॉपर्टीवर शासनाने रेव्हेन्यू रिकव्हरी नियमानुसार जप्ती आणली आहे.

नंतर 4इ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ........

तिला स्थगिती देऊन या उद्योजकांना दिलासा देण्याची गरज आहे. याबाबत मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणातून स्थगिती दिल्याची घोषणा करावी, अशी मी विनंती करतो. कारण कोकण प्रदेशातील या उद्योजकांवर वेगवेगळ्या प्रकारे अन्याय होत आहे तो दूर करावा.

महोदय, कोकणात खार भूमीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला आहे. या खाऱ्या पाण्यामुळे सुपीक जमीन नापीक होते. सन 1995-96 पूर्वी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून या ठिकाणी बंधारे बांधण्यात आलेले आहेत पण त्यांच्या दुरुस्तीसाठी निधीची सोय कोणत्याच हेडखाली केलेली नाही. ज्याप्रमाणे विदर्भातील माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीसाठी विशेष निधी उपलब्ध करुन दिला आहे त्याच धर्तीवर कोकणातील बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करावी. असे बंधारे म्हणजे विशेष करुन रेगे मानस आणि दत्त मानस या ठिकाणी आहेत. ते सन 1997 पूर्वी बांधलेले असून त्यांच्या दुरुस्तीची व्यवस्था शासनाने करावी आणि कोकणातील बागायतदार व मच्छिमारांना योग्य प्रकारे न्याय द्यावा, अशी मी सूचना करतो व माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

------

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, दि. 23 मार्च, 2011 रोजी राज्याचे उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री श्री. अजित पवार यांनी खालच्या सभागृहात आणि या राज्याचे तरुण व तडफदार अर्थ राज्य मंत्री श्री. राजेंद्र मुळक यांनी या सभागृहात सामान्य माणसासाठी असलेला अर्थसंकल्प सादर केला. "जो जे वांछिल तो ते लाहो" अशा प्रकारचे वर्णन मी या अर्थसंकल्पाचे करतो. जो फक्त वर्षाचा विचार करतो तो झाडाकरिता, जो 10 वर्षांचा विचार करतो तो झाडे लावतो, आयुष्यभराचा विचार करतो तो माणसे जोडतो आणि जी माणसे, माणसे जोडतात तीच आयुष्यात मोठी होतात. हे काम अर्थमंत्र्यांनी केले व सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून हा अर्थसंकल्प सादर केलेला आहे.

महोदय, राज्याच्या सर्व विकास योजना, सामाजिक विकास योजनांचा यामध्ये विचार करण्यात आलेला आहे. या योजनांचा खर्च भरुन काढत असताना सामान्य माणसावर त्याचा फार मोठा बोजा पडणार नाही आणि अर्थसंकल्पात तूट राहणार नाही अशी या अर्थसंकल्पाची वैशिष्ट्ये आहेत. सर्व शिक्षा अभियान योजनेपासून अष्टविनायकापर्यंत लोकांच्या जिव्हाळ्याच्या सर्व योजनांसाठी काही ना काही तरी आर्थिक तरतूद यामध्ये केलेली आहे या ठळक वैशिष्ट्यांकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. राज्यातील सामान्य माणसासाठी आज शेती, वीज, पाणीपुरवठा, रोजगार हमी योजना ही अत्यंत महत्वाची क्षेत्रे आहेत, या क्षेत्रांकडे विशेष लक्ष देण्याचे काम सुध्दा या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून झालेले आहे. त्याचबरोबर मागील वर्षाची महसुली जमा 86910 कोटी इतकी होती पण या वर्षी मात्र त्यात 23.03 टक्क्यांनी वाढ झाली आहे. राज्याच्या विविध योजनांचे आकारमान पाहिले तर 41500 कोटी एवढे आहे पण सर्व भागावर लक्ष केंद्रीत करीत असताना शेतीसारखा महत्वाचा विषय आहे, त्याकडेही लक्ष दिलेले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

सभापती महोदय, भारत हा कृषी प्रधान देश आहे. संपूर्ण देशात महाराष्ट्र हे शेती क्षेत्रात अग्रेसर राज्य आहे. महाराष्ट्र राज्य सुवर्णमहोत्सव वर्ष साजरे करीत आहे. सन 1960-61 मध्ये महाराष्ट्रामध्ये पेरणीचे क्षेत्र जवळपास 17,838 हेक्टर एवढे होते परंतु आज हे क्षेत्र 40 हजार हेक्टरच्याही पुढे गेलेले आहे. सन 1960 मध्ये सिंचनाच्या क्षेत्राची टक्केवारी 6.5 टक्के होती परंतु गेल्या 50 वर्षाची तुलना केली तर सिंचनाच्या टक्केवारीमध्ये 17.7 टक्क्याने वाढ झाल्याचे आपल्याला दिसून येईल.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी विचार सरणीचे राज्य असून शाहू, फुले, आंबेकडरांच्या नावाने हे राज्य चालवले जात आहे. महाराष्ट्र शासनाने सातत्याने शेतकरी व शेतक-यांच्या प्रश्नाकडे लक्ष दिलेले आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर एवढा मोठा निर्णय कोणीही घेतला नव्हता एवढा मोठा निर्णय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेबांनी घेतलेला आहे. माननीय पवार साहेबांनी शेतक-यांचे 72 हजार कोटी रुपयाचे कर्ज माफ केलेले आहे तसेच राज्य सरकारने सुध्दा शेतक-यांचे कर्ज मोठया प्रमाणात माफ केलेले आहे. एवढेच नाही तर जे छोटे शेतकरी आहेत त्यांना यावर्षीच्या अर्थसंकल्पात 50 हजार रुपयांपर्यंतचे कर्ज बिन व्याजी मिळणार असून 3 लाख पर्यातच्या कर्जावर केवळ 2 टक्के व्याज आकारले जाणार आहे. असा ऐतिहासिक निर्णय या राज्य सरकारने घेतल्याबद्दल मी या शासनाचे अभिनंदन करतो, स्वागत करतो.

सभापती महोदय, जून व जुलै महिन्यामध्ये खतांची मागणी वाढत असते. त्यामुळे यासंदर्भात एक ऐतिहासिक पाऊल उचलण्याचे काम या महाराष्ट्र शासनाने केलेले आहे. शेतक-यांना खताचा पुरवठा मुबलक व्हावा यादृष्टीने शासनाने उपाययोजना केलेली आहे. यासंदर्भात माझी शासनाला एकच सूचना आहे की, खतांचा पुरवठा कमी होत नाही परंतु जे व्यापारी खताचा कृत्रिम तुटवडा निर्माण करतात त्यांना प्रतिबंध करण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळे यासंदर्भात शासनाने कटाक्षाने नियोजन करण्याची आवश्यकता आहे एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, जादूची कांडी फिरवून वीज तयार केली जाऊ शकत नाही तर वीज निर्माण करण्यासाठी मोठ मोठे प्रकल्प तयार करावे लागत असतात. विजेच्या संदर्भात महाराष्ट्र

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

राज्य 2012 पर्यंत भारनियमन मुक्त होईल अशा प्रकारची घोषणा करण्यात आलेली आहे ही फार आनंदाची बाब आहे. खरे म्हणजे वीज चोरीला आळा घालण्याची नितांत आवश्यकता आहे. वीज चोरी रोखण्यासाठी वीज मंडळाच्या वतीने विविध उपाययोजन केल्या जात आहेत. एवढेच नाही तर भोंगे लावून वीज चोरी करु नका अशी दवंडी पिटवली जाते परंतु वीज चोरी काही थांबली जात नाही. यासंदर्भात मला असे म्हणावयाचे आहे की,

"वीज चोरी बंदीचे नारे गावोगाव फिरु लागले,
तरीही रात्री अपरात्री आकडे तारेला भेटू लागले."

अशा प्रकारचे चित्र आपल्याला ग्रामीण भागात दिसते. त्यामुळे यावर निर्बंध आणण्याचे काम आपल्याला यापुढील काळात करावे लागणार आहे.

सभापती महोदय, या शासनाने मागेल त्याला वीज जोडणीचा निर्णय घेतलेला आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी शेतक-याच्या बाबतीत ऐतिहासिक निर्णय घेतलेला आहे. वीज जोडणीसाठी शासनाने 80 कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पात केलेली आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने शेतक-यांसाठी कृषी संजीवनी योजना सुरु केलेली आहे त्यामुळे याकडेही आपल्याला दुर्लक्ष करुन चालणार नाही.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे ........

महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असे आहे की, ज्या राज्याने रोजगार हमी योजना प्रथम सुरु केली होती आणि त्यानंतर केन्द्र सरकारने या योजनेची संपूर्ण देशामध्ये अंमलबजावणी केली होती.या देशातील सामान्य माणसाला रोजगार देण्याची योजना प्रथम आपल्या राज्यात सुरु झाली होती व त्याचा स्वीकार चांगल्या पध्दतीने देश पातळीवर करण्यात आला होता.

सभापती महोदय, आरोग्य आणि शिक्षण या सारख्या अत्यंत महत्वाच्या बाबीवर या अर्थसंकल्पामध्ये पुरेशी तरतूद सरकारने केलेली आहे. या निमित्ताने मला शासनाला एक विनंती करावयाची आहे. ग्रामीण भागामध्ये प्राथमिक आरोग्य केन्द्रे वा उप केन्द्रे ज्या पध्दतीने सक्षम असावयास पाहिजे` त्या पध्दतीने सक्षम असल्याचे दिसून येत नाही.गोरगरीब व्यक्तीला त्या ठिकाणी चांगल्या प्रकारच्या आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केन्द्रे आणि उप केन्द्रे आर्थिक दृष्टया बळकट केली पाहिजेत आणि त्या ठिकाणी राहणारे डॉक्टर्स कायम स्वरुपी तेथेच राहतील याची दक्षता घेण्यात आली पाहिजे. आरोग्य केंद्रावर डॉक्टर्सची उपस्थिती बंधनकारक करण्याची गरज निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पाच्या पुस्तकाकडे नजर टाकल्यास आपल्याला असे दिसून येईल की, पुण्याचे ससुन रुग्णालय, नांदेडचे शासकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथील कॅन्सर हॉस्पिटल किंवा घाटी रुग्णालय, वर्धा येथील कस्तुरबा कॅन्सर हॉस्पिटल इत्यादीसाठी मोठया प्रमाणावर अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे. पुस्तक वाचल्याशिवाय माणसाचे मस्तक संपन्न होत नाही. म्हणून माणसांनी तसेच विद्यार्थ्यानी पुस्तके वाचली पाहिजेत या दृष्टीने शासनाने काळजी घेतली आहे हे या अर्थसंकल्पावरुन दिसून येत आहे.

सभापती महोदय, पुस्तक वाचल्यामुळे माणसाचे मस्तक संपन्न होते आणि संपन्न झालेले मस्तक कोणापुढेही नतमस्तक होत नाही म्हणून पुस्तके वाचलीच पाहिजेत. राज्यातील ग्रंथालये अधिक बळकट झाली पाहिजेत यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आली आहे.असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, आजच्या काळात जो शिकेल तोच टिकेल म्हणून शिक्षणासारख्या विषयासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आली आहे. आजच्या काळात एज्युकेशन इज द पॉवर असेच म्हटले जाते. सर्व विकासाचा पाया शिक्षण आहे त्यामुळे शिक्षणासाठी शासनाने मोठी

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे ........

तरतूद केलेली असली तरी शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन आणि त्यांना द्याव्या लागणा-या सुविधासाठी ही तरतूद केलेली असल्यामुळे हा आकडा अधिक फुगलेला दिसून येत आहे. त्यामुळे प्रत्यक्षात शाळांचा विकास करण्यासाठी ,शैक्षणिक विकास करण्यासाठी भौतिक सुविधा देण्यासाठी वेतनेतर अनुदानाची गरज आहे परंतु मार्च 2004 सालापासून वेतनेतर अनुदान देणे बंद करण्याचा निर्णय शासानाने घेतला आहे.या सभागृहात वारंवार वेतनेतर अनुदान सुरु करण्याची आम्ही मागणी केलेली आहे. ग्रामीण भागातील शेवटच्या मुलांना ख-या अर्थाने शिक्षण द्यावयाचे असेल तर ग्रामीण भागातील शाळांना सुध्दा भौतिक सुविधा दिल्या गेल्या पाहिजेत त्यामुळे वेतनेतर अनुदान बंद करण्यात आलेले आहे ते पुन्हा सुरु करण्याचा निर्णय राज्य सरकार लवकर घेईल अशी मला अपेक्षा आहे.

सभापती महोदय, या वर्षीच्या अर्थसंकल्पात त्यासाठी तरतूद करण्यात येईल अशी मला अपेक्षा होती परतु ती झाली नाही. या विषयी मला खेदाने नमूद करावेसे वाटते. तरतूद न करण्याची जी काही चूक झालेली आहे ती पुन्हा दुरुस्त करण्याची संधी शासनाला आहे तेव्हा पुढच्या काळात वेतनेतर अनुदानाची तरतूद करणे हा शाळांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा मुद्दा असल्यामुळे ही तरतूद करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, 2001 च्या जनगणनेनुसार देशाच्या साक्षरतेचे प्रमाण 65 टक्के एवढे होते आणि राज्याचे प्रमाण 76.90 टक्के एवढे होते. राज्यातील साक्षरतेचे प्रमाण निश्चित वाढलेले आपल्याला दिसून येत आहे. या दृष्टीकोनातून शाळेतील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे आदिवासी भाग असो, नक्षलग्रस्त भाग असो त्या भागातील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनाची योजना केन्द्र सरकारच्या माध्यमातून राज्य सरकारने आणलेली आहे त्याकरता राज्य सरकारने अर्थसंकल्पामध्ये भरीव तरतूद केलेली आहे .

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

या राज्यातील वर्तमानपत्रांमध्ये दररोज शालेय पोषण आहार योजनेमधून पुरविण्यात येणाऱ्या धान्यामध्ये अळया सापडल्या, पाल सापडल्याच्या बातम्या छापून येतात. एकदा तर मुलांना खायला देण्यासाठी शिजविण्यात आलेल्या खिचडीमध्ये साप सापडल्याचे आढळून आले. आज विद्यार्थी शाळेमध्ये शिकण्यासाठी जात असतांना तो परंतु व्यवस्थित घरी येईल की नाही, आपल्या आई-वडिलांचे तोंड पाहील की नाही या शंकेने त्यांच्या जीवात जीव राहत नाही. असे प्रकार शालेय पोषण आहारामध्ये सुरु आहेत. त्यामुळे आपण ही योजनाच बंद केली पाहिजे. त्याऐवजी तेवढयाच खर्चात त्या विद्यार्थ्यांना शालेय पुस्तके दिली पाहिजेत, वह्या दिल्या पाहिजेत, गणवेश दिला पाहिजे, बूट आणि मौजे दिले पाहिजेत आणि जर विद्यार्थी दूर अंतरावरुन शाळेत येत असेल तर त्याला सायकल सुध्दा दिली पाहिजे. या सर्व शैक्षणिक सुविधा योजनेच्या निधीमधून विद्यार्थ्याना पुरविल्या तर त्यांना त्याचा अधिक उपभोग घेता येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या बौध्दिक गुणवत्तेमध्ये देखील वाढ होण्यासाठी मदत होईल. ही शालेय पोषण आहाराची योजना नक्षलग्रस्त भागातील शाळा, आदिवासी दुर्गम भागातील शाळांसाठी जरुर चालू ठेवली पाहिजे आणि विकसित शहरी भागातील शाळांमध्ये सुरु असलेली शालेय पोषण आहाराची योजना आपण बंद केली पाहिजे अशाप्रकारची सूचना मी या ठिकाणी करतो.

सभापती महोदय, कोकणाच्या विकासाबाबत मला एवढेच सांगावयाचे आहे की, तत्कालीन शिक्षण राज्य मंत्री माननीय श्री. हसन मुश्रीफ साहेब हे रत्नागिरी जिल्ह्याचे पालक मंत्री असतांना त्यांच्याकडे कोकणासाठी नवीन एस.एस.सी.बोर्ड स्थापन करण्याची आपण मागणी केली होती ती सरकारने अजून पूर्ण केलेली नाही. शासनाने ते बोर्ड मंजूर केल्याची घोषणा केली असली तरी ते लवकरात लवकर कार्यान्वित करावे अशी माझी मागणी आहे. सभापती महोदय, एखाद्या चांगल्या गोष्टीला चांगले म्हणण्याची दानत ज्याच्यामध्ये असेल तो उत्कृष्ट माणूस समजला जातो. तेव्हा राजकारणामध्ये आपण आपला राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवून राज्याच्या विकासाच्या दृष्टीने असलेल्या चांगल्या गोष्टींना आपण पाठिंबा दिला पाहिजे. या करिता मी या ठिकाणी मांडलेल्या भूमिकेशी आपण देखील सहमत झाले पाहिजे.

सभापती महोदय, अल्पसंख्यांक समाजातील मुलांना सुध्दा चांगले, उत्कृष्ट शिक्षण मिळाले पाहिजे याकरिता क्रांतिकारक निर्णय घेणारे आमचे सरकार आहे. हे मला या ठिकाणी आनंदाने नमूद करावेसे वाटते. आज अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे या करिता इयत्ता



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. विक्रम काळे....

पहिली पासून ते पदवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा क्रांतिकारक निर्णय राज्य व केंद्र शासनाने घेतला आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी कायम विना अनुदानित तत्वावरील धोरण स्वीकारण्यात आले होते. परंतु माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ साहेबांनी त्यांच्या काळात फार कष्ट घेऊन "कायम" हा शब्द वगळल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. "कायम" हा शब्द वगळल्यामुळे त्या शाळांना अनुदान मिळाले पाहिजे. आज कायम विना अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांच्या बाबतीत देखील "कायम" हा शब्द वगळण्यात यावा या मागणीकरिता गेल्या 15 दिवसापासून शिक्षक आझाद मैदानावर आंदोलन करीत आहेत. त्यांच्या मागणीकडे या सरकारने दुर्लक्ष करुन चालणार नाही, त्यांच्या बाबतीत सुध्दा निर्णय घेऊन कायम विना अनुदानित मधील "कायम" हा शब्द वगळण्यात यावा अशी मागणी करतो. वेळेअभावी मला अनेक मुद्दे मांडता आलेले नाहीत एवढे बोलून व आपण मला बोलण्याकरिता अधिक वेळ दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, वित्तीय तूट कमी करुन 58.21 लाख रुपयांचा शिलकी अंदाजपत्रक सादर करताना ग्रोथ रेट कमी होऊ न देता मांडलेला अर्थसंकल्प स्वागतार्ह आहे आणि कॉंग्रेस पक्ष व युपीए सरकारच्या जाहीरनाम्यातील आम आदमीसाठी तयार केलेले हे अंदाजपत्रक आहे आणि त्यासाठी मी माननीय वित्त मंत्री तसेच माननीय वित्त राज्यमंत्री यांचे मनापासून अभिनंदन करते.

सभापती महोदय, मी याठिकाणी जेंडर बजेट म्हणजे महिलांसाठी अर्थसंकल्प असावा या विषयावर बोलणार आहे.राज्य शासनाने महिलांसाठी 50 टक्के आरक्षण ठेवण्याच्या बाबतीत नुकताच निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे आपल्या राज्याने जेंडर फिलॉसॉफी स्वीकारलेली आहे हे यावरुन स्पष्ट झालेले आहे. येथून पुढे महिलांसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प असावा अशी जोरदार मागणी होणार आहे. आमच्या पक्षाच्या नेत्या माननीय श्रीमती सोनिया गांधी या नेहमीच जेंडर बजेट साठी आग्रही राहिलेल्या आहेत आणि त्याचे प्रतिबिंब अर्थसंकल्पामध्ये दिसून येते. तसेच केंद्रीय अर्थसंकल्पाच्या वेळी लोकसभेच्या माननीय विरोधी पक्षनेत्या श्रीमती सुषमा स्वराज यांनी देखील जेंडर बजेट बाबत सुतोवाच केले होते. महाराष्ट्र सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलासाठी 50 टक्के आरक्षणाचा निर्णय घेतलेला आहे आणि यामध्ये माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेब यांचे सुध्दा योगदान आहे हे नाकारता येणार नाही. ते सुध्दा आपल्या आघाडीचे नेते आहेत. महाराष्ट्र सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांसाठी 50 टक्के आरक्षणाचा जो निर्णय घेतलेला आहे, त्यासंदर्भातील कायदा विधिमंडळामध्ये लवकरच येणार आहे आणि याचे आमच्या महिला वर्गाने उत्स्फूर्तपणे स्वागत देखील केलेले आहे. महिलांना राजकीय प्रवाहामध्ये 50 टक्के आरक्षणाच्या माध्यमातून स्थान देत असताना, सध्याच्या 33 टक्के स्थानिक स्वराज्य संस्थांच्या महिला वॉर्डांमध्ये विकास कामाच्या बाबतीत नेहमीच काटकसर केली जाते आणि याचा अनुभव मी पुणे महानगरपालिकेची महापौर असताना घेतलेला आहे. याबाबतीत ग्रामीण विभागातील महिलांच्या आरक्षित वॉर्डामध्ये सुध्दा विषमता दिसून येते.महिलांना राजकीय प्रवाहामध्ये आरक्षणाच्या माध्यमातून स्थैर्य मिळण्यासाठी महिलांसाठी स्वतंत्र बजेट अधोरेखित करणे मला क्रमप्राप्त आहे. नुकतेच मुंबई विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाने जेंडर बजेट "A Case Study of India " या नावाने पेपर प्रसिध्द केलेला असून त्याची एक प्रत माझ्याजवळ आहे आणि मी त्याचे अवलोकन केलेले आहे."द स्टेट प्रोफाईल ऑफ महाराष्ट्रामध्ये "पॉलिसी फॉर वुमन" याचा अंतर्भाव केलेला आहे. या माध्यमातून "Health infrastructure,Maharashtra Population policy ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी . . . .

Statement, Vision, 2011, Gender Analysis याबद्दल नमूद केलेले आहे. यामध्ये मिसिंलेनियस आसपेक्टस् दिलेले आहेत. त्यामध्ये हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर, चाईल्ड मॅरेजेस्, सेक्स रेषो, व्हायलन्स अगेन्स्ट वुमन, फोर्स प्रेग्नन्सी आणि दारिद्र्यरेषेखालील लोकांचे जीवनमान उंचावण्याच्या योजना इ.समावेश आहे. आपले जे बजेट सादर झाले आहे, त्यामध्ये अनेक योजनांचा समावेश आहे. मी त्यातील काही योजनांचा उल्लेख करु इच्छिते. राज्य निधीतून रोजगार हमी योजनेकरता 745 कोटी एवढा निधी प्रस्तावित करण्यात आलेला आहे. या योजनेमध्ये जी कामे असतात मग ती फलोत्पादन योजना असेल, शेततळी योजना असेल यामध्ये महिलांना फार कमी प्रमाणात रोजगार मिळतो असे माझे स्वतःचे मत आहे. आज महिला विमान चालवित आहेत, अशा वेळी त्यांना जेसीबी चालविणे किंवा ट्रॅक्टर चालविणे हे काही अवघड नाही. मला वाटते की, शासनाने हा आस्पेक्ट देखील लक्षात घ्याावयास पाहिजे. त्याच प्रमाणे राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजने अंतर्गत मच्छिमारांच्या नौकांचे यांत्रिकीकरण करण्यासाठी कर्जाव्दारे अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येते. यातील काही निधी आज फक्त यांत्रिकी बोटींसाठी वापरला जातो. परंतु यातील काही निधी मच्छी विक्री करणाऱ्या महिलांसाठी राखून ठेवण्यात यावा आणि या महिलांचे बचत स्थापन करुन शीतपेट्यांसाठी किंवा शीतगृहांसाठी त्यांना निधी उपलब्ध करुन द्यावा अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत स्थापन केलेल्या शहरी व ग्रामीण भागातील विविध आरोग्य संस्थांच्या बांधकामांसाठी 241 काटी रुपयांची तरतूद केलेली आहे. अनेक वेळेला ग्रामीण भागामध्ये किंवा तालुका स्तरावर ग्रामीण रुग्णातील पुरुष वॉर्डांमध्ये त्यांच्या महिला नातेवाईंकांना रहाणे शक्य नसते. तेव्हा त्याठिकाणी महिलांना रहता यावे, तसेच स्वच्छता गृहांसाठी आणि रुग्णालयातील अनेक सुविधांसाठी, त्याचप्रमाणे नवअर्भकांच्या चोऱ्या होतात त्याला प्रतिबंध करण्यासाठी सुरक्षिततेच्यादृष्टीने सीसी-टी.व्ही बसविले पाहिजेत. त्यासाठी या निधीचा उपयोग व्हावयास पाहिजे.

सभापती महोदय, अंगणवाडी बांधकामासाठी आणि शहरी भागामध्ये सुध्दा अंगणवाडीसाठी भाड्याने जागा घेता यावी याकरता भरीव तरतूद केलेली आहे, त्याबद्दल मी मनापासून माननीय वित्त मंत्री महोदयांचे अभिनंदन करते.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी....

त्याचप्रमाणे महिलांवर होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी महिला आयोगाच्या सहमतीने जे समुपदेशन केंद्र सुरु करण्यात येत आहेत, याबाबतीत मी शासनाचे मनापासून अभिनदन करते. ही योजना जिल्हा स्तरावर राबविण्यात येणार आहे. पण महापालिका आणि नगरपालिकांच्या स्तरावर देखील या योजनेचा विचार करण्यात यावा. ॲडमिनिस्ट्रेशनवर निधी जास्त खर्च होतो त्याऐवजी समुपदेशन केंद्राच्या सुविधेवर जास्त खर्च करण्यात यावा. समुपदेशन केंद्राची वेब-साईट सुरु करावी आणि ज्यांना या योजनेचा फायदा झालेला आहे, त्यांनी त्यांचे अनुभव या वेब-साईटवर उपलब्ध करुन द्यावेत. विधान परिषदेतील आणि विधानसभेतील महिलांची व एन.जी.ओ.च्या महिलांची एकत्रित बैठक घेऊन समुपदेशन केंद्राची धोरणे ठरविण्यात यावीत.

सभापती महोदय, शासनाने अनुसूचित जाती आणि नव बौध्द प्रवर्गाकरिता कच्च्या घरांचे पक्क्या घरामध्ये रुपांतर करण्यासाठी 800 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. संजय गाधी निराधार योजनेतील पात्र महिलांना या योजनेचा प्राधान्याचे लाभ देण्यात यावा. मागसवर्गीय मुला-मुलींच्या वसतिगृहाची तरतूद वाढविण्यात यावी तसेच वर्किंग वुमन्स हॉस्टेल्स बांधण्यात यावीत अशी मी शासनाला विनंती करते व माझे भाषण पूर्ण करते. धन्यवाद.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ( कोकण विकास पदवीधर ) : सभापती महोदय, या राज्याच्या अर्थमंत्र्यांनी सभागृहासमोर जो अर्थसंकल्प मांडलेला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी व काही सूचना करण्यासाठी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या राज्याचा अर्थसंकल्प ज्या दिवशी मांडण्यात आला त्याच्या आधल्या दिवशी माननीय अर्थ मंत्र्यांचे "दादा बजेट" येणार आहे असे वर्तमानपत्रात छापून येत होते. महाराष्ट्रातील जनता या बजेटकडे डोळे लावून बसली होती. परंतु हा अर्थसंकल्प "दादा बजेट" म्हणून लोकांनी स्वीकारलेला नाही. अतिशय नियोजन शून्य, राज्याला अधिक कर्जामध्ये लोटणारे आणि कुठल्याही प्रकारचे समाधान कुठल्याही क्षेत्रातील माणसाला न देणारे असा असमतोल असलेला हा अर्थसंकल्प या राज्यतील जनतेने ऐकलेला आहे. सभापती महोदय, 2 लाख 31 हजार कोटी रुपये एवढे प्रचंड कर्ज या राज्याच्या जनतेवर आहे. याबाबतीत माझी अशी सूचना आहे की, राज्य शासनाने याबाबतीत एक श्वेत पत्रिका प्रसिध्द करावी. 2 लाख 31 हजार कोटी रुपये कुठून आणलेले आहेत, कशा पध्दतीने कर्ज घेण्यात आलेले आहे, यासंबधीची माहिती उपलब्ध झाली तर त्याचा निश्चितपणे उपयोग होईल.

सभापती महोदय, सरकारी तिजोरी ही राज्यातील विकास कामांसाठी शाश्वत उत्पन्नाचा झरा असते. परंतु या राज्याचे कर्ज सातत्याने वाढत आहे. हे सरकार गेल्या दहा वर्षापासून या राज्यात आहे. युतीच्या काळात 30 हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यात आले होते म्हणून त्याबाबतीत मोठया प्रमाणात आरडाओरड करण्यात आली होती. परंतु आज या राज्यावर 2 लाख 31 हजार कोटी रुपयाचे कर्ज आहे. या राज्यावरील वाढत्या कर्जामुळे या राज्याची आर्थिक व्यवस्था ढासळून जाईल अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. म्हणून या संदर्भात जो अहवाल आलेला आहे, त्यामध्ये पहिल्या क्रमांकावर उत्तर प्रदेश असून दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र राज्य आहे. सभापती महोदय, मी या अर्थसंकल्पातील केवळ 10 मुद्यांवर या ठिकाणी बोलणार आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये मच्छीमारांच्या अनेक गोष्टींबद्दल आम्ही अपेक्षा व्यक्त केल्या होत्या पण त्याबाबतचा उल्लेख या अर्थसंकल्पात करण्यात आलेला नाही. कोकणाला प्रचंड अशी किनारपट्टी लाभलेली आहे. कोकणातील सन्माननीय सदस्यांनी या संबंधात अनेक मुद्दे या ठिकाणी मांडलेले आहेत. कोकणात मत्स्य विद्यापीठ झाले पाहिजे, यासंबंधात वेळोवेळी

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर....

विधिमंडळात व विधिमंडळाच्या बाहेर घोषणा करण्यात आल्या, अनेक मंत्री बदलले पण कोकणात अद्याप मत्स्य विद्यापीठ झालेले नाही. कोकणात मंत्रिमंडळाची बैठक झाली तेव्हा निरनिराळया प्रकारचे मासे खाण्यासाठी सगळे पुढे असतात पण या मच्छीमारांचा विचार करण्यात येत नाही. निरनिराळया पध्दतीने येथील मच्छीमारांवर संकटे कोसळली, त्यासंदर्भात पॅकेज जाहीर करण्यात आले पण ते पैसे अद्याप मिळालेले नाहीत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सजय केळकर ....

आता तेलगळतीमुळे समुद्रात तेल मिसळले गेल्याने नुकसान झाले. मी स्वत: रायगड जिल्ह्यातील किनारपट्टीवरील मच्छीमारांना भेटलो. तेथील मच्छी विक्रेत्या महिलांना देखील भेटलो. मत्स्य कार्यालयामध्ये गेलो. परंतु अजूनही त्यांना नुकसानभरपाई द्यावयाची की नाही हे समिती ठरविणार आहे. मच्छीमारांना, मच्छी विकणाऱ्या महिलांना, मत्स्य उद्योग करणाऱ्यांना यामध्ये कोणत्याही प्रकारचे सहकार्य केलेले नाही. ठाणे जिल्ह्यातील तलासरी तालुक्यातील अनेक कुटुंबातील एक माणूस खलाशी म्हणून जातो. तो खलाशी म्हणून गेला तर त्याच्यासाठी कोणत्याही प्रकारची विमा योजना नाही. तो जर मिसिंग झाला आणि पाकिस्तानच्या जेलमध्ये बंद झाला तर त्यांच्या कुटुंबीयांना कोणत्याही प्रकारची मदत मिळत नाही. आम्ही हा अनुभव स्वत: घेतला आहे. आम्ही केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करुन प्रत्येक कुटुंबाकरिता 3 लाख रुपये घेतले. परंतु त्यांना जर आपण विमा योजना लागू केली तर निश्चितपणे त्यांच्या कुटुंबीयांना त्याचा उपयोग होईल. या अर्थसंकल्पात मच्छीमारांच्या दृष्टीने अतिशय निराशजनक आणि तुटपुंजी व्यवस्था आहे. त्या ठिकाणी मत्स्य विद्यापीठ स्थापन झालेले नाही.

सभापती महोदय, राज्यामध्ये राष्ट्रीय कृषी विमा योजनेच्या संदर्भात जी पीक विमा योजना आहे ती निरनिराळ्या पध्दतीने राबविली जाते. या योजनेमध्ये नारळाचा समावेश केलेला आहे. मला सांगण्यास आनंद वाटतो की, आंबा आणि काजूच्या संदर्भात गेल्या वर्षी मी सातत्याने पाठपुरावा करीत होतो आणि माननीय मंत्री श्री. गावित यांचे या अनुषंगाने पत्र आले की, आंबा आणि काजू यांचा राष्ट्रीय विमा योजनेमध्ये अंतर्भाव केलेला आहे. त्यामुळे आंबा आणि काजूला पीक विमा योजना लागू होईल. परंतु याच्याही पुढे जाऊन मी सांगेन की, आपल्या महाराष्ट्रात ठाणे जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त चिकू तयार होतो. घोलवड, डहाणू आणि त्या भागातील पट्टीमध्ये मोठ्या प्रमाणावर चिकू तयार होतो. त्यामुळे चिकू असेल, कोकम असेल, सुपारी असेल यांचा सुध्दा अंतर्भाव पीक विमा योजनेमध्ये करावयास पाहिजे होता. पण त्यांचा अंतर्भाव झालेला नाही. त्यामुळे मी शासनाला आणि माननीय अर्थमंत्र्यांना विनंती करतो की, या फळांचा देखील त्यामध्ये विचार झाला पाहिजे. त्यांच्यासाठी देखील पीक विमा योजना लागू केली पाहिजे. कारण हवामानामध्ये निरनिराळ्या प्रकारचा बदल होत असतो आणि हे बागायतदार सातत्याने नुकसानीच्या फेऱ्यामध्ये

...2...

RDB/

श्री. संजय केळकर ....

सापडत असतात. त्यांना शासनाकडून फार अल्पशी मदत मिळते. त्यांना वेळेवर नुकसानभरपाई मिळत नाही. त्यामुळे हे सगळे लोक अडचणीत आले आहेत. चिकूच्या संदर्भात मी आणखी एक सूचना करीन की, या भागामध्ये साठवणूक प्रकल्प करणे आवश्यक आहे. तो प्रकल्प देखील केला जावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी रोजगार हमी योजनेचे फार मोठे कौतुक केले गेले. परंतु आपण राज्याचा आर्थिक पाहणी अहवाल पाहिला तर या रोजगार हमी योजनेवर जेवढी रक्कम खर्च केली जावयास पाहिजे होती त्या मानाने प्रत्येक वर्षी कमी-कमी खर्च केला गेला आहे. मजुरांची संख्या देखील प्रत्येक वर्षी कमी-कमी होत गेली आहे. महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य आहे. या महाराष्ट्राने देशाला रोजगार हमी योजनेची दिशा दिली परंतु या योजनेच्या बाबतीत महाराष्ट्र मागे यावयास लागला आहे. रोजगार हमी योजनेच्या संदर्भात आम्ही वेळोवेळी या सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित करतो. खोटे मजूर दाखवून कशा पध्दतीने बिले वसूल केली जातात, कशा पध्दतीने मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केला जातो या बाबत आदिवासी भागातील पुराव्यांसह माहिती देऊन सुध्दा त्या बाबतीत कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. या ठिकाणी रोजगार हमी योजनेची निरनिराळ्या पध्दतीची भ्रष्टाचाराची प्रकरणे येऊन सुध्दा त्यावर वेळीच कारवाई केली जात नाही. त्यामुळे रोजगार हमी योजना शेवटच्या माणसापर्यंत योग्य पध्दतीने पोहोचत नाही.

सभापती महोदय, आरोग्याच्या संदर्भात मी दोनच मुद्दे मांडणार आहे. कारण ग्रामीण रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उल्लेख केला. आरोग्याच्या संदर्भात कुष्ठरोग्यांची सेवा करणाऱ्या ज्या संस्था आहेत त्यांची पत्रे देखील माझ्याकडे आहेत. महारोगी सेवा संघ, वरोरा तसेच अन्य निरनिराळया ठिकाणी महारोग्यांची सेवा करणाऱ्या संस्था आहेत. माझी या ठिकाणी आवर्जून मागणी आहे. 1994 पासून आपण कुष्ठरोग्यांना दररोज दरडोई जे अनुदान देतो ते 16 रुपये या महागाईच्या काळात कसे पुरणार ? हा दुर्लक्षित वर्ग आहे आणि त्यांची सेवा करणाऱ्या ज्या संस्था आहेत त्यांना जे 480 रुपये देतो त्यामध्ये वाढ केली पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

त्यांना दरडोई 15-16 रुपये देऊन भागणार नाही. त्यांनी दिलेल्या अहवालानुसार त्यांचा जो ताळेबंद आहे त्यानुसार प्रति वर्षी 66 लाख रुपये अनुदान मिळते. प्रति वस्ती कुष्ठ रोग्यांवर उपचारासाठी झ ाालेला खर्च 1 कोटी 77 लाख इतका आहे. कुष्ठ रोग्यांच्या अनुदानामध्ये शासनाने तातडीने वाढ केली पाहिजे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय नेत्र दान व देह दान करण्यासाठी अनेक संस्था पुढे येतात. अनेकांनी त्यासाठी नोंदणी केलेली आहे. पण त्या त्या हॉस्पिटलमध्ये याची व्यवस्था नसेल तर त्याचा काही उपयोग होणार नाही. म्हणून आरोग्य विभागाकडून नेत्र दान करणाऱ्यांसाठी सिस्टिम उभी केली गेली पाहिजे. देह दान करणाऱ्यांनी अंडरटेकिंग दिलेले असते किंवा ॲफिडेव्हिट तयार केलेले असते. परंतु रुग्णालयात देह दानाची व्यवस्था केलेली नसते ती निरनिराळ्या रुग्णालयात झाली पाहिजे.

आरोग्य विभागातील मनोरुग्णालय विषय सुध्दा महत्वाचा आहे. ठाण्याच्या मनोरुग्णालयामध्ये फॅमिली वॉर्डची संकल्पना मांडण्यात आल्यावर त्या वॉर्डचे भूमिपूजन झाले आहे, त्या ठिकाणी त्या वॉर्डची इमारत बांधली जाणार आहे. परंतु या मनोरुग्णालयाचे नाव सुध्दा बदलले पाहिजे. मनो विकास केंद्र, बुध्दी विकास केंद्र अशा प्रकारचे कोणतेही नाव दिले पाहिजे. एका बाजूला इमारत बांधण्यासाठी पैसे दिले जातात, भूमिपूजन केले जाते आणि दुसऱ्या बाजूला त्या रुग्णालयात काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना 6-6 महिने पगार मिळत नाही. होळीच्या दिवशी मी स्वत: त्या कामगारांना घेऊन गेलो होतो. आम्ही त्यापूर्वी असे जाहीर केले होते की, होळीपर्यंत पगाराचे पैसे दिले नाही तर शासनाच्या नावाने शिमगा केल्याशिवाय राहणार नाही. एका बाजूला माननीय मंत्री जाहीर करतात, अधिकारी जाहीर करतात तरीही गरीब कंत्राटी कामगारांना 6-6 महिने पगार मिळत नाही. अशा पध्दतीने सामान्य माणसांना केंद्र बिंदू मानणारे शासन प्रत्यक्षात सामान्य माणसांकरिता बजेट सादर करत नाही. महाराष्ट्राचा राजशकट चालवू शकत नाही. मनोरुग्णालयातील कंत्राटी कामगारांना कामावर घेतले जाते, पण त्यांचा पगार दिला जात नाही. आरोग्य विभागाने असे लिहून दिले आहे की, 31 मार्चपर्यंत त्यांचे पैसे दिले जातील. त्याप्रमाणे त्यांचे पैसे द्यावेत, अन्यथा शासनावर कोणीही विश्वास ठेवणार नाही. शिवाय ते कंत्राटी कामगार निघून जातील.

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.संजय केळकर.....

सभापती महोदय, कोकणातील समस्यांचा पाढा वाचावा तेवढा कमीच आहे. कोकणापासून गोव्याच्या सीमेपर्यंत छोटा मोठा अपघात झाल्यास अपघातग्रस्तांना मुंबईला आणावे लागते. सबंध कोकणात एकही अद्ययावत शासकीय रुग्णालय नाही. ठाणे येथे आणावयाचे असेल तर छत्रपती महाराज महापालिका रुग्णालय आहे, पण तेथेही उपचार झाले नाहीत तर रुग्णांना मुंबईलाच आणावे लागते. शासनाने इतर विभागांमध्ये शासकीय रुग्णालये दिली आहेत, वैद्यकीय महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये दिली आहेत. म्हणून माझी व कोकणातील सर्व सन्माननीय सदस्यांची अशी मागणी आहे की, कोकणासाठी अद्ययावत शासकीय रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय द्यावे. शालांत परीक्षा मंडळाच्या उपकेंद्रासाठी शासन स्वत:ची पाठ थोपटून घेत आहे. पण त्यासाठी अद्याप जागा उपलब्ध झालेली नाही. सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांसाठी मंडळाचे उपकेंद्र स्थापन करण्याची घोषणा 4 वर्षानंतर करण्यात आली होती. परंतु आणखी 4 वर्षे हे आघाडी सरकार असेपर्यंत उपकेंद्र होणार नाही असा विचार तेथील लोक करीत आहेत. 4 वर्षापूर्वी जाहीर केलेल्या गोष्टींची पूर्तता होत नसल्यामुळे कोकणातील लोक या शासनावर विश्वास ठेवण्यास तयार नाहीत.

सभापती महोदय, शिक्षणासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले मत मांडलेले आहे. शासनाने महाराष्ट्र शिक्षण संस्था विनियमन कायदा 2011 प्रस्तावित केलेला आहे. त्या कायद्यामध्ये अनेक त्रुटी आहेत. त्याचा अभ्यास केल्यावर असे आढळून येते की, या कायद्यामुळे पालकांना न्याय मिळणार नाही. या कायद्यात शिक्षण संस्थांच्या हिताच्या अनेक बाबी आहेत. तसेच कोणत्याही कारणास्तव विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द झाला तर त्याचे शुल्क परत मिळण्याचा त्यात उल्लेख केलेला नाही. या बिलासंबंधी अनेक गोष्टी मांडता येतील. या महाराष्ट्राची प्रयोगशाळा बनवू नका एवढेच मी म्हणेन.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते )**

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 19:25

श्री. संजय केळकर...

या राज्यात अनेक शिक्षण मंत्री होऊन गेले. अनेक शिक्षण मंत्र्यांनी शिक्षणाच्या बाबतीत वेगवेगळे प्रयोग केले. मग तो पर्सेन्टाईचा प्रयोग असो अथवा बेस्ट ऑफ फाईव्हचा प्रयोग असो. असे प्रयोग करीत असताना विद्यार्थी आणि पालक हे मात्र वेठीला धरले गेले आहेत.

सभापती महोदय, वेतनेतर अनुदानाच्या प्रश्नासंबंधी या सभागृहामध्ये वारंवार चर्चा होते. वेतनेतर अनुदान नसल्यामुळे शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. शाळा कशा चालवायचा असा प्रश्न निर्माण झालेला आहे. कोणतेही राज्य असो, त्या राज्याची भावी पिढी ही शिक्षणाच्या माध्यमातूनच घडत असते. त्यामुळे या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून शिक्षण विषयक बाबीसाठी भरीव आर्थिक तरतूद करावी अशी माझी आग्रहाची मागणी आहे. छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आपण नेहमी नावे घेत असतो. परंतु आदिवासी भागामध्ये आदिवासीसाठी काही देऊ केले तर ते त्यांच्या तोंडापर्यन्त पोहोचू दिले जात नाही ही वस्तुस्थिती आहे. आदिवासी मुलांसाठी सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आलेली आहे. आदिवासी मुलांची शाळेतील उपस्थिती वाढावी यासाठी उपस्थिती भत्ता देखील देण्याची तरतूद केलेली आहे. परंतु हा उपस्थिती भत्ता देत असताना दाखला सादर करण्याची अट ठेवलेली आहे. आदिवासी माणूस हा दाखला कुठून देणार ? माझी अशी सूचना आहे की, ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागामध्ये ज्या शाळा आहेत तेथील मुलांना उपस्थिती भत्ता देण्याच्या बाबतीत दाखल्याची अट शिथिल करावी.

सभापती महोदय, आश्रमशाळेच्या बाबतीत या ठिकाणी अनेक वेळा चर्चा झालेली आहे. आश्रमशाळेतील मुला-मुलींसाठी राहाण्याची चांगली सोय नसणे, संडास बाथरुमची सोय नसणे, पिण्याच्या पाण्याची तसेच जेवणाची सोय नसणे इत्यादी गोष्टींचा नेहमी ऊहापोह केला जातो. अनुदानित आश्रमशाळेंच्या बाबतीत आदिवासी विकास विभागाने अनेक प्रकारचे निर्णय घेतलेले आहेत. अनुदानित आश्रमशाळेला प्रत्येक विद्यार्थ्यामागे वेगळे अनुदान आणि शासकीय आश्रमशाळेला प्रत्येक विद्यार्थ्यामागे वेगळे अनुदान दिले जाते. अनुदान देताना विद्यार्थ्यांमागे अनुदानित आश्रमशाळेला वेगळे आणि शासकीय आश्रमशाळेला वेगळे अनुदान असा भेदभाव न करता दोन्ही ठिकाणी समान न्याय दिला पाहिजे. अनुदानित आश्रमशाळांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

सभापती महोदय, उद्योगाच्या बाबतीत बोलत असताना मी सांगू इच्छितो की, या लघु उद्योगांना प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. याचे कारण असे की, आज मुंबईच्या आणि ठाणे परिसरातील जमिनीच्या किंमती भरमसाठ वाढल्यामुळे उद्योजक उद्योग बंद करुन, जमिनी विकून पैसे कमवित आहेत. परिणामी कामगार बेकार होऊन त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची पाळी आलेली आहे. आज बंद पडलेल्या कारखान्यातील कामगारांना त्यांची देणी देखील न मिळाल्यामुळे त्या कामगारांची कुटुंबे देशोधडीला लागलेली आहेत. ज्या कारखानदारानी जमिनी विकलेल्या आहेत त्यांनी प्रथम कामगारांची देणी दिली पाहिजेत व नंतर बाकीची देणी दिली पाहिजेत अशा प्रकारचा जी.आर. शासनाने काढलेला आहे. परंतु त्या जी.आर.ची अंमलबजावणी होताना दिसत नाही. कामगाराला ख-या अर्थाने न्याय मिळावा या दृष्टीने या जी.आर.ची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, राज्याचे उत्पन्न वाढण्यासाठी कठोर उपाययोजना केल्याचे दिसत नाही. मी ठाण्याच्या विक्रीकर कार्यालयातील 5 हजार कोटीचा भ्रष्टाचार उघडकीस आणला होता. पण त्याबाबतीत पुढे काही कारवाई झालेली नाही. ज्या खात्याच्या माध्यमातून राज्याला भरीव महसूल प्राप्त होतो त्याच खात्यात भ्रष्टाचाराच्या माध्यमातून अधिका-यांच्या खिशात उत्पन्न जात असेल तर त्याबाबतीत कठोर कारवाई करुन उत्पन्नाचा स्त्रोत वाढविला पाहिजे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री. शिगम 19:30

श्री. संजय केळकर....

सभापती महोदय, मुद्रांक शुल्कच्या माध्यमातून राज्य शासनाच्या तिजोरीत मोठी भर पडते. महोदय, ठाणे शहरात एका ठिकाणच्या जमिनीची किंमत रेडी रेकनर प्रमाणे न लावल्यामुळे 100 कोटी रुपयांची वसुली संबंधितांकडून होऊ शकते अशा प्रकारचा मुद्दा मी या सभागृहात उपस्थित केला होता. संबंधितांकडून वसुली करण्यासंदर्भातील बाब माननीय महसुल मंत्र्यांनी मान्य केली होती. मुद्रांक शुल्क कार्यालयातून मला पत्र आले की, अशा प्रकारची 80 हजार प्रकरणे आहेत. अशा प्रकरणांची वसुली करण्यासाठी आमच्याकडे पुरेसा कर्मचारीवर्ग नाही, त्यामुळे अशा प्रकारची वसुली धिम्या गतीने होत आहे. गेल्या दीड वर्षात फक्त 23 हजार प्रकरणे तपासली गेली आहेत. राज्याच्या उत्पन्नामध्ये वाढ करावयाची असेल तर वसुलीची कार्यवाही का केली जात नाही ? मुद्रांक शुल्क न भरणाऱ्यांचे फार मोठे रॅकेट ठाणे जिल्हयात कार्यरत झालेले आहे. मुद्रांक शुल्क कार्यालयाकडून मुद्रांक शुल्कची वसुली करण्याबाबत टाळाटाळ केली जात आहे. सदरची मुद्रांक शुल्कची वसुली करण्याकरिता कर्मचारी नेमा आणि वसुलीची कार्यवाही तातडीने सुरु करावी. ज्यांनी संगनमताने मुद्रांक शुल्क चुकविलेला आहे, त्यांचे विरुध्द शासनाने कठोर कारवाई केली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्राच्या बाबतीत मी मागच्या वेळी बोललो होतो. या ठिकाणी आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात आपल्याकडे होमगार्ड आणि नागरी संरक्षण दलाची व्यवस्था केलेली आहे. होमगार्डला एक न्याय आणि नागरी संरक्षण दलाला दुसरा न्याय देण्यात येत आहे. मी गेल्या सहा वर्षापासून नागरी संरक्षण दलाचा सल्लागार म्हणून काम करीत आहे. नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकाच्या माध्यमातून अनेक प्रकारची कामे करु शकतो. राज्यात नैसर्गिक आपत्ती येते, पूर येतो, संकटे येतात, अशा वेळी नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवक आपल्या उपयोगी पडतात. परंतु त्यांना सुविधा देण्याकडे शासनाकडून दुर्लक्ष केले जाते. त्यांच्या दैनंदिन भत्त्यात वाढ केली पाहिजे. त्यांना योग्य ती यंत्रणा उपलब्ध करुन दिली पाहिजे. आपण पुढच्या काळात रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हे सुध्दा नागरी संरक्षण दलात घेत आहात. परंतु त्या ठिकाणी योग्य पध्दतीने निधीची व्यवस्था केली नाही तर त्याचा काही उपयोग होणार नाही. नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकाच्या दैनंदिन भत्त्यामध्ये वाढ करावी.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश केळकर...

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात राज्यातील विविध देवस्थानांचा विकास करण्यासाठी तरतूद उपलब्ध करुन दिली आहे. कोकणामध्ये अनेक धार्मिक स्थळे आणि पर्यटन स्थळे आहेत. कोकणातील देवस्थानाचा विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन दिलेला नाही. कोकणातील देवस्थांनाचा विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, ज्या शैक्षणिक संस्थांना 50 वर्षे पूर्ण झाली आहेत, ज्यांना 100 वर्षे पूर्ण झ ाली आहेत, अशा संस्थांना शासनाकडून अनुदान दिले जात आहे. परंतु या शैक्षणिक संस्थांना अनुदान पदरात पडण्यासाठी खूप दिरंगाई होते. या शैक्षणिक संस्थांना ठराविक कालावधीत अनुदान मिळाले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, 50 व 100 वर्षे पूर्ण झालेल्या ग्रंथालयांना देखील अनुदान उपलब्ध करुन दिले पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो आणि वेळे अभावी मी माझे मनोगत पूर्ण करतो.

----

यानंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा. ( विधानसभा द्वारा निर्वाचित ) : सभापति महोदय, मुझ से पहले बोलने वाले अनेक माननीय सदस्यों ने यहां पर एक घंटे तक भाषण किया है उस के बाद कुछ माननीय सदस्य 40-50 मिनट बोले तथा अभी कुछ माननीय सदस्य 15-20 मिनट तक बोले हैं. ज्यादा समय न लेकर सिर्फ 15 मिनट में ही मैं अपना भाषण समाप्त कर दूंगा.

अनेक माननीय सदस्यों ने पूरे बजट पर तथा अलग-अलग विभागों के बारे में भी अपनी राय यहां पर दी है. माननीय सदस्यों ने यहां पर बताया कि सरकार को कितना रिवेन्यु मिलेगा और सरकार उस पैसे को कहा-कहां पर खर्च करेगी.

सभापति महोदय, यह बात सभी को मालूम है कि सरकार को जो रिवेन्यु फिलहाल प्राप्त हो रहा है, उसका 70 प्रतिशत पैसा कर्मचारियों की पगार, पेंशन और सरकार ने जो कर्ज लिया है, उसका ब्याज चुकाने में ही खर्च हो रहा है. इसलिए विकास कामों के लिए तो हमारे पास सिर्फ 30 प्रतिशत बजट ही बचता है. बजट का सिर्फ 30 प्रतिशत हिस्सा यानी 41 हजार 5 सौ करोड़ रुपए ही हम विकास कार्यों पर खर्च कर सकते हैं. सभागृह में चर्चा करने के बाद हम यह जरुर ठहरा सकते हैं कि कितना पैसा कौन से विकास कार्य पर खर्च किया जाना चाहिए, लेकिन विकास कार्यों पर खर्च की जाने वाली कुल रकम हमारे पास सिर्फ 41 हजार 5 सौ करोड़ रुपए ही उपलब्ध है.

सभापति महोदय, बजट बनाने का हमारा तरीका बहुत ही ट्रेडिशनल है. यह बात सही है कि अभी केंद्र सरकार ने और बहुत सी राज्य सरकारों ने भी अब बजट का बनाने का सिस्टम थोड़ा रेशनलाइज किया है. ऐसा उन्होंने फिसकल डिसिप्लीन लाने के लिए किया है. हमारे यहा पर फिसकल डिसिप्लीन एक्ट है. जिसके अनुसार तीन साल के अंदर फिसकल डेफिसिट नहीं रहेगा. हमारे राज्य में इस बार टेक्नीकली फिसकल डेफिसिट नहीं है. क्योंकि 58 करोड़ रुपए की बचत इस बजट में दिखायी गयी है.

इस बात में कोई दो राय नहीं हैं कि हमारी आय बढ़ी है. लेकिन बजट बनाने के अपने ट्रेडिशनल तरीके में हमे बदलाव करना पड़ेगा. हमें यह देखना पड़ेगा कि पगार, पेंशन और ब्याज पर होने वाला खर्च 50 प्रतिशत से ज्यादा न होने पाये. हमारे राज्य का जो जीडीपी है उसका



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा.....

कम से कम 50 प्रतिशत हिस्सा विकास कार्यों पर खर्च होना बहुत जरुरी है.उसके लिए हमें बहुत से सुधार करने पड़ेंगे. मैं पहले भी कह चुका हूं कि हमारे यहां पर फिसकल डिसिप्लीन की कमी होने की वजह से हमारा बहुत सारा पैसा व्यर्थ हो जाता है.

हमारे राज्य में बहुत सारे प्रोजेक्ट ऐसे हैं जो 15-20 साल पहले बनने शुरु हुए थे लेकिन वे प्रोजेक्ट अभी तक बनकर पूरे नहीं हुए हैं. मैं गोसीखुर्द प्रोजेक्ट को डील कर रहा हूं इसलिए उस प्रोजेक्ट का जिक्र मैं यहां पर करना चाहूंगा. जब वह प्रोजेक्ट बनना शुरु हुआ तो उस समय इस प्रोजेक्ट की कुल कॉस्ट सिर्फ 5-7 सौ करोड़ रुपए ही थी, जबकि आज उस प्रोजेक्ट की लागत 12 हजार करोड़ रुपए से भी ऊपर चली गयी है. हमारा कहना है कि आप एक ऐसा कानून बनाएं, जिसमें यह प्रावधान हो कि कोई भी प्रोजेक्ट समयबद्ध तरीके से पूरा किया जाएगा. मुझे पूछना है कि आप ऐसा कानून बनाएंगे या नहीं ?

पिछले 15-20 वर्षों में महाराष्ट्र सरकार ने करीब 4 हजार इरीगेशन प्रोजेक्ट चालू किए हैं. बहुत सारे प्रोजेक्ट्स के लिए सरकार ने किसानों की जमीन ले ली . लेकिन उन किसानों को आज तक मुआवजा नहीं मिला है, न ही उन किसानों का पुनर्वसन किया गया है. इस प्रकार किसानों की जमीन तो चली गयी, उनके खेत तो चले गए, लेकिन जिस काम के लिए सरकार ने उन किसानों की जमीन ली थी वे काम अभी तक वहां पर सरकार की ओर से पूरे नहीं किए गए हैं. किसानों की बहुत सारी जमीन इरीगेशन प्रोजेक्ट तथा उद्योग शुरु करने के लिए ली गयी थी, परन्तु न तो वहां पर इरीगेशन प्रोजेक्ट आ पाए हैं और न ही वहां पर उद्योग धंधे शुरु हो पाए हैं. जिसकी वजह से हमारी सरकार, यहां की जनता और जन प्रतिनिधियों का बहुत सारा कीमती समय इन्हीं छोटी-छोटी बातों को सुलझाने में चला जाता है.

सभापति महोदय, हमारे सदन के माननीय शिक्षक आमदार हमेशा शिक्षकों की भलाई की बात करते हैं, यह अच्छी बात है. लेकिन हमें यह भी देखना पड़ेगा कि हम अपने कर्मचारियों की संख्या कितनी बढायें ? हमारी वर्किंग मॅन पावर कितनी रहनी चाहिए, इस बात पर विचार करना आवश्यक है, ताकि सरकार की लायलिबिटी बहुत ज्यादा न बढ़ने पाये. इसलिए हमारा सुझाव है कि एक एडमिनिस्ट्रेटिव रिफार्म कमीशन बनाया जाए ताकि यह कमीशन अगले 5-6 महीनों में यह

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

29-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4O-3

SGB/ DD/MMP 19:35

श्री जमा...

रिपोर्ट दे सके कि हम सरकार की एडमिनिस्ट्रेटिव कॉस्ट कैसे कम कर सकते हैं. हमारी कोशिश यही रहनी चाहिए कि हमारा प्रशासनिक खर्च कम से कम हो. इस बात को मैं फिर से दोहराना चाहूंगा कि हमारे सभी प्रोजेक्ट समय पर पूरा करने के लिए एक कानून बनाया जाना चाहिए. उन प्रोजेक्ट्स को पूरा करने के लिए हमारा टाइम बाउंड प्रोग्राम होना चाहिए. यदि कोई प्रोजेक्ट पूरा करने के लिए आपने तीन साल का समय निर्धारित किया है तो वह प्रोजेक्ट तीन साल में पूरा होना ही चाहिए,......

...4 पी- 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा.....

यदि कोई विशेष अड़चन उस प्रोजेक्ट को पूरा करने में आती है तो थोड़ी-बहुत छूट दी जा सकती है लेकिन तीन साल में पूरा होने वाला प्रोजेक्ट किसी भी हालत में 5 साल के अंदर तो पूरा होना ही चाहिए.

ऐसा बताया जा रहा है कि हमारे यहां पर 1 लाख 51 हजार करोड़ रुपए का इन्वेस्टमेंट आएगा और उसके माध्यम से यहां पर उद्योग शुरु होंगे और स्वाभाविक रुप से उसके जरिए यहां पर रोजगार बढ़ेगा. एक माननीय सदस्य ने यहां पर आंकड़े देकर अपनी बात कही है. मेरे पास भी बहुत सारे आंकड़े हैं लेकिन आंकड़े देकर मैं सभागृह का ज्यादा समय लेना नहीं चाहूंगा. लेकिन वह उद्योग यहां पर कितने दिन में खुला और उद्योग आने के बाद यहां पर रोजगार बढ़ा या नहीं बढ़ा. साथ ही जितना इंवेस्टमेंट आने की हमने उम्मीद की थी और लिखित रुप में दिखाया था, उतना इन्वेस्टमेंट आया या नहीं आया. इन सभी बातों पर सरकार को ध्यान देना पड़ेगा.

मैं कहना चाहूंगा कि रिवेन्यु बढ़ाने के लिए हमारे यहां पर कई उपाय किए जा सकते हैं. उदाहरण के तौर पर हमारे यहां पर बड़े पैमाने पर इल्लीगल माइनिंग हो रही है.इल्लीगल मुरुम जा रहा है मुरुम के पहाड़ खत्म हो रहे हैं, सेंड की इल्लीगल माइनिंग हो रही है. इस संबंध में यदि हम थोड़ी सी सावधानी बरतें और भ्रष्टाचार पर रोक लगाएं तो सरकार की करोड़ों रुपए की आमदानी बढ़ सकती है.

एक बात मैं यहां पर पावर ट्रांस्मीशन की करुंगा. पावर की बहुत चोरी हमारे यहां पर होती है. हम आंकड़े देकर यह सिद्ध कर देते हैं कि पावर की जितनी अधिक चोरी पहले होती थी, उतने परसेंट चोरी अब नहीं होती. इस तरह के आंकड़े देकर हम खुश हो जाते हैं. मेरा कहना है कि पावर ट्रांस्मीशन लॉस पर ध्यान देकर हम सरकार की आमदनी बढ़ा सकते हैं.

अभी यहां पर हमारे श्रम मंत्री महोदय बैठे थे. सभापति महोदय, मैं आपके माध्यम से श्रम मंत्री महोदय को कहना चाहूंगा कि हमारे यहां पर हजारों स्माल स्केल इंडस्ट्रीज बंद पड़ी हैं. हमारी बहुत सारी जमीन वहां पर फंसी हुई है और बहुत सारा केपिटल भी हमारा उसमें लगा हुआ है. फैक्ट्रीज बंद होने की वजह से हमें बहुत नुकसान हो रहा है. हमारा कहना है कि एक

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा....

कमीशन या एक त्रिपक्षीय समिति बनाकर इन लघु उद्योगों को शुरु करने के बारे में ध्यान दिया जाना चाहिए. यदि हम इन बंद उद्योगों में से सिर्फ 10-15 प्रतिशत उद्योगों को भी फिर से शुरु करा सके तो इससे भी हमारी सरकार की आमदनी बढ़ेगी और रोजगार भी बढ़ सकेगा. इस ओर सरकार को ध्यान देना चाहिए.

सभापति महोदय, मैं पहले भी कह चुका हूं और हमारे माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी साहब ने भी आंकड़े देकर यहां पर बताया कि ग्रामीण क्षेत्रों से ज्यादा गरीबी और बेरोजगारी आज शहरी क्षेत्रों में है. इस तरह की स्थिति के आंकड़े केंद्र सरकार के भी हैं और हमारे राज्य के आंकड़े भी यही बताते हैं कि ग्रामीण क्षेत्रों से ज्यादा बेरोजगारी और गरीबी शहरी क्षेत्रों में है. इस ओर हमें ध्यान देना होगा. यहां पर यह भी कहा गया कि ग्रामीण क्षेत्रों की बेराजगारी और गरीबी तो हम राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना के माध्यम से दूर कर सकते है. इसलिए हमारा कहना है कि शहरी क्षेत्र की गरीबी दूर करने के लिए हमें अपने राज्य की रोजगार हमी योजना का उपयोग करना चाहिए और उसके माध्यम से हमें शहरी क्षेत्र के बेरोजगारों को रोजगार दिलाने की कोई स्कीम राज्य सरकार को बनानी चाहिए.

सभापति महोदय, मैं विदर्भ के नागपुर शहर में रहता हूं. मैं यहां पर राजनीतिक दृष्टि से कुछ नहीं बोलना चाहता. मैं उद्योग क्षेत्र में काम करता हूं. मैं कहना चाहता हूं कि आज विदर्भ में कोई थर्मल पावर प्रोजेक्ट लाने की आवश्यकता नहीं है. क्योंकि अभी मौदा में केंद्र सरकार द्वारा एनटीपीसी का एक पावर प्रोजेक्ट शुरु किया जा रहा है. मौदा में अभी 1 हजार मेगावाट का पावर प्रोजेक्ट आया और माननीय केंद्रीय मंत्री श्री सुशीलकुमार शिंदे साहब ने अब उसको 2230 मेगावाट कर दिया है. उस पावर प्रोजेक्ट के लिए कोयला 8 सौ किलोमीटर की दूरी से उड़ीसा से लाना पड़ेगा. हम सभी अंदाज लगा सकते हैं कि यदि सिर्फ 1 हजार मेगावाट का भी प्रोजेक्ट हमने वहां पर लगाया तो उसके लिए वहां पर कितने हजार टन कोयले की आवश्यकता पड़ेगी. हमारे विदर्भ में उतना कोयला न होने की वजह उस प्रोजेक्ट के लिए इतनी दूर से कोयला ट्रांस्पोर्ट करना पड़ेगा. यदि वहां पर हाइड्रो पावर प्रोजेक्ट लाने की कोई बात हो तो हम समझ सकते हैं. क्योंकि साढ़े तीन सौ करोड़ रुपए का प्रावधान बजट में पावर प्रोजेक्ट के

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा....

लिए किया गया है. लेकिन अब वहां पर थर्मल पावर लाने की कोई गुंजाइश नहीं है. हमारे यहां पर पीने का पानी नहीं है, इरीगेशन का पानी भी हमारे यहां पर नहीं है. डॅम का पानी हम नागपुर महानगर पालिका को देते हैं और कोराड़ी थर्मल पावर प्रोजेक्ट को भी सप्लाय करते हैं. इसलिए इस ओर सरकार को ध्यान देना होगा.

मैं महाराष्ट्र सरकार का अभिनन्दन करना चाहता हूं कि उन्होंने अभी पहला गोरेवाडा जिओलॉजिकल गार्डन के बारे में प्रस्ताव दिया है. हमारे माननीय उप मुख्यमंत्री जी ने परसों के दिन नागपुर में एक मीटिंग भी ली थी. मैं भी उस मीटिंग में उपस्थित था. उन्होंने वहां पर कहा कि महाराष्ट्र का पहला जिओलॉजिकल गार्डन वहां पर बनाया जाएगा. हमारे हिन्दुस्तान के सबसे ज्यादा टाईगर विदंर्भ में पाये जाते हैं. वहां पर एक टाईगर हब भी बनने वाला है.

4 क्यू - 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा....

मैं बताना चाहूंगा कि तीन दिन पहले ही प्लानिंग कमीशन के वाईस चेयरमेन डॉ. मोन्टेक सिंह आहलुवालिया जी नागपुर में आये थे. उन्होंने यह माना कि विदर्भ दूसरे क्षेत्रों से पिछड़ा हुआ है, वहां पर बॅकलॉग है. शासन का हम इस बात के लिए अभिनन्दन करते हैं कि इस बॅकलॉग संबंधी स्टडी करने के लिए शासन ने एक कमेटी बनाने का निर्णय लिया है. इस बात का जिक्र राज्यपाल महोदय के अभिभाषण में भी किया गया है.

एक अच्छी बात यह है कि हमारा जो ह्युमन डॅवलपमेंट इंडेक्स है, उसको हम स्टेट लेवल पर मापते हैं. लेकिन अब हम उसको जिला स्तर पर मापेंगे. मुझे लगता है कि ऐसा करना संतुलित विकास करने की दिशा में एक अच्छा कदम होगा.

एक बात मैं यहां पर यह कहना चाहूंगा कि कपास हमारे विदर्भ क्षेत्र में पैदा होता है लेकिन कपड़ा बनाने की सभी प्रक्रिया कोल्हापूर और सोलापूर में होती है. हमारे यहां पर न तो जीनिंग फैक्ट्री हैं और न ही टैक्सटाईल मिल हैं. हमारे यहां पर एम्प्रेस मिल, मॉडर्न मिल तथा टैक्सटाइल कारपोरेशन के सारे मिल बंद हो गये हैं. हमारे यहां पर कुछ एग्रो बेस्ड, फारेस्ट बेस्ड तथा टैक्सटाईल बेस्ड इंडस्ट्री लाने की कोशिश हो तो हमारे क्षेत्र का आर्थिक विकास होगा तथा हमारे गरीब किसान जो आज आत्महत्या कर रहें हैं, उनकी आत्म हत्या रुक सकेंगी. डॉ. मोन्टेक सिंह आहलुवालिया ने यह भी कहा है कि माननीय प्रधान मंत्री द्वारा 3750 करोड़ रुपए का जो पॅकेज दिया गया था, उस बारे में वह जांच करायेंगे कि उसका इस्तेमाल सही ढंग से हुआ है या नहीं. यह विषय भी बहुत चिंता का है कि मदद के सारे प्रयत्न करने के बाद भी हमारे क्षेत्र के किसानों की आत्महत्याएं रुक नहीं पा रही हैं. मैंने पहले भी कहा कि शहरी विभाग में ज्यादा गरीब लोग रहते हैं, वे मजदूरी करते हैं और झोपड़पटटी में रहते हैं या किसी भी छोटी सी जगह में तिरपाल डाल कर रह लेते हैं, लेकिन आत्महत्या नहीं करते.

दूसरी जगहों पर भी किसान आत्महत्या करते हैं. लेकिन महाराष्ट्र में देखा जाए तो आत्महत्या करने के लिए हमारा पश्चिम विदर्भ क्षेत्र बहुत बदनाम हो रहा है. इसलिए इसको

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा.....

रोकने के लिए कुछ आवश्यक उपाय महाराष्ट्र सरकार द्वारा किया जाना बहुत आवश्यक है. इस बारे में सर्व पक्षीय मीटिंग बुलाकर, या अंतर्राष्ट्रीय लेवल के एक्सपर्ट लोगों को बुलाकर तथा केंद्र सरकार के लोगों को बुलाकर यह बात जानने की कोशिश करनी चाहिए कि हमारे यहां पर आत्महत्याएं क्यों हो रही हैं और इनको कैसे रोका जा सकता है. हमारे यहां पर कुपोषण की समस्या भी जल्द से जल्द हल की जानी चाहिए. बजट बनाते समय हमें आर्थिक प्रगति की ओर ध्यान देना बहुत आवश्यक है. जिला स्तर पर ह्युमन डॅवलपमेंट इंडेक्स बनाने से हमें इस संबंध में उपाय करने में जरुर मदद मिलेगी.

सभापति महोदय, मैं मजदूर क्षेत्र में काम करता हूं इसलिए मैं मजदूरों से संबंधित तथा अल्पसंख्यकों की समस्याओं से संबंधित कुछ बातें भी यहां पर बोलना चाहूंगा. मैं यहां पर पहले भी कई बार कह चुका हूं कि हमारे राज्य के श्रमिकों की हालत ठीक नहीं है. श्रम विभाग को जितना पैसा मिलना चाहिए, उतना पैसा श्रम विभाग को नहीं मिलता है. मैं बताना चाहूंगा कि लेबर डिपार्टमेंट में इन्फ्रास्ट्रक्चर की बहुत कमी है. मॅन पावर की कमी है, लेबर इंस्पेक्टर्स की कमी है. एक विशेष बात का जिक्र मैं यहां पर करना चाहूंगा कि हमने मिनिमम वेजेज एक्ट तो बना दिया है लेकिन उसको इम्पलीमेंट करने के लिए हमारे विभाग के पास कर्मचारी नहीं है. मैं विनती करुंगा कि लेबर मिनिस्ट्री को ज्यादा पैसा दिया जाये.

सभापति महोदय, मैं यहां पर अल्पसंख्यकों का भी प्रतिनिधित्व करता हूं इसलिए दो तीन बातें मैं उनके बारे में भी कहना चाहूंगा. मेरा कहना है कि महाराष्ट्र हेंडलूम कारपोरेशन बंद होने के बाद हमारे बुनकर समाज के लोग चाहे वे मुस्लिम समाज के हों या कोष्टी समाज के हों, उनकी हालत अच्छी नहीं है. हेंडलूम कारपोरेशन बंद हो जाने की वजह से बेचारे बुनकर समाज के लोग एकदम सड़क पर आ गए हैं. आमदनी का काई जरिया उनके पास नहीं है. मैं सरकार से अनुरोध करुंगा कि उनकी ओर विशेष ध्यान दिया जाए.

मेरी एक मांग यह है कि नागपुर शहर के अंदर एक अन्तर्राष्ट्रीय स्तर का इस्लामिक रिसर्च सेंटर बनाया जाना चाहिए. इस बारे में हमने माननीय मुख्यमंत्री महोदय से भी बात की है.

...3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा....

क्योंकि 1960 से पहले सी. पी. एण्ड बरार नाम का क्षेत्र था और उसकी राजधानी नागपुर थी. वह एरिया अब महाराष्ट्र में आने की वजह से नागपुर का दर्जा अब राजधानी का न रहकर अब उस शहर का दर्जा उप राजधानी स्तर का हो गया है. विदर्भ राज्य बनेगा या नहीं बनेगा उस बारे में अभी कुछ नहीं कहा जा सकता है. वह एक नेशनल इश्यू है. लेकिन मेरा कहना है कि नागपुर शहर में अन्तर्राष्ट्रीय स्तर का एक इस्लामिक रिसर्च सेंटर बनाया जाना चाहिए. उस सेंटर में उर्दू, अरबी और फारसी भाषा के बारे में रिसर्च होनी चाहिए. हमारे अमरावती और यवतमाल क्षेत्र में शिक्षा का स्तर बहुत ऊंचा है. इसलिए एक रिसर्च सेंटर अमरावती या नागपुर शहर में बनना चाहिए. मेरे हिसाब से यह सेंटर नागपुर शहर में ज्यादा सुविधाजनक रहेगा.

इस बजट का मैं स्वागत करता हूं क्योंकि आज के वातावरण में इससे अच्छा बजट बना पाना संभव नहीं है. महाराष्ट्र के संतुलित विकास का प्रयत्न हमारे माननीय वित्त मंत्री महोदय ने इस बजट के माध्यम से किया है.

सभापति महोदय, आपने मुझे बोलने का समय दिया, इसके लिए मैं आपका आभार मानते हुए अपना भाषण समाप्त करता हूं. धन्यवाद.

-0-

...4 आर-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले ( पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था ) :सभापती महोदय, 2011-2012 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्याकरिता व या अर्थसंकल्पाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पावर बोलत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी ग्रामीण भागातील प्रश्न मांडले आणि ते प्रश्न सोडविण्यासाठी काही सूचना देखील केल्या आहेत. महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता शहरीकरणाला जास्तीत जास्त महत्व देण्यात आले पाहिजे. असे मला या चर्चेच्या अनुषंगाने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, काही उद्योगपती आणि व्यापारी यांनी एकत्र येऊन पुणे शहरामध्ये शून्य भारनियमनाचा प्रकल्प हाती घेतला होता व एक कंपनी स्थापन करुन पुणे शहरातील भार नियमनाचा प्रश्न काही अंशी कमी करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु त्यामुळे पुणे शहरातील सर्वच प्रश्न सुटलेले आहेत असे नाही. या ठिकाणी मी फक्त पुणे शहरापुरतेच बोलणार नाही. शहरी भागातील विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने प्रयत्न केला पाहिजे, असे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. खाजगी कंपनीच्या माध्यमातून वीज निर्मितीचे प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत. त्या ठिकाणी कर सवलतीच्या बाबतीत अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. तसेच जागेचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. तेव्हा पुणे शहरातील एनर्जी प्रोजेक्ट पूर्ण करण्याकरीता शासनाने प्रयत्न केला तर त्यात शासनाला यश येऊ शकेल.

सभापती महोदय, शहरी भागासाठी केन्द्र सरकारने जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियान राज्य सरकारकडे पाठवले होते. त्या अनुषंगाने राज्य सरकारने 20 टक्के हिस्सा देऊन शहरी भागाच्या विकासासाठी महानगरपालिकांना निधी दिला आहे. महानगरपालिका वा नगरपालिका यांना जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियानाच्या अंतर्गत केवळ अर्थ सहाय्य करुन चालणार नाही तर त्या भागाचा विकास करण्यासाठी तसेच महानगरपालिका आर्थिक दृष्टया अधिक बळकट करण्यासाठी राज्य सरकारने अधिक प्रयत्न केले पाहिजेत. पुणे शहरासाठी पुणे विकास प्राधिकरण स्थापन करुन दोन वर्षे होऊन गेली आहेत. या प्राधिकरणाचे सदस्य सुध्दा निवडण्यात आलेले आहेत परंतु प्रत्यक्षात या प्राधिकरणाचे कोणतेही काम सुरु झालेले नाही. पुणे विकास प्राधिकरणासाठी आर्थिक मदत देण्यात आलेली नाही. पुणे विकास प्राधिकरणाचे काम सुरु होण्यासाठी या अर्थसंकल्पात काही तरतूद करण्यात आली असती तर ते अधिक बरे झाले असते असे मला या चर्चेच्या निमित्ताने आपल्याला सांगावयाचे आहे. 1991 साली पुणे शहराची लोकसंख्या 17.5 लाख एवढी होती आज पुणे शहराची लोकसंख्या 40 ते 45 लाखापर्यंत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले..

वाढलेली आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे शहरी भागामध्ये वाहतुकीच्या अनेक समस्या निर्माण होत आहेत. पुणे शहरातील सर्व पक्षीय मंडळीनी मेट्रो योजना राज्य शासनाला सादर केली होती. परंतु मुंबईच्या मेट्रो योजनेकडे राज्य शासन अधिक लक्ष देत आहे आणि वर्ष दोन वर्षात मुंबईमध्ये मेट्रो सुरु होईल. मात्र ज्या प्रमाणे मुंबई शहराकडे लक्ष दिले जाते, त्याप्रमाणे पुणे शहराकडे लक्ष दिले जात नाही. अशा प्रकारे शासन दोन शहरामध्ये भेदभाव का करीत आहे ? मुंबई शहराप्रमाणेच पुणे शहरातही मेट्रो लवकरात लवकर सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने निर्णय घ्यावा,अशी माझी शासनाला या चर्चेच्या निमित्ताने विनंती आहे.

सभापती महोदय, पुणे शहराचा विकास आराखडा दहा वर्षा पूर्वी मंजूर करुन तो शासनाकडे अंतिम मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. आज पुणे शहराच्या विकासाच्या दृष्टीने विकास आराखडयाला त्वरित मान्यता देणे, हा देखील तितकाच महत्वाचा प्रश्न आहे असे मला सांगावयाचे आहे. दहा वर्षा पूर्वी पुणे शहराचा विकास आराखडा शासनाकडे पाठवून सुध्दा अजूनही त्याबाबतीत निर्णय घेण्यात आलेला नाही. जुन्या विकास आराखडयानुसार 35 टक्के सुध्दा विकास आम्ही करु शकलेलो नाही. सभापती महोदय, पुणे शहराच्या विकास आराखडयाच्या बाबतीत शासनाने त्वरित निर्णय घ्यावा, अशी मी आपल्या माध्यमातून शासनाला पुन्हा एकदा विनंती करीत आहे.

सभापती महोदय, काही महानगरपालिका आणि नगरपालिकांमध्ये काम करणा-या कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु काही महानगरपालिकेच्या वाहतूक कंपन्या वा शिक्षकांना वेतन आयोग अजूनही लागू केलेला नाही. या कर्मचा-यांकडून आपण चांगल्या कामाची अपेक्षा करतो. त्यांच्याकडून विकासाची कामे अधिक चांगल्या प्रकारे व्हावीत, अशी देखील अपेक्षा करतो परंतु त्यांना अजूनही वेतन आयोग लागू केलेला नाही. तेव्हा याबाबतीत देखील शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, पुणे शहरामध्ये पी.एम.टी. नावाची वाहतूक कंपनी स्थापन करण्यात आली आहे. राज्य शासनाने त्याकरिता निधी दिला पाहिजे. परंतु शासनाकडून निधी मिळेल, अशी अपेक्षा न करता पुणे शहरातील नागरिकांनी पुणे महानगरपालिकेच्या वतीने पी.एम.टी.साठी आर्थिक सहाय्य दिले आहे. ही वाहतूक कंपनी स्थापन करुन चार वर्षे होऊन गेली आहेत.

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )** नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल भोसले...

गेल्या चार वर्षात एकूण आठ अधिकारी मला असे दिसले की, त्यांनी या कंपनीची सुधारणा करण्यापूर्वी स्वत:ची सुधारणा करण्यासाठी या जागेवरुन दुसऱ्या जागेवर बदलीसाठी प्रयत्न केले. तेव्हा ही वहातूक सुधारण्यासाठी एक सक्षम अधिकारी आपण आम्हाला दिला पाहिजे. त्याचप्रमाणे मुंबईच्या बेस्ट कंपनीचे उदाहरण डोळयापुढे ठेवून मुंबई शहरामध्ये प्रवासी वहातूक करण्याबरोबर या कंपनीला पर्यायी कंपनी म्हणून विद्युत पुरवठा कंपनी जोडली आहे. त्याप्रमाणे पुणे शहरातील प्रवासी वहातूक कंपनीबरोबर तेथील विद्युत पुरवठा कंपनी जोडण्याचा निर्णय घेतला तर शहराच्या विकासाचे अनेक प्रश्न मार्गी लागून आपण या शहराचा विकास करु शकतो.

सभापती महोदय, आज श्‍तीच्या प्रश्नाबाबत अनेक माननीय सदस्यांनी समस्या मांडल्या आहेत. शेतीला जोड धंदा सुरु करण्यासाठी ग्रामीण भागातील तरुण शहरामध्ये येत असतो. त्यादृष्टीने या तरुणांना रोजगार उपलब्ध होण्याकरिता जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देऊन महाराष्ट्रामध्ये औद्योगिकीकरण अधिक कसे वाढेल व महाराष्ट्राच्या उत्पन्नामध्ये अधिक भर कशी पडेल या दृष्टीने विचार करावा एवढे बोलून आणि या अर्थसंकल्पाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी दिनांक 23 मार्च 2011 रोजी सन 2011-12 चा राज्याचा अर्थसंकल्प या सभागृहामध्ये सादर केला. त्या अर्थसंकल्पाच्या भाषणाला माझा पहिला आक्षेप असा नोंदवावयाचा आहे की, या भाषणाची सुरुवात "अध्यक्ष महाराज" अशी करण्यात आली आहे. हे ज्येष्ठांचे उच्च सभागृह असल्यामुळे परंपरेनुसार आपण या ठिकाणी पीठासीन अधिका-यांचा "माननीय सभापती" असा उल्लेख करीत असतांना पुस्तकामध्ये मात्र "अध्यक्ष महाराज" अशाप्रकारे उल्लेख करण्यात आला आहे. त्याऐवजी अध्यक्ष/सभापती असा उल्लेख केला असता तर बरे झाले असते. त्यामुळे आता आम्हाला अध्यक्ष महोदय असे बोलूनच आपल्या भाषणाला सुरुवात केली पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, राज्याच्या कृषी उद्योगाला चालना देणारा आणि तरुणांना रोजगार देणारा असा हा अर्थसंकल्प असल्याचे म्हटले आहे. परंतु माझ्या दृष्टीने ही बाब हास्यास्पद ठरेल. या अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांना अल्प व्याज दराने 50 हजार रुपयापर्यंत कर्ज मिळणार आहे. विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांना एवढी कर्जाऊ रक्कम कधीच मिळत नाही. त्यांना प्रति एकरी किमान सात ते आठ हजार रुपयापर्यंतच कर्ज मिळते. त्याचप्रमाणे ते शेतकरी 3 लाख रुपयापर्यंतचे एवढे मोठे कर्ज कधीच घेऊ शकत नाहीत. तेव्हा याठिकाणी पीक कर्ज म्हटले असले तरी या कर्जाच्या व्याख्येमध्ये कोणत्या बाबी अंतर्भूत आहेत याचा उल्लेख करण्यात आला पाहिजे. ज्यावेळी त्याला बैल जोडी आणि बैल बंडीची आवश्यकता असते, नांगर, वखरणची आवश्यकता असते, त्यावेळी तो पीक कर्ज घेतो. त्याच्या शेताची डुकरे, हरणे वानरे ही जंगली जनावरे नासाडी करतात त्यांच्यासाठी आपण सोलर फेन्सिंगची व्यवस्था करणार काय? आपण त्यांना 3 लाखापर्यंतचे कर्ज 2 टक्के व्याज दराने देणार आहात त्यामध्ये त्यांना लागणाऱ्या शेतीच्या अवजारांचा समावेश करणार काय? आज जर त्याला ट्रॅक्टर विकत घ्यावयाचा असेल तर त्याची किंमत 5 लाखापेक्षा कमी नसते. म्हणून या पीक कर्जामध्ये ट्रॅक्टरचाही समावेश करावा अशी मी आग्रहाची मागणी करतो. आपण यामध्ये शेतकऱ्यांच्या हिताचा विचार केला असेल तर केवळ 84 कोटी 28 लक्ष रुपयांचे अनुदान देऊन भागणार नाही. या तुटपुंज्या अनुदानामधून शेतकऱ्याला काहीही मिळू शकत नसल्यामुळे आपण हे अनुदान वाढवून देणार आहात काय हा खरा प्रश्न आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर....

दर तीन वर्षांनी रासायनिक खतांच्या साठवणुकीसाठी दिल्या जाणाऱ्या निधीमध्ये शेतकऱ्यांची शुध्द फसवणूक केली जाते. या 51 कोटी 50 लक्ष रुपयांमध्ये किती हजार टन रासायनिक खत येणार आहे? डीएपी या खताचे दर प्रति बॅग 50 रुपयांनी वाढले आहेत. आज आपण डीएपी खताचा विचार करीत असाल तर 10 हजार टनाच्या वर डीएपीचे खत येऊ शकत नाही इतकी त्याची किंमत असते. अशा परिस्थितीत महाराष्ट्रातील 33 जिल्ह्यांना हे खत पुरणार आहे काय? आजही आमच्या विभागामध्ये साडे तीनशे रुपये दराने यूरिया विकला जात आहे. खतासाठी आपण 15 फेब्रुवारी रोजी केंद्र सरकारकडे रेकची मागणी केली होती. आता रब्बीच्या पिकाचा हंगाम सुरु आहे,

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर . . ..

धानाचे पीक घेतले जात आहे आणि त्यासाठी युरिया खताची आवश्यकता आहे. मी संबंधित विभागाचे माननीय मंत्री महोदय आणि प्रधान सचिव यांना पत्र दिलेले आहे की, युरिया खताची रेक अजूनपर्यंत पोहोचलेली नाही. म्हणून मला सांगावयाचे आहे की, शेतकऱ्यांना देण्यात येणारे अनुदान थोटके आहे. जर युरिया खताची रॅक तात्काळ पोहोचली नाही तर शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान होणार आहे. म्हणून मला विनंती करावयाची आहे की, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यासाठी युरिया खताची रॅक पोहोचण्याची आवश्यकता आहे. ही योजना खऱ्या अर्थाने चालवावयाची असेल आणि यातील काळाबाजार रोखावयाचा असेल तर एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे आणि ती म्हणजे रासायनिक खत विक्रेत्यांचाही विचार केला पाहिजे. शासनाचे रेट वाढतात पण त्यांना मिळणारा जो मुनाफा आहे तो अत्यंत अल्प आहे. त्यांना एक टक्का सुध्दा मुनाफा होत नाही. केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे, सेल्स टॅक्स आणि इन्कम टॅक्सप्रमाणे 5 टक्के मुनाफा घेतला जातो. म्हणून त्यांना जो इन्कम टॅक्स भरावयाचा आहे, सेल्स टॅक्स भरावयाचा आहे त्यासाठी व्यापाऱ्यांना चोरी करावी लागते आणि अधिक दराने खत विकावे लागते. याचाही विचार केला पाहिजे जेणेकरुन शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे आणि विक्रेत्यांनाही न्याय मिळाला पाहिजे. तसेच होलसेलरला न्याय मिळाला पाहिजे, रिटेलरला देखील न्याय मिळाला पाहिजे. पण ते मिळत नाही ही यातील शोकांतिका आहे. म्हणून खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील रासायनिक खताचे, बियाणाचे, कीटकनाशकाच्या बाबतीत होणारा काळाबाजार थांबवावयाचा असेल तर कृषी मुल्य आयोगाने सांगितयाप्रमाणे प्रत्येकाचे दर ठरवत असताना विक्रीच्या दराच्या बाबतीतही योग्य विचार केला पाहिजे आणि तो अनेक वर्षापासून करण्यात आला नाही हे खेदाने सांगावेसे वाटते. त्यामुळे यामध्ये जो काळाबाजार होत आहे, त्याला मुख्य कारण हे सुध्दा आहे. 500 रुपयांची बॅग 3 किंवा 4 रुपयांच्या मुनाफ्यासाठी कोणी विकत नाही. कारण त्याला त्याच्यापेक्षा जास्त खर्च येत असतो. हे आपल्याला सर्वांना अवगत आहे, त्यामुळे यामध्ये कृषी विभागाने विशेष लक्ष घालून ही समस्या सोडविली तर महाराष्ट्रातील काळाबाजार थांबू शकतो.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक 7, मागेल त्याला वीज जोडणी याबाबत मी आपल्या माध्यमातून माननीय राज्याचे उप मुख्यमंत्री आणि ऊर्जा मंत्री यांना विनंती करीत आहे. मी माझ्या शेतीसाठी विजेच्या कनेक्शनची मागणी करीत आहे. माझी कृषी पाटोल्याला 7.70 एकर एवढी जमीन आहे. त्याठिकाणी बोअरवेल केलेली आहे आणि मी एक शेतकरी म्हणून विजेच्या कनेक्शन

श्री.केशवराव मानकर . . ..

साठी अर्ज केला आहे. आमदार म्हणून अजून एकाही अधिकाऱ्याला फोन केलेला नाही. माझ्या येथे थ्री-फेज वायर आहे आणि 50 फूट वायर टाकून मीटर लावून वीज जोडणी करावयाची आहे. मी शेतामध्ये ऊस लावलेला आहे, परंतु अजूनपर्यंत मला विजेचे कनेक्शन मिळालेले नाही. जर एका लोकप्रतिनिधींना न्याय मिळू शकत नाही तर मग ही वीज जोडणी कशा प्रकारे करणार आहात हा आमच्यासमोर प्रश्न आहे. ही वस्तुस्थिती आहे आणि माझ्याबाबतीत जे घडलेले आहे ते मी येथे सांगत आहे. जर मी राजकीय प्रेशर टाकले तर ताबडतोब हे काम होईल. पण यामुळे गरीब शेतकऱ्याचे भले होऊ शकणार नाही. म्हणून मी येथे मागणी करतो की, एक एप्रिल रोजी माननीय ऊर्जा मंत्री यांनी या योजनेचे उद्घाटन करावे आणि कनेक्शन देऊन या योजनेचा शुभारंभ करावा.

**उप सभापती** : एप्रिल फूल करतील.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, आम्हाला सरकार एप्रिल फूलच करणार आहे. हे माहिती आहे म्हणून आम्ही आपल्या माध्यमातून न्याय मिळावा अशी मागणी करीत आहोत. याठिकाणी शेतकऱ्यासाठी ज्या योजना तयार करण्यात आलेल्या आहेत, त्यासंबंधीचा जी.आर.सर्व ठिकाणी पाठविण्याची आवश्यकता आहे. जर शेतकऱ्यांना दोन टक्के आणि 50 हजाराचा लाभ द्यावयाचा असेल तर बजेट मंजूर झाल्यानंतर 15 दिवसाच्या आत जी.आर.च्या प्रती संबंधित संस्थांकडे, बँकांकडे गेल्या पाहिजेत. त्याशिवाय या योजनेचा लाभ मिळणार नाही. हा विषय फार मोठा आहे. खऱ्या अर्थाने महाराष्ट्रामध्ये ग्रामीण रोजगार योजना राबविली जाते. या योजनेचे स्वागत करतो कारण मी त्या समितीचा सदस्य आहे. ही योजना अत्यंत चांगली आहे, पण राज्यामध्ये अधिकारी असे सांगतात की, यासाठी मजूर मिळत नाहीत. माझा शासनाला पहिला प्रश्न आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये दारिद्र्य रेषेखालील किती लोक आहेत याचा विचार केला पाहिजे. त्यांना आपण अन्नधान्यासाठी 2-3 रुपये देत आहोत. मग त्यांना 100 दिवसाच्या कामाची गरज नाही काय ? जर मजूर कामावर येत नसतील तर माझी शासनाला अशी सूचना आहे की, ज्यावेळी त्यांना कामाची गरज असेल त्यावेळी ते मागणी करण्यासाठी आले तर ते लोक दारिद्र्य रेषेखालील आहेत की नाही हे समजू शकेल. गरीब माणसाला मागेल तेव्हा काम मिळाले पाहिजे. भंडारा जिल्ह्यातील साकोली येथे 64 हजार मजुरांनी नोंदणी केलेली आहे. पण त्यांना अजून काम मिळालेले नाही अशी आपल्या योजनेची स्थिती आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे.... 20:05

श्री. केशवराव मानकर

सभापती महोदय, गोंदिया जिल्हयातील रोजगार हमी योजना समितीचा दौरा का रद्द करण्यात आला या संबंधीचे उत्तर देण्यात यावे. रोजगार हमी योजनेवरील मजुरांच्या मस्टरच्या संबंधात झालेल्या भ्रष्टाचाराच्या संबंधात मी एक तारांकित प्रश्न दिलेला होता. पण तो तारांकित प्रश्न शासनाने नाकारलेला आहे, त्यामुळे मी या ठिकाणी खेद व्यक्त करतो. सभापती महोदय, मी सुमारे पावणे दोन कोटी रुपयांचा भ्रष्टाचार सभागृहासमोर मांडला पण त्याला न्याय मिळाला नाही. नाला सरळीकरणावर 16 लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. पण तो नालाच अस्तित्वात नाही. रोजगार हमी योजना समितीचे अनेक जिल्ह्यातील दौरे राजकीय द्वेषापोटी रद्द केले असे मला या ठिकाणी खेदाने सांगावे लागत आहे. रोजगार हमी योजना समितीने ज्या ज्या जिल्हयांना भेटी दिल्या त्या त्या जिल्हयातील रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांचे हजेरी रजिस्टर बघितले तर प्रत्येक जिल्ह्यामध्ये मजुरांच्या संख्येमध्ये वाढ झालेली दिसून येते.

सभापती महोदय, अर्थसंकल्पात 1.93 टक्के कर्ज उभारण्याचे प्रस्तावित केलेले आहे. मला याबाबतीत शासनाला सांगावयाचे आहे की, खऱ्या अर्थाने आता कर्ज घेण्याची गरज नाही. महागाई वाढविणारा हा अर्थसंकल्प आहे असा माझा आरोप आहे. विक्रीकर 4 टक्क्यावरुन 5 टक्के करण्यात आला आहे. त्यातून कोटयवधी रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने प्रगतीशील आणि बचतीचा हा अर्थसंकल्प आहे. सभापती महोदय, प्रत्येक मंत्र्यांनी कोणती कामे केली आणि अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या तरतूदी पैकी किती खर्च करण्यात आला यासंबंधीचा अहवाल बघितला आहे. मला या ठिकाणी अत्यंत दु:खाने सांगावे लागत आहे की, माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री आणि इतर कोणत्याही मंत्र्यांनी अर्थसंकल्पातील निधी 100 टक्के खर्च केलेला नाही. म्हणून हा अर्थसंकल्प शिलकी अर्थसंकल्प आहे. त्यामुळे प्रत्येक विभागाने किती खर्च केलेला आहे, हे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावे. सभापती महोदय, अर्थसंकल्पातील पूर्ण निधी खर्च केला असता तर अर्थसंकल्प तुटीचा झाला असता. शासनाने यासंदर्भात एक श्वेतपत्रिका काढावी. या सभागृहात अर्थसंकल्पाला मंजुरी देण्यात येते, तेव्हा या अर्थसंकल्पातील किती पैसे खर्च झालेले आहेत, याची माहिती या सभागृहाला मिळाली पाहिजे.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर......

सभापती महोदय, उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून मद्या वरील उत्पादन शुल्क वाढविण्यात आले आहे. देशी मद्यासाठी हे शुल्क मोठया प्रमाणात वाढविण्यात आले आहे. विदेशी मद्या वर हे शुल्क वाढविले असते तर आमचे काही म्हणणे नव्हते. कारण विदेशी मद्य पिणारी माणसे श्रीमंत असतात. पण मजूर, हमाल व अत्यंत गरीब माणूसे देशी मद्य पितात. देशी मद्यासाठी 240 रुपये प्रती प्रुफ लिटर इतकी वाढ केलेली आहे, ती योग्य नाही. ती उलट करण्यात यावी. विदेशी मद्यासाठी 33 रुपये प्रती बल्क लिटर वाढ करण्यात आलेली आहे त्याऐजी ती देशी मद्यासाठी करण्यात यावी आणि विदेशी मद्यासाठी 240 रुपये वाढ प्रती प्रुफ लिटर इतकी करण्यात यावी. सभापती महोदय, मी कलार समजाचा असल्यामुळे मला याबाबतची माहिती आहे. गरीब माणसाला लुटणारे हे बजेट आहे. श्रीमंत माणसाला लुटण्यात यावे आणि गरीब माणसाला ते बहाल करण्यात करावे अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात गॉगल्सवरील कर 12.5 टक्के करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. मी जो चष्मा घातलेला आहे त्यामध्ये सनग्लॉस आहे.त्यामुळे या चष्म्यातून स्पष्ट दिसते आणि उन्हापासून संरक्षण देखील होते. त्यामुळे अशा प्रकारच्या चष्म्याचे 12.5 टक्के दर वाढविण्यात येणार आहेत काय?

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर .....

हा निर्णय परत घेतला पाहिजे. गरीब माणूस 50 ते 100 रुपयाचा गॉगल वापरतो. त्यालाच आपण काळा चष्मा म्हणतो. गरीब माणसाचा 50 किंवा 100 रुपयांचा चष्मा असेल तर त्यावर सूट द्यावी. या बाबत माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य गॉगलचा उल्लेख करीत आहेत. यामध्ये ते मोघम आहे. त्यामुळे त्या बाबत स्पष्टता करावी.

सभापती महोदय, वेळ कमी असल्यामुळे मी सर्व मुद्यांना स्पर्श करु शकत नाही. मी शेवटी असे म्हणेन की, हा अर्थसंकल्प दिशाहीन आहे, गरीब माणसांना भूलथापा देणारा आहे, शेतकऱ्यांच्या विरोधी आहे. सामान्य माणसाला महागाईच्या खाईत लोटणारा हा अर्थसंकल्प आहे, असे खेदाने नमूद करुन मी माझे भाषण संपवितो.

---

**उप सभापती** : या ठिकाणी कॅबिनेट मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे उपस्थित आहेत. मी त्यांना विचारु इच्छितो की, उद्याच्या कामकाजाच्या बाबतीत काय करावयाचे ?

प्रा. लक्ष्मणराव ढोबळे : सभापती महोदय, आपले जे आदेश असतील ते मान्य करु.

**उप सभापती** : सभा□हाची बैठ□ आता स्थ□ि होऊ□ उद्या बुधवार, दिनांक 30 मार्च, 2011 रोजी सकाळी 10.00 वाजता पु□ भरेल.

( सभा□हाची बैठ□ रात्री 8 वाजू□ 11 मि□िटां□, बुधवार, दि□ां□
30 मार्च, 2011 रोजीच्या स□ाळी 10.00 वाजेपर्य□ स्थ□ि झाली )

---------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही